म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. ४५६३

BVBK-0404563

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

29 SEP 1974

OV 1974

5

# प्रतिमा

लेखक

पं. महादेवशास्त्री जोशी

[ सन १९५४ ]

BVBK-0404563

ज्ञानराज प्रकाशन
४२१ शनिवार पेठ, पुणें.

मूल्य ३ रुपये

प्रकाशक :
सौ. सुधा महादेव जोशी,
ज्ञानराज प्रकाशनाकरितां,
४२१ शनिवार पेठ, पुणें २.

## प्रारंभीं—

हा माझा सातवा कथासंग्रह आहे.

यांतली 'सांतेरीची मूर्ति' ही कथा मुंबई रेडिओच्या सौजन्यानें घेतली आहे.

'पर्जन्यकुंड' ही यांतली शेवटची कथा मूळ संस्कृतमध्यें प्रसिद्ध झालेली आहे. या संग्रहांत दिला आहे तो तिचा स्वैर अनुवाद.

मुखपृष्ठ चित्रकार श्री. दलाल यांचें आहे.

बाकी विशेष मीं सांगण्याजोगें कांहीं नाहीं.

—लेखक

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.

मुद्रक :
श्रीपाद जगन्नाथ गानू,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण पेठ, पुणें २.

प्रिय

सुधेस

समर्पित

# कथानुक्रम


| कथा | पृष्ठ |
|---|---|
| १ प्रतिमा - - - | १ |
| २ झडपणी - - - | १५ |
| ३ त्याची रसवंती गुप्त झाली - - | ३४ |
| ४ तें नाटक ! हें नाटक !! - - | ५३ |
| ५ सांतेरीची मूर्ति - - - | ७१ |
| ६ परशा पेन्शनर - - - | ८० |
| ७ पूर्वग्रह - - - | ९७ |
| ८ कसोटी - - - - | ११३ |
| ९ पर्जन्यकुंड - - - - | १३१ |

# प्रतिमा : : १ :

आईबाप हौशी असले कीं मुलगा चतुर्भुज व्हायला वेळ लागत नाहीं. निदान आमच्या कोंकणांत तरी कांहीं काळापूर्वी तशी परिस्थिति होती. वडिलांनीं मला व्याकरणशास्त्र शिकवण्यासाठीं बेळगांवांत ठेवलं होतं. कौमुदी, मनोरमा हे ग्रंथ पढून मी घरीं गेलों होतों. पुढचे ग्रंथ म्हणण्यासाठीं मला सांगलीला जायचं होतं. त्या शास्त्राचा स्नातक झाल्यावांचून लग्नाची बेडी पायांत अडकवून घेण्याची माझी इच्छा नव्हती. पण माझा हा 'पोरकट' विचार दादांनीं डोळ्यांभोंवतीं येणाऱ्या चिलटासारखा उडवून लावला आणि एका शुभमुहूर्तावर भरल्या मांडवांत गिरिजेला माझ्यापुढें उभं केलं.

लग्न झालं. नव्या नवलाईचे दोन महिने चुटकीसरसे निघून गेले. शब्दांतलं मायाजाल, सहवासांतलं माधुर्य, इंगित अन् रहस्य यांची देवाण-घेवाण, यांतून मी एक दिवस खडबडून भानावर आलों आणि कचाच्या निर्धारानें सांगलीच्या मार्गाला लागलों.

त्या विद्यालयांत अनेक विद्यार्थी शिकत होते आणि ते सगळेच ब्रह्मचारी होते. चार हातांचा पण दोन हात मागें ठेवून आलेला निराळ्या जातीचा विद्यार्थी काय तो मी एकटाच. मला तें पाहून कांहीं दिवस कसंसंच झालं. त्या ब्रह्मचाऱ्यांच्या घोळक्यांत मला माझ्या दुसऱ्या आश्रमाची वाच्यता करायला धीरच होईना. त्या छात्रगणांतले कांहीं कुमार माझे मित्र झाले होते. विष्णु जोशी तर माझ्या अंतरंगांत शिरूं पहात होता. पण मी मात्र माझं रहस्य कोणापुढेंच उघड करूं इच्छीत नव्हतों किंवा शकत नव्हतों.

त्यामुळें घराविषयीं किंवा घरच्या माणसांविषयीं बोलण्याचा प्रसंग आला तर मला कमालीची सावधानता बाळगावी लागे. चुकून कुठें त्यासंबंधीं सूचक उल्लेख झाला तर... तर त्या कृष्णेचं पाणी प्यालेल्या मुलांनीं 'ता'

वरून ताकभात ओळखला असता. सगळ्या पाठशाळेभर ती गोष्ट 'वाजे वाजे' झाली असती. आणि मग वेळीं अवेळीं थट्टेचा गुलाल उधळून त्या वात्रट पोरांनीं मला बेजार केलं असतं. त्या शतमुखी सरबत्तींतून तोंड वर काढणं कठीण कर्म होतं.

घरून निघतांनाच या थट्टेचा मासला मीं चाखला होता. माझा सांगलीला जाण्याचा बेत ऐकून आमच्या शेजारच्या भैरवकाकांनीं हसत हसत मला चिमटा घेतला होता. 'आतां कसली विद्या होते तुझी ! अरे, विद्येचा काळ ठरलेला आहे.'

'मातृस्तनं परित्यज्य
भार्यास्तनपरिग्रहः'

आमच्या सहाध्यायांनाहि सुभाषितं कांहीं कमी येत नव्हतीं ! त्यामुळें गौप्यस्फोट झाला नाहीं तोंवरच माझी घडगत होती. आमचे गुरुजीहि कांहीं कमी थट्टेखोर नव्हते. पाठाच्या वेळीं उत्तरं देतांना जरा कुठें वाचा चांचरली तरी त्यांनीं वेळोवेळीं माझी फजिती उडवायला कमी केलं नसतं. छेः ! नको रे बुवा तो प्रसंग !

पण हें रहस्य जसजसं मी आंत कोंडूं लागलों तसतसं तें मला आंतून बोंचणी देऊं लागलं. सदा सावध राहण्यामुळें गिरिजा माझा पालव सोडीनाशी झाली. ध्यानीं मनीं तीच. रात्रीं अंथरुणावर पडलों म्हणजे झोंपेच्या आधीं ती पुढें धावत येई. सभोंवतीं अंधार घेरून आलेला असला तरी अंतरांत दिवे लागत आणि त्या प्रकाशांत गिरिजेची गोरी श्रीमूर्त झळाळून दिसे. आणि मग आंतल्या आंत माझा आवाज उमटे. 'माझी गिरिजा !'

'हा वसंत ऋतु नाहीं का ? दारीं मोगरा दरवळला असेल. पाटाकडच्या झाडावरून पिकल्या फणसाचा वासहि त्यांतच मिसळला असेल. आंगणांतल्या अर्ध्या मांडवाखालीं कापशी गाय आणि तिची वंशावळ दिवसा खाल्लेल्या बेहड्याच्या फळांचा रवंथ करीत विसावली असेल. पडवीवर दादा अधून मधून जागे होऊन मोठ्यांदा खांकरत असतील. आंतल्या खोलींत आई झोंपली असेल. तिच्या पायांगती तिच्याच पांघरुणांत मनीमावशी असायलाच हवी. मधल्या

वासरींत देवांच्यासमोर नाना अन् येसू आणि बहुधा त्या दोघांच्यामध्यें गिरिजा...'

'पण तिला झोंप लागली असेल का? शक्य नाहीं. मी इथें जागा तर तीहि तिथें जागीच असली पाहिजे. पांघरुणाच्या आंत डोळे तक्क उघडे असतील तिचे. मी येतांना ती मला म्हणालीच होती. 'रात्र मला आतां वैरीण होईल!' मी निघतांना वडील माणसांच्या देखत आपल्याला दोन शब्द बोलतां येणार नाहींत म्हणून काय बायकी कावा केला तिनं! आंगण उतरतांना माझे डोळे तिला शोधतात तर ही आपली गुपचुप वहाळापलीकडच्या केतकीच्या बनांत. माझी जाती वाट त्या बनांतूनच होती. एकाएकीं कांटेरी पाती लवून मला आडवी कां झाली म्हणून पहातों तर तिच्या मुळाशीं गिरिजेचा गोंडस हात!

पातीच्या अंगाला कांटे असले तरी गिरिजा मृदुमधुर आणि भावार्द्र होती. तिच्या या अनपेक्षित एकान्त भेटीमुळें मी एकदम स्तिमित झालों. तिचे डोळे अन् नाकाची बोंडी लाल झाली होती; त्यावरूनच मला तिची वियोगव्यथा कळली. मी दिसतांच तर तिनं अभिषेकच चालू केला.

"छेः छेः! गिरिजे, असं वेडेपण नाहीं करायचं. फक्त दोन वर्षं. अन् तींसुद्धां सलग नव्हेत. मधें एकदां सुटींत येऊन जाईन. डोळे पूस अन् जा घरीं."

मी क्षणभर थांबलों अन् माझेहि डोळे अनावर होत आहेत असं समजल्यावर पुढें सटकलों. चार पावलं पडलीं नाहींत तोंच एक रुद्ध पण गोड शब्द उमटला.

"मला तुमचा एक फोटो काढून पाठवाल? माझ्या नांवें नको हं? मामंजींच्या नांवावर. मी मग न कळत तो हाताशीन. हं ऽऽ!"

विद्यालयाच्या माडींत तिसऱ्या मजल्यावर आंथरूण टाकून मी आडवा झालों रे झालों कीं केतकीच्या बनांतलं हेंच दृश्य माझ्या डोळ्यांपुढें साकार व्हायचं. तांबूस गालाची, टपोऱ्या डोळ्यांची, पुढें उभार पण मुळाशीं थोडंसं दबलेल्या नाकाची गिरिजा मला म्हणायची, 'अजून मी तिथेंच आहें. त्याच केतकीच्या बनांत. त्याच अरुंद पाउलवाटेच्या कडेवर. तुमचीं येतीं पावलं

निरखीत. तुम्ही मला वेडी म्हणणार ? म्हणा. पण हें वेड तुम्हींच मला लावलंत. अवघ्या दोन महिन्यांत. आतां तें कायमचं लागलं. जन्मजन्मांतरीं—"

माझ्या शेजारींच विष्णु जोशी झोंपायचा. एक दिवस एका झोंपेनंतर जागा झाल्यावर त्यानं माझी चुळबुळ पाहिली. तो मला म्हणाला, 'अजून झोंपला नाहींस ? कसला विचार करतो आहेस ? लग्न झालं असतं तर विचारलं असतं कीं, विरहानलांत पोळतो आहेस का ?'

मी हसलों. तो अज्ञानांत होता. एकदा वाटलं कीं, काळजांत असह्य होणारं माझं गुपित विष्णूजवळ उलगडावं. त्या अनभिज्ञ जीवाला माझ्या 'ज्ञाता स्वाद' मनाची चडफड सांगून जिवाचा भार हलका करावा. त्यालाच एकट्याला विश्वासांत घ्यावं. पण तो जितका सहृदय होता, तितकाच चावट होता. त्यानं गुरुजींनासुद्धा सांगायला कमी केलं नसतं. 'गुरुजी, हा सदाशिव पंतजलीऐवजीं निराळयाच गोष्टीची चिंतनिका करतो बरं का ! 'कौमुदी,' 'मनोरमा'—'

आणि या मरणाला भिऊन मीं जिभेच्या टोंकावर उडी घेण्यासाठीं आलेलं तें रहस्य पुन्हां आंत लोटलं.

पण दैवाच्या मनांतून मला एवढ्यावरच सोडायचं नव्हतं. तें मला आपल्या कलाकुसरी दाखवणार होतं. अंगाला जाळ घालणार होतं. जिवाला 'अवस्था' लावणार होतं. त्यानं धनुष्याला दोरी चढवली होती. भात्यांत बाण भरून घेतले होते. तें फक्त विवक्षित क्षणाची वाट पहात राहिलं होतं.

आषाढ शुद्ध द्वादशीला त्याला तो क्रूर मुहूर्त मिळाला. जुन्या सांगलींतल्या एका सद्‌गृहस्थानं आम्हां बारा विद्यार्थ्यांना जेवायला बोलावलं. आम्ही सोवळयानें तिथें गेलों. पाटावर बसून त्रिसुपर्ण सुरू केलं, 'ब्रह्ममेतु मां मधुमेतु माम्— '

आणि याच क्षणीं माझ्या उरीं बाण लागला. एक पंधरा-सोळा वर्षांची मुलगी समोरच्या दारानें जेवणघरांत उगवली आणि दुसऱ्या दारानें अंतर्धान पावली. माझा मंत्र एकाएकीं गळयांत थिजला. 'गिरिजा... !' मी एकदम चकित झालों. माझं काळीज धडधडूं लागलं.

गिरिजा इथें कशी ? कधीं आली ? कोणाबरोबर आली ? मला कसं कळलं नाहीं ? छट् ! पण ही गिरिजा असेलच कशी ? काय यांचा अन् तिचा संबंध ! ती गिरिजा नव्हे ; पण तिची प्रतिमा मात्र खास आहे. काय आश्चर्य ! तीच उंची, तीच ठेवण. तसेच जांभासारखे गाल. तसेच टपोरे डोळे. तसंच... '

विधाता हुबेहूब एकीसारखी दुसरी मूर्ति घडवूं शकतो याचं मला नवल वाटलं. ज्या दारांतून ती अदृश्य झाली त्या दाराचा माझे डोळे फिरून फिरून वेध घेऊं लागले. मला तिच्या पुनर्दर्शनाची तहान लागली. त्या दर्शनांत मला तिच्या आणखी काहीं साम्यरेषा पहातां आल्या असत्या. मीं तिच्या-भोंवतीं केतकींचं बन कल्पनेनं उभं केलं असतं. तिच्या डोळ्यांत तें पाणी, ती आर्ती दिसते का पाहिलं असतं.

पंक्तींत लाडवाचं वाढप सुरू झालं तरी माझ्या पानांत वरणभातच लोळत होता. माझं पोट एकाएकीं भरलं होतं अन् तिथली भूक हृदयांत शिरली होती. भूकच नव्हे ; तर आशाळभूतपणा. पण माझं दैव तितकं जोरकस नव्हतं. ती मेघमंडळांत अदृश्य झालेली सौदामिनी पंगत उठली, पानसुपारी झाली तरी पुनश्च काहीं लकाकली नाहीं. ती कुठल्या सात पडद्यांत दडून बसली होती देव जाणे !

परत येतांना विष्णु मला म्हणाला.

" असा काय वागत होतास रे वेंधळ्यासारखा ? तुला आमच्याबरोबर कुठें न्यायची सोय नाहीं. "

मीं त्याला काहीं उत्तर दिलं नाहीं. मनांत मात्र म्हटलं—' जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ! तूं बेट्या लग्न कर. गिरिजेसारखी प्रेमळ बायको तुला मिळूं दे. केतकीच्या बनांत ती तुझी वाट अडवूं दे. आणि इथें इतक्या दूर अंतरावर ध्यानींमनीं नसतां तिची प्रतिकृति तुला दिसूं दे. नाहीं तूं वेडापिसा झालास तर माझं नांव दुसरं. '

त्याच दिवशीं संध्याकाळीं बरोबरचीं मुलं आमराईत फिरायला गेल्याची संधि साधून मी घरीं पत्र लिहायला बसलों.

" प्रिय गिरिजे !

आज एक नवल वर्तलें ! काय म्हणून विचारूं नकोस. तुला तें खरंसुद्धा वाटायचं नाहीं. विधात्यानं तुझ्यासारखी, तुला लपवावी अन् तिला उघडावी अशी एक मोहिनी प्रतिमा इथें घडवली आहे बघ. आतां तुझी स्मृति अंतरांत अनावर झाली तर आणि ती पुन्हां कधीं दिसलीच तर मला दुधाची तहान—"

इथेंच माझी लेखणी स्तंभित झाली. कसला बावन्नकशी मूर्ख आहें मी ! हें पत्र घरीं धाडणं म्हणजे अनर्थांना निराळं आमंत्रण नको. मी हें गिरिजेच्या नांवानें लिहितों आहें पण तें नेमकं पडेल दादांच्या हातीं. दादा आधीं संतापतील. मग आमची विद्वत्ता आईला ऐकवितील. मग दोघं मिळून गिरिजेची ओंवाळणी करतील. गिरिजा आधीं रडेल, मग रागावेल अन् मग नाना कुशंकांची जाळीं विणूं लागेल. तिच्या हृदयांत मत्सर ठाण मांडील. अन् मी घरीं गेलों कीं ती देवयानीची भूमिका घेईल अन् ययाति बनून नाकदुऱ्या काढण्याची पाळी माझ्यावर येईल.

ज्या उत्कटतेनं त्या कागदावर हीं भलतीं अक्षरं उमटलीं त्याच अन् तशाच तिडिकीनें त्या कागदाचे पै पै एवढे तुकडे झाले अन् गच्चीवरून खालच्या वेळूच्या बेटावर उधळले. कोणी न पाहतां माझं तें मूर्खपण जन्मून अस्त पावलं म्हणून मीं समाधानाचा श्वास सोडला.

पण माझा मूर्खपणा संपला असं मीं मानलं हें माझं दुसरं मूर्खपण होतं. मी शहाणा झालों असतों तर ती पुन्हां कशी दिसेल अन् कुठें दिसेल म्हणून दिवसरात्र तळमळलों नसतों. मन सैरभैर करून घेतलं नसतं. माझ्या डोळ्यांनीं जळीं स्थळीं तिला शोधण्याचा छंद घेतला नसता. कृष्णाबाईच्या घाटावर मीं तास न् तास बकध्यानहि लावलं नसतं.

माझा होरा होता कीं, ती मला दिसायची तर घाटावरच दिसेल. सानथोर सर्वांची हजेरी तिथें चार-दोन दिवसांत तरी लागायचीच. आणि हा माझा होरा खरा ठरला. सकाळचा पहिला प्रहर संपायच्या वेळेला ती एक दिवस तिथें दाखल झाली. घाटाच्या माथ्यावरच ती मला दिसली. समोर अन् समग्र. डाव्या कमरेवर घिनगी अन् उजव्या हातीं गवाळं अशा सरंजामानिशीं

ती एकेक पायरी उतरत प्रवाहाच्या जवळ येत होती. मला वाटलं, माझी युगायुगांची आशाच जणुं नारीरूपानें पुढें येऊन माझ्या डोळ्यांचं पारणं फेडीत आहे.

पुन्हां साम्य पुढें आलं. गिरिजा अशीच कडेवर घागर घेऊन पाटावर येत होती. दुडीवर दुडी नेऊन काळ्या अळवाची चरी अन् अबोलीचीं झाडं शिंपीत होती. फक्त गिरिजेची घागर मातीची आणि हिची बिनगी पितळेची. मीं पाहिलं कीं, तिनं पाण्याजवळ येऊन बिनगी खालीं ठेवली. ती ठेवतांना तिच्या कांकणाची मंजुळ किणकिण उठली. तिची सिंहकटी ओकी, रिती झाली. तिच्या दोघी मैत्रिणी तिला घाटावर भेटल्या. त्यांच्याशीं ती काहीं तरी बोलली. मोजकेच शब्द ; पण ते खडीसाखरेचे खडे होते. मैत्रिणींनीं तिची काहीं तरी थट्टा केली तेव्हां तिचं ढवळं हास्य तिच्या हिरकण्यांतून फांकलं. त्या वेळीं एक विशेष गोष्ट मला दिसली. तिच्या खालच्या दाढेचा एक दांत किंचित् आंतल्या अंगाला उगवून वाढला आहे अन् तो तिच्या स्मिताच्या दुधांत साखरेची चिमूट टाकीत आहे. अन् हसतांना तिच्या गालावर पडणारी ती चिरी! जणुं मन्मथाचीं नामाक्षरं रेखाटण्यासाठीं यौवनानं आधीं काढलेली नाजूकशी ओळच. चटकन् फरक जाणवला कीं, हें मुखसौभाग्य गिरिजेला नाहीं. विधाता तेवढ्याला चुकला आहे. बाकी ती कानाच्या पाळीकडून भाळाकडे मोहोरलेली किंचित् हिरव्या रंगाची शीर मात्र दोघींच्यामध्यें सारखी आहे.

ती एवढा वेळ 'तटस्थ' होती ती आतां वाहत्या पाण्याच्या पायरीवर उतरली. वर्षाऋतूंतलं तें कृष्णेचं धोधावतं विस्तीर्ण पण गढूळ पात्र तिनं एकवार सादर निरखलं. पलतडीच्या अन् डाव्या उजव्या अंगाच्या हिरव्या-गार मळ्यांवर एक भिरभिरता दृष्टिक्षेप केला. घाटाच्या खालच्या बाजूनं पाणी बुरुजाला वेढून आंत शिरलं होतं आणि तिथें भला मोठा वळसा बनला होता त्याकडे पाहतांना तिनं किंचित् सभय मुद्रा दाखवली. आणखी दोन पायऱ्या उतरून पुढचे ओचे भिजवीत ती गुढघाभर पाण्यांत उभी झाली. खळाळत्या पाण्याची ओढ आपल्याला लटपटवील म्हणून तिनं आपले पाय घाटाच्या फरशीवर घट्ट रोवले.

आतां ती गुडघे दुमडून तिथल्या तिथें बुचकळी मारणार होती, तें गंगा-जळ तिच्या खांद्यांवरून खळाळून फेसाळून तिच्या गौरकांतीला अधिक खुलवीत खालीं जाणार होतं. मान, गळा भिजणार होता. हनुवटीवर अन् मुखावर चुबुक् असा आवाज होणार होता. क्षणभर तिथल्या लोकांना असा भ्रम होणार होता कीं, कृष्णेच्या वहात्या मातट पाण्यांत एक गोंडस कमळच उगवलं आहे.

पण एवढ्यांत बरोबरच्या विघ्नसंतोषी मित्रांनीं माझा हात खिसकून माझी समाधि भंगवली. विष्णु जोशी म्हणाला.

" चल रे पोहायला जाऊं. वर गणपतीच्या घाटावर जाऊन तिथून पडूं अन् या घाटाला लागूं. "

मला ' नाहीं होय ' म्हणायला त्यांनीं सवडच ठेवली नाहीं. आपण एका बुभुक्षिताला भरल्या ताटावरून ओढून काढतों याची त्या नर्मदेतल्या गोट्यांना कल्पनाहि नव्हती. मला त्यांचा राग आला. ते मित्र नसून शत्रु आहेत असं वाटलं. गणपतीच्या घाटावरून आम्हीं ' हरगंगेऽऽ ' म्हणून उड्या टाकल्या. ओघाबरोबर लोटत खालीं आलों अन् निथळत्या अंगानें घाटाला पाय लावले. एवढ्यांत अर्धा तास सहज गेला होता. माझी आशाळभूत नजर माणसांच्या जमावांत हिंडून आली. कोणी न्हात होते, कोणी धूत होते, कोणी नेशीत होते, कोणी स्तोत्र म्हणत होते. पांच-पन्नास माणसं तिथें आपापलं काम उरकण्याच्या नादांत निमग्न होतीं. पण तरीहि तो घाट मला सुना वाटला. त्याची भव्यता, गंभीरता, पवित्रता, सगळं तिथें जशाचं तसं होतं. फक्त न्हाळीची सुंदरता तेवढीच तिथून निघून गेली होती. माझे पाय खिळून रहातील, डोळे जडून रहातील, असं आतां तिथें कांहीं उरलं नव्हतं.

त्या रात्रीं माझं वहाळाकडचं केतकीबन मोडलं अन् कृष्णेचा घाट पुढें मांडला. प्रेमाच्या उद्रेकानें आंत–बाहेर आर्द्र झालेल्या विराणी गिरिजेला अर्धचंद्र देऊन ती नवी अज्ञात मुलगी माझ्या कल्पनेच्या सिंहासनावर विराजली. ' माझं चिंतन कर. माझं ध्यान कर. मला तुझी भावपुष्पांजुळि वहा, ' म्हणून मला आग्रह करूं लागली—

' माझ्यांत अन् तुझ्या गिरिजेंत विलक्षण साम्य आहे हें मला कबूल; पण तें फक्त बाह्य आकारापुरतं. त्यांतसुद्धा तपशील वेगळा आहे. किंचित् आंतल्या

अंगाला उगवून माझ्या हास्यांत चिमूटभर साखर टाकणारा हा दांत, माझ्या गालावरची नाजूक लाजाळू चिरी,... हें आहे का तुझ्या गिरिजेला? तिचं ओलं अन् आडवं लावलेलं कुंकूं, त्याचा खालीं येणारा तेलकट तवंग आणि माझ्या कपाळींची ही नकसूद मसूरडाळ. तिनें भिवयांच्या मधोमध चंद्रकोर गोंदून घेतली आहे ती किती पसरट अन् बेडौल झाली आहे! काय गरज होती त्या गोंदण्याची! त्यापेक्षां माझ्या नितळ, विस्तृत कपाळावर तिथेंच एक लहानशी भोवरी आहे तिच्याकडे लक्ष गेलं आहे का तुझं? रतीच्या भाळावरसुद्धा ही कोंवळी कला सांपडायची नाहीं.

'तिच्या कोपरापर्यंत बाह्यांच्या धारवाडी खणाच्या चोळया. त्यांचा गळाहि धड कापलेला नसतो. बसेल तशी बसेल अंगांत. कुठें तंग तर कुठें बेडौल फुगलेली. माझं कोणतंहि पोलकं माझ्या अंगाला कसं फिट्ट बसतं. तें माझ्या भुजलतांची गोलाई अन् नितळपणा कधींहि आच्छादीत नाहीं. तुझी गिरिजा रानांत जन्मली अन् रानांतच वाढली. तिच्या चालण्या-बोलण्यांत नागरसंस्कार नांवाला तरी आहेत का?...'

तिचा शब्दन् शब्द खरा होता. त्यानंतरच्या चार महिन्यांत अनेकदा ती मला दिसली. कधीं माझ्या प्रयत्नानें तर कधीं अभोगत. पण प्रत्येक वेळीं ती नवी होती. केंगणेश्वरीच्या चौथऱ्यावरून त्या भोकरीच्या झाडाखालून प्रदक्षिणा घालतांना, तिथल्या ठाणबंद मस्तवाल हत्तीपुढून गणपतीकडे जातांना मी तिची चपलचरण विद्युद्गति न्यहाळली होती. मैत्रिणींच्या घोळक्यांतून, आमराईंत फिरतांना तिथल्या बाकांवर बसून मी तिचे विभ्रमविलास पाहिले होते आणि मराठी-इंग्रजी बोलहि ऐकले होते. त्या प्रत्येक वेळीं ती मला गिरिजेसारखी असूनहि गिरिजेपेक्षां सरस वाटली होती.

आतां गिरिजेची मूर्ति माझ्या मनांत ठरेचना. आली रे आली कीं ही तिला मागून खो द्यायला तयार असायची. आपण स्वतः माझे जीवप्राण वेंटाळून घ्यायची. मी तिच्याशीं तासन् तास ओंठ न उघडतां बोलायचा. तिला तें मधुर हास्य अनेकदां हसायला लावायचं.

पण पुढें पुढें कल्पनेच्या सुखांतला रस आटला. ती आपल्याशीं एखादा शब्द बोलेल का, मलाच उद्देशून प्रत्यक्षांत एकदां तरी हसेल का, तिचा

एखादा भावकटाक्ष माझ्या काळजांत बोचेल का, ही आशा पाठीस लागली. पण कसं शक्य होतं तें! मी कल्पनेच्या वारूवर स्वार झालों होतों, तिचा वेडा बनलों होतों; पण तिच्या लेखीं माझं या जगांत अस्तित्व तरी होतं का? मला हें समजे; पण तरीहि माझं मन ओढाळपण सोडीत नसे. तिच्या एका स्मितासाठीं कोणत्याहि साहसकर्मांत उडी घ्यायला मी तयार होतों. मला एकदाच नव्हे तर अनेकदा वाटलं होतं कीं, ती नाहीं तर तिची बिनगी तरी पाण्याच्या धारेला लागून घाटाखालीं जावी अन् आपण धाड्दिशीं प्रवाहांत उडी घेऊन ती वर आणावी. आणि मग फक्त एकच स्मित....एकच धन्यवाद– 'बरं झालं बाई तुम्ही होतां म्हणून.... '

माझ्या भ्रमिष्टपणाला कुठून तरी जोराची थप्पड मिळायला हवी होती. विष्णु जोशानं तें काम केलं असतं.पण माझं हें राजगुह्य मीं कोणापाशींच उच्चारलं नव्हतं. कोणालाहि त्याचा वाससुद्धा येऊं दिला नव्हता. माझे सहाध्यायी फक्त एवढंच म्हणत, 'येडगळ आहे. कसला एवढा गंभीर विचार करतो देव जाणे!' त्यामुळें मृगजळाच्या सागरांत गटंगळ्या खाणाऱ्या मला हात द्यायला कोणीच पुढें येऊं शकत नव्हतं. माझं स्वास्थ्य पार उडालं होतं. अभ्यासांत चित्त मुळींच शिरत नव्हतं. पाणिनि–पतंजलि कोण्या झाडाचा पाला ठरले होते. 'उपनिषदं प्यालों, गीता बुद्धींत कोंबली; पण हायरे दैवा! ती चंद्रमुखी काहीं माझ्या मनोमंदिरांतून हालायला तयार नाहीं' हे जगन्नाथ पंडिताचे अशरण उद्गार मलाहि काढावे लागत होते.

गिरिजेबद्दल माझ्या मनांत आतांशा एक नवी अढी निर्माण झाली होती. एवढ्या दहा महिन्यांच्या अवधींत तिनं मला एकहि पत्र धाडूं नये! हुंः! पण धाडीलच कशी ती? लिहायला यायला हवं ना? 'र ट फ' वाचण्यापलीकडे तिची विद्वत्ता गेलेलीच नाहीं. आम्हीं भाष्यान्त अध्ययन करावं आणि हिनं घरीं गेल्यावर विचारावं, पतंजलि कशाशीं खातात?...' म्हणजे याचा इत्यर्थ हा कीं, मीं एक अनगड घोरपड गळ्यांत बांधून घेतली आहे. तीच गिरिजेऐवजीं ही मुलगी असती तर......

अशा अवस्थेंत दिवस कटले अन् महिनेहि पसार झाले. मार्गशीर्षांत वाजूं लागलेले लग्नांचे बेंडबाजे पौषांत मधली विश्रांति घेऊन माघांत पुन्हा सुरू

झाले. दिव्यांच्या झगझगाटांत रात्रीं रस्त्यावरून वराती मिरवूं लागल्या. आम्हां विद्यार्थ्यांना त्यांच्याशीं काहीं कर्तव्य नव्हतं ; पण समोरच आली एखादी तर कुतूहल वाटायचं. पाहूं या वधू कशी आहे, वर कसा आहे, जोडा अनुरूप आहे का प्रजापति आपल्या नेहमींच्याच वळणावर गेला आहे ... ?

ती वरात जरा विशेष थाटामाटाची दिसली म्हणून मी आणि हरभट रस्त्याच्या चौकांत जरा थबकलों. प्रथम बत्त्या, नंतर वधूवरांची सजवलेली गाडी, त्यामागून लेण्यालुगड्यांच्या पुरंध्री अन् त्यांच्यामागून पुरुषसमाज. माझी नजर प्रथम वधूवर गेली आणि वराला पहाण्यापूर्वींच माझ्या हृदयावर वज्र आदळलं. तीच मुलगी होती ती अन् कोण्या तरी वराशीं जन्मगांठ बांधून खुशींत मिरवत चालली होती. हें काय अनपेक्षित मी पहात होतों... !

मला उभं रहावेना. शरीराचं ओझं सांभाळायला पाय असमर्थ ठरले. मीं गळलों, आहाळलों, भंगलों. ज्या कसल्या तरी कल्पनेच्या तंतूला मी लोंबकळत होतों तो एकाएकीं तुटला अन् मी खोल कुठल्या तरी दरींत कोसळलों. मी तिथून पाठशाळेंत कसा आलों तें माझं मलाच कळलं नाहीं. माझ्या देवदारी पेटीवर डोकं टेकून मीं अश्रूंना वाट करून दिली. मला एकामागून एक अनावर स्फुंद येऊं लागले. सर्वांच्या आधीं ते विष्णु जोश्यानं ऐकले आणि तो माझ्याकडे आला.

" सदाशिव, तूं रडतोस ? काय झालं रे ? थोड्या वेळापूर्वी तर आमच्याबरोबर गप्पा मारीत होतास. "

तो माझ्या शेजारीं बसला. त्याला काहीं कल्पना येईना ; पण आपल्या वाणींत स्नेहाचं अमृत मिळवून त्यानं मला शांत, स्वस्थ करण्याचा प्रयत्न केला. मला बुडत्याला काडीचा नव्हे ; होडीचा आधार मिळाल्यासारखं झालं. जें रहस्य मीं आजवर काळजाच्या कड्याकुलपांत कोंडून ठेवलं होतं तें मला न विचारतां सगळे बंध तोडून विष्णूच्या कानाकडे धावूं लागलं. विष्णूला पहिला धक्का बसला तो मी विवाहित असल्याचा. क्षणभर त्याचा विश्वासच बसेना माझ्या शब्दांवर. लग्न करून संसाराला लागलेला माणूस काय पाठशाळेंत अध्ययनासाठीं येऊं शकेल ! आणि पुढचं प्रकरण ऐकून तर तो स्तंभितच झाला.

२९/५२

" सद्या ! कोपरापासून नमस्कार तुला ! इतका महामूर्ख दुसरा पाहिला नाहीं मीं. विचार म्हणून कांहीं चीज असते ती खुंटीलाच टांगलीस कीं रे ! च् च्...! "

त्यानं मला खूप समजावलं. माझा मर्मग्राही उपहासहि केला. प्रसंगीं माझी चांगली खरडहि काढली. पण तें सगळं माझ्या पालथ्या घड्यावर पाणी झालं. माझी चव गेली ती परत येईना. मनाच्या चिरफाळ्या झाल्या त्या जोडल्या जाईनात. उठलेली तगमग शमेना. ती मुलगी माझी होणं शक्य नाहीं हें मला ठाऊक होतं. पुरतं ठाऊक होतं. पण ती दुसऱ्याची कां झाली म्हणूनच माझं मन मला भंडावूं लागलं होतं. ती गिरिजेसारखी असावी कां, असली तर मला दिसावी कां, दिसली तर लोकाची व्हावी कां, इथपासून त्याची तक्रार होती.

त्या खचलेल्या मनःस्थितींतून मी लवकर सांवरत नाहीं हें पाहून विष्णूनं एक नवा तोडगा काढला. तो मला म्हणाला.

" तूं आतां घरीं जा. महिना दोन महिने ' घरच्या माणसांत ' राहून ये. तुझ्या या रोगावरचं औषध तिथें आहे. नाहीं काय म्हणतोस ? मी सांगतों तें ऐक. नाहीं तर मी हा सगळा प्रकार गुरुजींच्या कानावर घालीन. "

" नको माझे आई ! तेवढं करूं नको. मी तुझ्या म्हणण्याप्रमाणें घरीं जातों. "

आणि खरोखरच मीं दुसऱ्या दिवशीं सांगली सोडली. मी अचानक घरीं दाखल झाल्याचं पाहून सर्वांना नवल वाटलं. ' प्रकृति किती खराब करून घेतलीस रे, ' म्हणून आईनें हळहळ व्यक्त केली. गिरिजेला दहा महिन्यांच्या दीर्घ, उदास रात्रीनंतर आज सूर्योदय झाला. ती त्या सूर्याला अर्घ्य देण्यासाठीं उल्हासाचा वसंत फुलवून सिद्ध झाली. तिच्या हृदयांतल्या आनंदोर्मी डोळ्यांवाटे बाहेर धावणं करीत आहेत हें मीं पाहिलं. तिचा संभ्रम मला तिच्या चालण्याबोलण्यांत सर्वत्र दिसला. आई येऊन समोर उभी राहिली, तसं करणं तिच्या विनयाचारांत बसत नव्हतं ; पण ती आडोश्या आडोश्यानं वडील माणसांच्या नजरेंत न भरेल अशा बेतानें मला डोळ्यांत सांठवून घेत आहे हें मला समजलं. तिच्या त्या नजरेंत आईची माया, पत्नीची उत्कंठा अन् सखीचा स्नेहाळपणा या सगळ्यांचं एक कोवळं मीलन

मला पहायला मिळालं. न्हाणींत विस्तव सांदुकतांना, माझ्या कपड्यांचा ढीग धुतांना, मधें मधें सासूच्या हुकमांची तालिमी करतांना तिचं मन, तिची काया तिला सांवरत नाहीं याची साक्ष मला पटली. केतकीबनांतला तो करुणेचा आवेग अन् आजचा हा हर्षोत्फुल्लतेचा आवेग—दोन्ही तिला सोसायला भारी जड होते.

मला माझ्या वृत्तीची लाज वाटली. मी दमून आलों होतों. कल्पनेच्या कुरणांत चरून आलों होतों. लाथ खाऊन आलों होतों. गिरिजा आपल्या भूमिकेवर अविचल होती. निरागस होती; तशीच माझ्यावर टकळा ठेवून होती. मीच एकटा तिचं सर्वस्व होतों. तिचं सूर्यकमल मलाच एकट्याला सदासन्मुख रहाणार होतं.

पाणी तापल्याची आईच्या मार्फत वर्दी मिळतांच मी न्हाणीकडे गेलों. तिथें मोठ्या चुल्यावर तांब्याचा हंडा तापला होता. वर फणसाची स्निग्ध सावली होती. स्नानाचं पाणी मागच्या खोलगट भागांत सांचून मुरत होतं तिथें पुन्नाग पोसला होता. सोनटक्क्यांचीं बेटं आपलीं लांब पानं त्याच्या विस्तारांत घुसवीत होतीं. शेजारींच पांच घेंपांवर गिरिजेच्या निर्मळ मनासारखा पाट खळखळत होता. त्याच्या दोन्ही तीरांवर पोफळी डोलत होत्या. खालच्या अंगाला अशोक फुलला होता आणि वरच्या अंगाला जांभाच्या केशरी पाकळया झुळुझुळु गळत होत्या. आणि अशा प्रसन्न निसर्गाच्या सान्निध्यांत गिरिजा पाटाचीं तपेलीं भरून आणून तापलेला हंडा विसावीत होती. मी पाथरीवर उभा राहून तिच्या हाल-चाली न्याहाळीत होतों.

पाणी विसावलं आहे याची खात्री करून घेऊन तिनं पहिला तांब्या भरून माझ्या हातीं दिला. एवढा वेळ दूर दूर वावरणारी गिरिजा आतां मला जवळ आली. अगदीं समोरासमोर झाली. तिच्या मुखावर सलज्ज स्मित होतं; पण गालावर त्या मुलीसारखी चिरी मात्र नव्हती. तिची मसूरडाळ अन् हिचं आडवं, फताडं कपाळभर कुंकू. त्याच्यांतून तवंग खालीं ओघळतच आहे. तिच्या नय-नांत सदा विभ्रम खेळत होता अन् गिरिजा त्या बाबतींत अज्ञाण. तिची अनेक पद्धतींची केशरचना मीं पाहिली होती; पण हिचा खोपा मात्र पूर्वीं होता तोच कायम. तें नथुकलं हिच्या नाकांत सदैव अडकलेलं. काय गरज होती त्याची!

चोळीला आकार नाहीं, नेसण्यात सफाई नाहीं. दोघी किती सारख्या; पण किती भिन्न! तिच्या कळाकुसरी हिला कधींच येणार नाहींत.

स्मरण होण्याचा अवकाश; पहातां पहातां तें मुखमंडळ गिरिजेच्या मुखावर प्रगटलं. शतयोजनं धावत येऊन ती गिरिजेच्या आकारांत शिरली. क्षणभर विजेसारखी लकाकली आणि पुनः अदृश्य झाली. पुन्हा आपली माझ्यापुढें गिरिजा. त्या उत्तेजक स्मृती, त्या व्यथा, त्या वेदना यांनीं माझ्या काळजाला घरं पाडलीं. त्या वरातीच्या वाद्यांनीं पुनश्च कानठळ्या बसवल्या. एकाएकीं माझे डोळे मिटले अन् आत्मा आक्रोशून उठला.

"ती तूं नव्हेस....ती तूं नव्हेस!!"

आणि गिरिजेच्या हातांतून माझ्या हातीं येणारा तांब्या मधल्यामध्यें गळाला अन् खालच्या पायरीवर आदळला.

"काय झालं? भोंवळ का आली?" गिरिजेनं घाबरून विचारलं. तिच्या स्वरांत चांगलाच कंप निर्माण झाला होता.

पण मला काय झालं तें मी तिला सांगूं शकत नव्हतों. पुढेंहि कधीं शकणार नव्हतों. माझ्या अंतःकरणाच्या भूमींत एक उल्का येऊन आदळली अन् ती खोल रुतून बसली हें त्या भोळ्या निसर्गकन्येला कधींच कळणार नव्हतं. मला गिरिजेची अत्यंत करुणा आली आणि प्रेमसरितेचं दुथडी भरलेलं पात्र जवळ असतां मृगजळामागें अजून धावणाऱ्या स्वतःबद्दल तितकाच तिरस्कार वाटला. कोणत्या घातवारीं मीं सांगलीचं प्रस्थान काढलं होतं देव जाणे!

---

## झडपणी : :२:

सुलोचना सौभाग्याला आणि त्याबरोबरच संसारालाहि आंचवून आज माहेरीं आली होती. तिचा डाव मांडतो न मांडतो तोंच उधळला होता. मधला एका वर्षाचा काळ स्वप्नवत् ठरला होता. तिला सासर हें यातनाघर झालं होतं. तिचा कैवार घेणारा, तिला 'रडूं नको' म्हणून संबोखणारा आतां तिथें कोणी उरला नव्हता. तिच्या सासू-सासऱ्यांना अनिवार पुत्रशोक झाला होता; पण त्यांच्या दृष्टीनं तिचं जणूं कांहींच हरवलं नव्हतं. सासू-सासऱ्यांचा तो शोक दुधारी होता. त्याची एक धार होती रडण्याची अन् दुसरी होती सुनेला टोंचण्याबोंचण्याची. तिच्या सहनशक्तीचे तणावे एक दिवस तुटले होते. अनिर्वाहपक्ष म्हणून तिनं बापाला निरोप धाडला होता आणि आज बाप तिला घरीं घेऊन आला होता. ती आतां कायमची माहेरीं रहाणार होती. आपलं पांढरं फटफटीत कपाळ नित्य, तिन्ही त्रिकाळ आईबापांच्या पुढं धरणार होती.

'वामन परांजप्याची मुलगी परतून आली' हें वर्तमान दुसऱ्या दिवशीं सकाळींच गांवांत पसरलं. शेजारणींनीं हातांतलीं कामं टाकलीं अन् त्या परांजप्यांच्या घराकडे मोहोरल्या. जातांना एकीनं दुसरीला बोलावलं अन् दोघींनीं तिसरीला हाकारलं. दुःखी, कष्टी शेजारणीचं सांत्वन हे झाले त्यांचे दाखवायचे दांत. खायचे याहून वेगळे होते. खरं म्हणजे सुलोचनेचं पांढरं कपाळ त्यांना पहायचं होतं. ती कशी रडते, किती रडते, वाळली आहे किती, खंगली आहे किती, याचं एकदा 'चक्षुर्वै सत्यम्' करायचं होतं आणि तिच्या शोकप्रदर्शनाची मात्रा कमी-जास्त दिसेल त्या मानानं तिच्यावर पाठी-मागून टीकाहि करायची होती.

पण त्या आल्या मात्र; खोलीचं दार धाडकन् लागलं. त्या घटकाभर सुलोचनेच्या आईशीं बोलत बसल्या तोंवर तें किलकिलंसुद्धा झालं नाहीं. या

उर्मट पोरीनं आपल्या थोबाडींत मारली असं त्यांना वाटलं. कुठें होती सहानुभूति! कुठें होती हळहळ! सुलोचनेच्या दुःखानं कोणाच्या काळजाला कुसळसुद्धां बोंचलं नव्हतं. त्यांनीं घरीं जातांना वाटेंत एकमेकींना सुनावलं—

'किती दिवस रहाणार आहेस अशीं दारं लावून! उद्यां, परवां, कधीं तरी येशीलच म्हणावं बाहेर!'

खरं होतं त्यांचं म्हणणं. सुलोचनेला आठ–पंधरा दिवसांतच बाहेर यावं लागलं. बाप झाला म्हणून काय झालं! किती दिवस मुलीला खोलींत बसवून पोशील! त्याचा संसार मैलभर पसरलेला होता. डोंगरावर काजू, शेतवडींत वांयगण, पाटाखालीं कुळागर, गोठ्यांत गुरं अन् आंगणांत वासरं. वेळच्या वेळीं सगळे हंगाम साधायचे म्हणजे हाताशीं माणसं असतील तेवढीं थोडीं. शिवाय त्या बिचाऱ्याला पोटदुखी लागली होती. तिसरा प्रहर संपायला आला कीं तो पोटाला वेंठ घालून बसायचा. तशा स्थितींतहि तो हातून होईल तें काम करी. आणि एखाद्या दिवशीं सुपारीएवढा खाण्याचा सोडा गिळूनहि व्यथा थांबली नाहीं कीं आंगणांत भुकेनं तणकाडीसाठीं ओढ घेणाऱ्या वासराला उद्देशून म्हणे. 'आज कोण आणणार तुझ्यासाठीं ओला चारा? मी तर असा तळमळत पडलों आहें...'

हे त्याचे अगतिक उद्गार एक दिवस सुलोचनेच्या कानीं पडले. आपली अंधारांत बसण्याची कालमर्यादा संपली, हें त्या उद्गारांवरून तिला जाणवलं. ती तडक बाहेर आली. हातीं कोयती अन् कमरेवर पाटी घेऊन लगेच वाटेलाहि लागली. तिला पाहून गांवाच्या डोळयांतल्या बाहुल्या तीव्र झाल्या. गांवाला जें पहायचं होतं तें त्यानं लांबून–जवळून पाहिलं. नागू मंत्री तर तिला सामोराच आला.

प्रादेशमात्र पायवाटेवर त्या दोघांची समोरासमोर गांठ पडली. इकडे तिकडे न पहातां खालच्या मानेनं वाट चोखाळणाऱ्या सुलोचनेला खरं म्हणजे नागू मंत्र्यानं बाजूला होऊन पुढें जाऊं द्यायला हवं होतं. तिचं सुकलेलं तोंड अन् निस्तेज डोळे निरखून पहाण्याची त्याला कांहीं गरज नव्हती. पण त्यानं तेवढं दाक्षिण्य दाखवलं नाहीं. तो तिची वाट अडवून उभा राहिला.

" सुलोचना !"

ती ओ न देतां मनांत म्हणाली कीं, 'उण्याला द्यावी पाठ.' पुढें सटकायला अवकाश मिळेना, म्हणून तिनं खरोखरीच त्याच्याकडे पाठ केली. नागाप्पाच्या दयेचा सागर उचंबळला. तो तिला म्हणाला.

" चारा आणायला निघालीस का ? च् च् ! काय म्हणावं तुझ्या बापाला ? माणूस आहे का कोण आहे ! तुला चारा आणायला पाठवतो—"

" मग तूं आणून दे कीं. घे ही पाटी अन् कोयती. मी चाललें घरीं."

तिनं दोन्ही वस्तु नागाप्पाच्या पुढ्यांत आदळल्या अन् ती मागें वळली. नागाप्पाला वीज चाटून गेल्यासारखं वाटलं. 'मन द्रवलं म्हणून बोललों ; नसलं सोसत तर जा आपल्या वाटेनं' म्हणून तो तिच्यापुढें सटकला. त्यानं आपला डावा खांदा जरा अधिक जोरानं उडवला हें तिनं पाहिलं. तिनंहि त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून मानेला एक झटका दिला आणि परत पाटी-कोयती हातांत घेऊन वांयगणाचा रस्ता धरला.

तिला नागू मंत्री लहानपणापासूनच अप्रिय होता. 'आपल्याकडे पाहून हळहळण्याचा याला काय अधिकार! चोंबडा कुठला !' ती स्वतःशींच म्हणाली. अलीकडे तिला कोणाचंच कांहीं सोसत नव्हतं — बरं किंवा वाईट. ती जगावर तर कावली होतीच ; शिवाय स्वतःवरहि. आपल्याविषयीं चुकचुकणाऱ्या माणसाच्या डोक्यांत दगड उचलून घालावा असंसुद्धा तिला कित्येकदा वाटे. माहेरीं आल्यापासून तिनं त्या घरांतलं सुख देशांतराला घालवलं होतं. ती स्वतः तर धुमसत होतीच अन् आईबापांना, मावंडांना, कोणालाच मनःस्वास्थ्य लाभूं देत नव्हती.

वेळेवर जेवा-खायला येईलच असा नेम नसायचा. तिच्या नांवानं राखून ठेवलेलं एखादं क्षुल्लकसंसुद्धा काम करीलच असा भरंवसा नसायचा. करायला पदर बांधलान् कीं मग वाघिणीसारखी त्या कामावर तुटून पडायची. आई 'शाबास' म्हणायला गेली कीं तिच्यावर वसकन् तोंड टाकायची.

" मला कसली शाबासकी देतेस ? आतां यांतच मरायचं आहे मला ! —"

ती केव्हां रडेल अन् केव्हां हसेल याची कसलीच पूर्वसूचना मिळायची नाहीं. एकदा कपाळावर आठ्या पडल्या कीं दिवसाच्या दिवस त्या मोडायच्या नाहींत. पोंवळ्यासारख्या तिच्या अधराची लवलव सारखी सुरू असायची. 'माझा नवरा मेला, मी उघडी पडलें. दुःखाच्या खाईंत लोटली गेलें. जिवंत असून जड शिळा बनलें. माझ्या या दुर्दशेला आई जबाबदार आहे, बाप जबाबदार आहे, शेजारी जबाबदार आहेत — सारं जग जबाबदार आहे. या सगळ्यांना आक्रंदून, उरस्फोड करून जाब विचारला पाहिजे. सगळ्यांना धारे-वर धरलं पाहिजे...'

आणि याच त्रासाला उबगला कीं वामन परांजपे वैतागून म्हणे.

"उलट्या पायांची अवगत-देवगत घरांत रिगली तरी चालेल. 'आक्काबाई' घरांत घुसलेली पुरवेल. आकाशाची कुऱ्हाडहि डोक्यावर पडलेली सोसवेल. पण नवरा मरून मुलगी माघारीं येणं मात्र नको रे देवा ऽ!"

विशेषतः हे उद्गार तो नागू मंत्र्याकडे काढी. नागाप्पाची त्या घरांत विशेष ये–जा होती. तो मांत्रिक होता. छां–छूं करणारा होता. देवऋषिपण जाणणारा होता. गंडे, दोरे, ताईत बांधणारा होता. रविवारीं–बुधवारीं त्याच्या घरीं माणसांची थाप लागायची. कोपऱ्यांत नारळांचा ढीग व्हायचा. चारपांच रुपयांचा गल्ला सहज जमा व्हायचा. कुठून तो ही मंत्रविद्या घेऊन आला होता देव जाणे! पण त्या पंचक्रोशींत त्याची ख्याति होती. गाईचा आंचळ रक्ताळला इथपासून तों बायकामुलं आजारी असल्यापर्यंत सगळीं दुखणीं घेऊन कुळवाडीमाळवाडी अन् पुष्कळसे ब्राह्मणसुद्धा त्याच्याकडे यायचे. तो मग आत्मविश्वासानं त्यांना सांगायचा.

"हा 'आसा' ने अन् वळचणीला खोंचून ठेव. हा दोरा त्याच्या दंडांत बांध. सगळं दुरुस्त होईल. नाहींच झालं तर बुधवारीं परत ये. मग पाहीन. मात्र येतांना एक 'तळी' आण. मीं माझ्या देवाला आंगवून घेतली आहे. तळींत एक रुपया अन् एक पावली ठेवायची असते ठाऊक आहे ना? जा!..."

वामन परांजपेहि याच कारणासाठीं त्याचा भक्त बनला होता. नागाप्पानं येऊन पडवीवर आसन ठोकलं कीं तो बायकोला 'चहांत दुधाची धार जरा

सढळ पडूं दे’ असं खुणेनं सांगायचा. आपली पोटदुखी वाढली, पोटाला वेंठ घट्ट आवळून अन् सुपारीएवढा सोडा खाऊनहि जरासुद्धा उतार पडेनासा झाला, कीं तो नागू मंव्याला निर्वाणीची हाक मारायचा. त्यानं येऊन पडवींत आसन मांडायचं. ओंठांतल्या ओंठांत कांहीं तरी पुटपुटत काळा दोरा उदबत्तीच्या धूमरेखेवर धरून त्याला सात–पांच गांठी द्यायच्या. मग तो दोरा वामन परांजप्याच्या दंडांत बांधायचा. अन् त्यावर थोडंसं भस्म चोपडून म्हणायचं.

“आत्तां उतार पडेल. चिंता नको!”

पोटाला नसला तरी मग वामन परांजप्याच्या मनाला उतार पडायचा. त्या पोटदुखीचं धरणं–पारणं व्हायचं. पण जरा बरं वाटलं कीं त्यानं मात्र मनाशीं म्हणायचं, कीं ‘हा नागाप्पाच्या गंड्याचाच गुण.’ नागाप्पाहि वरची दंतपंक्ति अधरावर दाबीत त्याला ठांसून सांगायचा, ‘गुरूची आण घातली होती मीं. बिशाद काय रोग हटत नाहीं!’

सुलोचना संध्याकाळीं चाऱ्याची पाटी घेऊन घरीं येते तर आजहि तो पडवीवर बसलेला होताच. त्याच्या पुढ्यांत उदबत्ती जळत होती आणि तिच्या धुरावर काळया दोऱ्याला गांठी पडत होत्या. वामन परांजपे पोट दाबीत त्याच्या मुद्रेकडे टक लावून बसला होता. सुलोचना आलेली पहातांच नागाप्पाचे डोळे घिसघिसले. ओंठावर चोरटं स्मित उमललं. सुलोचना क्षणभरहि पडवीवर न थांबतां घरांत पळाली. तिला त्याचं अस्तित्व सहन झालं नाहीं.

सुलोचनाच कशाला, गांवांतल्या इतर बायकासुद्धा त्याच्या झळकीला रहात नसत. कारण त्याचे डोळे सदा तांबारलेले, ओंठ नेहमीं मुडपलेला अन् तोंडांत सार्वकाळ देवचाराच्या अन् ब्रह्मसमंधाच्या गोष्टी. बायकांनाहि तो त्याच भूतयोनींतला वाटे. पण त्याच पदवीमुळें अडीनडीच्या वेळीं त्याला सगळयांच्या घरांत प्रवेश मिळे. अनेक बायकांच्या दंडांना त्यानं आपले गंडे बांधले होते. आणि एक दिवस त्याच मंत्रविद्येच्या मिषानं त्याला सुलोचनेच्याहि जवळ येतां आलं. वामन परांजप्यानं त्याला गळ घालून आणलं. ‘कांहींहि कर बाबा, पण पोरीची बाधा दूर कर’ म्हणून त्याला विनवलं.

काळ सगळया जखमा भरून काढतो म्हणतात ; पण त्या जखमा निराळया असतात. तरुण विधवेचं दुःख ही विषारी जखम आहे. ती चरत चरत जाते. तिच्यावर काळाची मात्रा चालत नाहीं. सुलोचना आरसा पुढं घेऊन वेणी वळायला बसली कीं तिचं प्रतिबिंब तिला जाचूं लागे. तिचे ते स्वप्नाळु, निळसर डोळे! कुणी बघायचे ते ? अन् त्यांनीं तरी कुणाला न्याहाळायचं ? तें पातळ, पारदर्शक पुड्यांचं उभार नाक. ते पोवळयाच्या कांतीचे ओंठ. दोन्ही हातांत न पेलणारं तें मऊ मऊ केसांचं ओझं. सगळे अवयव कसे रेखीव नि अव्यंग. बापानं तिला पातळ-नितळ त्वचा दिली होती. आईनं केतकीवर्ण बहाल केला होता. शिवाय तिच्या यौवनाची काही कमाई होतीच. तिचे वडील तिच्या लहानपणीं म्हणत, 'आमच्या सुलूला कुणीहि हसत-नाचत उचलून नेईल.'

तिला ते शब्द आठवले कीं ती म्हणे, 'होय; नेली उचलून. पण त्या मेल्या नेणाऱ्याचे हात पडले निर्जीव अन् मी आदळलें खालीं. काय करूं मी आता ? कुठं नेऊन घालूं हें तारुण्य अन् सौंदर्य ? याला भाजूं, डागूं का बिब्बा घालूं ? कुणी तरी आंतून पोखरतंय् मला. अगदीं भुगा पाडतंय्. ही काळीजखरपणी नाहीं मला सहन होत. आजूबाजूच्या जगाला माझ्या वेदनांची तिळभर तरी कल्पना आहे का ? तें हसतंय्, खिदळतंय्. मलाहि हंसायचा उपदेश करतंय्... होय. मी हसणार आहें, खदखदून हसणार आहें. ऐकणाराचं ऊर धडकेल असं विकट हसणार आहें. ऐका म्हणावं मग. कान फुटेपर्यंत ऐका...'

आणि खरोखरच एके दिवशीं ती अकस्मात् हसूं लागली. आई म्हणाली, 'अग कां ?' वडील म्हणाले, 'काय ग झालं ?' पण तिला उत्तर देतां आलं नाहीं. ती सारखी खदखदतच राहिली. लाजलज्जा गुंडाळून. शून्यांत दृष्टि लावून. आणि कुणाचीहि पर्वा न करतां. तोंड हसतं आहे अन् डोळे रडताहेत. आईनं तिचे चढत जाणारे मजले थांबवण्याचा बराच प्रयत्न केला. प्रथम गोंजारून नि मग खेकसून. पण कांहीं मात्रा चालली नाहीं. तिनं नवऱ्याच्या तोंडाकडे पाहिलं. त्यानंहि 'फाजिलपणा बस् कर' म्हणून दटावून बघितलं. पण सुलोचना भानावर नव्हतीच तर ऐकणार कोण ? पुढें तिचं

हसणं तिलाच असह्य झालं तेव्हां तिनं हात लांब करून कुशीवर अंग टाकलं आणि दंडावर डोकं आदळलं.

मग हास्य थांबलं अन् अश्रुधारा तेवढ्या चालू राहिल्या. चोळीची किनार ओलीचिंब झाली. डोळयांच्या कवड्या बनल्या. हात–पाय गार पडले. बोटं वेडींवांकडीं झालीं. फक्त नाकपुडयांचा संकोच–विकास आणि मधून मधून आंवढा घोटणं तेवढं शिल्लक राहिलं. आई–वडिलांच्या पोटांत आवरा उठला. 'हें आणिक काय नवं?' म्हणून आईनं आपले कणवभरी डोळे वामन परांजप्याकडे लावले.

तो ताबडतोब नागाप्पाकडे धावला. त्याच्या मतें या विकारावरचा धन्वंतरि तोच होता. नागाप्पाच्या पडवीवर गिऱ्हाइकांची थाप बसली होती. पण घाबऱ्याघुबऱ्या वामन परांजप्यानं सांगितलेली सुलोचनेची ती हकीकत ऐकून, त्यानं तोंडांतला मंत्र तोंडांत ठेवला. दोऱ्याची गांठ कच्ची होती ती पक्की करायलासुद्धा तो थांबला नाहीं. येतांनाच उसगीचे दोन टाळ मोडून त्यानं हातांत घेतले. घरीं येऊन निश्चेष्ट सुलोचनेजवळ बैठक मांडली. तोंडानं मंत्राची पुटपुट अन् हातानं उसगीच्या त्या कोंवळया पालवीचा तिच्या मस्तकावर प्रहार असं मंत्रतंत्रविधान त्यानं एकदम सुरू केलं.

थोड्या वेळानं सुलोचनेनं वर नेलेले डोळे खालीं आणले. ती या जगांत आली. चटकन् उठूनहि बसली. नागाप्पानं वामन परांजप्याकडे शिकंदराच्या नजरेनं पाहिलं. त्यानं नागाप्पाचा प्रभाव वाणीच्या आधीं डोळयांनींच मान्य केला. खरं म्हणजे सुलोचनेच्या प्रक्षुब्ध शोकावेगांतून निघालेला तो उन्माद होता. ती केवळ मनोव्यथा होती. पण नागाप्पानं पिशाच्चबाधा हें तिचं निदान जाहीर करून टाकलं. तिच्या आई-बापांना तें तात्काळ पटलं. लगेच पुढचा प्रश्न आला. पिशाच्च खरं, पण तें कुठलं, कुणाचं? 'संध्याकाळीं सांगेन' असं ऐटींत उत्तर देऊन नागाप्पा तिथून निघून गेला.

संध्याकाळीं वामन परांजप्याला पुन्हा त्याचे पाय धरावे लागले. तो आला. प्रथम गुळाचा गरम चहा ताम्हनांत ओतून प्याला. आणि मग पाटावर कांहीं भातगोटे घेऊन ते फिरवतांना भुवयांच्या धनुकल्या करीत बसला.

वामन परांजपे त्याच्या शेजारीं पोट दाबीत बसला होता. आई उंबऱ्या-जवळ टेंकली होती. सुलोचना भिंतीजवळ जुनेर टाकून मलूलपणें पडली

होती. कोण पिशाच आहे, तें किती जबर आहे, त्याची काय मागणी आहे, तें सुलोचनेच्या सासरचं आहे का माहेरचं आहे, हें कळावं म्हणून सर्वांनाच उत्कंठा लागली होती. नागाप्पानं बराच वेळ त्यांना तशा अवस्थेंत ठेवून अखेर एकदाचं तोंड उघडलं—

" कठीण आहे...दुर्धर आहे !... "

" कठीण ? दुर्धर ? कसं ? कोण ? " वामन परांजप्यानं श्वास रोधून विचारलं.

" सुलूच्या नवऱ्याचं पिशाच ! तोच समंध होऊन तिच्या मानगुटीवर बसला आहे. नवऱ्यानं बायकोला पछाडलं आहे. अगदीं गच्च ! "

" अगदीं गच्च ? "

" होय ! "

" काय म्हणतो तो ? "

" सोडणार नाहीं म्हणतो. झुरवून, झिजवून मारीन म्हणतो. "

सगळ्यांनीं डोळे ताणले आणि तोंडाचे 'आ' उघडले. सुलोचनेच्या डोळ्यांत निजल्या जागीं अश्रू तरळले. तिनं कूस बदलून भिंतीकडे तोंड केलं. ती जगावर कावली होती. स्वतःला उबगली होती. मरण कःपदार्थ मानूं लागली होती. दिवसांतून सतरा वेळां मनोमन आत्महत्या करीत होती. पण आतां, या वेळीं नागाप्पाच्या शब्दांमागून मृत्यु, पाऊल न वाजवतां आपल्याकडे मोहरा करून हळूहळू पुढें येत आहे असं जेव्हां तिला समजलं, तेव्हां ती एकदम थरारली. उद्वेगानं खडक बनलेल्या तिच्या हृदयांतून जीवनाच्या आसक्तीचे द्रव निघूं लागले. अशाहि परिस्थितींत आपल्याला जगावंसं वाटतं, हें तिला त्या वेळीं कळलं. तिनं कान नागाप्पाकडे लावले आणि मन त्याच्या पुढच्या शब्दांसाठीं सावचित्त केलं. नागाप्पा पुढें बोलूं लागला.

" असूं दे. तुम्ही नका चिंता करूं. मी त्याचं बारसं जेवलों आहें ! असले अनेक खट, महाखट समंध गाडून टाकले आहेत मीं. गोडीगुलाबीनं 'झाड' सोडलन् तर ठीक. नाहीं तर काढतों मग निर्वाणीचं शस्त्र... "

सगळ्यांना हायसं वाटलं. त्याचा 'ऊर्ध्व' खालीं आला. सुलोचनेवर नागाप्पाचे उपचार सुरू झाले. गळ्यांत गंडा आला. डाव्या दंडांत ताईत चढला. घराच्या कडाशीला सुया टोंचलेलं लिंबू खोचलं गेलं. उडीद आणि

पिंजर टाकून भाताचीं लाल 'मुठलीं' तिठ्यावर ठेवलीं गेलीं. नागाप्पाचं त्या घरांत प्रस्थ वाढलं. 'हा मेला मला काय बरी करणार? माझी हाक आतां देवानं ऐकायची,' म्हणून सुलोचना कित्येकदा तिरसटपणा करी. दंडांतला ताईत तट्दिशीं तोडी. गळ्यांतल्या गंड्याला हिसडा मारी. पण तिचं तें करणं, बोलणं, तिचं नसून त्या समंधाचं आहे असंच सगळ्यांनीं मानलं. पुन्हा आठ–दहा दिवसांनीं तिला तोच पूर्वीचा झटका आला. नागाप्पानं सगळ्यांना त्या खोलींतून बाहेर काढलं आणि दाराला आंतून कडी लावली.

सुलोचना सावध झाली तेव्हां तिला कळलं कीं, आपण खोलींत एकट्या आहों अन् नागाप्पा अगदीं आपल्याला खेटून बसला आहे. त्याचा श्वास आपल्याला जाणवतो आहे. एक हात त्यानं आपल्या खांद्यावर ठेवला आहे आणि त्याच्या डोळ्यांतून कसली तरी वेगळी भाषा उमटत आहे. चटकन् उठून दूर होण्याइतकं तिला त्राण नव्हतं. तिनं नागाप्पाचा हात आपल्या हातानं उचलून खालीं टाकला आणि नजर खालीं वळवली.

"पुरती सावध झालीस ना? तुला भानावर आणायला आज मला फार कष्ट पडले. तुला जबरदस्त झडपणी झाली आहे. पण विश्वास ठेव माझ्यावर. मी तुला या यातनांतून वर काढीन."

सुलोचना असहाय्यपणें घळघळ रडूं लागली. नागाप्पानं तिचाच पदर उचलून तिचे डोळे पुसले आणि तो बाहेर गेला. तो गेला; पण त्याच्या त्या उष्ण श्वासाची जाणीव मागाहून राहिली. तो खांद्यावरचा पुरुषी करस्पर्श तिथं चुरचुरत राहिला. त्याच्या डोळ्यांतली ती भाषा तिच्या कानांत गुणगुणत राहिली. ती उत्तेजक होती तितकीच भयप्रद होती. हें घडतं आहे तें बऱ्याचं नव्हे असं तिला वाटलं. आपल्या असहाय्य अवस्थेवर तिनं आग पाखडली. आपल्या मेलेल्या नवऱ्याला लाख शिव्या मोजल्या. सारी रात्र स्वप्नांतल्या नको असलेल्या अनुभवांनीं घामाघूम होऊन घालवली. सकाळीं उठल्यावर तिनं बापाला बजावलं.

"मला पुन्हां तसं कांहीं झालं तर नागाप्पाला बोलावूं नका. मी मेलें तरी चालेल. कांहीं जगबूड होणार नाहीं."

वामन परांजप्यानं हे तिचे शब्द नागाप्पाच्या कानांपर्यंत पोंचवले. त्यावर तो म्हणाला.

" मला वाटलंच होतं ! हें ती बोलत नाहीं. तिच्या कांठ्यावरचा ' तो ' बोलतो आहे. मला घाबरला आहे तो. भुताला मांत्रिक डोळ्यांपुढें नको असतो. सगळीकडे एकच अनुभव. तुला मुलगी हवी ना ? मग असलं बोलणं मनावर घेऊं नको. तिला सर्वस्वीं माझ्या हातीं सोंपव. हा समंध मोठा चिवट आहे. जसं तांबड्या माडाचं सोडण ! पड खाईल ; पण कायमचा जाणार नाहीं. मीं त्याचं आव्हान स्वीकारलं आहे. आतां शेंडी का पारंबी—"

सुलोचनेच्या निषेधाची अशी वासलात लागली. पुन्हां आपल्याला तसं होऊं नये म्हणून तिनें प्रत्येक भावप्रक्षोभाच्या वेळीं दातीं बळ आणलं. एकदोन वेळां ' येतों, येतों ' म्हणणारा तो झटका परतलाहि. पण तिची शक्ति किती खर्च झाली ! तिसऱ्या वेळीं तिला तो आवरला नाहीं आणि ती धरणीला शरण गेली. त्या क्षणाचीच वाट पहात बसलेला नागाप्पा धावत तिथें आला.

पुन्हा तीच खोली आणि तोच नागाप्पा. त्या दिवशीं ती जेव्हां सावध झाली, तेव्हां तिचं मस्तक त्याच्या खांद्यावर विसावलं होतं. तो कांहीं बोलला नाहीं ; पण न बोलतांच तिला त्याच्या काळजांतले ध्वनी ऐकायला आले. ते स्पष्ट होते, अनिवार्य होते. शरीर आणि मन निस्त्राण झालं असतांना ते तिच्यावर आघात करीत होते. तिनें एकवार डोळे उघडून त्याच्याकडे पाहिलं. काय होतं त्या दृष्टींत ? आग का पाणी ? करुणा का आसक्ति ? आराधना का धिक्कार ? तिला सगळं हवं होतं, पण कांहींहि नको होतं. ती त्या वेळीं विधि-निषेधाच्या पलीकडे होती. केवळ असहाय्य ! केवळ परिस्थितीच्या भोंवऱ्यांत सांपडलेली !

नागाप्पाचे डोळे घिसघिसले. त्यानं नेहमींच्या लकबीप्रमाणें दांतांखालीं अधर दाबला. त्या दिवशीं त्याला कळलं, कीं आपला मंत्र यशस्वी झाला आहे. तो मनांत म्हणाला, ' ही तळपती वीज इतक्या लवकर सौम्य होईल अशी अटकळ नव्हती मला. ' आपली पिस्कारलेली आंखूड शेंडी गोळा करीत तो उठला. जातांना त्यानं वामन परांजप्याला सांगितलं.

" उद्यां तिन्हीसांजा येईन. एक देवता-यंत्र सिद्ध करून तें तिच्या गळ्यांत बांधलं पाहिजे. नारळ, उदबत्ती, विडा, थोड्या मोहऱ्या, एवढं सामान खोलींत नेऊन ठेव. आतां उपचार-पद्धति बदलायला हवी. "

यथाक्रम तिचा तो विकार सौम्य सौम्य होत गेला. आतां नागाप्पा घरीं आला कीं बापानं न सांगतांच ती त्याला चहा करून देऊं लागली. घरांत कांहीं अपूर्व पदार्थ झाला असेल तर तो राखून ठेवून त्याच्या पुढें करूं लागली. तो पडवीवर असेपर्यंत त्याच्याभोंवतीं घुटमळूं लागली. त्याच्या घरीं अडीअडचणीला कंबर बांधूं लागली. आणि अशा अडचणी वारंवार येऊं लागल्या. सुलोचना घरीं नसली तर नागाप्पाकडे सांपडायची हा नियम ठरून गेला.

गांवांत 'घूं घूं' सुरू झालं. आयाबायांच्या नजरा तिच्यावर टवकारूं लागल्या. 'आम्ही समाचाराला गेलों त्या वेळीं धाड्कन दार लावून घेऊन खोलींत सासणणारी हीच का ती बया,' म्हणून त्या एकमेकींना विचारूं लागल्या. तिच्या आईकडे औपरोधिक बोलूं लागल्या. सुलोचनेला तें कळे. ती मनांतल्या मनांत त्यांना उत्तर देई, 'बघवत नसेल तर डोळ्यांत मिरच्यांची फकी घालून घ्या.' पण कित्येकदां तिचं तिलाच तें उत्तर पटत नसे. अफूच्या कैफांत विवेकभ्रष्ट होऊन पेंगळून पडलेला तिचा आत्मा एखाद्या दिवशीं खाडकन् जागा होऊन तिला फटकारा मारी.

'शीः! काय करून घेतलंस हें? अशी कशी पोतेरं झालीस?'

पोतेरं! पोतेरं! तिला तो शब्द झोंबे. सोललेल्या अंगावर मिठाचं पाणी शिंपडावं तसा. ती मग खवळून उठे. नागाप्पाला आपल्या डोळ्यांच्या आगींत भाजूं लागे. त्याची चांगली खेटरपूजा बांधी. त्याला मेलेलं मास खाणारा कोल्हा म्हणे. तो निर्लज्जपणें हसूं लागला कीं त्याच्यापुढें आदळआपट करी. घरीं येऊन बापावर घसरे. आईला हवी तशी कांच्यांवर ओढी. आणि तेवढ्यानंहि आंतलं तुंबळ शमलं नाहीं तर आपल्या तांबूस तळव्यानं थाड्थाड् कपाळ बडवून घेई. तिचा तो कधींमधीं येणारा उन्मादाचा झटका जितका अनपेक्षित तितकाच सर्वांना तापदायक असे. आईबापांना त्याचं निदान होऊं शकत नसे. तीं दोघंहि मूग गिळून बसत. सुलोचना त्यांना डोईजड झाली होती.

अशा वेळीं वामन परांजपे पडवीवर येऊन बसला अन् समोर कोणी असलं, तर आंत सुलोचनेला ऐकूं जाणार नाहीं इतक्या बेतानं तो आपलं तें नेहमींचं पालुपद एकदां आळवून पुरं करी.

"...पण नवरा मरून मुलगी माघारीं येणं मात्र नको रे बाबाऽ!"

त्यानंतर एका रात्रीं त्याचा चुलतभाऊ मडगांवाहून आला होता त्याच्या-पुढेंहि आपल्या दुर्दैवाचा सारा पाढा वाचून अखेर हेंच पालुपद त्यानं आळवलं. राजाभाऊ एवढा वेळ स्तब्धपणें ऐकत होता त्यानं मग तोंड उघडलं.

" हूं ! ऐकलं सगळं. तुला राग येणार नसेल तर यांतून बाहेर पडायचा एक मार्ग सुचवतों. "

" सुचव ना ! राग कसला त्यांत ? " वामन परांजपे आपल्या पोटावर पुढचीं बोटं दाबीत म्हणाला.

" तूं या मुलीचा पुनर्विवाह लावून टाक. "

" पुनर्विवाह !... " आणि एवढंच म्हणून तो गप्प झाला. आज हा रस्ता बारा हात रुंद झाला आहे, कुणी कुणाला नांवं ठेवीत नाहीं, अनेक मोडलेले संसार अन् भंगलेले जीव या विधीनें पुन्हा उभे रहातात, हें सगळं त्यानं पाहिलं नसलं तरी ऐकलं होतं. पण त्याला वाटलं, या शहरांतल्या गोष्टी. तिथें कुणाची कुणाला पर्वा नसते. जो तो आपापल्या परी स्वतंत्र. खेड्यांत हें कसं जमायचं ? इथला समाज परस्परावलंबी. एकमेकांत गुंफलेला. नको असलं तरी इथें शेजाऱ्यापाजाऱ्यांचं दडपण सोसावं लागतं.

वामन परांजप्याच्या मनांत अनेकदा ही कल्पना आली होती. पण तिचा स्वतःशीं देखील उच्चार करायला तो धजला नव्हता. अन् आज त्याचा चुलत-भाऊ बिनदिक्कतपणें त्याला ती गोष्ट सांगत होता. तसं घडलं असतं तर त्याच्या उरांतली सुरी निघणार होती. खाल्लेलं अंगीं लागणार होतं. अंथ-रुणावर पडल्यावर झोंपेविना ताठलेले डोळे आढ्याकडे लावण्याचं कारण उरणार नव्हतं. पण तरीदेखील त्याचा होकार बाहेर पडेना. राजाभाऊनं मग त्याला बरंच मोठं व्याख्यान ऐकवलं. त्याच्या अंतरांत पटलेला मुद्दा पुन्हा त्याला पटवला. त्याचं म्हणणं खोडून काढतां येईना तेव्हां वामन परांजपे एवढंच म्हणाला.

" मीं पुष्कळ हो म्हटलं, म्हणून तेवढ्यानं काय होणार ? तिला पत्कर-णारा कोण अन् कुठें हुडकायचा ? मी का आतां या असल्या वरसंशो-धनाला जाऊं ? "

" तूं नको जाऊं. मी करतों तें सगळं. मडगांवांत माझ्या शेजारीं एक गृहस्थ आहे. त्याची बायको नुकतीच वारली आहे. फक्त दोन लहान मुलं आहेत. वयानं फार जून नाहीं. तो पुनर्विवाहाचीच मुलगी शोधतो आहे. त्याचा स्वतःचा छापखाना आहे. धंदा चांगला चालला आहे. स्वभावानंहि भला माणूस. मी नेहमीं पाहतों. मी तिथें प्रयत्न करीन. बहुतेक जमवीनच. तूं फक्त सुलोचनेचा रुकार घे. "

" तें नाहीं रे बाबा आपल्याला जमायचं. तिची ऐरण सदाच तापलेली असते. मनांत नसलं तर ती मला पिसडून काढील. राजाभाऊ, काय सांगूं! या पोरीला मी फार घाबरतों. "

" ठीक आहे. मीच विचारतों तिला."

राजाभाऊ सकाळीं जाणार होता तो थांबला. सुलोचनेला तो प्रश्न विचारायचा म्हणजे स्थल–कालाची अपेक्षा होती. ' ऊठ सोट्या, घे ओळख ' असं करण्यानं उद्दिष्ट बिनसण्याचा संभव होता. आधीं वळणावळणानं बोलून तिची मनोवृत्ति तयार करून मगच तीं प्रश्नोत्तरं तिच्या कानांत सोडायला हवीं होतीं. राजाभाऊनं तें काम उत्कृष्टपणें केलं.

राजाभाऊ आपल्याला असं कांहीं विचारील अन् तेंहि इतक्या कळवळ्यानं याची सुलोचनेला कल्पनाहि नव्हती. तिला चकित करणारा, तिच्या विचारशक्तीवर गोड आघात करणारा असा तो सवाल होता. ती घुटमळली, गोठली, अधोमुख झाली. काय उत्तर द्यावं तें तिला क्षणभर सुचलं नाहीं. सुचलं तरी तें उच्चारवलं नाहीं. ती स्वतःमधेंच गुरफटली.

' पुनर्विवाह ? ...... माझा ? ... खरंच का ? असं होणं शक्य आहे ? मातीचं भांडं, एकदां विटाळलं कीं निरुपयोगी झालं, हें खरं नव्हे का ? माझ्या कपाळीं परत कुंकू लागेल ? तुटलेलं मंगळसूत्र परत ओवतां येईल ? हक्काचं घर, हक्काचं माणूस, हक्काचं प्रेम, मला पुन्हा मिळूं शकेल ? काय ऐकतें मी हें राजाभाऊच्या तोंडून ? तसं झालं तर हा मेला दावेदार नागाप्पा माझ्या राशीचा सुटेल. सत ना गत अशी माझी दशा करून टाकली आहे चांडाळानं...... '

आणि नंतर आपण राजाभाऊला होकाराचं उत्तर दिलं तें तोंडानं का मानेनं हें तिचं तिलाच कळलं नाहीं. संकोचानं त्याच्या पुढून दूर होतांना तिची ती स्वप्नाळु दृष्टि त्याला सांगत होती. 'राजाभाऊ, बापाला सुचलं नाहीं तें तुला सुचलं. तूं हें घडवून आणलंस तर जन्मभर तुझे उपकार स्मरेन.'

आणि त्यानंतर चार दिवसांनीं तिला दाखवण्यासाठीं म्हणून राजाभाऊ त्या गृहस्थाला घेऊन आला, त्याला पाहून सुलोचनेला खूप समाधान झालं. पूर्वीच्या तिच्या नवऱ्यापेक्षांहि तो सरस होता, नागर होता, सुदृढ होता. त्याचे कपडे, त्याचे केस आणि त्याच्या चेहऱ्याची प्रत्येक बाजू तिनं चोरट्या नजरेनं पाहून घेतली. आपण आंत–बाहेर होतांना तोहि आपला वेध घेण्याची संधि दवडीत नाहीं हेंहि तिला कळलं. ती त्याच्या नजरेला नजर भिडवूं शकली नाहीं. नव्या नवरीची लाज अन् उत्कंठा तिच्या काळजांत शिरली. तो बोलत होता तें आंतून ऐकतांना, आजवर झालेले जन्माचे धिंडवडे आणि नजीकचा तिरस्करणीय भूतकाळ घटकाभर ती साफ विसरून गेली. तो जेवतांना वामन परांजप्याकडे बघून सांगत होता.

"मोडलेला संसार पुन्हा उभा करायला मी निघालों आहें. स्वतः भाजल्यापोळलेल्या माणसानं त्याच स्थितींतलं एखादं योग्य माणूस जोडीला घ्यावं असं मला वाटतं. माझी कल्पना आहे कीं, अशीं दोन माणसं चटकन् सांधूं शकतील. आत्मप्रतीतीनं दुसऱ्याचं मन जाणूं शकतील. माझ्या फारशा काव्यमय अपेक्षा नाहींत. जी कुणी येईल तिनं घरसंसार आपला म्हणावा अन् आईवेगळ्या दोन मुलींहि आपल्या म्हणाव्या एवढंच माझं म्हणणं आहे."

त्याचं हें बोलणं वस्तुतः आपल्याला उद्देशून आहे, हें तिनं ओळखलं. ती त्याला मोठ्यानें उत्तर देऊं शकली नाहीं; पण मनाशीं मात्र म्हणाली. 'नका हो असा मनांत विकल्प आणूं! तुम्ही एका जड शिळेला उद्धरणार अन् मी का तुमच्या मुलींना दुजं करीन! पहा तर खरं. माझा आकस्ताळेपणा कुणीं तरी तुमच्या कानावर घातलेला दिसतोय्. पण तो असह्य यातनांतून उद्भवला आहे. परिस्थिति बदलली कीं जाईल तो. खरंच जाईल...'

त्या रात्रीं तिला आलोचन जाग्रण झालं. भविष्यानं तिला गोंजारलं अन् भूतानं डिवचलं. ती प्रथम सुखानं रडली अन् मग दुःखानं. आपल्या जीवनांत

नागाप्पा आला नसता तर आजच्याहूनहि आपला माथा उजळ असता असं तिला राहून राहून वाटलं. वैधव्य हा तिचा जाहीर अपघात होता. तिच्याशीं लग्न करूं पाहणारा गृहस्थ तो जमेला धरूनच आला होता. पण नागाप्पाचा हा गुप्त अपघात... तिच्या हृदयाचा तेवढा एकच कप्पा कलंकित होता. तो त्यापासून लपवून ठेवतांना तिला वारंवार आंतल्या आंत पिचावं लागणार होतं. आणि तो तर कधींच उघडून दाखवणं इष्ट नव्हतं. वैधव्य सहन केलं म्हणून त्याआगळं काहीं सहन करण्याइतका तो क्षमाशील असेल अशी तिनं कशी कल्पना करावी !

सकाळीं तो अन् राजाभाऊ दोघेहि निघून गेले. 'चार दिवसांनीं परत येईन ; कुठें वाच्यता करूं नको या गोष्टीची,' एवढंच राजाभाऊ जातांना वामन परांजप्याला बोलला. त्यांची पाठ वळते न वळते, तोंच नागाप्पा वाटेवरच्या फणसाखालीं उभा असलेला सुलोचनेला दिसला. तो आपली उंटाडी मान वर करून बारीक डोळ्यांनीं झाडावरचीं फळं मोजीत होता. लोकांच्या वस्तू मोजायच्या, चांगलं असेल तें भुंवया आकुंचित करून निरखायचं, ही त्याची जन्मखोड होती. सुलोचना समजली कीं, हा 'काळमुखा' आतां इकडेच येणार. तिनं अत्यंत तिरस्कारानं एकदां त्याच्याकडे पाहिलं आणि तो पडवीवर येण्याच्या आंत तोंड चुकवलं. तो तोंड घेऊन चालता झाला हें कळलं तेव्हांच ती घरांत शिरली. आतां ती त्याच्या सावलीलासुद्धा उभी राहणार नव्हती.

आईनं तिला सांगितलं कीं, नागाप्पा 'पाहुणे कोण आले होते, कशाकरतां आले होते,' असं खोदून खोदून विचारत होता. ती आईला म्हणाली, 'तूं काहीं बोललीस कीं काय?' त्यावर आईनं सांगितलं कीं, 'आपण ताकास तूर लागूं दिली नाहीं.' सुलोचनेचा जीव भांड्यांत पडला. आतां तिचं सारं लक्ष राजाभाऊच्या पुनरागमनावर केंद्रित झालं होतं. तिचा उजाडलेला दिवस संपतां संपत नव्हता. रात्री तळमळत जात होत्या. आपले निळसर स्वप्नाळू डोळे जागरणानं तिनं रक्तकमळं करून घेतले होते. सुख तिला एका हाकेच्या अंतरावर दिसत होतं; पण त्याचं तोंड आपणाकडे आहे का विरुद्ध दिशेला आहे हें तिला खात्रीलायक कळत नव्हतं. ती असह्य अशी दोलाचल अवस्था अनुभवीत होती.

चार दिवस संपून पांचवा उगवला आणि तिनें वाटेकडे डोळे लावले. पण राजाभाऊ दिसला नाहीं. सहावा दिवसहि सुनाच गेला. सातव्यानेंहि माग-च्याचीच री ओढली. घरांतलीं सगळींच माणसं अस्वस्थ झालीं. सुलोचनेची घालमेल बापाला जाणवली. त्यानं मग स्वतःच मडगांवची वारी करण्यासाठीं रुमाल बांधला. पोट दुखत होतं तरी तो तसाच निघाला. गेल्याच्या दुसऱ्याच दिवशीं परत आला. त्याचं आंबट तोंड पाहून सुलोचनेचं काळीज धसकलं. कांहीं तरी चिनसलं होतं खास. पण काय तें विचारायला तिची जीभ रेटेना. वामन परांजपे बायकोला सांगत होता तें ऐकायला तिनं जिवाचे कान केले.

" नाहीं जमत तें. उगाच खेप मात्र पडली. "

" काय झालं ? "

" त्याला कुणीं तरी बातमी दिली कीं, ' सुलूचा नवरा पिशाच होऊन तिच्या कांध्यावर बसला आहे. जो तिच्याशीं लग्न करील त्याला तो मुरडून खाईल. ' तो गृहस्थ मला भेटला नाहीं. पण राजाभाऊला म्हणाला म्हणे, ' आपल्याला नको बुवा ती मुलगी. उगाच चुडणीनें वाघ घरांत कशाला आणूं ! "

" शेवटीं असंच का ? कोण हा त्याला गुरु भेटला ? कुणाला हें बरं बघवलं नाहीं ? " सुलोचनेची आई म्हणाली.

पण हा ' हितशत्रु ' कोण हें आईला उमगलं नसलं तरी सुलोचनेला ताब-डतोब उमगलं. ' नागाप्पा ! दुसरं कुण्णी नव्हे. त्या मेल्याला सगळ्यांचीं रहस्यं कर्णपिशाच सांगतं कीं काय नकळे ! ' मधले दोन दिवस तो घरीं नव्हता, हें तिला कळलं होतं. ' बरं झालं कुठें ओवाळला तो ! ' ती म्हणाली होती. पण आतां तिची खात्री झाली कीं, तो आपल्याच सुखांत विष कालवायला गेला होता. तिनं कपाळावर हात मारून घेतला.

ज्या एका विलोभनीय यक्षसृष्टींत सुखाच्या पायघड्यांवरून ती पैंजण रुणझुणवीत चालत होती, त्या यक्षसृष्टीवर उल्कापात झाला. ती कडेलोट व्हावा तशी खालीं कोसळली. पहिला क्षण निराशेंत सुस्कारला. पण दुसऱ्याच क्षणीं तिचं आंतलं धगधगीत तेज उसळून आलं. तिच्या दोन्ही डोळ्यांत रक्त उतरलं. अस्सं जावं अन् त्या मांगांतल्या पेडमांगाच्या नरडीचा घोट घ्यावा, असं तिला वाटलं. ती त्याच पावलीं विजेसारखी बाहेर पडली. संकोच,

विनय, मर्यादा या सगळ्यांचं आवरण झुगारून देऊन तरातरा निघाली. जशी गोळी लागून उलटलेली वाघीणच!

तिनं नागाप्पाचं घर गांठलं; पण तो घरीं नव्हता. तो कुळागरांत गेल्याचं कळलं तशी ती तिकडे धांवली. ओव्यामागून ओटे एका दमांत उतरून तिनं कुळागराचं मुळस गांठलं. तिच्या भिरभिरत्या जळजळीत डोळ्यांना नागाप्पा वहाळाच्या धडेवर दिसला. तो एका लिंबिणीच्या खालीं उभा होता आणि भुंवया आकुंचित करून लिंबं टेहळीत होता. सुलोचनेनं मागाच्या मेरेवरूनच त्याला हांक मारली.

"नागाप्पा!"

ती हांक नव्हती, तर बंदुकीची गोळी होती. नागाप्पाला ती पाठीवर लागली आणि त्यानं झटकन् तोंड वळवलं. त्याला सुलोचना दिसली, पण ती त्याच्या नित्यपरिचयाची नव्हे; तर दानवनिर्दाळणाला प्रवृत्त झालेली कपालभैरवी या स्वरूपांत. तो चरकला; पण तरीहि दोन पावलं पुढं सरकला. नेहमींच्या लकबीप्रमाणें दांतांखालीं ओठ दाबीत त्यानं सुलोचनेवर नजर रोखली.

"पुढं ये असा. मला तुझ्याशीं कांहीं बोलायचं आहे."

"असं? मग तें इथं कशाला? खासगी बोलायची आपली जागा ठरलेली आहे."

"मसणांत गेली ती जागा. माझा पुनर्विवाह कां मोडलास तूं? कां माझ्या सुखांत बिब्बा घातलास?"

"कुणीं, मीं? नमः शिवाय! तुझा पुनर्विवाह होणार होता? नवलच ऐकतोंय् मी!"

"हो हो, होणार होता. पण तूं मधें आडवा पडलास. तूं लावालावी करून तो मोडलास. तूं—

"मी कशाला असलं पाप माथीं घेऊं बये! छेः छेः!"

"कशाला म्हणजे? स्वतःच्या स्वार्थासाठीं—"

"स्वार्थ काय माझा एकट्याचाच होता? टाळी काय एकाच हातानं वाजली?"

" लाज नाहीं वाटत जीभ काढून बोलायला ? "

" वाटली असती. पण ती तूं सोडली नसतीस तर ! "

" आतां कळलं मला. तुझंच हें हलकटपणाचं—"

" बरं झालं कळलं तें. केव्हां तरी तें तुला कळायलाच हवं होतं. घोव हवा होता तुला नाहीं का ? पाट लावून जाणार होतीस, होय ना ? अन् मला लाथ मारून ! गेले आठ दिवस तोंड पहायला तयार नव्हतीस माझं. अर्ध्या पिसानं मोर झाली होतीस. हा नागाप्पा म्हणजे काय तुला कोण्या झाडाचा पाला वाटला—"

" नीच...हलकट..."

सुलोचनेच्या संतापाला आतां आवर उरला नाहीं. तिनं पायाजवळचा आंब्याएवढा एक दगड उचलला अन् तो नागाप्पावर भिरकावला. त्यानं चटकन् अंग चोरलं म्हणूनच त्याचा कपाळमोक्ष चुकला. तो दगड मागच्या लिंबिणीच्या पर्णसंभारांत घुसून सटसटत पलीकडच्या ओढ्यांत 'डुबुक्' वाजला. तो चुकला हें पाहून सुलोचनेनं तसाच दुसरा एक दगड उचलला.

त्यासरशीं नागाप्पानं वाघासारखी तिच्यावर झडप घातली. तिचा उजवा दगडाचा हात घट्ट पकडून त्यानं तो निर्दयपणें पिरगाळला.

" टाक, टाक तो दगड खालीं—"

" ओय्...ओय्...मेलें......धावा रे..." म्हणून तिच्या तोंडून बोभाटा निघणार—निघतो आहे, हें पाहून त्यानं आपला डावा हात तिच्या उघडलेल्या तोंडावर दाबला. तिच्या हातचा दगड खालीं सुटला, तरी त्याची पकड मात्र यत्किंचितसुद्धा सैल झाली नाहीं. त्याच्या त्या घिसघिसत्या डोळ्यांतून आतां जणुं ठिणग्या निघत होत्या. दातांखालीं दाबल्या जाणाऱ्या ओठाची त्याला या वेळीं दखल नव्हती. नागाप्पा त्या वेळीं आग्या वेताळ बनला होता. सुलोचनेला आपल्या तांबारलेल्या नजरेनं जाळीत, भाजीत तो बजावीत होता—

" माझ्यापुढें गमजा चालायच्या नाहींत तुझ्या ! त्रिभुवनांत कुठें पळालीस तरी तुला फरफटीत आणून माझ्या पायांशीं लोळायला लावीन. आतां माझ्यावांचून तुला दुसरी गति नाहीं. नागाप्पानं एकदां 'झाड' धरलं कीं

तें ब्रह्मदेवाच्या बापाला सुटायचं नाहीं. अधिक धिंडवडे काढून घ्यायचे नसतील तर मला संभाळूनच राहिलं पाहिजे तुला. आतां मी तुझ्यामागून येणार नाहीं ; तूं आलं पाहिजेस. कुत्र्यासारखं शेपूट घोळीत नि पाय चाटीत. मुंडावळ्या बांधायला निघाली होती ××..."

आणि त्यानं तिला तशीच मागें ढकलून दिली. ती मागच्या घडेवर आदळली अन् उभीच्या उभी अननशीच्या पात्यांवर कोसळली. तिला तो मागचा झटका आला आणि तिनं अंग मुडपलेल्या अवस्थेंतच डोळे फिरवले. नागाप्पानं तें पाहिलं. पण तिला सावध करायला तो तिथें थांबला नाहीं. 'मरत नाहीं ; येईल थोड्या वेळानं शुद्धीवर,' म्हणून तो तिथून चालता झाला.

पण नागाप्पा क्रूरकर्मा झाला तरी निसर्ग दयावंत होता. पोफळींनीं तिच्यावर आपली सावली धरली. केळींनीं हात हालवून तिला वारा घातला. अननशीच्या पात्यांनीं तिच्याखालीं आपला जीव अंथरला. तिथल्या दगडानं तिचं मस्तक अलगत मागें लोंबकळत ठेवलं. अर्ध्या घटकेनं ती सावध झाली. कुडीवेगळी होऊं पहाणारी तिची चित्कला पुन्हा तिच्या काळजांत आपल्या जागीं बसली. आपले जड जड डोळे तिनं मोठ्या प्रयासानं उघडले. आपण कुठें अन् कशा स्थितींत आहों हें तिला कळायला कांहीं क्षण जावे लागले. चोळीच्या खालीं उघड्या पाठीला अननशीच्या कांट्यांची बोंचणी चालू होती, ती आतां कुठें तिला जाणवूं लागली. पण तरीहि तिला उठून बसावंसं वाटलं नाहीं. तिचं गोरंगोमटं मुखमंडल इतकं पांढरं फटफटीत पडलं होतं कीं, जणूं नागाप्पा तिथून जातांना तिच्या कोंवळ्या कायेंतलं सगळं रक्त पिऊन गेला होता. पुरी शुद्धि आल्यावर तिच्या मनांत पहिला विचार आला तो हा—

या क्षणीं आपल्या पायांखालची धरणी दुभंग व्हावी अन् आपण असंच्या असं तींत गडप व्हावं !

पण धरणीनं आपल्या पोटांत घ्यायला सुलोचना कांहीं अग्निदिव्य केलेली सीता नव्हती !

---



२०८५८
ग्रा.ग्र
२०२८
३१७।६१

# त्याची रसवंती गुप्त झाली : : ३ :

आमच्या वाड्याच्या आंगणांत अनेक भिक्षेकरी अनेक मिषांनीं येत असतात. 'ब्राह्मण आला आहे हो ऽऽ! काहीं अन्न असलं तर वाढा!' म्हणून एक जण पुकारतो. काहीं लोक खांद्यावर गुळ्या अन् हातांत बुक्कयाचं तबक घेऊन येतात. त्यांच्यापैकीं कोणाला पंढरीस जायचं असतं तर कोणी पंढरीची वारी करून नुकतेच आलेले असतात. दोघांनाहि दोन्ही कारणांसाठीं भिक्षा मागायचा अधिकार प्राप्त झालेला असतो. वाघ्ये भंडार घेऊन येतात तर भुत्ये देवीचा उदोकार गर्जत येतात. आमचा लालू चित्रकथीहि त्यांतलाच.

तो अधून मधून वेगवेगळे गांव हिंडे अन् उरलेले दिवस पुण्यांत भिक्षा मागे. पंधरवड्यांत त्याची फेरी चुकायची नाहीं. वाड्याच्या मधल्या प्रशस्त चौकांत मधोमध येऊन तो उभा रहायचा. हेतु हा कीं, सर्वांचं लक्ष आपल्याकडे वेधावं. फाटक्या, मळकट धोतराचा काचा, डोक्याला तेलकट खादीची टोपी, अंगांत सदरा असला तर असला; नाहीं तर तसलंच एखादं फाटकं तुटकं धोतर पांघुरलेलं, खांद्यावर टेकवलेली एकतारी, बरगड्यांच्या फांसळ्या, उराची शिंप, डोळ्यांत भरण्याजोगी उंची, तिला साजेसाच लांबट चेहरा, मुद्रेवर लाचारी आणि डोळ्यांत अभ्यासानं कायमचं आणून बसवलेलं कारुण्य...असं होतं लालू चित्रकथ्याचं चित्र. कोण लक्ष देणार त्याच्याकडे!

पण याच चित्राला दुसरी एक कोवळी अन् नाजूक बाजू होती अन् ती म्हणजे त्याची मुलगी गौरू. खेटून उभी राहिली कीं लालूच्या खांद्याला डोकं लागावं इतकी ती वाढलेली होती. भिक्षेला निघतांना लालू जर तिला अभ्यंगस्नान घालून आणता तर मालिन्याच्या पुटाखालीं तिची त्वचा किती गोरीपान आहे तें जन-लोकाला कळलं असतं. तिच्या दोन भुंवयांमधली, हनुवटीवरची अन् हातावरची गोंदणी चांगली उठून दिसली असती. आपले

तोकडे आणि बिनअग्रांचे केस मागें ओढून घेऊन ती त्यांचा पोफळाएवढा अंबाडा बांधी अन् त्याचा काळा आगवळ मानेवर रुळता सोडी. तिला कुंकवाची कदर नव्हती. तो सौभाग्यटिळा कपाळीं लावणारा अजून तिला भेटायचा होता. नेसलेलं जुनेर कमरेभोंवतींच जेमतेम पुरल्यामुळें त्याचा पदर शिल्लक उरत नव्हता. वाढत्या उराची लाज कंचुकीच काय राखील तेवढी. पण त्या गोष्टीचीहि तिला विशेषशी जाणीव नव्हती. तिच्या हातांतला अल्युमिनियमचा वाडगा काळवंडलेला असे; पण तिच्या ओठाच्या पाकळीआड दडलेलं स्मित मात्र तितकंच ढवळं होतं. त्या वाडग्यांत कोणीं पैसा टाकला, किंवा शिळापाका तुकडा फेकला कीं तें चटकन् बाहेर डोकावे. चौकांत उभी राहिल्या राहिल्या तिचे भ्रमरनेत्र मगळया बिन्हाडांत वर-खालीं हिंडून येत.

लालू चित्रकथी वाड्यांत आला कीं पंधरा-वीस मिनिटं हालत नसे. त्यानं सुरू केलेलं गाणं संपायलाच तेवढा वेळ लागायचा. अन् तें संपेपर्यंत त्यानं कोणापुढेंहि तोंड वेंगाडायचं नाहीं. त्याचा आवाज घोगरट पण सुरेल होता. एकतारीच्या 'तुईतुई' मध्यें तो अगदीं दूध-पाण्यासारखा मिसळे. आणि त्याचं न्यून तें पुरतं करायला गौरू हजर असायचीच तिथें. तो पालुपदावर आला कीं ती झेप घातल्यागत त्याचा शेवटचा चरण पकडी अन् भिंगरीसारखी टिपेला भिडून पुन्हां मुळाशीं येई. किती स्वच्छ अन् धारदार गळा! जणूं एखादी किन्नरीच तिच्या नितळ कंबुकंठांत लपून बसली आहे. एकच लकेर तिनं फेकली कीं बापाच्या स्वरमालेला जरतारी किनार जोडली जायची. वाड्यांतली सगळीं माणसं एकदम कान टवकारायचीं. मग लालूला मूठ मूठ दाणे घालायला पोरांचीं अहमहमिका लागायची. ती पोरगी हें लालूचं मुख्य भांडवल होतं.

पण माझं लालूकडे लक्ष वेधलं तें निराळ्याच एका कारणानं. एका फेरींत तो आला आणि त्यानं एक सुंदर गाणं सुरू केलं.

**"जिव जलमाचा संगती कुडी बोलती<br>मला नका हो सोडून जाऊं प्राणपती"**

हें पालुपद त्यानं एकतारीच्या स्वरांत स्वर मिसळून म्हटलं अन् पाठोपाठ उंच, दळदार आवाजांत गौरूनं 'जाऊं प्राणपती ऽऽ' हा त्याचा शेवटचा

चरण छेडला. लालूच्या स्वराला पोटांत घालून तिची ती लकेर दाराखिडक्यांतून माझ्या बिऱ्हाडांत घुसली. मी माडीवर बसलों होतों. तिथं येऊन तिनं माझ्या हृदयाची तार कंपित केली. ‘अरेच्च्या ! हें गाणं कांहीं न्यारंच दिसतंय.’ मीं म्हटलं. हातांतलं काम तसंच टाकून मी झपाझप जिना उतरलों. मी कशाकरतां खालीं आलों हें लालूनं ताडलं असावं. भिकारी मोठे मानसशास्त्रज्ञ असतात हें मला ठाऊक होतं. दुसऱ्याच्या भावनांना कसा मुलायम स्पर्श करावा अन् आपल्या थाळयांत नाणं कसं वाजवून घ्यावं, ही कला त्यांनीं नित्य अभ्यासानं आत्मसात् केलेली असते, याचाहि मला अनुभव होता. मी खालीं येऊन ऐकत उभा राहिलेला पाहून लालूनं आपले डोळे मुकुलित केले आणि जणूं आपली ब्रह्मानंदीं टाळी लागली आहे असं मला भासवलं. त्याच्या मुखांतून एकेक चरण मागें पडूं लागला. गाण्यांतला आशय घनसांद्र होत चालला. गौरूच्या पालुपदानं त्याला एक विलक्षण धार येत चालली—

अंतकाळ मांडलेला आहे. पंचप्राणांची उलघाल होते आहे. आत्मराज प्रस्थान ठेवायला निघाल्यामुळें कुडीला ‘अवस्था’ लागली आहे. ती त्याला कवळून धरीत आहे. तळमळून प्रार्थीत आहे.

“...नका हो मला सोडून जाऊं ! तुम्ही माझे जन्माचे सोबती. आपलं दोघांचं आजवर कसं मैत्र नांदलं ! तुम्ही पाटील, मी धर्माची चावडी. तुम्ही गोसावी, मी विश्रांतीची मढी. तुम्ही गारुडी, मी तुमची पोतडी. तुम्हीं पोहणार, मी तुमची सांगडी. तुम्ही दोरा, मी आकाशांत उडणारी वावडी...”

पण आत्मराज तिचं ऐकत नाहीं. त्याला वरून हुकूम आला आहे. तो निघाला, उडाला, ठिकाणाला पोंचलासुद्धा. लगोलग कुडी थंड पडली. निश्चेष्ट बनली. अन् मग कवि आपल्या कवनाचा निष्कर्ष सांगतो— काय आहे या नरदेहांत ! हा तर क्षणाचा बुडबुडा. चालतो तोंवर दुसऱ्याच्या उपयोगी पडावं. दुसऱ्याचं दुःख हलकं करावं. भुकेल्याची भूक जाणावी, तान्हेल्याला पाणी द्यावं ...

मी एवढा वेळ रोधून धरलेला श्वास सुस्काऱ्याच्या रूपानं सोडला. त्या गाण्याची चाल, त्यांतली संवादकल्पना तीं चढत्या श्रेणीचीं रूपकं अन् शेवटचा निष्कर्ष, हें सगळं एकदम माझ्या मनांत भरलं. मला असलीं लोक-

गीतं जमवण्याचा छंद होता. भाराभर गोळा करावं तेव्हां त्यांत असलं एखादं चमकतं काव्यरत्न हातीं लागावं. तें काव्य लालूचं नव्हतं. पण तरीहि त्या वेळीं मला तो शब्दसृष्टीचा ईश्वर वाटला. मी आणखी त्याच्याजवळ गेलों. आर्जवानं त्याला म्हटलं,

" तूं हें गाणं मला देशील का ? माडीवर ये अन् पुन्हां एकदां म्हण. मी झरझर उतरून घेतों."

" आतां भिक्षेची वेळ आहे दादा ! " तो म्हणाला.

" भिक्षा मी घालीन तुला आजच्या सबंध दिवसाची. तूं ये वर. "

" तसं न्हाई व्हायचं दादा ! "

" मग उद्यां येशील ? "

" तें कसं सांगूं ! माजं काय, म्होरा फिरल तिकडं फिरल. "

लालू मला वस्ताद दिसला. मासा सहजासहजीं गळाला लागायला तयार नव्हता. माझी उत्सुकता त्यानं पाहिली होती. मी माझ्या मुद्रेवरचे रसभाव लपवूं शकलों नव्हतों. म्हणजे त्याच्यापेक्षां मीच भोळा होतों. आपण म्हट-लेल्या आजच्या गाण्याचा भाव काय आहे, याचा त्याला बरोबर अंदाज आला होता. तो पुन्हा येण्याचं निश्चित सांगेना अन् मला उत्कंठा आवरेना. अखेर मीं त्याला म्हटलं.

" तुझा पत्ता तरी सांग मला. म्हणजे मीच तुझ्याकडे येईन. "

" पत्त्या सांगतों कीं. नव्या पुलावरनं जातांना उजव्या हाताला एक झोपड्यांची वाडी हाय का ? टिनपाटवाडी म्हंत्यात तिला. तिथंच माजंबि एक झोपडं हाय. लालू चित्रकथी म्हनलांत कीं कुनी बी सांगल तुमाला. मातर सकाळच्या पारीं लवकर या. मंग मला भिक्षेला जायचं असतं. "

" ठीक आहे, उद्यां सकाळीं येईन मी. "

" एकादं धोतर बितर हाय का दादा ? माजं हें बगा. पार लक्तरं लोंबत्यात. "

" पाहीन असलं तर. उद्या आणीन येतांना. "

'बरं' म्हणून मला त्यानं नमस्कार केला. लालूच्या वस्तादपणाचा हा दुसरा पुरावा. मी यायचं तर रिक्त हस्तानें येऊं नये, अशी त्याची ही

चरण छेडला. लालूच्या स्वराला पोटांत घालून तिची ती लकेर दाराखिडक्यांतून सगळ्या बिऱ्हाडांत घुसली. मी माडीवर बसलों होतों तिथें येऊन तिनें माझ्या हृदयाची तार कंपित केली. 'अरेच्च्या ! हें गाणं कांहीं न्यारंच दिसतंय.' मीं म्हटलं. हातांतलं काम तसंच टाकून मी झपाझप जिना उतरलों. मी कशाकरतां खालीं आलों हें लालूनं ताडलं असावं. भिकारी मोठे मानसशास्त्रज्ञ असतात हें मला ठाऊक होतं. दुसऱ्याच्या भावनांना कसा मुलायम स्पर्श करावा अन् आपल्या थाळ्यांत नाणं कसं वाजवून घ्यावं, ही कला त्यांनीं नित्य अभ्यासानं आत्मसात् केलेली असते, याचाहि मला अनुभव होता. मी खालीं येऊन ऐकत उभा राहिलेला पाहून लालूनं आपले डोळे मुकुलित केले आणि जणूं आपली ब्रह्मानंदी टाळी लागली आहे असं मला भासवलं. त्याच्या मुखांतून एकेक चरण मागें पडूं लागला. गाण्यांतला आशय घनसांद्र होत चालला. गौरूच्या पालुपदानं त्याला एक विलक्षण धार येत चालली—

अंतकाळ मांडलेला आहे. पंचप्राणांची उलघाल होते आहे. आत्मराज प्रस्थान ठेवायला निघाल्यामुळें कुडीला 'अवस्था' लागली आहे. ती त्याला कवळून धरीत आहे. तळमळून प्रार्थीत आहे.

"...नका हो मला सोडून जाऊं ! तुम्ही माझे जन्माचे सोबती. आपलं दोघांचं आजवर कसं मैत्र नांदलं ! तुम्ही पाटील, मी धर्माची चावडी. तुम्ही गोसावी, मी विश्रांतीची मढी. तुम्ही गारुडी, मी तुमची पोतडी. तुम्ही पोहणार, मी तुमची सांगडी. तुम्ही दोरा, मी आकाशांत उडणारी वावडी..."

पण आत्मराज तिचं ऐकत नाहीं. त्याला वरून हुकूम आला आहे. तो निघाला, उडाला, ठिकाणाला पोंचलासुद्धा. लगोलग कुडी थंड पडली. निश्चेष्ट बनली. अन् मग कवि आपल्या कवनाचा निष्कर्ष सांगतो— काय आहे या नरदेहांत ! हा तर क्षणाचा बुडबुडा. चालतो तोंवर दुसऱ्याच्या उपयोगी पडावं. दुसऱ्याचं दुःख हलकं करावं. भुकेल्याची भूक जाणावी, तान्हेल्याला पाणी द्यावं ...

मी एवढा वेळ रोधून धरलेला श्वास सुस्काऱ्याच्या रूपानं सोडला. त्या गाण्याची चाल, त्यांतली संवादकल्पना तीं चढत्या श्रेणीचीं रूपकं अन् शेवटचा निष्कर्ष, हें सगळं एकदम माझ्या मनांत भरलं. मला असलीं लोक-

गीतं जमवण्याचा छंद होता. भाराभर गोळा करावं तेव्हां त्यांत असलं एखादं चमकतं काव्यरत्न हातीं लागावं. तें काव्य लालूचं नव्हतं. पण तरीहि त्या वेळीं मला तो शब्दसृष्टीचा ईश्वर वाटला. मी आणखी त्याच्याजवळ गेलों. आर्जवानं त्याला म्हटलं,

"तूं हें गाणं मला देशील का? माडीवर ये अन् पुन्हां एकदां म्हण. मी झरझर उतरून घेतों."

"आतां भिक्षेची वेळ आहे दादा!" तो म्हणाला.

"भिक्षा मी घालीन तुला आजच्या सबंध दिवसाची. तूं ये वर."

"तसं न्हाई व्हायचं दादा!"

"मग उद्यां येशील?"

"तें कसं सांगूं! माजं काय, म्होरा फिरल तिकडं फिरल."

लालू मला वस्ताद दिसला. मासा सहजासहजीं गळाला लागायला तयार नव्हता. माझी उत्सुकता त्यानं पाहिली होती. मी माझ्या मुद्रेवरचे रसभाव लपवूं शकलों नव्हतों. म्हणजे त्याच्यापेक्षां मीच भोळा होतों. आपण म्हट-लेल्या आजच्या गाण्याचा भाव काय आहे, याचा त्याला बरोबर अंदाज आला होता. तो पुन्हा येण्याचं निश्चित सांगेना अन् मला उत्कंठा आवरेना. अखेर मीं त्याला म्हटलं.

"तुझा पत्ता तरी सांग मला. म्हणजे मीच तुझ्याकडे येईन."

"पत्त्या सांगतों कीं. नव्या पुलावरनं जातांना उजव्या हाताला एक झोपड्यांची वाडी हाय का? टिनपाटवाडी म्हंत्यात तिला. तिथंच माजंबि एक झोपडं हाय. लालू चित्रकथी म्हनलांत कीं कुनी बी सांगल तुमाला. मातर सकाळच्या पारीं लवकर या. मंग मला भिक्षेला जायचं असतं."

"ठीक आहे, उद्यां सकाळीं येईन मी."

"एकादं धोतर बितर हाय का दादा? माजं हें बगा. पार लक्तरं लोंबत्यात."

"पाहीन असलं तर. उद्या आणीन येतांना."

'बरं' म्हणून मला त्यानं नमस्कार केला. लालूच्या वस्तादपणाचा हा दुसरा पुरावा. मी यायचं तर रिक्त हस्तानें येऊं नये, अशी त्याची ही

विनयगर्भ सूचना होती. त्याला उधारीची बात ठाऊक नव्हती. 'इस हाथ दे उस हाथ ले!'

मला तें गाणं माझ्या संग्रहांत दाखल करण्याची त्वरा झाली होती, म्हणून मी दुसऱ्याच दिवशीं सकाळीं त्या मोहिमेवर निघालों. पुलाच्या कमानीखालून जाणाऱ्या रस्त्यानं फर्लांगभर गेल्यावर मुठेच्या तीरावर मोकळ्या मैदानांत ती खरोखरीची 'टिनपाट' वसाहत मला भेटली. गोसावी, चित्रकथी, वासुदेव, वाघ्ये, भुत्ये अशा अनेक उपाधींचे लोक तिथें मिराशी करून राहिलेले दिसले. बहुतेक सगळे चार खुंटांचे जहागिरदार. त्यांतल्या त्यांत जे अधिक शहाणे आणि महत्त्वाकांक्षी होते ते चार कोंबड्या किंवा एखादी म्हैस बाळगून भिकेच्या मुख्य धंद्याला जोड देत आहेत हेंहि समजलं.

बैठ्या झोपड्यांचा तो एक गमतीदार पुंज होता. दाटीवाटीनं त्या झोपड्या उभारलेल्या होत्या. भिंतीच्या जागीं दगड रचलेले. मधें पायाच्या पोटरीएवढे दोन धारण. त्यांवर एक तेवढंच आढं. त्यावरून टिनच्या पत्र्यांचं उतरतं आच्छादन. पिसाट वाऱ्याच्या लीलांनीं तें उडून जाऊं नये म्हणून आणखी त्यावर चार दोन वजनदार दगड. सर्पणाच्या काटक्या कुटक्या त्यावरच. चिरगूट, पांघरूण वाळवायचं तेंहि तिथेंच. उभं राहण्याइतकी उंची नसल्यामुळें आंतले सगळे व्यवहार बसूनच चालायचे. आंत बाहेर व्हायचं तें ओणव्यानेंच. तिथें गर्दी, गडबड, काय ती सकाळ–संध्याकाळ. बाकी सारा दिवस शुकशुकाट. बायकापोरांसह सगळे मुलूखगिरीवर गेलेले.

तें एक निराळंच जग होतं. जनांत असूनहि विजनांतलं. तिथें कोण माणसं रहातात, तीं काय करतात, कशीं जगतात, काय खातात, काय बोलतात, त्यांचीं देणीं दुखणीं कोणतीं, याचा शेजारच्या झकपक जगाला पत्ता नव्हता. श्रीमंतांना त्या दिशेकडे भ्रूभंग करण्याचं कारण नव्हतं. विद्वानांना तिकडे कांहीं मिळण्याजोगं नव्हतं. सामान्य जनांनी नव्या पुलावरून जातांना तिकडे पाहिलं तरी तें पाहून न पाहिल्यासारखंच होतं. चोरालासुद्धा कधीं तिकडे नजर वळवावीशी वाटली नसेल.

आणि अशा या विचित्र जगांत एका सकाळीं प्रवेश करून मी लालू चित्रकथ्याचा पत्ता विचारला. मला तिथें पाहून सगळ्यांच्या नजरा विस्मयानं

विस्तारल्या. हा पांढरपेशा माणूस कोण, इकडे कुठें वाट चुकला अन् लालू-कडे याचं काय काम असेल, असे तर्क-वितर्क त्यांच्या मनांत उमटत आहेत हें मीं जाणलं.

लालू आपल्या झोपडीच्या दारांत एका गोणपाटावर बसला होता. त्यानं आपलं चित्रांचं बाड पुढें उघडून टाकलं होतं. त्यांत मारुतीचं लंकादहन, इंद्रजिताचा वध, द्रोणागिरीचें उच्चाटन, अहि–महि राक्षस, कौरव–पांडवांचं युद्ध अशीं अनेक रंगीत चित्रं होतीं. हेंच बाड घेऊन तो गांवोगांव जात असे. एकेक चित्र पुढें धरून त्यावरून ती समग्र कथा रंगवून सांगत असे. ऐकतां ऐकतां श्रोते तल्लीन होत असत. त्याला बिदागी मिळत असे. एखादा हौशी पाटील आपल्या घरीं त्याची खास कथा करून त्याची संभावना करीत असे. मला वाटलं आजहि त्याला कुठें तरी जायचं असावं अन् तो आपल्या कथेची निवड करीत असावा.

मला दारांत उभा पाहून त्याला आश्चर्य झालेलं दिसलं. काल पत्ता विचारून घेणारा हा बुवा आज 'दत्त' म्हणून घरीं येईल याची त्यानं स्वप्नांतहि कल्पना केली नसेल. मला त्यानं 'या' म्हटलं अन् आपल्या खालचं गोणपाट ओढून माझ्यापुढें पसरलं. काळ्या ढगांतून चांदणी, तशी गौरू खोपटांतून बाहेर डोकावली. डोळ्यावर आलेले केस दोन्ही हातांनीं मागें सारीत तिनं माझ्याकडे टक लावली. तिच्या डोळ्यांचीं साळकं अजून निजसुरींच होतीं आणि तीं कमालीचीं मोहक वाटत होतीं. एका मोठ्या कमळांत दोन लहान कमळं ही कालिदासाची समस्यापूर्ति गौरूला पाहून मला आठवली.

मी माझ्या पिशवींतून एक जुनं पण स्वच्छ धोतर काढून लालूच्या हातीं दिलं. एखाद्या राजेश्वरानं पुढें आलेल्या नजराण्याला नुसता करस्पर्श करून तो बाजूला करावा तसं त्यानं तें धोतर पाहिलं न पाहिलंसं करून शेजारीं ठेवून दिलं. त्याला जणूं सुचवायचं होतं कीं, मी जें तुम्हांला देणार आहें, त्याच्या तुलनेनं हें धोतर म्हणजे अगदींच क्षुद्र वस्तु! तो मग सावकाशपणें चिलीम भरूं लागला. काल तो माझ्या दारींचा भिकारी होता. आज ती भूमिका माझ्याकडे आली होती. त्याला कोणी आंगणांत दिसल्याबरोबर लगेच

भिक्षा घालीत होतं काय ? बराच वेळ ताटकळत उभं रहावं, घसा दुखेपर्यंत गाणं म्हणावं, मधेच लाचार मुद्रेनें तोंड वेंगाडावं, तेव्हां कुठें त्याच्या झोळींत मूठभर दाणे पडायचे. मग आज मला भिक्षा घालतांना त्यानं तरी तत्परता, घाई, आस्था, कां दाखवावी ? ' ये यथा मां प्रपद्यन्ते ! ' चिलीम ओढतांना त्याची तंद्री लागली होती. मी समोर असूनहि त्याला दिसत नव्हतों. ती विझल्यावर हातावर पालथी ठोकतांना तो मला म्हणाला.

" आज मला कथेचं जरा बघायचं आहे. संध्याकाळीं आमंत्रण आहे मला. तुम्ही उद्या या."

मी एकदम सर्द झालों. त्याच्या त्या शिष्टपणाचा मला रागहि आला. पण तो माझ्या चर्येवर दिसूं देणं इष्ट नव्हतं. गरजू तो नव्हता; मी होतों.

" हें बघ लालू, तें गाणं मला आजच्या आज हवं आहे. मीं तुला धोतर आणलंच आहे. गाणं बोललास तर जातांना बंदा रुपया हातावर ठेवीन. विचार कर या गोष्टीचा."

रुपयाचं आमिष त्याला धुत्कारणं शक्य नव्हतं. तो एक क्षणच थांबला अन् ' बरं घ्या, ' म्हणून त्यानं तें कालचं गाणं सुरू केलं. मीं तें भराभर वहीवर उतरलं. गाणं संपल्यावर प्रसन्न मनानं मीं वही मिटली. आजवर कोणाचाहि टांक न लागलेलं एक जुनं परंपरागत लोकगीत मीं मिळवलं याचा मला अभिमान वाटला. मराठी रसवंतीच्या प्रवाहांत टिटवीच्या चोचीनं मीं एक बिंदु आणून टाकला याबद्दल माझं मलाच धन्य वाटलं.

इकडच्या तिकडच्या गप्पा करतां करतां मी हळूच त्याच्या मनांत रिगलों. त्यांत मावजी ठाकूर म्हणून कोणी तरी त्याचा गुरु आहे अन् त्यानं आपल्या शिष्याला बरींच कवनं पढवलीं आहेत याचा मला अंदाज लागला. हें सगळं लोकसाहित्याचं भांडार त्याला खुलं करायला लावायचं असा मनाशीं निर्धार करीत मी उठून उभा राहिलों.

एवढ्यांत लालूच्या समोरच्याच झोपडींतून एक बाप्या ओणव्यानंच बाहेर पडला. त्यानं काचा कसला होता, एक फाटका आंखूड शर्ट अंगांत घातला होता आणि डोक्याला पटका बांधून त्याचा समला गळ्याभोंवतीं वेढला होता. हातांतल्या तुणतुण्यावर बोटं टाकीतच तो रस्त्याला

लागला. मी त्याला लगेच ओळखलं. 'नव्या पुलाच्या फूटपाथवर उभं राहून पोवाडे म्हणतांना त्याला मी कित्येकदा पाहिलं होतं.

"हा कोण रे ? तुझा कोणी नातेवाईक वगैरे आहे की काय ?" मी लालूला विचारलं.

"तो कसला नातेवाईक ! कुठला कोण उपटसुंब हाय कोण जाणे ! हितं उपटलाय लोकांना त्रास द्यायला." लालूनं मला उत्तर देतां देतांच त्याच्या जात्या आकृतीकडे एक तीव्र दृष्टिपात केला. त्याचा हा शेरा मला 'याचको याचकं दृष्ट्वा' या जातीचा वाटला. हेवेदावे काय श्रीमंतांच्याच मालकीचे नव्हते. भिकाऱ्यांनाहि त्याचं वरदान आहेच.

दुसऱ्या दिवशीं परत तिकडे जातांना माझ्या पिशवींत खाऊचा पुडा होता. काल मी लालूची संभावना केली होती ; पण गौरूच्या हातावर कांहींच टाकलं नव्हतं. आज मी तिला खूष करणार होतों. पण मी तिथें जातों तर लालू झोपडींत नव्हता. समोरच्या झोपडींत कुजबूज ऐकूं आली म्हणून मी ओणवून आंत पाहिलं. एवढयांत त्याच्या दारांतला कुत्रा माझ्या अंगावर गुरगुरून आला म्हणून आत्मरक्षणासाठीं मला माघार घ्यावी लागली. पण तेवढयांत मला जें दृश्य ओझरतं दिसलं तें हें कीं, गौरू तिथें उभी आहे, त्या पोवाडेवाल्या तरण्या बाप्यानें तिचा हात धरला आहे अन् ती डाव्या हातानं त्याचा समला चुरगाळीत आहे. दोघंहि नेत्रपल्लवींत प्रणयभावनांची देवघेव करीत आहेत.

मला पाहतांच गौरू त्याचा हात हिसडून बाहेर आली. आपला चोरटेपणा आणखी कोणाच्या लक्षांत आला नाहींना, म्हणून तिनं एकदा आजूबाजूला नजर भिरभिरवली. मी तिच्या हातांत खाऊचा पुडा देतांच त्याच नजरेंत अधाशीपणा प्रगटला. तटातट दोरा तोडून तिनं तो पुडा उलगडला. आंतला एक लाडू उचलून तिनं त्याचा लहान तोंडीं मोठा घास केला. भणंगाला भाणं लाभावं तसा तिचा तो आविर्भाव होता. गौरू दुष्काळांत जन्मली नसली तरी दुष्काळांत वाढली होती.

मी तिच्या त्या बकाण्याकडे पहात होतों. एवढयांत लालू आला. त्याच्या खांद्यावर पाण्याची घागर होती. ती आंत ठेवून बाहेर येतांनाच त्यानं माझ्या-

साठीं बैठक आणली. ' अग काय खातीस तें सावकाश खा ' म्हणून गौरूला कौतुकाच्या शब्दांत सुनवलं. मी बसलों. माझ्यासमोर तो बसला. आज लगेच गाण्याला सुरवात झाली. चरण सांगतां सांगतांच त्यानं आपलं चिलीम भरण्याचं काम चालू केलं.

माझी लेखनाची हातघाई चालू होते एवढ्यांत दहा-पांच कोंबड्या कुठून तरी तुरुतुरु करीत माझ्याभोंवतीं गोळा झाल्या. हाकलायला हात वर केला तर त्या माझ्या वहीवर माती उडवून डोक्यावरून उडाल्या. मग पोरांनीं घोळका केला. त्यांच्या मागून बायका डोकावूं लागल्या. नंतर गवळी टोपी घातलेल्या म्हाताऱ्यांनीं तिथें येऊन काठ्या आडव्या केल्या. मी कांहीं तरी लिहून घेत आहें हा त्या सगळ्या वाडींत कुतूहलाचा विषय झाला होता.

लालूनं त्या शेजाऱ्यांवर अभिमानाची नजर फेकली. एक शिकला-सवरला माणूस आपल्या दारीं बसून आपण सांगतों तें कागदावर घालतो, ही आढ्यता त्याची छाती फुगवीत होती. या टिनपाटवाडींत आपली योग्यता असामान्य आहे, असं कांहीं तरी त्याला वाटूं लागलं होतं.

पुढें पुढें त्याला भलताच आत्मविश्वास निर्माण झाला. तो माझ्याकडे शिष्यभावानें पाहूं लागला. एक अनजाण जीव आपल्याला शिकवून शहाणा करावयाचा आहे, असं त्याला वाटूं लागलं. त्याचा तो अभिनिवेश पाहून मला मनांतल्या मनांत हसूं येई. हा मला आपली चिलीम भरून द्यायला तर सांगणार नाहीं ना, असंहि कित्येकदा वाटे. मी लिहितांना अडत होतों, पेन्सिल थांबवून त्याच्या तोंडाकडे पहात होतों तो त्याचे कित्येक शब्दांचे मुलखावेगळे अपभ्रंश चटकन् आकलन होत नसत म्हणून. पण त्याला वाटे, ' पहा, किती ' गिन्यानबुड्या ' माणूस ! ' अन् मग तो मला अर्थ विवरून सांगायला प्रारंभ करी—

" अव, ' कुळखेत्र ' म्हंजी तिथं कौरव-पांडवांचं विद्ध झालं. ' मग माझ्या लक्षात येई कीं ' कुळखेत्र ' हा शब्द कुरुक्षेत्र असा लिहायला हवा. ' केघोळ घंटा किती वाजल्या ' यांतल्या ' केघोळ ' शब्दावर माझी लेखणी अडायची अन् मग त्यानं माझी समजूत पाडायची कीं ' केघोळ ' म्हणजे बराच वेळ. ' लक्षुमणाला शक्ति लागल्या ' हें कळायचं ; पण पुढचं ' जाले जगजुर '

म्हणजे काय ? ‘ जर्जर ’ शब्दाचा इतका बुद्धीला जर्जर करणारा अपभ्रंश लोक-भाषेनं केला असेल याची मला काय कल्पना ?

पण त्यानं माझ्या पदरांत घातलेलं सगळं अज्ञान मान्य करून मी चिकाटीनें काम करीत होतों. अशीं एक नव्हे, दोन नव्हे, अनेक लोकगीतं मीं त्याच्याकडून मिळवलीं. माझी जाडजूड वही पुष्कळशी भरली. त्यानंहि माझ्याकडून नित्य गुरुदक्षिणा वसूल केली. बायकोप्रमाणेंच त्याचाहि ‘ आणा ’ कधींच फिटला नाहीं.

तें काहींहि असो. पण लालू आतां हळूहळू माझा मित्र बनूं लागला होता. एखाद दिवस मी रिक्त हस्तानं गेलों तरी आतां तो पान्हा चोरीत नसे. मी दिसलों कीं तो आदरून गौरूला म्हणे, ‘ गौरू, बसकुर आण दादांना. ’ तोंड गोड होण्याच्या आशेनं पुष्कळदा लालूच्या आधीं तीच माझी वाट पहात दारांत उभी राही. मला पाहिल्यावर तिचे डोळे लकाकत आणि स्मिताची प्रभा हनुवटीवरच्या गोंदलेल्या तिळापर्यंत पसरे. मला तिच्या-विषयींहि बरंच कुतूहल वाटूं लागलं होतं. समोरच्या झोपडींत त्या वाघ्याच्या जवळ उभी राहून लालूच्या डोळ्यांआड चालणारे तिचे नखरे, मुरके अचानक दोनचारदा पहायला मिळाले होते. लालूलाहि त्याची थोडीबहुत जाणीव असल्याचं मला कळलं होतं.

लालू दिसायला खप्पड होता ; पण गौरू उजळ नि चुणचुणीत होती. त्या-वरून तिची आई चांगली असावी असा मीं कयास बांधला होता. पण ती तर मला कधींच त्या झोपडींत दिसली नव्हती. नेहमीं पहावं तों लालू नि गौरू दोघंच जणं. ती बहुधा परलोकवासी झाली असावी अशी माझी कल्पना होती. पण लालूच्या तोंडून खरं काय तें काढावं म्हणून मीं एक दिवस त्याला विचारलंच.

“ गौरूची आई कुठें दिसत नाहीं लालू ? ”

माझ्या या प्रश्नासरशीं लालू खिन्न, गंभीर झाला. आधींच निस्तेज असलेली त्याची मुद्रा अधिकच काळवंडली. डोळ्यांत कारुण्यभाव गोळा झाले. झुरका घेण्यासाठीं अर्धवट उचललेली त्याची चिलीम तिथेंच थांबली. तो प्रश्न त्याला नको होता अन् मी तर विचारून बसलों होतों. बोलावं तरी

कठीण, न बोलावं तरी कठीण अशा मूढ अवस्थेंत तो कांहीं क्षण घुटमळला. पण एवढ्यांत त्याचं तें दाबलेलं दुःख गोठून त्याच्या काळजांत खिचूं लागलं. आतां त्याला तें ओकून टाकणंच भाग होतं. तितका त्याचा विश्वास मीं संपादन केला होता. अगदीं सावकाश थांबत थांबत तो मला सांगूं लागला. अर्धा तास लागून त्यानं आपल्या जीवनांतलं तें अरण्यकांड पुरं केलं.

गौरू तीन वर्षांची असतांनाचा तो प्रसंग. त्या वेळीं लालूचा भाऊ त्याच्याच शेजारीं स्वतंत्र झोपडी उभारून रहात होता. लालूसारखाच तोहि चौपदरीचाच धनी होता. दोघांची नेहमीं धुसफुस चालू असायची आणि तिचं कारण म्हणजे गौरूची आई. तिचं ओढाळ मन लालूपेक्षां दिराकडेच अधिक धावत होतं. भिकारी असला तरी लालूपेक्षां तो अधिक छानछोकीचा होता. देहानं तर चांगला होताच अन् टिळेमाळाहि कुशलपणें करीत होता. लालू भिक्षेला गेला कीं, थोड्या वेळांत तो घरीं परतायचा अन् लालू घरीं यायच्या वेळीं परत तोंड काळं करायचा. लालूनं तिला अनेकदां पकडली होती अन् त्या गुन्ह्याबद्दल चौदावं रत्न दाखवलं होतं.

अशा या धुमसत्या संसारांतच गौरू जन्माला आली होती. लालूला वाटलं होतं कीं, आतां तरी आपली बायको परद्वार सोडील. पण तसं झालं नव्हतं. तिचे छंद सुटले नव्हते. याची मार-बडव कमी झाली नव्हती. लालू तिला दिवसेंदिवस डोळ्यांसमोर नकोसा झाला होता. आणि अखेर एक दिवस ती आपल्या प्रियकरासह पसार झाली होती. नवऱ्याला अन् पोटच्या गोळ्यालाहि टाकून. तिला लालू नको असला तरी लालूला ती हवी होती. तो तिच्या मागावर निघाला होता. खाकोटीला चित्रांचं बाड अन् खांद्यावर गौरू अशा स्थितींत तो नगर, सातारा, सोलापूर या जिल्ह्यांतलीं अनेक गांवं हिंडला होता.

जिथें जाईल तिथें तो आपलं चित्रांचं बाड सोडी. चार लोक भोंवतीं गोळा झाले कीं त्या चित्रांवरून ती समग्र कथा सांगे—

"हा वाळी बगा. हा सुग्रीव बगा. हे दोघे बंधु. एका आईच्या पोटीं जन्मलेले. पर दोगांची लई दुस्मानकी. सुग्रीवाचं राज्य वाळीनं बळकावलं.

ही बगा त्येची अस्तुरी. जनू दवण्याची काडी. जसं काय आबाळांतलं नक्षेत्र. तीबि त्येनं पळवली... ”

रामायणांतले वालि–सुग्रीव झुंझासाठीं तरी समोरासमोर आले होते. पण लालूच्या या वालीची, एवढ्या प्रवासांत त्याला सावलीसुद्धां कधीं दिसली नाहीं. तीं दोघं कुठल्या देशाला परागंदा झालीं होतीं देव जाणे! कोणी त्याचा पत्ता सांगूं शकत नव्हता. कोणीं त्यांना पाहिलं नव्हतं. कोणीं त्यांच्याबद्दल ऐकलं नव्हतं. लालूसारख्या भिकाऱ्याची बायको पळाली काय, मेली काय, जगाला त्याची पर्वा नव्हती.

या भ्रमंतींत गौरूचे फार हाल झाले होते. तिचं वय सहा महिन्यांनीं वाढलं होतं; पण अंगावरचं मांस मात्र होतं तेंहि झडलं होतं. तो परत पुण्याला आला होता. आतां तिला एका जागीं ठेवून तिची जोपासना करणार होता. पण टिनपाटवाडींत परत येतो तर त्याची झोपडी उडून गेली होती. जाग्यावर उरले होते ते दगड अन् खळगे. पुन्हा ती उभी करण्यासाठीं त्याला चार दिवस खपावं लागलं होतं.

ही सगळी साद्यंत कथा ऐकून मला लालूची काकळूत आली. त्यानं फक्त वृक्ष–पाषाणांना मिठ्या मारल्या नव्हत्या; बाकी हरवलेली बायको मिळावी म्हणून सगळ्या प्रकारचे श्रम घेतले होते. स्त्रीजन्माच्या कहाण्या सगळेच रसभरितपणें सांगतात. पण मला वाटलं, ही पुरुषजन्माची कहाणी कोणी सांगायची! हिच्यांत केवढं आर्त भरलेलं आहे. स्त्रियांना निदान रडून, आक्रंदून आपलं दुःख हलकं करायची आणि दुसऱ्याची सहानुभूति मिळवायची मोकळीक असते. पुरुषाला तोहि मार्ग बंद आहे. त्यानं पुटपाकासारखं आंतल्या आंत कढायचं.

आईचं आंतडं निबर झालं, तिनं शरीरसुखापुढें अपत्य तुच्छ मानलं म्हणून लालूला तसं करतां येत नव्हतं. त्यानं गौरूचं मोठ्या मायेनं लालनपालन केलं. तिला आपला जीव लावला. ती चार प्रहर त्याचा पालव धरून आणि चार प्रहर त्याच्या कुशींत असे. त्याच्या उबेंत ती वाढली. त्याच्या कूर्मदृष्टींत उमलली. प्रथम प्रथम खांद्यावरून तो तिला भिक्षेला नेत होता. पुढें ती आपल्या पायांनीं त्याच्याबरोबर हिंडूं लागली. घरीं आल्यावर गाडगा-

भर पाणी आणूं लागली,. ' च्याय ' साठीं तीन दगडांच्या चुलींत विस्तव घालूं लागली. बापाच्या दमलेल्या पोटऱ्या आपल्या नाजूक पावलांनीं दाबूं लागली. इतके दिवस ती केवळ पाल्य होती. आतां त्याला तिचा बराच आधार होऊं लागला.

त्यानं गौरूला बरींच गाणीं शिकवलीं. ती पालुपद धरूं लागली. चौथ्या चरणाला स्वराची किनार जोडूं लागली. मधेंच एखादं कडवं स्वतंत्रपणें म्हणून बापाच्या शिणलेल्या गळ्याला दोन मिनिटांची विश्रांति देऊं लागली. भिकाऱ्याची पोर म्हणून तिच्या सुस्वर कंठाचं कोणी उघड कौतुक करीत नव्हतं. पण ती ललकारली कीं कोणत्याहि वाड्यांतलीं माणसं कान टवकारतात हें नित्याच्या अनुभवानं त्याला कळून चुकलं होतं. अलीकडे टिनपाटवार्डातल्या त्या भिकारी जगांत लालू चित्रकथी श्रीमंत गणला जाऊं लागला होता. तिसऱ्या प्रहरीं घरीं परततांना त्याची झोळी बरीच जड असायची आणि तिच्यावर शेजाऱ्यांचे अधाशी, मत्सरी डोळे रोखले जायचे.

लालूच्या डोळ्यांदेखत गौरूचं शैशव ओसरलं होतं. चैत्रमासीं जमिनींतून उगवणारं भुईचाफं पाहतां पाहतां पाकळ्या फुलवून तक तक करूं लागतं तशी गौरू त्या उकिरड्यांत उल्हासूं लागली होती. ती दिशीं माशीं भरत चालली होती. तिच्या मुखाला रसरशीतपणा येऊन त्यावरचे गोंदलेले तीळ अधिक गहिरे दिसूं लागले होते. ही चैत्रमोगरी आपल्या जीर्ण मांडवावर आतां फार दिवस राहूं शकणार नाहीं, याची लालूला जाणीव झाली होती. तो मला एक दिवस म्हणाला होता.

"पोरीचं लगीन आतां लवकरच उरकून टाकीन म्हणतों. हाय् एक पोरगा हेरलेला. देहूरोडला फॅक्टरींत कामाला आहे. म्यां लगीन काढलं तर तुम्हीं थोडी मदत करायला हवी गरिबाला."

त्यानंतर मला चार-आठ दिवस त्याच्याकडे जातां आलं नाहीं. नंतर एके दिवशीं गेलों तर लालू दारांत बसलेला होता आणि त्याची मुद्रा प्रक्षुब्ध दिसत होती. कांहीं तरी बिघडलं आहे असं त्याचे डोळे मला सांगत होते. ' या दादा ' म्हणून आज त्यानं माझं स्वागत केलं नाहीं. माझ्या हातांत खाऊचा पुडा आहे का नाहीं तें बघायला गौरूहि पुढें आली नाहीं. नऊ

वाजून गेले होते तरी ती गोधडीचं घुंगट घेऊन आंत झोपली होती. नुसती झोपली नव्हती तर कण्हत होती, खुसमुसत होती. मीं लालूला विचारलं.

" गौरूला बरं वाटत नाहीं का ?"

" तिला काय धाड बडवलीया ! " लालू तुटकपणें उत्तरला.

" मग अशी झोपून कां ? काय झालं आहे तें सांगशील तर खरा ! "

" मीं मारलंय तिला. चांगलं दणकलंय. "

" कां रे बाबा ? "

" कां ? इच्यारा तिलाच. आतापून गुण उधळायला लागली. हा समुरचा शनि...आताच ववाळला तुणतुणं घेऊन पगितलात ना ! त्येच्या संगतीनं पोरगी चंचळ झाली. तिला आता बापाचीबी मुर्वत लागेना. त्या मुर्दाडासंग नाचाया व्हावं... "

" आज कांहीं विशेष घडलं का ? "

" अव, मी सकाळीं उठून गेलों घासलेट आणाया. पर पुलावर पोंचलों अन् कळलं कीं आपण पैसे न घेतां निगालोंय. लगी परत फिरलों. घरीं येतों तर पोरगी समुरच्या झोपडींत. तो मुर्दाड तुणतुणं लावून पवाड्याचा चौक गातो अन् हिला म्हंतो, ' म्हण दाजि रऽऽ! जी जीऽऽ!' अन् ही गाढईची कानशिलावर हात ठेवून शिरा ताणते ' दा जि रंऽऽ!' असा राग आला...आंत शिरून दरादरा ओढीत आनली अन् कोपऱ्यांतलं हातीं लागलं तें लांकूड घेऊन दणकली. आतां पडलीया घुंगट घेऊन... "

" लालू, चुकलास तूं. तूं मारायला नको होतंस तिला. समजुतीनं सांगितलं असतंस तरी तिला आपली चूक कळली असती. कुस्कुटाच्या कामाला कुऱ्हाड वापरूं नये. मार केवळ शरीराला लागतो. पण मायेचे, सहानुभूतीचे शब्द आंतपर्यंत जाऊन भिडतात. मारानं काम बिघडतं, सुधारत नाहीं— "

" पाहतों ना कसं सुधारत न्हाई तें. अशी तुडवीन कीं, जल्माची याद ऱ्हाईल. "

ही वेळ त्याच्याशीं वाद घालण्याची नाहीं हें मला कळून आलं. आज माझ्या झोळींत कांहीं पडणं शक्य नाहीं हेंहि समजलं. मी तसाच माघारा

फिरलों. पुढें आठ दिवस तिकडे फिरकलों नाहीं. म्हटलं, लालूला प्रकृतीवर येऊं द्या. पण ज्या दिवशीं मी फिरून तिथें पोंचलों त्या दिवशींहि सगळा उल्हासच होता. लालू बाहेर नव्हता. गौरूहि कुठें दिसत नव्हती. आंत डोकावतों तर तसंच गोधडीचं घुंगट. मला प्रथम वाटलं ती गौरूच असेल. अजून ती माराच्या दुखण्यांतून बरी झाली नसेल. पण ती गौरू नव्हती. तो होता लालू. त्याचं कण्हणं बाहेर ऐकूं येत होतं. मीं कधींहि त्याच्या झोपडींत पाय ठेवला नव्हता, तो त्या दिवशीं ठेवला. 'लालूऽ' म्हणून हांक मारली. त्याच्या शेजारीं बसलों. त्यानं मला पाहिलं. आपले खोल गेलेले डोळे माझ्यावर जडवले. पहातां पहातां त्यांतून अश्रूंचा प्रवाह सुरू झाला. त्याची ती अति दीन चर्या मला बघवेना. आठ दिवसांत तो एकदम, म्हातारा, जर्जर झाला होता.

"काय होतंय तुला?" मीं कणवपूर्ण स्वरांत विचारलं.

"माजी गौरू गेली हो मला टाकून!"

"गेली? म्हणजे?"

"म्हंजी काय! त्या समुरच्या भामट्यानं पळवून नेली तिला."

"अन् ती गेली?"

"व्हय दादा! गेली. नुसती गेली नाहीं; माझ्या टाळूवरून सपशेल हात फिरवून गेली."

"हें भलतंच झालं. कधींची गोष्ट ही?"

"ज्या दिवशीं मीं तिला मारली, त्याच रातीं. मला कसली काळझोप लागली देव जाणे! थाऊर रातीं जागा होऊन हात लांब केला तर पोरगी हातरुणांत न्हाई..."

आणि यापुढची लालूनं सांगितलेली हकीगत अशी होती—

लालू खडबडून उठला. बाहेर येऊन त्यानं प्रथम जाग घेतली. पण चाहूल लागेना. रात्र चिडीचिप् होती. तें भिकारी जग उद्यांची काळजी सोडून स्वस्थ घोरत पडलं होतं. समोंवतीं काळोख दाट झाला होता. वर चांदण्या तेवढ्या डोळे मिचकावून खालचं जग न्याहाळीत होत्या. पलीकडची मुठा नदी

आपला दुबळा प्रवाह कसा बसा संगमाकडे रेटीत होती. रेल्वेच्या पुलावरचे दिवे त्या टिनपाटवाडीपर्यंत आपला प्रकाश पोचवूं शकत नव्हते.

त्यामुळें लालूला चांचपडत फिरावं लागलं. त्यानं तिला हाक मारली ती त्या निःस्तब्ध नीरवतेंत अधिकच मोठी झाली ; पण तिला ' ओ ' आली नाहीं. त्याला मग दुसरी शंका आली आणि त्याचा जीव कावरा बावरा झाला. त्यानं झोपडींत येऊन काड्याची पेटी हातासली. तो समोरच्या झोपडीकडे गेला. फर्रकन् त्यानं काडी ओढली. झोपडीपुढचा भाग प्रकाशानं उजळला. दारांत तो कुत्रा नव्हता. दुसरी काडी ओढली तर झोपडी शून्य दिसली. तो पोवाडेवाला वाघ्या आंत नव्हता.

लालूची शंका खरी ठरली. त्याचं मन आक्रोशून म्हणालं, ' तुझी पोरगी पळवली या वाघ्यानं. दोघंहि आतां यावेळीं हातांत हात घालून दूरदेशाचा मार्ग कापीत असतील. ' त्यानं कपाळावर हात मारून घेतला. पायांतलं बळ एकाएकीं खलास झाल्यामुळें त्याला मटकन् खालीं बसावं लागलं.

त्याची मुलगी पळाली नव्हती, तर सहावा प्राणच पळाला होता. कुठें शोधायची तिला ? कुठल्या रस्त्यानं तिचा मागोवा घ्यायचा ? पण कुठेंतरी शोधायलाच हवं होतं. कुठला तरी रस्ता धरायलाच हवा होता. गौरूवांचून लालू जगूं शकत नव्हता. गौरूवांचून तो आंधळा, पांगळा, मुका अन् निष्प्राण होता. तोच एक त्याच्या जीवनाचा आधारतंतु होता.

तो बसलेला पुन्हा उठला अन् झोपडींत आला. गाडग्या मडक्यांच्या सांदींत त्यानं हात खुपसला. कोणाला कळूं नये अशा बेतानं त्यानं तिथें एक पुरचुंडी ठेवली होती. लालूची कवडी कवडी जोडलेली सारी ' माया ' तिच्यांत होती. गौरूच्या शोधासाठीं तो आतां तिच्यावर उदक सोडणार होता. पण लालूचं दैव तिथेंहि पालथं पडलं. गौरूनं आपल्या वरातीबरोबर ती पुरचुंडीहि आंदण म्हणून नेली होती. प्रियकराबरोबर पसार होतांना तिनं आपल्या बापाला साफ धुतलं होतं.

आतां लालूवर दुहेरी प्रसंग होता. पोरगी परत मिळवणं आणि तिच्या-बरोबर पाय फुटलेलं तें संचित धनहि. बिचाऱ्याला '**पुस्तकं वनिता वित्तं परहस्तगतं गतम्**' हें सुभाषित ठाऊक नव्हतं.

पहांट होतांच झोपडीचं कवाड लावून तो बाहेर पडला. मनाच्या प्रेरणे-नुसार त्यानं चाकणचा रस्ता धरला. समोरून येणाऱ्या अनेक लोकांना गौरूच्या खाणाखुणा सांगून ती दिसल्याचं विचारीत सुटला. एकदोघांनीं त्याला सांगितलं, ‘ हायत, दोगबी हायत. याच रस्त्यानं फुडं जात्यात.’ त्याला आशा वाटली. बराच धीर आला. उल्हासानं तो सारखा चालत राहिला. सूर्यास्तापर्यंत त्यानं धर्मशाळा असलेलं रस्त्यांतलं एक गांव गांठलं. तिथंहि पुन्हां त्यानं चौकशी केली. त्याला उत्तर मिळालं, ‘ धरमशाळेंत जा बग. थतं हैती दोगं कुणी तरी.’

तो त्वरा करून धर्मशाळेपर्यंत पोंचला. त्याच्या आधीं त्याचं मन पुढें झेपावलं. पायांआधीं डोळे धावले. त्याचं हरपलं निधान तिथें त्याला दिसलं. गौरू तीन दगड मांडीत होती. तिचा वाघ्या प्रियकर काटक्या मोडीत होता अन् त्याचा कुत्रा पायरीवर पहुडला होता.

लालू प्रथम नजरेस पडला तो गौरूच्या. ‘ बाबाऽ ! ’ ती एकदम ओरडली. पण ती बापाला हाक नसून प्रियकराला धोक्याची सूचना होती. वाघ्यानं तिकडे पाहिलं. लालू एकेका पावलानं पुढें येत असलेला त्याला दिसला. ‘ च्या—’ म्हणून त्यानं प्रथम एक शिवी हांसडली अन् पाठोपाठ एक दगड उचलला. ‘ नको रे मारूं ’ म्हणून गौरूनं एका उडींत त्याचा हात पकडला.

“ मग, चल. पळायला हवं आतां इथून.”

“ आटप लवकर तर.”

त्यानं तुणतुणं उचलून पटका तसाच खाकोटीस मारला. गौरूनं गांठोडं उचलून डोक्यावर घेतलं. कुत्र्यानं पुढचे पाय ताठ करून आळस झाडला. तीं दोघं पळूं लागलीं. दहा पावलं पळायचं अन् एकदां वळायचं. लालूच्या अंगांत त्राण उरलं नव्हतं तरी तोहि जिवाच्या आकांतानं त्यांना गाठण्या-साठीं मागून धांवत सुटला. तरण्या-म्हाताऱ्यांची शर्यत लागली.

“ गौरू, मागं फिर. पळूं नको. गौरू ऽऽ ! ”

त्याचा आक्रोश चालू झाला. हें ग्रहण आपल्या मागचं सुटत नाहीं असं वाघ्याला वाटलं. तोहि सूडाला पेटला. त्यानं आपल्या आज्ञाधारक कुत्र्याला ‘ छूः ! ’ करून लालूच्या अंगावर सोडलं, दगड मारणारा वाघ्याचा हात

गौरूनं झेप घालून पकडला असला तरी कुत्र्याची झेप आवरणं तिच्या हातीं नव्हतं. त्या प्राण्यानं आपलं काम सायसंगीत केलं. लालू दुसऱ्याच क्षणाला तिथें मोडून पडला. भळभळ रक्त वाहवणारा तो क्रूर दंश दोही हातीं दाबून धरून तो दृष्टीच्या टप्प्याबाहेर जाणाऱ्या आपल्या कलिजाला सर्व शक्ति एकवटून बाहूं लागला.

"गौरू ऽ ऽ ! माझ्या पोरी ! नको ग मला टाकून जाऊं. परत ये. मागं फिर. मेलों ग मी ऽ ऽ !"

अशी होती ही लालूची कर्मकथा. त्यानं गोधडी बाजूला करून आपली जखम माझ्यापुढें उघडी केली. 'अरे बापरे ऽ !' माझ्या अंगावर शहारे आले. त्याच्या डाव्या पोटरीच्या मासांत कुत्र्याचे ते दांत किती खोलवर रुतले होते ! अजून मलमपट्टी झालेली नव्हती ; त्यामुळें ती जखम चिघळून भयानक झाली होती. सगळा पाय सुजून 'घोण' झाला होता. त्याच्यावर आतां ताबडतोब इलाज करायला हवा होता. अन्यथा लालूची गति कठीण होती. मीं त्याला म्हटलं.

"बाकीच्या गोष्टी राहूं देत आतां. तूं बरा झालास म्हणजे मग पुढचा विचार करूं. तूं माझ्याबरोबर इस्पितळांत चल."

"नको दादा ! मी हितंच होईन बरा. अन् न्हाइ झालों तरीबी चालल. कशाला जगायचं आतां ? माझी गौरू ऽ ऽ !–" त्यानं दोन्ही हातांच्या तळव्यांनीं तोंड झांकून हुंदके द्यायला सुरवात केली. मला वाटलं त्याच्या या दुःखाच्या महापुरांत आपणहि वाहून जाऊं.

पण मीं त्याचा तो आत्मघातकी वि[चा]र मानला नाहीं. नव्या पुलावर एक टांगा पकडून मीं त्या टिनपाटवाडीच्या रस्त्यावर आणून उभा केला. 'नको, नको' म्हणत असतां त्याला उठवलं अन् हळूहळू चालवीत टांग्यांत आणून घातलं. मग मी स्वतः चढून बसलों आणि टांगेवाल्याला म्हटलं, 'चलो. ससून हॉस्पिटल.'

पु. क्र.... दि ..........

लालू त्या प्राणघातक आजारांतून बरा होऊन परत आपल्या झोपडींत रहायला आला आहे. जगायला हवं म्हणून नव्हे, तर प्राण असेपर्यंत गोळाभर अन्न हवं म्हणून तो गांवांत हिंडतो. वाड्यांत आला म्हणजे उभा राहत नाहीं, तर देहाचं मुटकुळं करून बसतो. त्याच्या मर्मनिकृंतक दुःखांचे शिलालेख त्याच्या मुद्रेवर कोणालाहि वाचतां येतात. आतां त्याच्या गळ्यांत एकतारी नाहीं. तो बोलतो, मागतो, गयावया करतो; पण त्याची रसवंती आतां गुप्त झाली आहे. त्याची ती 'वाचा' आतां मेली आहे. माझ्या वहीचीं पुढचीं वीस पंचवीस पानं अजून कोरीं आहेत आणि यापुढें तीं अलंकृत होतील अशी मला मुळींच आशा नाहीं.

## तें नाटक ! हें नाटक !! :     : ४ :

बाळंभटजीच्या अंतूला नाटकाचा नाद कां लागावा हें एक मोठं कोडंच होतं. आनुवंशिक संस्कार म्हणावं तर बाळंभट नाटकाचा कट्टा दुष्मन होता. अंतूच्या शब्दांत सांगायचं तर वृंदावन, घनश्याम या जातीचा. पुरुष लुगडं नेसून, छातीशीं गोळे भरून, तोंडाला रंग फासून नाचायला आलेला पाहिला कीं सचैल स्नान करून प्रायश्चित्त घेतलं पाहिजे अशी त्याची शास्त्राज्ञा होती. यावरून त्याच्या आजा-पणजांचीहि कल्पना करावी. कोणत्याहि प्रसिद्ध, अप्रसिद्ध नटाशीं बेचाळीस पिढ्यांत अंतूचं कुठें नातं नव्हतं. आणि तरीहि अंतू पक्का नाटकी होता. मनानं, वाणीनं आणि अभिनयानंहि. हें बीज त्याच्या मनोभूमींत कोणत्या देवानं किंवा देवचारानं आणून घातलं होतं कोण जाणे !

वयाच्या चौदा-पंधराव्या वर्षीं बाप घरीं नाहीं असं पाहून त्यानं शिमग्यांत एक सोंग काढलं होतं आणि तें गांवभर फिरवलं होतं. शेजाऱ्यांनीं पोटभर हसून त्याचं कौतुकहि केलं होतं आणि त्या दिवसापासून नाटकांत जाण्याची कल्पना त्याच्या मनांत वावरूं लागली होती. आपण नाटकांत गेलों तर नांव काढूं असं त्याला प्रामाणिकपणें वाटूं लागलं होतं. पण ही आपली महत्त्वाकांक्षा बापाच्यापुढें उघड करायला त्याला धीर होत नव्हता. तसलं कांहीं आपण म्हटलं तर बाप आपली खेटरपूजा बांधील हें त्याला ठाऊक होतं.

आज तो विशींत आला होता. या चार-पांच वर्षांत त्यानं आपल्या आवडत्या विषयांत खूप प्रगति केली होती. मोचेमाडकरांचीं चिनपड्याचीं आख्यानवजा पौराणिक नाटकं त्यानं शेकड्यांनीं पाहिलीं होतीं. त्यासाठीं किती तरी कोसांची पायपीट केली होती. कधीं उपाशीं तर कधीं अर्धपोटीं अशा अवस्थेंत शेंकडों रात्री आलोचन जाग्रणं केलीं होतीं. कवळं, म्हार्दोळ, सांखळी अशा ठिकाणच्या नाटकांनीं गाजणाऱ्या जत्राहि त्यानं सोडल्या नव्हत्या.

पणजीला तिथल्या स्थानिक मंडळींनीं काढलेल्या ‘पौषपौर्णिमकर नाटक मंडळी’ चीं नाटकं पाहिल्यावर मग ‘चैत्रपौर्णिमकर नाटक मंडळी’ त्यांना कशी तोडीस तोड देते तें पाहायलाहि तो चुकला नव्हता.

किती तरी नाटकांचीं पुस्तकं त्यानं गोळा केलीं होतीं. किती तरी आवडत्या भूमिकांचीं भाषणं तोंडपाठ केलीं होतीं. तो रागावला, एखाद्याबरोबर भांडायला उठला कीं ‘निर्लज्ज नराधमा... अकलेच्या अमीरा... बेताल, बदसूर बडबड बंद कर... मातीच्या मोलानं माणुसकी विकूं नको’ असं अनुप्रासांनींच बोलायला लागे. वाटेनें जाऊं लागला कीं सौभद्र, मानापमान अशा नाटकांतलीं पदें म्हणत, मधून मधून तानांचीं भेंडोळीं सोडीत जाई. तो येण्यापूर्वीं त्याच्या आगमनाची वार्ता लोकांना कळे. ‘आला, नाटकी आला!’ असं ते एकमेकांना सांगत. अंतू हें नांव मागें पडून ‘नाटकी’ या टोपणनांवानंच तो आतां गांवांत ओळखला जाऊं लागला होता. कोणी त्याचं कौतुक करीत तर कोणी त्याला उघड वा प्रच्छन्नपणें हिणवीत. पण त्यानं एखादी सुरावट फेकली, नुसतं एखाद्या पदाचं तोंड म्हटलं तरी सगळ्यांचे कान टवकारले जात. पोराचा आवाजच तसा दळदार होता. त्याची नस सगळ्यांना ठाऊक झाली होती. त्याचं तें ढंगदार गाणं ऐकून लोक त्याला खुलवण्यासाठीं म्हणत.

“तूं नाटकांत जायला हवंस. मोठी मजा करशील गड्या—”

तें ऐकून त्याला आपल्या मस्तकावर पुष्पवृष्टि झाल्यासारखं वाटे. तो लगेच म्हणे.

“मी एका पायावर तयार आहें. नाहीं रंगभूमि गाजवली तर त्या बापाचं नांव सांगणार नाहीं. पण आमचे पिताश्री आम्हांला जाऊं देतील तर ना! नाटक म्हटलं कीं त्यांना कपाळशूळ उठतो. ते माझ्यापुढें हातवारे करून म्हणतात—‘रांडेच्या ऽऽ! हीं कसलीं अमंगळ पदं म्हणतोस? त्याऐवजीं चार वेदाक्षरं म्हटलींस तर तुझे पितर नर्कांत का जातील! म्हणे ‘न्यमन न्यटवरा ऽऽ विस्मयक्यारा ऽऽ! ...’ अहाहा! दिवे ओवाळा या कुलदीपकाच्या तोंडाभोंवतीं! ...”

त्यानं केलेली ही वडिलांची हेटाळणी गांवांतल्या त्यांच्या पोक्त चहात्यांना मुळींच आवडत नसे. ते त्याला दाबल्यासारखं करून म्हणत.

" बरोबर आहे बाळंभटांचं म्हणणं. त्यांचीं गांवांत चार यजमानकृत्याचीं घरं आहेत. गांवांत त्यांना प्रतिष्ठा आहे. घर आहे, घराभोंवतीं पांच-पंचवीस कलमं आहेत. पाटाखालीं ढोकाच्या मेरेनं कुळागर आहे, सगळं कांहीं आहे. तूं त्यांचा वडील मुलगा. तुला असले पोरकट चाळे शोभत नाहींत. त्यांतून वडिलांनीं आतां तुझे दोहोंचे चार हात करून दिले आहेत. आतां घरप्रपंचाची सगळी जबाबदारी तूंच संभाळायचीस. आईविना पोरकीं झालेलीं तुझीं लहान भावंडं आहेत, त्यांना तूंच वर काढायचींस. हें सगळं सोडून तूं असा नाटकी बनलास तर बाळंभटजींनीं तुझ्यापुढें दिवे ओवाळायचे नाहीं तर काय करायचं — "

अंतू हे उपदेशाचे घुटके या कानानं घेई अन् त्या कानानं सोडून देई. त्याची भ्रमंती कधीं संपली नाहीं अन् बाप-लेकांचीं भांडणं कधीं चुकलीं नाहींत. बाप क्रोधी अन् मुलगा पागल. जोडी मोठी नमुनेदार जमली होती. अगदीं हिरण्यकशिपु अन् प्रल्हाद यांच्या तोडीची. अंतूला संसाराच्या खुंटाला बांधून घालायला बापाचा अक्रस्ताळीपणा कुचकामी ठरला होता. रहातां राहिली दुसरी शक्ति म्हणजे बायको.

पण तिचे पाश तेवढे रेशमी अन् बळकट नव्हते. बायकोबद्दल अंतूला मोठंसं प्रेम नव्हतं किंवा तिरस्कारहि नव्हता. आपल्याला बायको यथातथाच मिळाली असं मात्र त्याला अधून मधून वाटे. त्याच्या लग्नाचं ' गुजगुज ' सुरू झालं तेव्हां त्यानं स्वतःलाच विचारलं होतं. ' बोल जिवा, तुला प्राणप्रिया कशी पाहिजे ?' मग जिवानं त्याला सांगितलं होतं. ' पहिला नंबर भामिनीचा. ती कशी वनमाला बनून राजमहालांतून निघाली अन् धैर्यधरासाठीं रानावनांत भटकली ! तो भलतीच थट्टा करतो आहे असं पाहिल्यावर एवढ्या मोठ्या तीन चांदांच्या सेनापतीलासुद्धां तिनं ठणकावून सांगितलंन्.

' विनयहीन वदतां नाथा, नाहीं मी बोलत— '

अन् भामिनी मिळणारच नसेल तर मग वसुंधरा. केवढं तिचं पातिव्रत्याचं तेज ! ' वृंदावन ! पतिव्रतेच्या पावित्र्याचा हार स्वीकारण्यासाठीं आपली मान पुढें वांकवा,' असं तिनं म्हणतांच त्या वृंदावनाची—त्या कृतान्त काळाची-सुद्धा म्हातारी कांपली...

पण भामिनी, वसुंधरा राहिल्या रंगभूमीवर. त्याच्यापुढें बोहल्यावर उभी राहिली ती इंदु-चिंदूंची धाकटी बहीण. तितपत काळी नव्हे; पण चेहऱ्या-मोहऱ्यांत कसलाहि ठसठशीतपणा नसलेली अन् अगदींच मिळमिळीत. घोड्यावर बसून गोंडे हालवीत लग्नमंडपांत जातांना त्याला वाटलं होतं, आतां आपली प्रियतमा गौरीहरापुढून उठून पुढें आली असेल. दुरून मला पाहिल्या-वर म्हणत असेल, 'दादा ते आले, दादा, दादा, ते आले ना!' पण प्रत्यक्षांत त्याला तिच्या मुद्रेवर तसलं कांहींच दिसलं नाहीं. त्याला वाटलं कीं, आपला संसार इतरांसारखा थातुरमातुरच होणार. त्यांत नाट्य निर्माण होणारच नाहीं.

आपल्या बायकोच्या अंगीं नाट्य उत्पन्न व्हावं म्हणून अंतूनं प्रथम प्रथम बरेच प्रयत्न केले; पण ते पालथ्या घड्यावर पाणी ओतावं तसे ठरले. एकदा तीं दोघंच कुळाराचं शिंपणं करीत होतीं. वरून पाण्याचे ओझर एकाखालीं एक असे ओतत खालीं येत होते. चराकडची सुरंगी पानोपानीं फुलली होती अन् तिच्या फुलांचा दमदमाट पसरला होता. जांभाच्या फुलांतले आरक्त केसर वाऱ्यावर विखुरत होते. सर्वांगीं पोफळींना वेढून वर चढलेल्या मिर-वेलींवर हिरवे, तांबडे मिरींघोस चौफेर लटकत होते. वरपासून खालपर्यंत सगळं कुळागर शिंपून निघाल्यामुळें तुडुंब दिसत होतं. उन्हं झाडांच्या शेंड्यांवर अन् कवडसे खालीं नाचत होते. वातावरण धुंद होतं, मस्त होतं. सतत दोन तास कंबर मोडून शिंपल्यामुळें अंतूच्या बायकोचा चेहरा तांबूस, ओलसर झाला होता. कानाच्या पाळीसुद्धां लालसर दिसत होत्या. त्याला ती सौदामिनीसारखी वाटली. तिची थोडी गंमत करावी असं त्याच्या मनांत आलं. आपल्या हातांतल्या कल्यांतून एक लहानशी जलधार त्यानं केळीच्या-ऐवजीं बायकोच्या अंगावर टाकली. लगेच सौदामिनीची वसंतसेना झाली. त्याची अपेक्षा होती कीं, इथें तिनं दोन्ही हातांची ढाल तोंडापुढें धरून, मानेला किंचित् बांक देऊन, स्वयंवरांतल्या रुक्मिणीसारखा अभिनय करावा— 'खडा मारायचा झाला तर!'

पण ती नुसतीच किंचाळली अन् पुन्हां असला पाणीदार अतिप्रसंग नको म्हणून घरीं पळून गेली. तो कातावल्यासारखं करून उद्गारला, 'हेंद्रटच आहे मेलं!' त्या दिवसापासून अंतूनं ठरवलं कीं, तळीरामाच्या घरांत जशी गीता

तशी आपल्या घरांत 'ही'! रांधा, वाढा, उष्टीं काढा! तेवढ्यासाठींच आपल्या घराच्यां रंगभूमीवर तिचा प्रवेश मान्य करून घ्यायचा.

गोव्यांत नाटकाचा मोसम सुरू झाला कीं अंतूला घरीं राहवायचं नाहीं. तो मग पणजी-म्हापश्याला कोणती कंपनी आली आहे त्याचा वास काढूं लागे. तशी भरीव बातमी कळली कीं त्याच दिवशीं संसारावर तुळशीपत्र ठेवून मार्गस्थ होई. कोणाची ना कोणाची तरी ओळख काढून थेट कंपनीच्या बिऱ्हाडांतच आपलं सोवळंभांडं टाकी. मग तिथलं कोणतंहि काम करायला त्याची ना नसे. कंपनीच्या बिऱ्हाडीं चालणाऱ्या नाटकाच्या तालमी दाराआडून पहातांना त्याला स्वर्ग ठेंगणा वाटे. एखादा नट आपलं भाषण मिळमिळीत अन् जीव नसल्यागत बोलूं लागला कीं तो जिथल्या तिथें अस्वस्थ होत असे. त्याला वाटे, आपण पुढें जावं अन् तींच वाक्यं ठसक्यांत म्हणून टाळी घ्यावी. प्रेक्षकांवर परिणाम करण्याच्या दृष्टीनं वाक्य कसं उच्चारलं पाहिजे, त्यांत चढ-उतार कसे पाहिजेत, याचं त्याला उपजतच ज्ञान होतं. तालमीच्या वेळीं चालणारे थट्टाविनोद, तें सिगारेटी ओढणं, तें पानाचे तोबरे भरणं, ते मिस्किलपणाचे नेत्रविक्षेप, एखाद्या स्त्रीपात्र्यानं लाजत मुरकत गळ्याला चिमटा काढल्यासारखं करून कृत्रिम आवाजांत सुरू केलेलं तें गाणं, हें सगळं पहातांना तो अगदीं हुरळून जाई. कोणत्या नटाला काय खोड्या आहेत, कोणाचे विशेष गुण कोणते, हें खोल जिज्ञासेनं जाणून घेऊन तो आपल्या काळजांत सांठवून ठेवी. केस नीटनेटके करून, डोक्यावर फॅरची उंच टोपी किंचित् तिरकी ठेवून, गळ्याभोंवतीं लोकरीचा गळपट्टा वेढून, तलम धोतराचा पंखेदार काचा मारून, विलायती अत्तरानं घमघमणारा रुमाल कोटाच्या खिशांत कोंबून अन् हातांत लवलवती सुंदर छडी घेऊन तो नटवर्ग सायंसहलीसाठीं माडीवरून खालीं उतरला कीं इंद्रसभेंतले लोकपाल मृत्युलोकींच्या संचारार्थ निघाले असं त्याला वाटे.

'छे! नाटकासारखी मजा नाहीं!' असं तो मग म्हणे. अजून आपण नाटकांत कां गेलों नाहीं याचं त्याला नवल वाटे. कोण अडवतं आपल्याला! बाप?... बायको?... घर, संसार... का माझा मीच? जावंसं वाटतं; पण अजून धीर होत नाहीं, असं कां बरं व्हावं?'

या वर्षी मात्र तो सगळा धीर एकत्र करून निघाला होता. मास्टर दीनानाथची कंपनी पणजीला आली आहे हें त्याला कळलं होतं. दीनानाथ हा त्याचा आदर्श पुरुष होता. त्याच्यावरून तो जीव ओवाळून टाकायला तयार होता. भीत भीत का होईना; पण मोठ्या शर्थीनं दीनानाथच्या बैठकीपर्यंत त्यानं मजल मारली होती. दीनानाथनीं त्याची नाटकांत येण्याची इच्छा ऐकून घेतली होती. त्याच्याकडनं एक पदहि म्हणून घेतलं होतं. आपल्याला काय वाटलं तें त्यांनीं बोलून दाखवलं नव्हतं. पण निरोप देतांना एवढंच सांगितलं होतं, कीं आमची कंपनी आणखी दोन महिन्यांनीं बेळगांवला जाणार आहे; त्या मुक्कामांत मला येऊन भेट.'

अंतूचं काम झालं नव्हतं; पण त्याच्या जिभेला मधाचं बोट लागलं होतं. दोन महिन्यांनीं का होईना; पण त्याच्या आशेला जागा होती. तो उल्हसित मनानं कंपनीच्या बिऱ्हाडांतून बाहेर पडला होता. येतांना न कळत त्याची जीभ गुणगुणूं लागली होती, 'शूरा मी ऽऽ वंदिलें ऽऽ!'

पण त्याच्या या आनंदाच्या दुधांत मिठाचा खडा टाकायला बाळंभट नुसता टपून बसला होता. त्याला परगांवचं एक लग्न संपादायचं काम आलं होतं. चांगली पंचवीस रुपये संभावना मिळणार होती. पण अंतू ऐन वेळीं निघून गेल्यामुळें त्याचं तें घबाड हुकलं. घर कोणावर टाकून जाणार होता तो! मुलाला स्वतः कांहीं मिळवण्याची तर अक्कल नव्हतीच; पण तो दुसऱ्यालाहि मिळवूं देत नव्हता. त्याच्या दृष्टीनं पोराची आतां हद्द झाली होती. तो असून निरुपयोगी ठरला होता. तो सुधारेल, नेटका प्रपंच करील, त्याच्या डोक्यांतलं तें नाटकाचं वेड जाईल ही आशा आतां संपली होती आणि या निराशेचा उद्वेगच त्याच्या अंतरांत कढत होता. त्यामुळें अंतू घरीं येतो, पडवीवर टेकतो, तोंच त्यानें त्याच्यावर भार काढला.

"एवढ्यांत कशाला घरीं आलास बाबा! अजून बाप जिवंत आहे तुझा. तो मेल्यावर त्याला भाजायला आला असतास तरी पुरलं असतं—"

आणि मग कमरेवर हात घेऊन, कांपत, थरथरत तो अंतूला अद्वातद्वा बोलत सुटला. पण अंतूचं एक नाहीं कीं दोन नाहीं. त्यानं तोंडांत मिठाची गुळणी धरली होती. तो प्रतिवाद करीत नाहीं, उलट उत्तर देत नाहीं हें

पाहून म्हाताऱ्याला अधिकच चेव भरला. किती बोलावं तेवढं थोडं, काय करावं तें कमीच, असं त्याला वाटलं. आज त्यानं कमरेचं सोडून माथ्याला गुंडाळलं होतं. तो नुसता नाचत होता, दूर जात होता, कपाळावर हात मारीत होता अन् पुन्हा अंतूसमोर येऊन नवं शब्दभांडार खुलं करीत होता.

एवढ्यावरच भागलं असतं तरीसुद्धा मोठासा अनर्थ घडला नसता. पण त्यानं आज पोराला कठोरांतली कठोर शिक्षा द्यायचं ठरवलं होतं. अंतूनं आपल्या पडवीच्या भिंतीवर वेगवेगळया ठिकाणचीं, वेगवेगळया नाटकांचीं हस्तपत्रकं चिकटवलीं होतीं. प्रसिद्ध नटांचे वेगवेगळया भूमिकेंतले कांहीं फोटो चारी कोपऱ्यांना चुका ठोकून भिंतीवर बसवले होते. बाळंभटानं तीं हस्तपत्रकं टरकावलीं, ते फोटो बोटं घालून फाडले, ओढले नि त्यांचा चोळा-मोळा करून आंगणांत टाकला. अंतूचीं किती तरी नाटकांचीं पुस्तकं खिडकींत, कोनाड्यांत, वहालांवर अशीं अंतूच्या गैरहजेरींत सुखनिद्रा घेत पडलीं होतीं. एक एक करून तीं त्यानं उचललीं आणि आंगणांत फेकलीं. पाठोपाठ स्वतः आंगणांत उडी मारून त्यांचीं तुळशीवृंदावनासमोर रास केली आणि तितक्याच वेगानें धावत जाऊन न्हाणीच्या चुलींतलं एक पेटतं कोलीत उचललं.

एवढा वेळ अंतू स्तब्ध होता. तो राणा भीमदेव पडवीची रंगभूमि दणाणून सोडीत होता तें पहात होता, ऐकत होता. पण बापानं जेव्हां चुलींतलं कोलीत उचललं तेव्हां तो पुढें काय करणार आहे हें त्याला कळलं. त्यासरशीं त्याच्या अंगावर शहारे आले.

अंतूच्या वांट्याला तीं नाटकं नव्हतीं; तर वेद होते. त्यांतले किती तरी मंत्र त्यानं घोळवून घोळवून म्हटले होते अन् कित्येक मुखोद्गत केले होते. त्याची ती बहरलेली पुष्पवाटिका होती. केव्हांहि आंत शिरावं अन् मनसोक्त आनंद लुटावा. आणि या आपल्या भावानंदाच्या सृष्टीला आतां पुढच्याच क्षणीं ज्वाळ लागणार हें पाहिल्यावर वाघासारखी त्यानं आंगणांत झडप घातली. त्या राशींतलीं सगळीं नाटकं त्यानं भराभर उचललीं आणि छातीशीं पोटाळून धरलीं. बाप तें कोलीत विझडीत समोर उभा ठाकला तें पाहून त्यानं दातओठ चावले. नकळत त्याच्या तोंडून नाटकांतल्या एका पदाचा चरण बाहेर पडला—

" मज गमे ऐसा जनक तो
मांग सा ऽ ऽ चा— "

" खरं रे माझ्या कुळदीपका ! मी मांग आहें. मांगांतला पेडमांग आहें. तूं राहूं नको माझ्या घरांत. चालता हो तोंड घेऊन." बाळंभटानें कोलीत ओवाळीत हेल काढले.

अंतूनं तीच पडत्या फळाची आज्ञा मानली. तो आल्या पावलीं, त्याच धुळीच्या पायांनीं, ती आपली नाटकांची दौलत त्याच पिशवींत कोंबून, त्याच उन्हाच्या कडावर, उपाशींपोटीं घर सोडून चालता झाला. त्यानं आपल्या भावंडांच्या आर्त हाका ऐकल्या नाहींत कीं बायकोच्या डोळयांतल्या अश्रुसरी पाहिल्या नाहींत. आतां रंगभूमि हेंच त्याचं घर होतं आणि तेंच जवळ करायला तो संथपणें पण निर्धारानें चालला होता.

दीनानाथनीं अंतूला रंगभूमीचं दार किलकिलं केलं होतं; पण उघडलं नव्हतं. दोन महिन्यांनंतर बेळगांवला जाऊन पुन्हां तो त्यांची गाठ घेणार होता. पण तोंपर्यंतहि त्याला नाटकांतच रहायचं होतं. थोडीबहुत अनुभवाची शिधोरी पदरीं बांधायची होती. पण जायचं कुठें ! नाटककंपन्या काय गल्लो-गल्लीं पडल्या होत्या थोड्याच ! त्यानं विचार केला कीं, प्रथम मोचेमाडकरांशीं संधान बांधावं. ती मंडळी कुठल्या भागांत नाटक करीत आहे, याचा तो तपास घेऊं लागला आणि याच तपासांत त्याला आणखी एक बातमी लागली ती ही कीं, श्री. सखाराम बर्वे यांनीं एक नवीच कंपनी उभारली आहे अन् ती अंत्रुजमहालांत आपले खेळ करीत आहे.

पट्टीचे पेटीवादक आणि नाट्यांतले मुरब्बी असा बर्व्यांचा लौकिक अंतूच्या कानावर होता. त्यांची जी कांहीं त्याला माहिती होती तिच्यावरून त्याला भरवंसा वाटला कीं ते आपल्याला ठेवून घेतील. एका संध्याकाळीं पांचांच्या सुमाराला तो त्यांच्या बिऱ्हाडीं पोंचला. बर्वे आंगणांत मांडवाखालीं बसले होते. त्यांच्याभोंवतीं त्यांचे भक्तगण आणि कांहीं नटहि होते. नाटकांतल्या संगीतावर चर्चा चालली होती. तें कसं असावं अन् कसं नसावं त्याबद्दल ते विवेचन करीत होते. त्या ठेंगण्या, सडपातळ मूर्तीच्या डोळयांत कारुण्याची छटा कायमची होती. मिस्किलपणा चमके, पण तो अधूनमधूनच. त्यांच्या

बोलण्यांत अधून मधून विनोदाच्या फुलबाज्या सहजपणें उजळून जात. अंतू हळूच तिथें येऊन एका बाजूला बसला. आल्या आल्या त्याला आवडत्या नाट्याविषयाची मेजवानीच मिळाली.

सखाराम बर्व्यांनीं त्याची बारकाईनें चौकशी केली. त्याची कंपनींत रहाण्याची तीव्र इच्छा दिसल्यावर त्या दृष्टीनं त्याला एकदां निरखून घेतलं. अंतूचा चेहरा भावदर्शी आहे, रंगभूमीवर तो समोर तोंड करून किंवा तिरप्या मानेनं कसाहि उभा राहिला तरी त्याच्या चेहेऱ्याची ठेवण चांगली आहे अन् विशेष म्हणजे त्याचे डोळे टपोरे, स्वच्छ अन् तरल आहेत हें पाहिल्यावर त्यांना वाटलं कीं, मुळांत हिरा आहे. पैलू पाडून घेतलेन् तर रंगभूमीवर प्रकाश पाडील.

आणि त्या दिवसापासून अंतू नाटकी झाला. पहिल्या महिन्यांत नाटकांच्या तालमींना न चुकतां हजर राहणं एवढंच त्याला काम मिळालं. अंतू वाढत्या मनोल्हासानं तें करूं लागला. तो घर विसरला, कुळागर विसरला, बाप विसरला, बायको विसरला, सगळं कांहीं विसरला. जणूं त्याला भूतकाळ नव्हताच. जणूं तो नाट्यसृष्टींतच पहिल्यानें जन्माला आला होता अन् एखाद्या नवजात शिशूसारखा डोळे विस्फारून भोंवतींच्या विश्वाकडे टकामका पहात होता.

पहिल्या पहिल्यानं अंतू नुसता आ उघडून 'आश्चर्यवत्' तालमी पाही. पुढें पुढें तो गंभीर होऊं लागला. प्रत्येक भूमिकेच्या अंतरंगांत शिरून ती तपासूं लागला. थोड्याच दिवसांत एखादं पात्र गैरहजर असलं तर तालमीच्या वेळीं त्याचं भाषण पुस्तकावरून म्हणायचं काम त्याला मिळूं लागलं. तें करीत असतांना त्या त्या भूमिकेच्या अभिनयाच्या अशा कांहीं छटा तो दाखवी कीं, समोरच्या पात्रानं एकदम गोंधळल्यासारखं व्हावं. कित्येकदां त्या शहाणपणाच्या असत तर कित्येकदा मूर्खपणाच्याहि असत. पण ज्या कांहीं असत त्या त्याच्या स्वतःच्या अकलेतून निघालेल्या असत. त्यांच्या मागें कांहीं तरी विचारांचं मंथन असे. बर्व्यांना तें पाहून वाटे कीं, अंतू नाटकाचा नुसता वेडाच नाहीं तर शहाणाहि आहे. ते बोलून दाखवीत नसत; पण अंतूसाठीं त्यांच्या हृदयांतला एक लहानसा कोपरा रिकामा झाला, एवढं मात्र खरं होतं.

बव्र्यांची कंपनी बरींच नाटकं करी, पण 'पंतांची सून' हें तिचं हातखंडा नाटक होतं. बवें त्यांत पंतांची भूमिका बहारदार करीत. त्यांतली झंपूची भूमिका करणारा नट कांहीं दिवस रजेवर जाणार होता. तें काम कोणाला द्यावं असा विचार करीत असतांना अंतू त्यांच्या डोळ्यांपुढें उभा राहिला. दुपारीं तालमीच्या वेळीं ते त्याला म्हणाले.

"अंतू, आज मी तुला या गिंडीकाकूच्या मांडीवर दत्तक म्हणून बसवणार आहें."

गिंडीकाकूचं काम करणाऱ्या नटानं मान वेळावून एक मुरका मारला अन् अंतू बव्र्यांच्या तोंडाकडे पाहूं लागला.

"अरे, म्हणजे झंपूचं काम तूं करायचंस."

"मी ?"

"होय, तूंच. गिंडीकाकू चोरून भर्जी चारील तुला नाटकभर. चंगळ होईल तुझी."

"गिंडीकाकूंची खायला बरीं; पण तिच्या जोडीला प्रेक्षकांनीं दिलीं म्हणजे—"

"तीं नको असलीं तर भूमिका चांगली वठव."

"जशी आज्ञा !"

अंतू त्या दिवशीं या लोकांत नव्हता. आपल्याला काम मिळालं याचा आनंद तो लपवूं शकला नाहीं. झंपूनं त्याच्या काळजांत घर केलं. झोंपेंतसुद्धा त्यानं त्याला सोडलं नाहीं. एका स्वैंपाकीणबाईचा अर्धवट मुलगा श्रीमंताच्या घरीं वागतांना आपला अवतार कसा दाखवील, हेंच एक त्याच्या मनांत सारखं घोळत राहिलं.

पहिल्या रात्रीं तो जरा घाबरला, घुस्मटला; पण नंतर आत्मविश्वासानं काम करूं लागला. रंगभूमीवर प्रवेश करतांच त्यानं प्रेक्षकांवर असे कांहीं डोळे फिरविले कीं त्या क्षणीं टाळयांचा कडकडाट. एका अर्धवटाचा आपण पुरते शहाणे आहोंत हें दाखवण्याचा तो अभिनय प्रेक्षकांनीं सहर्ष स्वीकारला आणि मग गिंडीकाकूचा अन् त्याचा तो प्रवेश चांगलाच रंगला.

गिंडोकाकू जेव्हां त्याला म्हणाली कीं ‘ पंत तुला मांडीवर बसवणार आहेत ’ तेव्हां त्यावर त्यानं तारे तोडले. ‘ म्हणजे ते माझे बाप होणार. तूं माझी आई आहेसच. अर्थात् तुझे ते नवरे होणार. म्हणजे ते तुला बायको म्हणून मांडीवर दत्तक घेणार... ’ इथें अंतूनं अशी कांहीं फुशारकी दाखवली, कीं पहा, माझंसुद्धां डोकं कसं काम करतंय तें ! तर्क म्हणजे तर्क.

गिंडीकाकूनं जेव्हां त्याला सांगितलं, कीं ‘ तूं पंतांना दत्तक गेल्यावर ही सगळी इस्टेट तुझीच ’ तेव्हां तो आश्चर्य अन् आनंद यांचा पूर आपल्या डोक्यावरून गेला असं दाखवीत म्हणाला.

“ होय का ? मग मी छान स्वयंपाक करायला शिकेन आणि स्वयंपाकाला जातांना गळ्यांत कंठी...हातांत सलकडीं...कानांत बिकबाळी...अन् बोटांत आंगठी घालून जाईन.” आणि इथें त्यानें लक्ष्मीघरासारखे दोन्ही हात उगाच हालवले.

त्याचा नायकिणीच्या घरांतला प्रवेश तर प्रेक्षकाना मेजवानी ठरूं लागला. बर्वे त्याच्या कामावर बेहद्द खूष झाले. अंतूनं झंप्याच्या कामावर स्वतःचा छाप उठवला. दिनकर ढेरे कामण्णा, तसा अंतू नेने झंप्या म्हणूनच ओळखला जाऊं लागला. शोकीन तरुण त्याचा परिचय करून घेऊं लागले. त्याला चहा पाजूं लागले. अंतूलाही वाटूं लागलं कीं आपण कोणी तरी आहोंत ; निदान होण्याच्या मार्गावर तरी आहोंत.

त्याला नाटकमंडळींत गेल्याला आतां एक वर्ष उलटून गेलं होतं. तेवढ्या अवधींत त्याची कंपनी सावंतवाडी, वेंगुर्लें, मालवण या भागाचा दौरा करून आली होती. अंतू आतां छानछोकी करूं लागला होता. त्याच्या अंगावर तलम, सुंदर कपडे चढले होते. केसांना वळण अन् तुकतुकी आली होती. गळ्याभोंवतीं रेशमी गळपट्टा आला होता. दोन भुवयांच्या मध्यें शेंदूर लागला होता अन् हातांत कृशांगी, देखणी छडीही आली होती. तो आपल्या नाटकी जीवनावर विलक्षण खुष होता. .

अधून मधून त्याला घरची आठवण येई ; पण तो ती झाडून टाकीत असे. घर हें त्याच्या वांट्याला आतां रान झालं होतं. बापाला त्यानं

त्या रानांतला वाघ ठरवलं होतं. अन् बायको! बिळांतली घूस असत नाहीं का, तशीच ती एक असं तो समजत होता. अलीकडे 'पंतांची सून' मधला तो नायकिणीच्या घरांतला प्रवेश करतांना त्याला वाटूं लागलं होतं कीं, आपल्या आयुष्यांत अशी एखादी 'चांदणी' उगवली तर किती बहार होईल!

अशांत एक दिवस बर्व्यांनीं सांगितलं.

"येत्या शनिवारीं आपल्याला भीमकोंडीला जायचं आहे. तिथल्या देवीची जत्रा आहे. मीं नाटकाचं निमंत्रण स्वीकारलं आहे."

त्यासरशी अंतूचं तोंड उतरलं. भीमकोंडी म्हणजे त्याच्या सासुरवाडीचं गांव. तिथून पांचच मैलांवर त्याचं स्वतःचं घर. ती दिशा त्याला नको होती. ओळखीचीं माणसं भेटायचीं. एखादे वेळीं सासरेबुवा उपदेश करायला यायचे. सगळ्या मंडळींच्या देखत आपली अप्रतिष्ठा व्हायची. 'छेः, तिकडचा वारासुद्धां नको आपल्याला.'

पण मनांतून नको असलं तरी तें त्याला टाळतां आलं नाहीं. सगळी मंडळी पुढें गेली, रंगभूमीची मांडावळ करूं लागली तरी हा एकटाच मागाहून रेंगाळत राहिला. आपल्याला कोणी ओळखूं शकणार नाहीं इतका अंधार पडल्यावर त्यानं देऊळ गांठलं. मुख्य मंडपाच्या शेजारींच नाटक्यांसाठीं एक तणार उभं केलं होतं त्यांत लगेच पथारी पसरली. तो रंगायची वेळ होईपर्यंत कुडाकडे तोंड करून झोपून रहाणार होता. नाटकाच्या वेळेपुरेसा रंगभूमीवर येणार होता अन् नाटक संपल्यावर सगळ्यांच्या आधीं तिथून पसार होणार होता. स्वस्थ पडला असूनहि त्याचं मन धाकधुक करीत होतं. त्याला वाटलं, बेबंदशाहींतलं तें वाक्य कोणी तरी आपल्या कानाशीं कंठरवानं ओरडत आहे, "राजा, वैऱ्याची रात्र आहे; जागा रहा!"

तें देऊळ गांवाच्या बाहेर एका माळावर होतं. आसपास जाळी झिलकुट्या वाढल्या होत्या. पण आज तिथें उत्साहाची पर्वणी आली होती. मांडवाच्या दुतर्फा मिठाईचीं दुकानं बसलीं होतीं. फुटाणेवाल्यांनीं आपल्या मालाच्या राशी घातल्या होत्या. 'खा गर ऽ ऽ म, खा गर ऽ ऽ म' असं ते ओरडत होते. त्यांतच सोड्याच्या बाटल्यांचे आवाज मिसळत होते. खेळणींवाले शिट्या फुंकीत होते. माळणींनीं फुलवेण्यांचा सुवासिक संभार पुढें मांडला होता. चहावाले खोबरेलांत तळलेल्या भज्यांचा उग्र दर्प सोडीत होते.

नाटक सुरू व्हायचं होतं अकरा वाजतां; पण आठ वाजल्यापासूनच तिथें लोकांची मूस फुटली होती. आजूबाजूचीं गांवं अन् वाड्या यांच्यामधून माणसं मुंग्यांच्या रांगेसारखीं लोटत होतीं. जनसंख्या फुगत चालली होती. कोलाहल क्षणाक्षणाला वाढत होता. प्रत्येकाला काहींना काहीं विकत घेण्याची घाई अन् नाटक पहाण्यासाठीं सोयिस्कर जागा धरण्याचीहि धाईच.

हें सगळं निजल्या जागीं अंतूच्या कानांवर आदळत होतं. हा तिथला उतूं जाणारा उत्साह त्याच्या परिचयाचा होता. नाटकमंडळींत जाण्यापूर्वी अशा किती तरी जत्रा तो हिंडला होता अन् लोकगंगेवर तरंगला होता. पण आज मात्र अशाच एका वाजत्या गाजत्या त्या स्थळीं त्यानं आपलं तोंड लपवलं होतं.

पण रंगायच्या पूर्वी त्याला एकदा मागच्या ओढ्यावर जाऊन येण्याची निकड उत्पन्न झाली आणि तो उठला. तो ओळखीपाळखीच्या लोकांना भीत होता; अंधाराला नव्हे. त्यानं खिशांतली विजेरी काढून हातांत घेतली अन् तो निघाला. देवळाच्या मागें आणखी बरंच माळ होतं, त्यापुढें थोडा उतार होता अन् त्याखालीं ओढा होता. देवळाची पुढची बाजू माणसांनीं फुलली होती पण मागची निवांत होती. तिकडे अधून मधून वाऱ्यावर डोलत होत्या, माघांतलं दंव पीत होत्या, त्या फक्त उसगीच्या जाळ्या.

अंतू पंधरा मिनिटांनीं तिकडून परतला. चढाव चढून माळावर आला. वरून अंधार सांडत असला तरी त्याच्या पायाखालची वाट मोकळी होती, समतळ होती. पुढें थोड्याच अंतरावर देवळाकडचा प्रकाश झगमगत होता. त्यामुळें विजेरी न दाबतांच तो चालत होता. एवढ्यांत डाव्या हाताची एक जाळी खजबजते आहे असा त्याला भास झाला. तो किंचित् चरकला; पण पळाला नाहीं.

त्या जाळींत दोन माणसं कुजबुजत होतीं. त्याला वाटलं, कोणी चोर-चांडाळ तर नव्हे! त्यानं तिथूनच आणखी लक्षपूर्वक ऐकलं. त्यांतला एक आवाज पुरुषी अन् दुसरा बायकी आहे हें त्याला लगेच कळलं. काहीं तरी वेगळं वाममार्गी प्रकरण आहे ही त्याची खात्री झाली. माणसाची असल्या रहस्याविषयींची जिज्ञासा मोठी अवखळ असते. अंतूहि तिच्या आहारीं गेला.

मांजराच्या पावलांनीं पुढें जाऊन तो जाळीच्या दुसऱ्या अंगाला खेटला. आतां ते कुजबुजते ध्वनी त्याला अधिक स्पष्ट झाले आणि एकाएकीं त्याच्या छातीला हिसका बसला.

" हें काय ऐकतों मी ! हा तर हिचा आवाज. होय ! शंकाच नको. तीच ही. माहेरीं आली असेल अन् इथं जगाच्या डोळयांआड अंधारालाहि लाजवणारे असले चाळे करीत असेल. अवदसा खरी ! पण हा प्राणी कोण ? कोणी ब्रह्मदेव का असेना ! त्याचा गळा दाबून—"

अंतू दबत दबत त्याच्या बाजूला जवळ गेला अन् त्यानं विजेरी दाबली. समोरासमोर, नाकाला नाक भिडेल अशा अवस्थेत असलेल्या दोन चेहऱ्यांवर लखलकन् प्रकाशाचा झोत पडला. अंधाराच्या पोटांतच नव्हे ; तर त्या दोघांच्याहि काळजांत खंजीर खुपसल्यासारखं झालं. तो पुरुषी चेहरा झटकन् पाठमोरा झाला. आपल्या मुद्रेवरची एक रेषाहि ओळखूं न देतां त्यानं ओढ्याच्या अंगानं झेप टाकली. एवढा वेळ त्यानं जिची जवळीक केली होती, आपल्या ओठांतले मधुलिप्त बोल जिच्या कानांत ओतले होते, जिच्या मोजक्याच प्रणयवचनांनीं ज्यानं आपला जीव फुलवला होता, त्यानंच तिला त्या दाहक प्रकाशाच्या झोतांत तशीच ठेवून ' यःपलायते ' केलं. पापाला बळ असतं तें फक्त पायांत, हें सिद्ध करून तो अदृश्य झाला.

जाग्यावर उरली ती फक्त स्त्रीमूर्ति ! तिला पळायचंसुद्धा भान उरलं नाहीं. तिच्यावर जणूं वाघशिरं पडलं. तिचं हृदय धडधडूं लागलं म्हणण्यापेक्षां तें थांबण्याच्या बेतांत आलं म्हटलं तरी चालेल. तिनं फक्त प्रकाश पाहिला. त्यामागची व्यक्ति तिला दिसली नाहीं. अंतूनं ' चक्षुर्वै सत्यम् ' केलं. तो जवळ गेला, समोर उभा राहिला. ' मला ओळखलंस ' म्हणून गुरगुरला. तेव्हां तिला त्याची ओळख पटली. तिच्या वांट्याला केवढं आश्चर्य होतं तें ! चौदा महिने ज्याची कथा-वार्ता नव्हती तो तिला खाटल्यावर पकडायला म्हणतात तसा अचानक पुढें प्रगट व्हावा, म्हणजे काय गोष्ट होती !

अंतूनं विजेरी बंद केली. कांहीं क्षणांनंतर अंधाराला सरावलेल्या त्याच्या डोळ्यांना तिची आकृति स्पष्ट दिसूं लागली. तिची मान खालीं पडली होती. ती जणूं धरणीला ठाव मागत होती. अंतूच्या मुद्रेवर कोणत्या भावनांचं थैमान मांडलं आहे तें तिला दिसत नव्हतं म्हणूनच बरं !

"कोण होता तो पाजी माणूस?" त्याचा सवाल उठला. पण तिचं उत्तर मात्र उमटलं नाहीं. तिला अजून वाचा आली नव्हती. अंतूनं पाहिलं. तिनं दोन्ही हातांनीं लुगड्याच्या निऱ्यांजवळ एक पुडा धरलेला होता. अंतूला वाटलं कीं, तो बहुश जत्रेंतल्या मिठाईचा असावा अन् त्या पळपुट्या प्रियकरानं दिलेला असावा. अन् त्यावरची ती अबोलीची वेणी–तीहि त्याचीच भेट असली पाहिजे. अंतूनं त्यावर एक थप्पड लगावली. त्यासरशीं तो पुडा त्याच्या पायाशीं आला अन् वेणी त्या झुडपाच्या फांदीवर पडली. अंतूची बायको थरथर कांपूं लागली.

आणि दुसऱ्याच क्षणीं ती खालीं कोलमडली. तिनं त्याचे पाय धरले अन् वर मस्तकहि टेकलं. अंतू रागानं दांत-ओठ खात होता, नागोबासारखा फुसफुसत होता, तरी त्याला वाटलं कीं, 'एकच प्याल्या'चा प्रयोग चालला आहे. सिंधु सुधाकराच्या चरणांवर पडली आहे अन् त्याला अश्रूंनीं भिजलेल्या शब्दांनीं विनविते आहे—

"लोटुं नका कांता। अशी दुरी कांता —"

तिची काया गदगद हालत आहे असं त्याला दिसलं. तिचे हुंदकेहि ऐकूं आले. आपल्या पायांवर अश्रूंचा कढत द्रव सांडत आहे असंहि कळलं. पायांवर पडलेल्या माणसाला तुडवण्याइतका तो निदर्य, राक्षस नव्हता. ती स्वतः उठेना; तेव्हां त्यानं तिला उठवली, उभी केली. कांहीं क्षण तो उद्वेगाचे निःश्वास सोडीत स्तब्ध उभा राहिला अन् मग म्हणाला.

"तूं अशा अवस्थेंत दिसशील याची कल्पना नव्हती मला. काय केलंस हें! कशी एवढी घसरलीस?"

ती आतां थोडीशी सांवरली होती. तिला आंतून धीर मिळूं लागला होता. पदरानं अश्रु पुसतां पुसतां ती बोलूं लागली.

"एवढी कशी घसरल्यें? ... तुम्ही मला जाब विचारतां? जिची नवऱ्यानं वास्तपुस्त सोडली, जिला चौदा महिने त्याचं ओझरतं दर्शनसुद्धा झालं नाहीं, जिला सासऱ्यानं गांजलं, मागून–पुढून लोकांनीं निखंदलं, तिनं काय करावं? तिचं मन कसं ठिकाणावर रहावं! सगळयाच काय सीता–दमयंती असतात? मी अशी कां झाल्यें, या स्थितींत तुम्हांला कां दिसल्यें, याचं उत्तर

माझ्याकडे मागण्याच्या आधीं तुम्हीं स्वतःच्या मनालाच तें विचारायला हवं होतं—"

ती थोडा वेळ थांबली. अंतू त्यावर कांहीं बोलतो का याची वाट पाहूं लागली. त्याच्या मनोवृत्तींतला फरक तिला त्याच्या मुद्रेवर दिसणं शक्य नव्हतं. त्याच्या शब्दावरूनच ती तें जाणणार होती. पण तो कांहीं बोलला नाहीं. केवळ स्थाणुपुरुषच राहिला. मग ती आणखी पुढें बोलूं लागली.

" तुम्ही निघून गेलांत अन् मला सगळा शून्याकार झाला. कुठें गेलांत हें कळेना. कोणी म्हणूं लागले कीं, तुम्ही नाटकांत गेलांत. कोणी सांगूं लागले कीं, तुम्ही परागंदा झालांत. कोणी बोलूं लागले कीं, तुम्ही कोण्या बाईच्या नादीं लागलांत. सगळ्यांचा सूर एकच कीं, तुझा नवरा आतां परत येत नाहीं. तो तुला कायमचा अंतरला...

" काय झालं असेल मला हें ऐकतांना ! अन् नवऱ्यानं सोडलेली तरणीताठी बायको म्हणजे जणुं बेवारशी वस्तु. कोणींहि तिला डोळा घालावा. कोणींहि तिची वाट अडवावी. कोणींहि तिच्याशीं सलगी करायला बिनदिक्कत पुढं यावं. तिनं किती जणांना झिडकारायचं ! किती दिवस ताठरपणा धरायचा ! अन् कोणाच्या पाठबळावर ...

" सासरीं चहूं बाजूंनीं पिडलें म्हणून उठून माहेरीं आलें. पण 'कुठें जाशी भोगा तर तुझ्यापुढें उभा !' इथेंहि तोच प्रकार. तीच निंदा, तीच टवाळी. तुमची नि माझी. सगळ्यांची दृष्टि विकृत नि शंकेखोर. कोणाची सहानुभूति नाहीं. माझ्या काळजांतली कळ कोणाला कळली नाहीं. मी माणसांत असून रानांत पडल्यासारखी झाल्यें.......

" तशांत हा आत्तांचा प्राणी भेटला. त्यानं माझ्यासाठीं सुस्कारा टाकला. माझ्याविषयीं कणव दाखवली. जेव्हा जेव्हा मला भेटला तेव्हा तेव्हा माझ्या-बद्दल मायेचे पाट वाहवले. त्यानं सांगितलं, यमे, चिंता करूं नको. मी तुझ्या नवऱ्याचा शोध करीन. असेल तिथून त्याला आणून तुझ्यापुढें उभा करीन. अन् हें नच झालं तर जन्मवेरी तुला अंतर देणार नाहीं. तुझं दुःख तें माझं दुःख समजेन...

" इतरांनीं मला गळाला अडकवण्याचा प्रयत्न केला; पण तो सरळ, उघडा होता. तो ओळखून मी त्याचा प्रतिकार करूं शकलें. पण हा माणूस करुणा अन् मायेचा कळवळा घेऊन माझ्यापुढें आला. मला तो परमेश्वर वाटला. त्यानं माझ्याभोंवतीं जाळं पसरलं; पण तें मला न दिसेल असं हळूहळू. माझ्या घाव लागलेल्या हृदयावर फुंकर घालीत तो तें आवळूं लागला. आणि आज त्यानं तें पुरतं आवळलं. नेत्रसंकेत करून त्यानं मला देवळापुढच्या लोकयात्रेंतून बाजूला काढलं...

" तो म्हणाला, 'चल' अन् मी त्याच्यामागून जाऊं लागल्यें. एकदाच का होईना, 'नाहीं' म्हणावंसं वाटलं; पण तो शब्द ओठांतून बाहेर फुटला नाहीं. मला जणूं त्यानं दावं लावलं होतं. मी माझ्या पायांनीं आल्यें नाहीं; त्याच्या पायांनीं आल्यें. कां आल्यें, कशी आल्यें कोण जाणे! पण आल्यें खरी! हे 'धिदि विधि' व्हायचे होते ना माझे! ... तुम्हीं तुमच्या जन्माचं नाटक केलंत अन् आज इथें या जाळींत, या अंधारांत माझ्या जन्माचं हें हेंगाडं, विद्रूप नाटक उभं झालं ..."

ती आणखी किती तरी बोलणार होती. चौदा महिने जें तिनं भोगलं तें सरसरून तिच्या जिभेवर आलं होतं. पण तिच्या बायकी, हळव्या मनानं तिला दगा दिला. पण ती जेवढं बोलली, तेवढंच अंतूला पुरलं. ती खरं बोलली होती. उघडं बोलली होती. तिनं आपला दुबळेपणाहि लपवला नव्हता. अंतू तिच्या एकेका वाक्यानं झरझर उतरत गेला. जर मधेच गळा दाटून तिचं बोलणं थांबलं नसतं तर त्यानं 'पुरे, पुरे' म्हणून तिच्या तोंडावर हात ठेवला असता.

त्याचं बायकोवर प्रेम नव्हतं हें खरं; पण वैरहि नव्हतं हेंहि तितकंच खरं. नाटकी, भ्रांतिकट दृष्टीनें तिच्याकडे पाहून त्यानं तिला यथा तथा ठरवलं होतं. तो नाटकांत गेला होता, चौदा महिने माघारा वळला नव्हता, याचा अर्थ त्यानं बायकोला टाकली होती असा नव्हे. त्याला फक्त नाट्यानं पछाडलं होतं.

पण आज तिनं त्याला विचार करायला लावलं. आपलं अस्तित्व अन् त्याची जबाबदारी या दोन्ही गोष्टी तिनं एकाच वेळीं पटवल्या. आजवर तो

पडद्यापुढचीं नाटकं पहात होता, करीत होता. तीं त्याच्या छांदिष्ट वृत्तीला रिझवीत होतीं. पण आजचं पडद्याआडचं हें नाटक त्याच्या चांगलंच जिव्हारीं झोंबलं. तो तिच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला.

" चल, जाऊं या आतां. "

" कुठें ? "

" आतां नाटकाला अन् सकाळीं घरीं. जन्माचं नाटक होण्यापूर्वी तुझ्या माहेरच्या देवीनं माझ्या डोळयांत अंजन घातलं हे तिचे महदुपकार. "

" खरंच तुम्ही घरीं येणार ? खरंच ? "

" खरंच. पण पुन्हां तूं असला फाजीलपणा करणार नसलीस तर. "

" पायांत वहाण आहे ना तुमच्या —"

" नको बोलूंस असलं. " असं म्हणतांना आतां मात्र त्यानं तिचं तोंड बंद केलं. दोघंहि त्या जाळींतून बाहेर पडलीं आणि हातांत हात गुंफून निघालीं. आणि हें नाटक मात्र दुसऱ्या कोणालाहि पहायला मिळालं नाहीं.

---

# सांतेरीची मूर्ति : :५:

आमच्या गांवची ग्रामदेवता शांतादुर्गा ; पण आम्ही तिला शांतादुर्गा न म्हणतां 'सांतेरी' असेंच म्हणतों. कोणी तरी, कधीं तरी उच्चाराला सुलभ असा हा अपभ्रंश केला आणि तोच आज सगळयांच्या तोंडीं बसला आहे. गांवाच्या बाहेरच्या अंगाला एका टेकडीच्या पायथ्याशीं तिचें देऊळ आहे. देऊळ कसलें ; दोन खणी कौलारू खोपटच तें. त्याला खांब नाहीं, कमान नाहीं कीं कळस नाहीं. जें आहे तें सुद्धा चांगल्या स्थितींत नाहीं. कडणीवांसा 'बरगा' झाला आहे. पावसाचें पाणी पिऊन भिंती ठायीं ठायीं कोसळल्या आहेत. मागच्या कोपऱ्यांत टेकाडासारखें वारूळ वाढलें आहे तें सुद्धा कुदळींचे दोन घाव घालून कोणी दूर केलें नाहीं. त्या गांवाची जी कळा तीच त्या देवळाची.

पण तिथें जाणाऱ्या माणसाला देवळाचें हें दारिद्र्य जाणवत नाहीं. त्याच्या उजव्या अंगाला पाटाचें पाणी चारी प्रहर खळाळत असतें. खालच्या भागाला दोन्ही हंगाम भातशेत झुलत असतें. मागच्या बाजूला एकच माड आहे ; पण तो देवीवर अखंड छत्रचामरें ढाळीत असतो. आणि देवळाच्या परिसरांतली ती आंब्या-फणसांची राई ! दक्षिणायन असो, उत्तरायण असो ; तिथें शोभेला वाण नाहीं. छायेला तोटा नाहीं. अन् शांतीची तर तिथें सदाच वस्ती !

दसरा, पाडवा अशा कोणत्या तरी सणावारीं सांतेरीची अमंत्रक पूजा होते. चैत्रांत 'म्हातण' म्हणजे गांवसमाराधना होते. त्या दिवशीं एकदाच तिला महानैवेद्य दिसतो, आणि पौष महिन्यांत काला होतो त्या रात्रींच फक्त तिच्यापुढें दिवेवात पाजळते. पण तरीहि ती ग्रामस्थांवर कोपत नाहीं. गांवावर काहीं अरिष्ट ओढवलें तर ती सगळ्या ग्रामस्थांचें, बाळगोपाळांचें गाऱ्हाणें ऐकते. गांवांत दुसरा देव नाहीं तेव्हां सगळे नवस तिच्याच वांट्याला येतात. तिला

नारळाची शेरणीहि चालते अन् कोंबडीचें पिलूंहि चालतें. सगळ्या जातींचे सर्व उपचार तिला मान्य आहेत. ती सर्वांवर राजी आहे.

शेजारच्या गांवचा एखादा माणूस माझ्या गोष्टीला मधेंच अडथळा करून म्हणेल, ' पुरे झालं तुझं हें सांतेरीचं पुराण. सांतेरी आहे कुठं तुझ्या देवळांत. तिथें आहे तो फक्त एक मातीचा लंबचौकोन कट्टा. प्राणावांचून शरीर नव्हे, तसें देवावांचून देऊळ नव्हे ! ' पण आम्हांला तसें वाटत नाहीं. आम्ही त्या कट्टयाला, त्या केवळ ' भूमिके 'लाच हात जोडतों. तिलाच सगळे उपचार समर्पितों. त्या निराकारांत आम्हांला सायुध, सशक्तिक देवी दिसते. आमच्या ग्रामदेवतेच्या बाबतींत आम्ही आकाराच्या पलीकडे गेलों आहों.

या देवळाला मूर्तीचा योगच नाहीं. मूर्तीचें अन् या वास्तूचें सात जन्मांचें वांकडें असें म्हटलें पाहिजे. पूर्वी कदिमकाळीं या चौथऱ्यावर मूर्ति विराजत होती याची साक्ष मागच्या फणसाखालचें तें देवीच्या आकाराचें तुटलेलें अन् मातींत लोळणारें अर्धांग पाहून पटते. कोणत्या तरी धर्मसंघर्षांत तिच्यावर घण बसला असावा. आणखीहि एक अशीच तुटकी फुटकी मूर्ति या गांवांत आहे. पण ती पहाण्यासाठीं शेताच्या पायथ्याला वहाणाऱ्या ओढ्याच्या कोंडांत बुडी मारली पाहिजे.

देवळांत मूर्ति नाहीं अशा स्थितींत तीन पिढ्या गांवांत उगवल्या आणि मावळल्या. प्रत्येक पिढीला मनापासून असें वाटत होतें कीं, ' आपल्या देवळांत मूर्ति बसवायला हवी. आपण नुसत्या चौथऱ्याची पूजा करतों ही लज्जास्पद गोष्ट आहे. ' पहिलीनें कल्पना केली, दुसरीनें विचार केला, तिसरीनें योजना आंखली ; पण प्रत्यक्ष कृति मात्र कोणींच केली नाहीं.

पण चौथ्या म्हणजे आमच्या पिढीनें पूर्वजांचें हें उणें फेडायचें ठरवलें. एका वर्षी पौषांतल्या काल्याला आलेल्या कांहीं परगांवच्या लोकांनीं चार-चौघांत ग्रामस्थांची लाज काढली. ' देवळांत नाहीं देव ; अन् काला कसला करतां डोंबलाचा— ' गांवांतल्या तरुणांना तें झोंबलें ; पण त्यांना झोंबून विशेषसा उपयोग नव्हता. तें लागायला हवें होतें तातोबांना. त्या वर्षी त्यांना तें लागलें आणि एकदम सगळीं चक्रें फिरलीं.

तातोबा म्हणजे गांवांतले बडे प्रस्थ. ते त्या गांवचे मोकासदार अन् पुन्हा मातबर. मुबलक शेतीवाडी अन् हत्तीच्या पायासारखें कुळागर. त्यांनीं

मनावर घेतल्यावर काय होणार नाहीं? गांवांतली दुसरी डोळयांत भरणारी व्यक्ति म्हणजे गंगाधर. तो पैसेवाला नव्हता; पण चळवळया होता. गांवकीचें एखादें काम तडीला न्यायचें असेल तर त्याला 'फुलें माळावीं' हें तंत्र तातोबांना ठाऊक होतें. या वेळींहि तातोबांनीं त्यालाच प्रथम बोलावून घेतलें अन् आपला मनोदय सांगितला. देवळांत मूर्तीची स्थापना होणार म्हणून तोहि फुलला.

दोन दिवसांत देवळापुढच्या अंगणांत गांवकीचा मेळा जमला. तातोबांनीं प्रस्ताव करून मूर्तिस्थापनेची आवश्यकता सर्वांना पटवली. ब्राह्मण, कुळवाडी, सुतार, लोहार, गावडे, वाणी सगळयांनीं त्यांच्या बोलण्याला माना तुकविल्या. मूर्ति अन् देवप्रतिष्ठा मिळून कमींत कमी सात-आठशें रुपये जमायला हवेत, हा अंदाज जेव्हां तातोबा बोलले तेव्हां मात्र सगळेच जरा कचरले. एवढी रक्कम त्यांच्या आवांक्याबाहेरची होती. तातोबा त्यांना म्हणाले.

"गांवकीचं काम आहे. जिच्या दयेवर गांव नांदतं त्या ग्रामदेवतेचं कार्य आहे. सर्वांनीं या वेळीं एकदाच आपली शक्ति पणाला लावली पाहिजे. गंगाधर, कागदपेन्सिल घे. घाल माझं नांव. माझा आंकडा पंचवीस रुपये—"

पण गंगाधर कांहीं कच्च्या गुरूचा चेला नव्हता. त्यानें नांव लिहिलें; पण आंकडा मात्र घातला नाहीं. तो म्हणाला.

"तुमचं नांव पहिलं; पण आंकडा मात्र शेवटीं. सर्वांच्या वर्गणीचा एकंदर आंकडा कळूं दे. त्यांत जें कमी पडेल तो आंकडा तुमचा."

"वारे वा! तूं मोठा वस्ताद दिसतोस. माझ्यावर कां रे बाबा एवढा भूर्दंड—"

"भूर्दंड नव्हे हा! हा तुम्हीं सांगितलेलाच न्याय आहे. ज्यानं त्यानं शक्तीप्रमाणें ओझं उचलायचं. आमची ताकद एक तर तुमची एकास शंभर. खरं कीं नाहीं मंडळी?"

"होय, होय! अगदीं खरं." सभेचा एकमुखी कौल पडला.

"बरं बुवा, तुमच्या मनासारखं होऊं दे." तातोबांनीं हसत हसत संमति दिली.

चार–आठ दिवसांत सुमारें पांचशें रुपये ग्रामस्थांकडून तातोबांच्या हातीं आले. तीनशें रुपये आपल्याला घालावे लागणार याची त्यांना जाणीव झाली. मूर्ति बनवण्याबद्दल त्यांनीं मुंबईला आपल्या एका मित्राशीं पत्रव्यवहार केला. नंतर ते स्वतः उठून मुंबईस गेले. परत येतांना त्यांच्याबरोबर एक लांकडी खोकें बोटींतून पडावांत उतरलें. तिथून बैलगाडीनें गांवांत आलें आणि तिथून पुढें तातोबांच्या माजघरांत येऊन सुरक्षित जागीं बसलें.

गांवांतल्या जोशीबुवांनीं स्थापनेचा मुहूर्त काढून दिला. गंगाधर कामाच्या गाड्याला जुंपला. देवळापुढचा मांडव उभारायला घरटी एकेक वाप्या त्यानें ओढून काढला. तातोबांच्या उपाध्यांनीं पंचक्रोशींतल्या शास्त्री-वैदिकांची यादी केली. तातोबांकडून त्यांना आमंत्रणें गेलीं. मांडवांत वाटोळीं, चौकोनी कुंडें घालण्यांत आलीं. कोणीं रानांत हिंडून समिधांचे भारे आणले. कोणीं फुलांचे हारे आणले. कोणीं साळी डाळी जमा केल्या. कोणीं नारळांचीं पोतीं आणून आदळलीं. कोणीं दूध जमवलें. कोणीं तूप संपादलें.

ब्राह्मणांनीं यज्ञसाहित्याची मांडावळ केली. पहिल्या दिवशीं अधिवासन आणि दुसऱ्या दिवशीं प्रतिष्ठा असा दोन दिवसांचा कार्यक्रम ठरला. यजमानकृत्य तातोबांकडे ओघानेंच आलें.

त्या लहानशा खेडेगांवांत आनंदाचें महोदय पर्व प्रगटलें. प्रत्येकाच्या तोंडीं तोच एक विषय. प्रत्येकाला त्यासंबंधींच कांहीं तरी काम. ग्रामस्थांनीं या उत्सवासाठीं माघारणी घरीं आणल्या. परगांवचे आसेष्ट पाचारले. प्रतिष्ठेचा पूर्व दिवस उगवला. पहिला प्रहर संपायच्या सुमाराला तातोबांच्या आंगणांत सनईचे मंजुळ स्वर हवेवर तरंगले. ताशा कडकडला. शेतांतून, कुळागरांतून, पाळंदींतून, तातोबांच्या घराकडे ग्रामस्थांची रीघ लागली.

पालखी सजून तयार झाली. तिचे नवे गोंडे झुलूं लागले. ती उचलण्या-साठीं वाहक नवा पोषाख घालून अक्षरशः कंबर बांधून उभे राहिले. तातोबांनीं गंगाधराच्या मदतीनें देवघरांत ठेवलेली देवीची मूर्ति बाहेर आणली. ब्राह्मणांनीं स्वस्तिवाचनाचे मंत्र म्हटले. वातावरण जितकें मंगल

तितकेंच गंभीर झालें. मूर्तीकडे लागलेले ग्रामस्थांचे नेत्र उल्हासानें तरळले. किती तरी वर्षांची त्यांची आकांक्षा पुरी होण्याचा दिवस आज उगवला होता.

शालींत गुंडाळलेली ; पण गौरमुख तेवढें दर्शनासाठीं उघडें ठेवलेली ती मूर्ति पालखींत ठेवली गेली. तिला सांभाळण्यासाठीं पालखीच्या दोन बाजूंना दोघे उभे राहिले. वाहकांनीं पालखी उचलली. लोकांनीं लगेच उदोकार गाजवला. तासेवाल्याला स्फुरण भरलें. सनई रंगांत आली. कांहीं लोक पालखीपुढें चालूं लागले. कांहीं मागें राहिले. सांतेरी मिरवत मिरवत वृक्षांच्या छायेंतून देवळाकडे निघाली.

मंडपाच्या महाद्वारावर सुवासिनींनीं तिच्यावरून लिंबलोण उतरलें. तिला लामणदिवा ओवाळला. सर्वांनीं कुंकवाची उधळण केली. धार्मिक विधीला अनुसरून मूर्ति एक रात्र जळांत ठेवायची होती. ब्राह्मणांनीं ती सर्व सिद्धता करून तातोबांना मूर्तीवरचें आवरण काढायला सांगितलें. तातोबांनीं कांपऱ्या हातांनीं शाल दूर केली. मूर्ति अनावृत झाली.

ती मूर्ति चर्तुभुज होती. तिच्या चारी हातांत आयुधें होतीं. तिचें नितळ, तुकतुकीत गोरें अंग, प्रमाणबद्ध अंगठसा, गोऱ्या रंगावर गोरीच साडीचोळी, तिच्या गोऱ्याच चुण्या, रेखीव मुखमुद्रा, मस्तकीं मुकुट, कानीं कुंडलें, गळ्यांतले माणिहार आणि स्नेहाळू कृपाळू दृष्टि, हें सगळें ग्रामस्थांना घणी पुरेतों पहायला मिळालें. रंजल्या-गांजल्यांनीं, दलित–पीडितांनीं पायांशीं बसून करुणा भाकावी इतकी दिव्य सात्त्विकता त्या मुखमंडळावर झळकत होती.

पण लोकांचा हा हर्ष दुसऱ्याच क्षणाला विरजला. 'हें काय, हें काय,' अशी त्या घोळक्यांत कुजबूज उठली. जो तो दुसऱ्याकडे प्रश्नांकित मुद्रेनें पाहूं लागला. तातोबांना तें समजलें. त्यांनीं वरून कांहीं दाखविलें नाहीं; पण त्यांच्या अंतरांत चलबिचल सुरू झाली. ते इकडे तिकडे पाहूं लागले. लोकांची दृष्टि टाळूं लागले. काय केलें होतें असें त्यांनीं ? कोणता अपराध घडला होता त्यांच्या हातून ? एकच घडला होता ; पण तो ठसठशीत होता. मूर्ति ज्या विटेवर उभी होती, तिच्या दर्शनी भागावर त्यांनीं आपलें नांव कोरलें होतें–

खोदीव भागांत रंग भरून सफाईदार केलेल्या त्या विटेवर साक्षर माणसांना दोन ओळी ठळकपणें वाचतां येत होत्या.

श्री. ग. देसाई
यांनीं अर्पण केली.

त्या ओळी पाहूनच ग्रामस्थ अस्वस्थ झाले होते. क्षणापूर्वी आनंदानें उन्मळलेल्या त्यांच्या मुद्रा एकदम सुरकुतल्या होत्या. त्यांना तें मुळींच आवडलें नव्हतें. तातोबांच्या विरुद्ध आवाज उठवायला ते धजत नव्हते; पण त्यांनीं हें अनुचित केलें असें मात्र सर्वांनाच वाटलें.

पण बाकीचे बोलले नाहींत तरी गंगाधर होताच तिथें. तो निःस्पृह होता, छातीचा घट्ट होता. तें नांव पाहून त्याचा एकदम कपाळशूळ उठला. तो तग्रवग्र होऊन तातोबांच्या पुढें उभा राहिला.

" तातोबा! हें काय केलंत तुम्ही? कोणाच्या परवानगीनें तुम्हीं मूर्तीच्या विटेवर नांव घातलंत? हा आमचा अपमान आहे. हा सगळ्या ग्रामस्थांचा अपमान आहे......"

तातोबा चांगलेच चरकले. त्यांना चटकन् उत्तर सुचलें नाहीं. गंगाधर पिशाचासारखा खाऊं का गिळूं, अशा आविर्भावांत त्यांच्यासमोर उभा होता. त्यांनीं त्याच्याकडून तोंड फिरवलें तर तो पुन्हां त्यांना सामोरा झाला.

" माझ्या प्रश्नाला तुम्हीं जाबसाल दिलाच पाहिजे." तो पुनश्च ठासून म्हणाला. पण एवढ्या वेळांत तातोबा बरेच सांवरले होते. त्यांनीं त्याला तितक्याच नेटानें उत्तर केलें.

" मूर्तीला निम्म्याहून अधिक ती रक्कम मीं दिली आहे. म्हणून मीं माझं नांव घातलं. या समारंभाला अधिक आगळा खर्च येईल तोहि मीच भरणार आहें. ज्याचं दान त्याला श्रेय!"

" नाहीं. हा तुमचा दावा चूक आहे. गांवांतल्या प्रत्येक घरानं आपापल्या ऐपतीप्रमाणें क्वचित् ऐपतीबाहेरहि वर्गणी दिली आहे. तुमच्या ऐपतीप्रमाणें तुम्हीं खर्च केलात. यांत कांहीं विशेष केलं नाहीं. ही मूर्ति गांवाची आहे. तिच्याखालीं कोणाहि व्यक्तीचं नांव असतां कामा नये. मोकासेदार झालांत म्हणून तुम्हांला गांवाच्या भावना विकत घेतां येणार नाहींत......"

भा·वा
७७२०२
310

# सांतेरीची मूर्ति

गंगाधराच्या बोलण्याला न्याय होता. पण त्याला दुजोरा द्यायला मात्र कोणीहि पुढें आलें नाहीं. सगळ्यांनींच मूग गिळले. त्या भरल्या मांडवांत गंगाधर एकटा पडला. तातोबांनीं मंडळींचा वकूब ओळखला. आपण जरा उंच बोललों तर आपलें सगळें पचून जाईल, हा अंदाज त्यांना ताबडतोब आला. ते गर्जून म्हणाले.

"जें झालें त्यांत आतां बदल व्हायचा नाहीं. मीं योग्य तेंच केलें आहे. यांत कोणाच्या मानापमानाचा संबंध येत नाहीं. काय विनोबा? काय रे गणपत?"

विनोबा अन् गणपत यांनीं मान डोलवली. कोणी पुढें बोललें नाहीं. गंगाधराला चडफडत स्वस्थ बसावें लागलें. विरोधाचें वादळ उठलें; म्हणतां म्हणतां शमून गेलें. सगळें कसें शांत गंगाजळ झालें. तातोबांनीं लगेच आपला अवतार सौम्य केला. थोड्या वेळानंतर त्यांनीं मांडवांत एक ठोसर नजर टाकली. सगळे लोक तिथें होते. पण गंगाधर मात्र दिसत नव्हता. तातोबांना वाटलें, बरें झालें. पीडा गेली!

सूर्यास्ताला त्या दिवसाचें कृत्य संपलें. मांडवांत दिवे लागले. ब्राह्मणांचा फराळ उरकला. आचारी–खटपट्यांनीं दुसऱ्या दिवसाच्या गांवजेवणाची बरीचशी पूर्वतयारी करून ठेवली. मांडवांत जिकडे तिकडे अंथरुणें पडलीं. 'सावधपणें झोपा' असें आपल्या हस्तकांना फर्मावून तातोबा घरीं गेले. थोडया वेळांत कांहीं दिवे विझले, कांहीं त्या मार्गाला लागले. त्या विशाल मंडपांत निद्रादेवीचें साम्राज्य पसरलें.

बाहेर अंधार; आंत निद्रा. त्यामुळें मध्यरात्र उलटल्यावर एकाएकीं मूर्तीला पाय फुटले हें कोणालाच कळलें नाहीं. गंगाधर आणि त्याचे दोन मित्र यांचीं पावलें त्या काळोखांत कुठेंच अडखळलीं नाहींत. ते पाट उतरून शेतांत गेले. थोडा वेळ सरळ बांधावरून चालले. पुढें उजव्या हाताला वळले. भाताच्या रोपांनीं त्यांच्या पायाला कव घालून विचारलें, 'काय बेत आहे तुमचा?'

पण गंगाधर या वेळीं कोणाला उत्तर देण्याच्या मनःस्थितींत नव्हता. तो योजलेलें आधीं पार पाडणार होता अन् मग सगळ्यांना जाहीर उत्तर देणार

होता. सकाळपासून त्याच्या काळजाची जळजळ चालली होती. त्यानें तहान मारली होती. भूक मारली होती. अन् क्रोधाचा अंगार तेवढा फुलवला होता. बऱ्याच भवति न भवतीनंतर त्याला एक युक्ति सुचली होती. त्या युक्तीनें तो तातोबाचींच बोटें त्याच्याच डोळ्यांत घालणार होता. पांडू अन् येश्या या दोघां मित्रांना मग त्यानें मथवलें होतें अन् ते तिघे आतां शेताच्या मुळ-सांतल्या काजऱ्याच्या झाडाखालीं आले होते. रिकामे नव्हे ; तर सातेरीची मूर्ति उचलून घेऊन.

त्यांनीं ती मूर्ति काजऱ्याच्या पाचोळ्यावर उताणी अलगद ठेवली. येश्यानें चार काटक्या-कुटक्या गोळा करून जाळ पेटविला. गंगाधरानें डोक्याच्या पंचांत खोचून आणलेला खिळा बाहेर काढला. पांडूनें जवळचाच एक वाटोळा दगड उचलून त्याच्या हातीं दिला. गंगाधरानें तातोबांच्या नांवाचें पहिलें अक्षर ' श्री ' होतें त्यावर खिळ्याचें रुंद, धारदार टोंक ठेवलें. त्याच्या डोक्यावर पहिला दगड बसला. रंगाचा थोडासा टवका उडाला. ' श्री ' विद्रूप झाली. श्रीच्या मागून ' ग 'च्या पोटांत भोंक पडलें. त्याचीहि थोड्याच वेळांत ' गच्छंती ' झाली. ती नितळ वीट तेवढ्या भागांत खडबडीत झाली. आतां फक्त ' देसाई ' हीं तीन सलग अक्षरें उरलीं होतीं. तीं उडालीं कीं मूर्ति शुद्ध होणार होती. सगळ्या गांवाची होणार होती. वीट खडबडीत झाली तरी मूर्तीला धक्का लागणार नव्हता. ती मूर्ति शुद्ध होऊन परत जाग्यावर जाणार होती. त्याच कुंडांत अन् त्याच जळांत. सकाळीं उठल्यावर लोकांना मूर्ति दिसणार होती ; पण तिच्या खालचें तें गर्विष्ठ नांव तेवढें दिसणार नव्हतें. लोक आश्चर्यानें तोंडांत बोटें घालणार होते. ' ही काय भूतचेष्टा ! कसें झालें हें ? कोणीं केलें हें ? अघटित ! '

पण गंगाधराचा उत्साह चढायला अन् पेटवलेल्या सर्पणाची ज्वाळा विझायला एकच गांठ पडली. त्याच्या हातांतला खिळा भलत्याच ठिकाणीं टेकला गेला. दगडाचा ठोकाहि भलत्याच वजनानें पडला. आणि त्यासरसा मूर्तीचा डावा पाय पोटरीपर्यंत दुभंगला. योजलें होतें एक अन् झालें भलतेंच !

पांडू अन् येश्या त्या अंधारांत थरथरूं लागले. गंगाधराच्या तोंडचेंहि पाणी पळालें. दंव पडत होतें, थंडी अंगाला झोंबत होती. तरी त्याला घाम

फुटला. विटेवरचे आघात आतां त्याच्या छातींत दणाणूं लागले. तें नांव नाहींसें करून तो फक्त तातोबांचेंच शत्रुत्व पत्करणार होता. पण जें घडलें त्यामुळें आतां तो सगळ्या गांवाचा वैरी ठरला होता. तो समोर दिसता तर गांवानें त्याला उभें सोललें असतें. महा कठीण प्रसंग होता तो !

प्रथम त्याचे मित्र त्याच्यावर उलटले. ' तुझ्याबरोबर आतां आमचीहि वाट लावणार आहेस तूं!' ते त्याला म्हणाले. गंगाधरानें त्यांना सांगितलें, ' नाहीं. मला तापल्या तव्यावर बसवलं तरी तुमचीं नांवं माझ्या तोंडून बाहेर पडणार नाहींत. जें झालं त्याचे सगळे परिणाम मी एकटा भोगीन. तुम्ही निर्धास्तपणें निघून जा !'

ते दोघे त्याला त्या काळरात्रीच्या तोंडीं देऊन तिथून पसार झाले. गंगाधरानें मूर्तीचीं तीं दोन शकलें एकत्र जुळवून धरलीं अन् तो तसाच कांहीं वेळ शून्य मनानें बसून राहिला. पण जें तुटलें, फुटलें तें परत सांधणार होतें थोडेंच ! त्या मूर्तीबरोबर त्याचें जीवनहि छिन्न भिन्न झालें होतें.

गंगाधर बसला होता तिथून दहा पावलांवर ओढा होता. त्याचा प्रवाह सुकला होता ; पण मधल्या कोंडांत अजून पाणी होतें. गंगाधरानें ती द्विखंड मूर्ति दोन्ही हातांनीं उचलली आणि कोंडांत टाकून दिली. धबक्‌दिशीं एक आवाज उठला अन् विरला. गंगाधर तो ओढा उतरून पलीकडे गेला अन् त्या अंधाराच्या सागरांत गडप झाला. तो गांवाला अंतरला आणि गांव त्याला अंतरलें. आतां त्याला कोण आपंगिता भेटणार होता तें एक सांतेरीच जाणे !

# परशा पेन्शनर : : ६ :

गेले दोन महिने भाऊसाहेब ती गोष्ट करूं म्हणत होते. त्यांच्या घरचा परशा आचारी ज्या दिवशीं दम्यानें धापावत आणि गळयाची तंबोरी वाजवीत आपला हाडकुळा देह घेऊन त्यांच्या पानाशीं वाढायला आला त्याच दिवशीं त्यांनीं तें मनाशीं ठरवलं होतं. तो आतां साठीच्या घरांत आला आणि कामाला कष्टावूं लागला हें त्यांना पुरतेपणें कळलं होतं. ते त्याला त्याच दिवशीं सांगणार होते ; पण त्यांचे एक नातेवाईक नागपुराहून सह-कुटुंब त्यांच्याकडे रहायला आले आणि भाऊसाहेबांना तो विचार बाजूला ठेवावा लागला. नंतर ते स्वतः आठ दिवसांसाठीं गांवाला गेले म्हणून तो उरला. आणि येतांना त्यांची मुलगी अन् नातवंडं त्यांच्याबरोबरच आल्यानें तीं जाईपर्यंत परशाची अत्यंत गरज होती म्हणून तो रहित करावा लागला.

पण आज सकाळीं परशा जेव्हां चहाचा सरंजाम घेऊन टेबलाजवळ आला तेव्हां भाऊसाहेबांच्या लक्षांत आलें कीं, आजहि त्याला दम्याची जोरगत आली आहे. त्यांना वाटलं कीं, आतां हें अधून मधून असंच चालणार. यापुढें याच्या हातून काम रेटणं अशक्य. त्यांनीं त्याच्याकडे एकवार रोखून पाहिलं आणि तो जेव्हां चहा टेबलावर ठेवून परत जायला निघाला तेव्हां त्याला हांक मारली.

"परशुरामभाऊ!"

परशाचीं जातीं पावलीं एकदम थबकलीं. त्याला वाटलं कीं, काहीं तरी बिघडलं. त्याशिवाय परशाचा 'परशुरामभाऊ' व्हायचा नाहीं. भाऊसाहेब रागं भरायचे म्हणजे या संबोधनापासून त्याची सुरुवात व्हायची, हा त्याचा अनुभव होता. पुढची सगळी झाडपट्टी मग उघड्या शेलक्या शब्दांत. त्यामुळें आतांहि तसंच काहीं तरी असावं असं वाटून आलिया भोगाला सादर होण्यासाठीं त्यानं तोंड वळवलं अन् तो उंबऱ्यांतच उभा राहिला.

" पुढें या असे. " भाऊसाहेबांनीं शंकराच्या गाभाऱ्यांतून यावा तसा गंभीर घुमता आवाज काढला.

परशाचं दमेकरी काळीज धसकलं. बुडत्याला काडीचा आधार तसा त्यानं खांद्यावरच्या कळकट सोधऱ्याला हात घातला आणि दोन्ही हातांनीं त्याचा बोळा करीत तो भाऊसाहेबांच्या पुढें गेला.

" तब्येत बरोबर नाहीं वाटतं आज– "

भाऊसाहेबांच्या या प्रश्नानं परशाचा जीव एकदम खालीं पडला. त्याला वाटलं, नुसती तब्येतीची चौकशी करायला एवढा कशाला आवाज घुमवायला हवा होता ! आमचे साहेब म्हणजे अगदीं ' हेच ' आहेत. दुसऱ्याला उगीच घाबरवतील. तो या विचारांत घुटमळत राहिल्यामुळें चटकन् उत्तर देऊं शकला नाहीं. त्यामुळें भाऊसाहेबांना तोच प्रश्न पुन्हां उच्चारावा लागला.

" अलीकडे असंच होतं साहेब. जरा हवा बिघडली कीं—"

" विड्या किती ओढतोस दिवसांतून ? "

" मीऽऽ ! "

" तूं, तर कोण मी ? चाळीस, पन्नास..."

परशाला वाटलं कीं, याच्या पुढचा प्रश्न नक्की चिरुटाचा येणार. त्यांच्या खोक्यांतला एक चिरूट दोन दिवसांपूर्वींच त्यानं सगळ्यांचा डोळा चुकवून उचलला होता आणि आपण कोण्या लुंग्यासुंग्याकडचे आचारी नसून इनामदारांच्या घरचे आहोंत, या ऐटीनें तो इतर बल्लवमित्रांच्या मेळाव्यांत फुंकला होता. त्याचा मधुगंधी धूर पसरवून त्यानं त्यांना धुंद करून टाकलं होतं. त्या प्रश्नाला आतां कसं तोंड द्यावं याची चुळबुळ त्याच्या मनांत चालू झाली. तोंच भाऊसाहेब त्याला म्हणाले.

" दम्याला विडी फार वाईट. चार दिवस जगायचं असलं तर आजपासून विडी सोडून दे. कळलं ? मींसुद्धा चिरूट सोडलाय अलीकडे. तुझं वय काय ? "

" असेल पन्नास–साठ. मला नक्की ठाऊक नाहीं. "

" आमच्या घरीं आल्याला किती वर्षं झालीं तें तरी ठाऊक आहे का ?"

" चहा निवून जाईल साहेब."

परशाला वाटलं कीं, हे बोलत रहातील अन् चहा गारढोण झाला कीं मग आपल्यालाच चमकवतील, 'परश्या ! अरे हा चहा कीं कोल्ड्रिंक ?' मग बाईसाहेब त्यांना साथ करतील, 'अलीकडे अस्सं करतो तो. कसं तरी करून एकदा पुढं आदळायचं अन् पसार व्हायचं.' साहेबांचं बोलणं परवडलं. धो धो पाऊस पडेल अन् एकदम ओसरेल. बाईसाहेबांचं तसं नाहीं. एकदा कसलं तरी सूत्र मिळालं कीं मग दिवसभर पिरपिर. हें सगळं लक्षांत आणून त्यानं भाऊसाहेबांच्या प्रश्नाला बगल देऊन चहाची सूचना केली होती.

भाऊसाहेबांनीं लगेच ट्रे पुढं ओढला. बाईसाहेबांनीं कपांत साखर घातली. भाऊसाहेबांनीं कपांत चहाची धार ओतली. लगेच बाईसाहेबांनीं फुंकरानं साय बाजूला करून भांड्यांतल्या दुधानं चहाला गुलाबी रंग चढवला. पहिला घोट घेऊन पावाचा तुकडा उचलतां उचलतां भाऊसाहेबांनीं परशाला पुन्हां तोच प्रश्न विचारला.

" तुला किती वर्षं झालीं आमच्याकडे आल्याला ?"

" मला माहीत नाहीं साहेब. झालीं असतील वीस-पंचवीस वर्षं."

" त्याला काय अर्धवटाला विचारतां ? मी सांगतें. तो आला अन् एका वर्षानं आपला अप्पासाहेब जन्मला." बाईसाहेब म्हणाल्या.

" म्हणजे बत्तीस वर्षं पुरीं झालीं कीं."

" होय साहेब !"

" या बत्तीस वर्षांत आमचं घर सोडून जावं असं कितीदा वाटलं तुला ? खरं सांग हं."

" एकदाहि नाहीं साहेब. कां कोण जाणे ! पण माझी या घरावर मायाच जडली." परशा आमरुखं हंसत म्हणाला.

" म्हणजे देहानं अन् मनानं सुद्धा तूं बत्तीस वर्षं आमच्या घरीं राहिलास, खरं ना ?"

" राहिलों साहेब."

" आतां तुझ्या हातून पूर्वीसारखं काम होत नसेल."

" नाहीं. आतां जरा जास्ती कमी काम पडलं कीं—नाहीं म्हणजे तसं कांहीं नाहीं. काम न व्हायला काय झालं ? "

परशानं एकदम कोलांटी उडी मारली ती बाईसाहेबांच्या डोळ्यांकडे बघून. तो प्रथम खरं सांगायला निघाला होता; पण मग त्याला वाटलं कीं, कदाचित् आपल्याला काढून टाकलं तर! तो मनांत म्हणाला, 'या श्रीमंतांच्या प्रश्नांचा रोखच कळत नाहीं आपल्याला इतकीं वर्षं राहून.'

" एखादा नवा स्वैंपाकी पहा आतां आमच्यासाठीं. तुझ्या अड्डयावर जमत असतील बरेच आचारी. काय ? "

परशाची वाचाच बंद झाली तें ऐकून.

" घाबरूं नका परशुरामभाऊ! बत्तीस वर्षं नोकरी झाली तुमची. आतां तुम्हांला पेन्शन दिलं पाहिजे. आतां तुम्ही पेन्शनर झालांत, समजलं ? यापुढें दोन वेळ आमच्या पंक्तीला जेवायचं, दोन वेळ चहा घ्यायचा अन् आराम करायचा. ज्ञानेश्वरी वाचीत बसा आतां. अन् ती समजत नसेल तर नुसतंच हरि हरि म्हणत बाहेरच्या खोलींत पडून रहा. नुसतं घर राखलंत तिथून तरी पुष्कळ आहे. हातखर्चासाठीं म्हणून दरमहा पांच रुपये मी तुला देईन. काय, समजलं ? "

परशा घरांत गेला. जातांना चहाचा सरंजाम उचलून घेऊन गेला. तो कट्ट्यावर ठेवतांना त्याचे कांपणारे हात वेंबळ गेले आणि मोठा आवाज झाला. कांहीं फुटलं बिटलं नाहीं म्हणून बरं! परशाचं मन या वेळीं ठिकाणावर नव्हतं. असलं कांहीं लोकविपरीत ऐकायला मिळेल अशी त्याची कल्पनाहि नव्हती. आचाऱ्याला आणि पेन्शन! आचारी आणि विश्रांति! छेः! हें ऐकिलें ना देखिलें! त्यानें मरेपर्यंत चुलखंडांत जळायचं अन् मेल्यावर स्मशानांत जळायचं. जराजर्जर देह आडवा टाकायला हक्काचा आसरा असला तर ठीक; नपेक्षां त्याचे हाल कुत्रासुद्धा खायचा नाहीं. दुसऱ्याच्या घरीं जन्मभर राबलेले, बेछूटपणें वागलेले, हातून काम होईनासं झाल्यावर हाकलून दिले गेलेले आणि ना बायको ना पोर, अशा निरालंब अवस्थेंत खितपत पडून

'देवा, सोडव एकदा' अशी काळाची आठवणी करणारे कित्येक 'ब्राह्मण' त्याला ठाऊक होते.

तोच एक असा हरीचा लाल निपजला होता कीं, त्याला यापुढच्या आयुष्यांत आराम मिळणार होता. दोन वेळां पोळपाट-लाटण्याला हात न लावतां पंक्तीला जेवायला मिळणार होतं आणि विडी-काडीसाठीं वर पांच रुपये दक्षिणा! त्याला प्रथम वाटलं कीं, भाऊसाहेब आपली थट्टाच करताहेत. त्यांना तशी संवय होती. ते परशाला अनेकदा 'खंडेराव' करून चढवीत अन् मग खो खो हसत.

पण आजचा त्यांचा स्वर थट्टेचा नव्हता. ते गंभीरपणें बोलले होते. त्या शब्दांत अस्पष्ट अशी कृतज्ञतेचीहि झांक होती. तरीहि परशा अजून जरा साशंकच होता. गाडीला जोडलेल्या गाढवाच्या नाकापुढें एका वितीच्या अंतरावर गाजर बांधलं होतं आणि त्याच्या आशेनं तें भराभर मार्ग क्रमीत होतं आणि गाडी ओढली जात होती, अशी एक गोष्ट त्यानं ऐकली होती. तसलंच हें मधाचं बोट तर नसेल ना, अशी अजून त्याला धुकधुक होती. पण त्यानंतर चारच दिवसांनीं नवा आचारी बंगल्यावर दाखल झालेला जेव्हां त्यानं पाहिला, तेव्हां त्याची उरली सुरली आशंकाहि दूर झाली. त्याला वाटलं कीं दुनियेंत असा एकच धनी पैदा झाला असेल कीं, जो जन्मभर राबलेल्या आचाऱ्याला पेन्शन देऊन घरीं ठेवून घेतो.

"परशरामभाऊ! हे नवे महाराज आले आहेत तुमच्या जागीं. त्यांना स्वैंपाकघराचा चार्ज द्या!"

परशानं त्या शेलाट्या काळ्या व्यक्तीकडे कांहींशा हेवेखोर दृष्टीनंच पाहिलं. हा उपटसुंभ आपलं राज्य घ्यायला आला असंच त्याला वाटलं. भाऊसाहेबांच्या हुकमाप्रमाणें तो त्या नव्या बल्लवाला-वेंकोबाला घेऊन स्वैंपाकघरांत गेला.

"ही विजेची चूल. या एका चुलींत तीन शेगड्या आहेत. हें वरचं तिचं बटन. शेगडी लहान मोठी करण्याची ही चावी. हा कट्टा. इथें उभ्यानंच भाकऱ्या-पोळ्या करायच्या. शेगडीवरचे पदार्थ इथें उतरायचे. खालीं ठेवायचे नाहींत. त्यांत पायांची धूळ उडते. कळलं? कट्ट्याच्या पोटांतले हे दोन खण. यांत सगळीं स्वैंपाकाचीं भांडीं आहेत. लोणचीं अन् वेगवेगळे पाक यांच्या चरण्या या फडताळांत आहेत. दूध-दुभत्याचं कपाट हें..."

परशा मालकाच्या अभिनिवेशानं सगळं सांगत होता अन् वेंकोबा घुमेपणानं तें ऐकत होता. परशानं 'कळलं' म्हटलं कीं तो 'हूं ऽऽ' असं किंचित् गुमींतच उत्तर करी. स्वयंपाकघरांतला सगळा तपशील त्याला ऐकवून परशा पदभ्रष्ट अधिकाऱ्याच्या मनःस्थितींत बाहेर आला. पडवीच्या एका अंगाला असलेल्या आपल्या खोलींत जाऊन तो तिथल्या भव्य पण जुनाट अशा लांकडी पेटीवर बसला. आपला हताशपणा घालवण्यासाठीं त्यानं एक विडी शिलगावली. पेन्शनरचा आयुष्यक्रम अजून सुरू व्हायचा होता आणि चालू घडीला त्याचं मुदपाकखान्यावरचं राज्य मात्र नष्ट झालं होतं. त्या एवढ्या मोठ्या घरांत निःसंकोच वावरण्याची, तिथल्या वस्तू स्वतःच्या इच्छेप्रमाणें हाताळण्याची त्याची तीच एकमात्र जागा होती आणि म्हणूनच तो तिथून बाहेर पडतांना हिंपुटी झाला होता. त्याची विडी मुळाशीं येऊन चरचरूं लागली, एवढ्यांत त्याला बाईसाहेबांचा आवाज स्वैंपाकघरांतून ऐकूं आला. त्या वेंकोबाला सांगत होत्या.

"सगळं नीटपणें कर. उधळमाधळ करूं नको. आमच्या परशाची दीक्षा घे. त्यानं कधीं ओंगळपणा केला नाहीं अन् सांडलवंडहि केली नाहीं..."

परशाला ते शब्द म्हणजे मोत्यांचे झेले वाटले. बाईसाहेबांच्या तोंडून ते निघाले असल्यामुळें त्यांची मातब्बरी विशेष होती. नकळत त्याचा ऊर भरून आला. आजवरची आपली सेवा फुकट गेली नाहीं या समाधानांतच मग त्यानं आपलं स्नानबीन उरकलं.

पुन्हां खोलींत येऊन विडीला हात घालतो, तों त्याला घरांतून आवाज ऐकूं आला. तो मनांत म्हणाला. 'फोडलंन् वाटतं लेकानं कांहीं तरी.' घरांतल्या त्या भांड्यांवर त्याचा जीव होता. मग तो सहज बाहेर आला. पुन्हा आंत गेला. खिडकींतून त्याला दिसलं कीं बंगल्याच्या कुंपणांत दोन-चार कण्हेरींचीं फुलं फुललीं आहेत. त्यानं तीं तोडून आणून पूजेच्या तबकांत ठेवलीं. सहज म्हणून एकदा स्वैंपाकघरांत नजर टाकली. तितक्याच सहजपणें तो दिवाणखान्यांतहि एकदा डोकावला. भाऊसाहेबांनीं चष्म्यांतून नजर रोखून त्याला विचारलं. 'काय रे? काय हवंय?' 'कांहीं नको' म्हणून तो तिथून पसार झाला. पुन्हां विडीला हात जातांच त्यानं तो विंचू डसल्यागत मागें घेतला. 'परशा! चार दिवस जगायचं असलं तर

विडी सोडून दे ' हे भाऊसाहेबांचे शब्द त्याच्या कानांत घुमले. त्याला आपल्या मधून मधून उपटणाऱ्या दम्याची आठवण झाली. तो म्हणाला. ' पण खरंच का जगायचं आहे आपल्याला ? आहे तर ! आपण कांहीं तसे अजून म्हातारे झालों नाहीं. जगांतली मजा अजून कळते आपल्याला... '

आणि त्याचं मन तिथून निघालं. लकडीपूल ओलांडून गांवांत आलं. एका मोठ्या रस्त्याला लागलं. तिथून एका बोळांत वळलं. एका बेलाचं झाड असलेल्या घरापुढं थबकलं आणि मग आंत शिरून त्या जुनाट वाड्यांतल्या एका अंधाऱ्या खोलींत शिरलं. आगोठीच्या रात्रीं एखाद्या झुडपावर एकदम शेंशंभर काजवे चमकावे तशा त्याच्या अंतरांत किती तरी प्रणयस्मृती चमकून उठल्या. गेल्या बत्तीस वर्षांचा गतकाल त्याच्यापुढून सरकून गेला. बेलाचं झाड असलेल्या वाड्यांतली ती खोली हें त्याच्या सुखाचं, प्रेमाचं आणि विश्रांतीचं स्थान होतं. तो कधीं फिरायला जाण्याच्या तर कधीं नाटक-सिनेमाच्या निमित्तानं अधून मधून त्या खोलीला पाय लावीत होता. शक्य तों रिक्त हस्तानंहि नव्हे. ती खोली हाच त्याच्या एकाकी जीवनांतला लागा-बांधा होता. सुमारें पंधरा वर्षांपूर्वी म्हणजे वयाच्या प्रौढ अवस्थेंतच तो निर्माण झाल्यामुळें आसक्ति जडूनहि त्यांत उच्छृंखलपणा नव्हता. परशा रिकामपणाच्या वेळांत त्याच खोलीचं चिंतन करी. त्यामुळें आजहि त्याला वाटलं कीं, आपण पेन्शनर झाल्याची वार्ता आजच्या आज तिकडे पोंचवली पाहिजे.

एवढ्यांत वेंकोबानं स्वैंपाक तयार असल्याची वर्दी दिली. परशानं घाई-घाईनं जाऊन पाटपाणी केलं. भाऊसाहेब एका दारानं अन् बाईसाहेब दुसऱ्या दारानं जेवणघरांत आलीं. आपण त्या दिवशीं काय बोललों याचं भाऊ-साहेबांना चांगलं स्मरण होतं. ते परशाला म्हणाले.

" परशरामभाऊ, तुमचं पान आमच्या शेजारीं येऊं द्या ! "

तें ऐकून बाईसाहेबांच्या कपाळाला आठ्या पडल्या. त्यांनीं भाऊसाहेबांकडे रोखून पहात म्हटलं.

" हा काय पोरकटपणा ! शोभेल तेंच करावं माणसानं. "

" म्हणजे परशा माझ्या शेजारीं शोभणार नाहीं का मी त्याच्या शेजारीं शोभणार नाहीं ? "

" मला नाहीं माहीत. कोणीं पाहिलं तर चांगली शोभा करतील तुमची. परशा घरांत बसला तर त्याला घास गिळायचा नाहीं का ? इतकीं वर्षं पोटभर गिळलाच ना या घरांत ?— "

" होय, गिळला. पण आज तो माझ्या पंक्तीला बसला तर तुझं काय बिघडेल ! "

" सांगतें. गजाची नि गाढवाची सर होत नाहीं. त्याला म्हणतात स्वैंपाकी अन् तुम्हांला म्हणतात इनामदार ! "

" चुकतां तुम्ही. तो आतां स्वैंपाकी नाहीं. आमच्याहि इनामाचं काय झालं आहे तें तुम्हांला ठाऊक आहेच. आतां दोघांची जात एक. पेन्शनर ! "

" तुमच्याशीं कोणी बोलावं ! ये बाबा...चुकलें. याहो परशरामभाऊ. ह्यांच्या ताटाला ताट नि पाटाला पाट लावून बसा. तुमचीं फितं चढलीं आहेत आज. "

त्यावर परशानं हळूच दाराआडून उत्तर केलं, " नको बाईसाहेब. मी आपला आंतच बसतों. " पण आतां बाईसाहेब हट्टाला पेटल्या. त्यांनीं स्वहस्तें त्याचं ताट बाहेर आणून भाऊसाहेबांच्या शेजारीं मांडलं. त्या एवढ्या रागावल्या त्या भाऊसाहेबांच्या प्रतिष्ठेसाठीं. आपल्या नवऱ्याची मनोवृत्ति त्यांना जाणून घेतां आली नाहीं.

भाऊसाहेब आज स्वतःच्याच घरांत समता प्रस्थापित करायला निघाले होते. बत्तीस वर्षं ज्यानं आंग मोडून आपणाकडे राबणूक केली, चुकला माकला, पण ज्यानं चुकारपणा कधीं केला नाहीं, कोणीं अपराध असतांना बोललं किंवा नसतांनाहि बोललं तरी ज्यानं उलट उत्तर केलं नाहीं, अशा एका आश्रिताला सेवानिवृत्त करून आपल्या शेजारीं बसवण्याचा एक सात्त्विक आनंद आज ते उपभोगणार होते. बाईसाहेबांनीं निष्कारण त्रागा केला नसता, तर तो त्यांना मिळालाहि असता. पण झालेल्या आदळ आपटीमुळें त्याची विरी गेली. अप्रसन्न मनानेंच त्यांनीं ताटाभोंवतीं पाणी फिरवलं.

परशाला तरी त्यांत सुख कुठें होतं ! तो पंक्तीला बसला ; पण किती अंग चोरून ! जणूं त्याच्या पाटाला कोणी खिळेच ठोकून ठेवले होते. भाऊसाहेबांचं स्वच्छ, तलम धोतर अन् आपलं जाड, मलिन अंगवस्त्र–त्यांचा तो राजबिंडा भरीव देह अन् आपली शुष्ककाष्ठासारखी निबर, नीरस काया–यांतला फरक त्याला तीव्रतेनं जाणवला. 'छे ! भाऊसाहेबांच्या शेजारीं आपण म्हणजे चंदनाशेजारीं बाभूळ.' त्या भोजनांत परशाचं पोट भरलं नाहीं. तो आपला हात ओला करून उठला इतकंच.

संध्याकाळीं पांच वाजतां कोट चढवून नि काळी टोपी डोक्यावर तिरकी ठेवून जेव्हां तो बाहेर जायला निघाला, तेव्हां बाईसाहेबांनीं त्याला सुनावलं.

"आतां तुला दाही दिशा मोकळ्या झाल्या. बाहेर जातोस ; पण लवकर ये घरीं. सात वाजायच्या आंत."

तो मनांत म्हणाला, 'मी कशाला उशीर करीन ! मला फक्त एकाच ठिकाणीं जाऊन यायचं आहे.' आणि तो सरळ लकडीपूल ओलांडून मोठ्या रस्त्यानं पुढे गेला आणि मग त्या ठराविक बोळांत शिरला. तो आल्याचं समजतांच बेलाचं झाड असलेल्या वाड्यांतल्या अंधाऱ्या खोलीचं दार उघडलं. वळकटीला टेकून बसल्यावर त्यानं अंगणाच्या बाजूची खिडकी डाव्या हातानं लावून टाकली. त्यानंतर थोड्याच वेळांत फळीवरचा स्टोव्ह खालीं आला. आधण चढलं. कपबश्या खालीं निघाल्या. स्टोव्हची भरभरहि थांबली...

मग त्यानं आपण आजपासून पेन्शनर झाल्याचं त्या खोलीला सांगितलं. आतां आपल्याला विशेषसं काम नाहीं ; तेव्हां दुपारचा बराचसा वेळ इथें घालवतां येईल असंहि म्हटलं. पण त्या खोलीच्या चर्येवर त्याच्या सांगण्याची प्रतिक्रिया झाली ती नेमकी उलटी. तो गेला आनंदाची वार्ता सांगायला ; पण तीच तिथें खेदाची ठरली.

"तुम्हांला पेन्शन मिळालं ; पण माझी काय वाट ! मला कोण देणार पेन्शन ? मीं तरी तुमच्या सारखीच राबतें अन् एक वेळच खातें." ती खोली म्हणाली.

आणि मग जें थोडं-बहुत संभाषण झालं त्यावरून परशाला कळलं कीं या पेन्शनांत एक बाजू मोठीच गैरसोईची आहे. दरमहा पंधरा-वीस रुपये

त्याच्या खिशांतून त्या खोलींत येत. तेवढ्यावर त्याचं तिथें आगत–स्वागत होई. पण आतां भाऊसाहेब त्याला महिन्याचे अवघे पांच रुपये देणार होते अन् ते त्याच्या विडी-काडीलाच जेमतेम पुरणार होते. मग कुठल्या तोंडानं तो त्या खोलीकडे जाणार होता ! त्याला तिथें चहा-पाणी कोणत्या आधारावर मिळणार होतं ! ‘ छे ! ही एक आपत्तिच आली म्हणायची... ’

परत घरीं येतांना अन् पुढें रात्रभर तो याच गोष्टीचा विचार करीत राहिला. त्याला आराम हवा होता, आयतं अन्न हवं होतं. पण त्याचबरोबर विशिष्ट खोलीकडे जाणारा रस्ताहि मोकळा हवा होता. तें ठिकाण भंगलं तर आपल्या उपेक्षित, परावलंबी जीवनांतलं सारंच संपलं, असं त्याला वाटलं. तें होऊं द्यायचं नाहीं असा त्यानं निर्धार केला. त्यासाठीं शारीरिक कष्ट सोसण्याचीहि त्यानं तयारी केली. दुसऱ्या दिवशीं चहाच्या वेळीं त्यानं चाचरत, अडखळत भाऊसाहेबांना म्हटलं.

“ हा नवा ब्राह्मण मला काहीं ठीक दिसत नाहीं. त्याला ‘ नको ’ म्हणून सांगा. मीच करतों सगळं. मी अजून तसा काहीं डबघाईला— ”

“ कां रे बुवा ? स्वस्थ बसून नाहीं खाववत ? तुला दर अवसे–पुनवेला आतांशा दमा चाळवतो. जा, पुरे झालं शहाणपण. ” भाऊसाहेबांनीं त्याला पुढें बोलूं न देतां वाटेस लावलं.

परशाच्या उथळ वाटोळ्या डोळ्यांत नाखुषी तरळली. आपलं स्नान, कपडे धुणं वगैरे आटपून तो आपल्या खोलींत जाऊन अस्वस्थसा पडला. पण त्याला पडूनहि रहावेना. उठून त्यानं खिशांतला विड्यांचा जुडगा खालीं काढला. एक, दोन, तीन, एकामागोमाग दुसरी अशा कितीतरी विड्या ओढल्या. काळ्या पडलेल्या ओठांतून तो धुराचे लोट सोडीतच राहिला. एका तासांत त्याच्या शेजारीं थोटकं अन् जळक्या काड्या यांचा खच पडला.

त्याला आज कशाच प्रकारें चैन पडेना. पाण्याबाहेर फेकलेल्या माशासारखी त्याला तळमळ लागली. गेलीं बत्तीस वर्षं स्वैंपाकघर हेंच त्याचं आराम-विरामाचं स्थान झालं होतं. त्या चुली, तीं भांडीं, ती पितळी डब्यांची फौज, ती कांद्या-कोथिंबिरीच्या वासाची विळी, तो पाटावरवंटा, ते चिमटे, ते झारे, यांच्याशीं त्याच्या जिवाचे धागे गुरफटले होते. हा सगळा पसारा भोंवतीं

असल्यावांचून त्याला आपलं अस्तित्वच जाणवत नव्हतं. तो खोबरं खवायला बसला कीं पांच बोटांची बुचुकली नकळत त्याच्या तोंडांत जायची. बेदाण्याची, बदामांची बरणी खालीं आली कीं एक बकाणा सहज मारला जायचा. दूध विरजतांना त्यावरच्या जाड साईचा एखादा तुकडा हळूच जिभेवर पडायचा. हात अन् तोंड हीं दोन्ही एकाच वेळीं चालू रहायचीं. बाईसाहेब तेवढ्यांत स्वैंपाकघरांत आल्या कीं तोंड बंद अन् वाचा मुकी. जिभेवर घोळणारं घशाखालीं ढकलून दिल्यावर मगच शहाजोगपणें त्यांच्या प्रश्नाला उत्तरं द्यायचीं.

पण आज या सगळ्याला तो मुकला होता. खेळांत बाद झालेल्या गड्याप्रमाणें त्याला बाजूला बसावं लागलं होतं. स्वैंपाकघरांतून भांड्याकुंड्यांचे आवाज येत होते; ते जणुं त्याला आवाहन करीत होते. त्याचे हात आणि जीभ दोन्ही चुळबुळ करूं लागलीं. कसाबसा त्यानं तासभर दम धरला आणि मग मात्र त्याला बसवेना. वेंकोबाला—त्या नव्या आचाऱ्याला—चटण्याकोशिंबिरींत मदत करण्याच्या निमित्तानं तो स्वैंपाकघरांत गेला. त्यानं जेव्हां काकड्या अन् टमाटो टोपलींतून उचलले, तेव्हां वेंकोबा भाद्रपदांतल्या बैलासारखा फुस्कारून त्याच्या अंगावर आला.

" मला इथें दुसऱ्या कोणाची लुडबुड नको आहे. तूं बाहेर हो आधीं. नाहीं तर मी निघून जातों. "

परशाला वाटलं कीं, त्याला ताडकन् सांगावं. 'जा निघून. उगाच दमबाजी नको. मी बघून घेईन सगळं. कानामगून आला अन्—' पण भाऊसाहेबांच्या भयानं तो तसं बोलूं शकला नाहीं. गेला होता कांहीं तरी तोंडांत पडेल म्हणून; पण निराळ्याच अर्थानं त्याच्या तोंडांत मिळालं.

परशाचं डोकं विचार करूं लागलं. हा नवा आचारी भाऊसाहेबांच्या मर्जीतून, विशेषतः बाईसाहेबांच्या मर्जीतून उतरलाच पाहिजे. तो हाकलला गेलाच पाहिजे. ही गादी परत आपल्यालाच मिळाली पाहिजे. आपला जेवून खाऊन तीस रुपये पगार चालू झालाच पाहिजे. त्यांतला योग्य वांटा आपल्याला 'त्या' खोलींत पोंचवतां आलाच पाहिजे. आणि...

त्यानंतर कांहीं दिवस शरदृतूंतल्या प्रवाहासारखे संथ गेले. परशाच्या अंतरांत ज्या कांहीं घालमेली चालू असतील तेवढ्याच. आणि त्यानंतर एक

दिवस बाईसाहेबांना आढळून आलं कीं, घरांतले काहीं किरकोळ, इकडे तिकडे ठेवलेले पैसे अदृश्य होत आहेत. काहीं काहीं वस्तूंनाहि पाय फुटूं लागले आहेत. त्यांच्या फणीकरंड्यांतले चार रुपये गेले. मोठ्या प्रयासानं त्यांनीं आंबेमोहोर तांदूळ मिळवून पितळेचा मोठा डबा भरून ठेवला होता ; त्यांत शेराचा खळगा पडला. असंच आणखी आज हें अन् उद्यां तें.

बाईसाहेबांना प्रथम शंका आली ती वेंकोबाची. परशा कित्येकदा चोरून खातो हें त्यांना ठाऊक होतं. पण खाणं वेगळं नि हात मारणं वेगळं. तें त्यानं कधीं केलं नव्हतं. अर्थात् हें काम त्या नव्या आचाऱ्याचंच असावं असं त्यांना वाटलं. पण त्या त्याच्यावर स्पष्ट आरोप करूं शकल्या नाहींत. हो, 'जार धरावा खाटेवर अन् चोर धरावा मोटेवर–' त्या बोलल्या, पण कोणाचं नांव न घेतां. जो कोणी अपराधी असेल त्यानं हात आवरावा म्हणून.

पण वेंकोबाला तें न घेतलेलं नांव समजलं. त्याला रागहि आला. तो त्या बाबतींत शुद्ध होता. ही उचलेगिरी परशाचीच असली पाहिजे हें त्यानं ताडलं. आपल्यावरचा संशय दूर करायचा तर चोर पकडून देण्याची जबाबदारी आपल्यावरच येते, असं त्यानं मानलं. मग त्याची दृष्टि कावळ्याची झाली. तो स्वैंपाकापेक्षां परशावरच अधिक लक्ष देऊं लागला. चार दिवसांनीं त्यानं बाईसाहेबांना परशाच्या खोलींत बोलावून नेलं आणि त्याची वळकटी उलगडायला सांगितलं. त्यांनीं पायांनींच ती उलगडली. पण त्यांतली पुरचुंडी मात्र त्यांना हातांनींच उचलावी लागली. कारण त्यांत शेराच्या वर आंबेमोहोर तांदूळ होते.

परशा आंघोळीला गेला होता तो बाहेर आल्यावर त्यांनीं तें पाप त्याच्या पदरांत बांधलं. त्याची मुद्रा काळवंडली, भेदरली, हें पहातांच बाईसाहेबांनीं वीरश्रीनं त्याला फैलावर घेतलं. भाऊसाहेब त्या दिवशीं घरीं नव्हते. त्यामुळें गृहराज्याचे सर्व अधिकार बाईसाहेबांच्या हातीं आले होते. आज त्या 'कर्तुमकर्तुम्' होत्या. परशानं कांहीं काम न करतां पंक्तिपठाण व्हावं आणि वर दरमहा पांच रुपये उकळावे हें त्यांच्या व्यावहारिक दृष्टीला मुळींच मंजूर नव्हतं. भाऊसाहेब व्यावहारिक बाबतींत 'ट' वर्गीतले आहेत आणि धर्मराजाचा आदर्श ठेवून का कुठें संसार होतो, असं त्यांचं प्रामाणिक मत होतं. आणि तें अमलांत आणायला आज त्यांना पूर्ण मुभा होती. त्यांनीं परशाला खडसावून सांगितलं.

" चालता हो माझ्या घरांतून आत्ताच्या आत्तां. चोरटा माणूस माझ्या इथें नको..."

परशाला वाटलं, 'केलें तुका तें जालें माकां.' आपण त्या दुष्ट दुर्जन वेंक्याला घरांतून हाकलण्यासाठीं व्यूह रचला. पण तें आपल्याच नशिबीं आलं. बाईसाहेबांच्या मुद्रेवर इतका वडवाग्नि भडकला होता कीं, तशा स्थितींत त्यांच्या हातांपायां पडणंहि त्याला शक्य नव्हतं. त्याला बाहेर काढण्याचा निर्धार त्यांच्या डोळ्यांत स्पष्ट दिसत होता. परशाला त्यांच्या डोळ्याला डोळा भिडवणं दुर्घट होतं. तो नुसताच खालच्या मानेनं राहिला.

" तूं अजून हालत नाहीं आहेस. बऱ्या बोलानं गेलास तर ठीक. न पेक्षां पोलिसांच्या स्वाधीन करीन. मग भोग आपल्या कर्मांचीं फळं."

परशा दगडी पुतळा बनला होता तो हालला. खोलींत जाऊन त्यानं आपला बाडबिस्तरा कवळला. आजवरची उभी हयात ज्या घरांत घालवली तें सोडून जातांना त्याच्या अंतर्यामीं आक्रंदन उठलं. त्या घरांत त्याला कोणीं फुलं घातलीं नव्हतीं. घातल्या होत्या त्या शिव्याच. केला होता तो अधिक्षेपच. पण तरीहि त्याला तिथून पाय बाहेर काढतांना मरणप्राय दुःख झालं. त्याच्या उथळ डोळ्यांतून अविरत धार गळूं लागली. त्याला वाटलं, आज भाऊसाहेब असते तर कदाचित् आपला हा अपराध पोटांत घालते. भाऊसाहेबांच्याविषयीं त्याला विश्वास होता, आदर होता.

तो फाटकाबाहेर पडला अन् त्याच क्षणीं निर्वासित झाला. आपल्या शरीरांतलं उरलं सुरलं त्राण कोणीं तरी शोषून नेलं असं त्याला वाटलं. आभाळाच्या पालथ्या घमेल्याखालीं तो अनाथ झाला. कुठं जाणार होता तो! कोण त्याची वळकटी ओसरीवर ठेवून घेणार होता!

बाईसाहेब आज अधिकार गाजवून विजयी झाल्या. फुकट पोसावा लागणारा एक आयतोबा आपल्या कर्मानंच घरांतून निघाला याचं त्यांना समाधान झालं. वेंकोबाला आपण अश्वमेध केला असं वाटलं. त्याला वाटे कीं, आपल्यावर परशाचा सारखा डोळा आहे. आतां दुधावरची साय, डब्यांतले जिन्नस, तूप, दहीं, हें सगळं त्याचंच होतं. तो आतां स्वैंपाकघराचा एकछत्री सम्राट् होता.

भाऊसाहेब चार दिवसांनीं गांवाहून आले; पण त्यांना परशाची चाहूल कुठें लागेना. नाहीं तर दारांत टॅक्सी घरघरली कीं त्यांचं सामान उतरून घेण्यासाठीं तो खांद्यावरचं सोधनं टाकून धांवतच यायचा. त्यांनीं चौकशी केली तेव्हां बाईसाहेबांनीं तो गेल्याचं सांगून त्याच्या दुष्कृत्यांचा पाढा तिखटमीठ लावून वाचला. भाऊसाहेब गंभीर झाले. त्यांनीं एका सुस्काऱ्याव्यतिरिक्त कांहीं मतप्रदर्शन केलं नाहीं.

त्यानंतर कांहीं दिवस गेले. मग कांहीं महिने गेले. उन्हाळा संपून पावसाळा सुरू झाला. त्या बंगल्याभोंवतींचं आवार बदललं. सारी सृष्टिच बदलली. तें चिमुकलं जग परशाला विसरलं. परशा जणूं कधीं त्या घरांत नव्हताच असं झालं. पण परशाला मात्र त्याच घराची आठवण ठेवून पावलं वळवावीं लागलीं. तो येत होता. एकेक पाऊल धीरेधीरे टाकीत येत होता. तिन्हीसांजा, पावसाची जी एक सर सडसडून गेली तिनं त्याच्या अंगावरचे कपडे पार भिजले होते.

गेल्या तीन महिन्यांत त्याचे तीन तेरा झाले होते. भाऊसाहेबांच्या घरून उचललेली वळकटी निरुपाय म्हणून त्यानं त्या बेलाचं झाड असलेल्या वाड्यांतल्या खोलींत टाकली होती. मग एका समव्यवसायी मित्राच्या मध्यस्थीनं रास्ता पेठेंत एका घरीं स्वैंपाकाची नवी नोकरी पत्करली होती. पगार पस्तीस रुपये ठरला होता. म्हणजे भाऊसाहेबांच्यापेक्षां पांच रुपये अधिकच. पण राब त्याहून कितीतरी मोठा होता. दुपार–संध्याकाळ पंधरा-वीस माणसांची पंगत बसे. त्याला तेवढे श्रम झेपले नाहींत. भाऊसाहेबांनीं कांहीं वेडे म्हणून त्याला पेन्शनींत काढलं नव्हतं. पोळ्या लाटून लाटून त्याचे सांधे खिळखिळे होत असत.

ते श्रम आहाराबाहेर गेल्यामुळें पावसाळयाच्या प्रारंभीं तो बेदम आजारी पडला होता. त्याचा दमा चाळवला होता, खोकला वाढला होता अन् भरीला ताप. त्या खोलींतली हवा त्यानें बिघडवून टाकली होती. तिला त्याचं वास्तव्य नकोसं झालं होतं. एक दिवस सकाळच्या प्रहरीं टांग्यांत घालून तिनं जवळच्या रुग्णालयांत त्याची रवानगी केली होती. तो गेल्यावर ती खोली सारवणानें स्वच्छ झाली होती. पंधरा-वीस दिवस तो रुग्णालयांत पडला

होता. जरा बरं वाटल्यावर त्याची तिथून बोळवण झाली होती. तो जेमतेम बरा झाला होता. आतां त्याला विश्रांतीची गरज होती. पण कुठें मिळायची ती त्याला ! ती खोली आतां त्याची उरली नव्हती. त्याच्या जगण्यामरण्याचं तिथं कांहीं सोयर सुतक राहिलं नव्हतं. आणि त्यामुळेंच लाज गुंडाळून नि नाक मुठींत धरून त्याला भाऊसाहेबांच्या बंगल्याची वाट धरावी लागली होती.

अंधार पडल्यावर तो पडवीवर चढला नि जाळीला टेकून बसला. त्यानं आपल्या आगमनाची वर्दी दिली नाहीं ; पण ती त्याच्या खोकल्यानं दिली. ' कोण आहे ऽऽ ' म्हणून आंतून गर्जना झाली. पण परशानं ' हूं चूं ' केलं नाहीं. दार उघडलं गेलं आणि पुन्हा तोच सवाल आला. तेव्हां तो प्राण कंठाशीं आणून उत्तरला. ' मी परशा. '

" कशाला आलास पुन्हां ? कोणी अक्षद धाडली होती ? " बाईसाहेब कोपऱ्यांतलं विजेचं बटण दाबीत म्हणाल्या. एवढ्यांत भाऊसाहेबहि बाहेर आले. तिथल्या विद्युत्प्रकाशांत त्यांना एक दाढी वाढलेला अस्थिपंजर दिसला. त्याचे कपडे भिजले होते आणि तो जाळींतून आंत घुसणाऱ्या गार वाऱ्यानं कुडकुडत होता.

" काय रे परशा, कुठें होतास इतके दिवस ? " भाऊसाहेबांच्या त्या प्रश्नांत राग नाहीं, उपहास नाहीं, असला तर दयेचाच अंश आहे, असं परशाला वाटलं. त्याला एकाएकीं भडभडून आलं. आणि त्यानं भाऊसाहेबांच्या पुढें जमिनीला डोकं लावलं. मग तो त्यांच्या तोंडाकडे पाहूं लागला. त्यानं आपली सगळी कथा काहींहि न लपवतां भाऊसाहेबांच्या पुढें भडाभड ओकून टाकली आणि सरते शेवटीं तो म्हणाला, 'खरं म्हणजे मीं इथं पुन्हा तोंड दाखवायला नको होतं. पण...'

" पुन्हां चोरी करायची असेल. " बाईसाहेबांनीं त्यावर भाष्य केलं.

" चोरी करायला सुद्धा ताकद लागते. गोवऱ्या ओंकारेश्वरावर गेलेला हा हाडांचा सांपळा कसली चोरी करील बाईसाहेब ? " परशानं आपल्या शुष्क-काष्ठाकडे नखशिखांत अंगुलिनिर्देश केला.

" मग म्हणणं काय तुझं ? "

" साहेब, माझं चार महिन्यांचं पेन्शन."

" ज्या दिवशीं तूं घरांत चोरी केलीस त्याच दिवशीं तुझा पेन्शनवरचा हक्क उडाला."

" मी हक्क म्हणून नाहीं मागत. भीक म्हणून."

" मग जाणार कुठें तूं!"

" अहो, जायचं कुठें? दुपारच्या वेळीं दोन तुकडे पोटांत पडायला हवेत ना? कांहीं नाहीं माझ्याजवळ आतां. भिकेच्याच मार्गानं मरणाचा मुक्काम गांठायचा."

बाईसाहेबांना काय झालं तें नकळे; पण भाऊसाहेबांचं काळीज चिरलं त्या शब्दांनीं. त्यांनीं पुढें होऊन पडवीवरच्या खोलीची कडी काढून परशाला म्हटलं.

" उद्यां सकाळीं करूं विचार त्या गोष्टीचा. तूं घासभर अन्न खाऊन खोलींत पड."

परशा त्या खोलींत गेला. भाऊसाहेब घरांत आले. बाईसाहेबहि दिवा मालवून त्यांच्या पाठोपाठ गेल्या. त्यांना हें सगळं डोकेंदुखीला कारणीभूत झालं होतं.

" काय आरंभलं आहे तुम्ही हें? त्या चोरट्याला परत घरांत ठेवणार!"

" मी काय आरंभणार? कोर्टसुद्धा एका गुन्ह्याला दोनदा शिक्षा देत नाहीं एवढंच मला ठाऊक आहे."

" असली ही अबर्गत घरांत बाळगायची?"

" अबर्गत आहे म्हणूनच ठेऊन घेणं कर्तव्य वाटतं. धट्टाकट्टा असता तर म्हटलं असतं, रस्ता धर!"

" त्याला काय उशीर आहे! इथं दह्यादुधांत हात बुडायला लागला कीं चांगला धट्टाकट्टा होईल."

" त्यानं तुमचे चार रुपये हातासले, दोन शेर तांदूळ उपसले म्हणून तुमचा त्याच्यावर एवढा राग; पण तो ही शर्विलकी करायला कां उद्युक्त

झाला, याचा कांहीं विचार केला आहे का तुम्हीं ! त्याची व्यथा काय होती नि कुठें होती तें मलाहि इतके दिवस ठाऊक नव्हतं. आज तो भडाभडा सगळं बोलला त्यावरून मला कळलं. तुम्ही—आम्ही भलीं माणसं नाहीं का ? कां ; तर जें हवं तें जिथल्या तिथं मिळतं म्हणून. पण तरीहि आपलं भलेपण शंकास्पद आहे. आपण फार चांगले, निर्दोष, निरपराध अशी तुमची समजूत असली तर ती काढून टाका. आपल्याला जर खरंच भलं व्हायचं असेल तर..."

"तर काय तें सांगा. होऊं द्या एकदा सगळं."

"तर सांगूं ? आपण त्या भूमिकेंत जावं क्षणभर अन् मनाला विचारावं. तें बरोबर निर्णय देईल. दृष्टिकोण बदलेल तुमचा. एकच लक्षांत ठेवा. दुसऱ्याचा अपराध बोराएवढा असला तर आपली क्षमा निदान त्याहून तरी लहान असतां कामा नये !"

२९८५९
मा. ना.
२०२९
३।२।६१

# पूर्वग्रह : : ७ :

दाण्यावरचीं गुरें सुटलीं नव्हतीं. फुलांवरचें दंव झडलें नव्हतें. घरट्यांतले कावळे बाहेर पडले नव्हते. झाडांच्या हिरव्या शेंड्यांवर सोनेरी किरण फांकले नव्हते. आणि अशा त्या थंडीनें गारठलेल्या सकाळीं अंतोबा साधले विश्वनाथाच्या दारांत येऊन उभा झाला.

चार मैल चालून आला होता, त्यावरून तो पहांटेसच घरून निघाला असावा. त्याचे बारीक, निळसर डोळे त्रस्त झाले होते व चर्येवर व्यग्रपणा दिसत होता, त्यावरून त्यानें गेली रात्र अस्वस्थपणें घालवली असावी, असा कोणालाहि अंदाज झाला असता. गुडघाभर पंचा, चरचरत्या वहाणा, बाराबंदीचे दोन बंद बांधलेले, हिरवी धाबळी कथेकऱ्यासारखी कमरेभोंवतीं लपेटलेली, असा त्याचा पोषाख होता.

विश्वनाथ घराकडच्या फणसाचा पातेरा गोळा करून भावंडांना शेकोटी पेटवून देण्याच्या तयारींत होता. अंतोबाला पाहिल्यावर तो हातांतलें काम टाकून पडवीवर आला आणि त्यानें शेंदरी पसरून ' या बसा ' म्हटलें.

" मी बसायला आलों नाहीं." अंतोबा आपल्या पातळ ओंठांतून तिरसट शब्द बोलला.

" मर्जी तुमची ! माझा गृहस्थधर्म मीं केला."

" मला कळतो तुमचा गृहस्थधर्म. चार गांवचीं शंभर माणसं जमलेलीं असतांना दुसऱ्याच्या मुलीला नांवं ठेवणं, तिच्यावर भलतेच आरोप लादणं हें सुद्धा तुमच्या गृहस्थधर्मांतच येत असेल."

" कोणीं ? मीं ?"

" तूं नव्हे. तुझ्या आईनें."

" म्हणजे त्या इसापनीतींतल्या वाघासारखं कीं काय? तूं नव्हे, तुझ्या बापानें— "

" थट्टा करूं नकोस. माझ्या जिवाची लाही लाही झाली आहे नुसती. आठ दिवसांपूर्वी करमळीला त्या बावल्याच्या मुलाचं लग्न झालं तिथें शंपन्नास माणसांच्या देखत तुझी आई बोलली–' किनई, त्या अंतोबा साधल्याची मुलगी माझ्या मुलाला सांगून आली होती हो! पण मीं लावली धुडकावून! पायाळू मुलगी ती. ती गे बाये कोण करील! घराचं तळपट करायची जाईल तिथें...' तेव्हां मी तिला विचारायला आलों आहें, कीं तुला कोणीं सांगितलं हें? तूं आली होतीस का तिच्यावेळीं माझ्या बायकोचं सुईणपण करायला? "

तो तावातावानें बोलत असलेला ऐकून त्याची आई बाहेर आली होती. तिला विश्वनाथानें विचारलें.

" काय गे आई! हे काय म्हणतात? तूं यांच्या मुलीबद्दल कांहींच्या-बाही बोललीस? "

" मी नाहीं बा काहीं बोललें. उगाच कुभांड घालतो माझ्यावर. मी कशाला बोलूं! ती पायाळू, तिखळी, निखळी कशी का असेना; मला रे बाबा काय करायचं आहे! " आणि त्या पोक्त बाईनें आपल्या माथ्यावरचा अलवाणाचा पदर कानामागें सारला.

" ऐका, आई म्हणते, मी तसलं काहीं बोललें नाहीं. "

" नुसतं नाहीं म्हणून चालायचं नाहीं. माझ्यापाशीं पुरावा आहे. मी रुजवात करून द्यायला तयार आहें. " अंतोबानें कमरेची धाबळी सोडली अन् पुन्हां आवळली.

" देच रुजवात करून. माझ्यावर बालंट घ्यायला कुणाच्या काळजाला केस फुटले आहेत तें बघूं दे मला. चल, ही आलें मी तुझ्याबरोबर. "

आईचा तो आवेश विश्वनाथ पहातच राहिला. तेवढ्या वेळांत तिनें तीनदां नाक वर ओढलें. आपलें उभें लावणें नेसण आणखीच वर आवरून घेतलें. पदराची निवीति करून डाव्या बाजूला खोचली. अंतोबाच्या आधीं ती पडवीच्या पायऱ्या उतरली. विश्वनाथ तें पाहून तिला म्हणाला.

" आई, तूं हो घरांत ; मी जातों यांच्याबरोबर. "

आणि दुसऱ्याच क्षणीं विश्वनाथ आणि अंतोबा ही दुक्कल करमळीच्या रस्त्याला लागली. वाटेंत दोघांच्याही तोंडाला खीळ होती. फक्त दोघांच्या वहाणा तेवढ्या बोलत होत्या. अंतोबा विश्वनाथाच्या पुढें होता. त्याची रुमालाखालून डोकावणारी अर्धी शेंडी वाऱ्यावर हालत होती. विश्वनाथ त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून मनांत म्हणत होता, ' माझ्या आईवर आळ घेतोय् काय ! करमळीला जाऊन याच्या गोऱ्या तोंडाचं खापर करूनच याला परत धाडतों. '

ज्या मुलीबद्दल हें प्रकरण निर्माण झालें होतें, ती कांहीं महिन्यांपूर्वीं विश्वनाथाला सांगून आली होती. अंतोबानें पहिली उडी याच स्थळावर घातली होती. तो संबंध घडून येता तर आज त्या दोघांचें नातें सासऱ्या-जावयांचें असणार होतें. पण विश्वनाथानें ती मुलगी नाकारली होती. पायाळू म्हणून नव्हे—ती गोष्ट त्याच्या स्वप्नांतसुद्धा आलेली नव्हती. त्याचा मुद्दा दुसराच होता. त्या मुलीचे पंचक्रोशींतले लागेबांधे त्याला ठाऊक होते. तो तिच्या आईला ओळखीत होता. तिच्या मावश्यांना ओळखीत होता. तिच्या आजीला पण ओळखीत होता. या बायांनीं आपापल्या दिल्या घरीं काय काय उच्छाद केले, ते त्याला चांगले ठाऊक होते. त्या बायका दिसायला सालसूद, गोऱ्या, नाकेल्या, पण आंतून कवंडळासारख्या कडू हें त्यानें अनेकांच्याकडून ऐकलें होतें. ही मुलगी म्हणजे त्याच वंशवेलीचा नवा अंकुर ! हीहि त्याच वळणावर जाणार. ' खाण तशी माती ! ' हिनें आपल्या घरांत तेंच व्रत चालवलें तर ! आपल्याला दोघे धाकटे भाऊ आहेत ; एक बहीण आहे. सगळ्यांचे तीन तेरा व्हायचे. ' ही सोन्याची सुरी आपल्या उरांत खुपसून घेणें नकोरे बाबा ! ' तो म्हणाला होता. ती सुरेख आहे, अव्यंग आहे, लिहितांवाचतां येणारी आहे, या सगळ्या जमेच्या बाजू लक्षांत घेऊनहि त्यानें तिला नकार दिला होता. त्यामुळें आपली मुलगी इथें पटलीच पाहिजे, या आत्मविश्वासानें आलेल्या अंतोबाला नाक कापल्यासारखें वाटलें होतें.

वस्तुतः त्या मुलीचें नामग्रहणसुद्धा विश्वनाथाला नको होतें. तिला कुठेंहि देवोत, कांहींहि करोत, आपल्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं,

असें तो समजत होता. पण असें असूनहि त्याच मुलीच्या बाबतींत रुजवाती करण्यासाठीं त्याला त्या नको असलेल्या माणसाबरोबर करमळीला जावें लागलें होतें.

ते दोघे बाबल्याच्या घरीं पोहोंचतांच त्यानें त्यांचें आगतस्वागत केलें. अंतोबाची बायको गूळपाणी घेऊन बाहेर आली असतां तिला थांबवून घेऊन अंतोबानें तिच्यापुढें तो विषय काढला. खरें सांगण्याबद्दल तिला वड-देवाची शपथ घातली. ती विश्वनाथाला पाहून जराशी कचरली; पण शपथ मोडवत नसल्यानें तिनें सांगितलें कीं, विश्वनाथाची आई तसं बोलली खरी. अंतोबानें एक धारदार विजयी कटाक्ष विश्वनाथावर टाकला. एवढ्यांत शेजारची म्हातारी वेणूअक्का गुडघ्यावर हात टेंकून एक एक पायठणी चढत पडवीवर आली. तिनें अंगणांतूनच हा विषय ऐकला होता. विचारल्यावांचून बोलूं नये, हें नीतितत्त्व तिच्या गांवीं नव्हतें. सारवून नितळ केलेल्या जमिनीवर बसकण घेतां घेतां ती बोलली.

"म्हणाली हो ऽऽ! विश्वनाथाची आई तस्सं म्हणाली. म्हणे पायाळू मुलगी—मीं तिला त्याच वेळीं चमकावली. गप्प बसलें नाहीं. 'अगे नर्मदे ऽ ऽ! खरं असो खोटं असो; चार माणसांत लोकांच्या मुलीबद्दल असं बोलूं नये. सभ्यपणाची रीत नव्हे ही'......"

आतां तर अंतोबाच्या विजयावर तुरा चढला. तो विश्वनाथाला बोलला. 'झालं समाधान? पदरांत माप पडलं ना पुरेपूर? ही सत्तर वर्षांची म्हातारी सांगते आहे.'

विश्वनाथाचा चेहरा झरझर उतरला. तो अंतोबाला 'गवत्या गोमाजी' करायला आला होता; पण तोच स्वतः तसा झाला. जमिनीवर खिळलेली दृष्टि त्याला वर उचलवेना. छेः! त्याची आई भलतेंच कांहीं तरी करून बसली होती. त्याला न्यायाची चाड होती. खोट्याची चीड होती. तो जर न्यायाधीश असता आणि त्याच्या न्यायालयांत अंतोबानें आपली फिर्याद मांडून आतांच्यासारख्या पुराव्यानिशीं आरोप शाबीत केला असता, तर त्यानें आपल्या जन्मदात्या आईलाहि कठोर शिक्षा फर्मावली असती.

अंतोबानें त्याच्या त्या विषण्ण, म्लान अवस्थेचा पुरेपूर फायदा घेतला. एवढ्यांत शेजारची चार मंडळी त्या पडवीवर जमली होती, त्यांना उद्देशून तो म्हणाला.

" मंडळी ! पांचामुखी परमेश्वर ! तुम्ही मला देवासारखे. माझी कैफियत मी आतां तुमच्यापुढेंच मांडतों. माझ्या मुलीचं लग्न तळवण्यांतल्या किंजवडे-करांच्या मुलाशीं व्हायचं ठरलं होतं. फक्त मुहूर्तनिश्चय तेवढा व्हायचा होता. घरांत सांडगेपापड झाले होते. मीं साळीडाळी जमवल्या होत्या. सांखळीला जाऊन ' धडवत 'सुद्धा आणली होती. आणि अचानक परवां त्यांच्याकडून निरोप आला कीं, ' भेटून चला. ' मी गेलों. तर म्हणाले कीं, ' आम्हांला तुमची मुलगी कर्तव्य नाहीं. ' कारण विचारतांच या आतांच्या गोष्टीचा हवाला दिला. मीं त्यांना म्हटलें कीं, ' आपण दोघेहि जाऊं अन् या गोष्टीची शहानिशा करूं. ' त्यावर मुलाचा बाप म्हणाला, ' पिकल्यावांचून विकत नाहीं, फुलल्यावांचून परमळत नाहीं. तुमची मुलगी बत्तीस लक्षणी असेल. आम्ही कांहीं म्हणत नाहीं. फक्त अम्हांला ती नको आहे....... '

" मंडळी, आतां तुम्हीच सांगा. माझी वाढलेली मुलगी. हें ठरलेलं लग्न मोडलं, आतां दुसरीकडे कुठेंहि गेलों तरी या प्रकरणाची छाया येणारच माझ्या मागून. सगळ्या पंचक्रोशींत आतां ही गोष्ट पसरली असेल. म्हणजे कर्मभोग ओढवला कीं नाहीं माझा ! अशा स्थितींत मुलगी लग्नावांचून राहिली, उद्या कांहीं भलतंसलतं झालं तर त्याला जबाबदार कोण ? बोलणारं माणूस जिभेला हाड नसल्यागत बोलून गेलं. त्याला काय त्याचं ! माझे एकवीस पूर्वज नरकांत जायची वेळ. शिवाय अब्रू......"

विश्वनाथ तें व्याख्यान ऐकत होता. त्यांतला एक एक शब्द पांगाऱ्याची बी घासून त्याचा चटका द्यावा तसा त्याला वाटत होता. अंतोबा जरी अपमान करण्यासाठीं, जखमेवर मीठ चोळण्यासाठीं बोलत असला, तरी त्याच्या बोलण्यांत तथ्य आहे हें त्याला पटलें होतें. तो म्हणतो तसें होणें शक्य आहे, हें त्याच्या ध्यानीं आलें होतें. आपल्या आईच्या अद्वातद्वा बोलण्यामुळें एक मुलगी बुडावी, पंचक्रोशींत तिच्या लग्नाचा संभव नष्ट व्हावा, हें त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला मानवण्याजोगें नव्हतें. थोडा वेळ

खालच्या मानेनें त्यानें कांहीं तरी विचार ठरविला आणि तिथल्या लोकांना म्हटलें.

"मंडळी, माझ्या आईचा अपराध लहान नाहीं. गेलेला शब्द आतां परत येणं अशक्य. त्याची निष्कृति करण्याचा एकच उपाय माझ्या हातीं आहे. अंतोबा प्रथम ही मुलगी मला देण्यासाठीं आले होते. मीं तिला नाकारली होती. पण त्याचं कारण हें नव्हे. तें जाऊं द्या! अजून जर त्यांचा तो विचार कायम असेल तर मी त्या मुलीशीं लग्न करायला तयार आहें."

त्यासरशीं तिथल्या त्या पांचसहा माणसांचे डोळे एकदम विस्फारले. जादूगारानें नजरबंदी करावी तसें त्यांचें झालें. या प्रकरणाला अशी विलक्षण कलाटणी मिळेल, हें त्या लोकांच्या स्वप्नांतसुद्धा नव्हतें. त्यांच्याच नव्हे; पण अंतोबाच्यासुद्धा. एवढा वेळ त्यांची सहानुभूति अंतोबाकडे होती ती एका क्षणांत विश्वनाथाकडे वळली. बाबल्यानें अंतोबाला म्हटलेंसुद्धा.

"आतां काय तुझं म्हणणं आहे? जें वाईट म्हणून झालं तें तुझ्या पथ्यावरच पडलं कीं."

"होय; पण यांनीं दिलेला शब्द बदलला नाहीं तर. बाकी तुम्ही साक्षीला आहांत म्हणा." अंतोबा बोलला.

"करारपत्र लिहून देऊं का?" विश्वनाथानें तीव्र शब्दांत विचारलें.

अंतोबा नकारार्थी मान हलवतांना सगळी दंतपंक्ति दाखवून हसला. त्याला आज दुहेरी विजय मिळाला होता. ज्यानें त्याच्या मुलीला प्रथम झिडकारलें, तोच आतां नाक मुठींत धरून तिचा स्वीकार करायला निघाला होता. कुठलीहि अट न घालतां; कांहींहि न मागतां.

त्यानंतर आठच दिवसांनीं विश्वनाथानें अंतोबाच्या भरल्या मांडवांत कुमुदचें विधियुक्त पाणिग्रहण केलें.

कुमुदची आई ही तर कन्यादान करणारीच. शिवाय कुमुदची आजी, तिच्या मावश्या, यासुद्धा त्या मांडवांत सळसळत होत्या. सगळ्यांची ठेवण एका घाटाची. जणूं एकाच मुशींतून सगळ्या ओतून काढल्या आहेत. सगळ्यांचे डोळे घारे आणि उग्र. सगळ्यांची एकच गव्हाळी कांति. सगळ्यांचा आवाज एकाच जातीचा, म्हणजे बायकी असूनहि मार्दवशून्य.

त्या सगळया जणींचें नातें कोणालाहि न सांगतांच कळावें. एकाच खोडाच्या या बाहुल्या आहेत हें त्यानें जाणावें.

आणि हा सगळा मातृवंशाचा वारसा घेऊन आलेली ती षोडशवर्षा कुमुद. ती विश्वनाथाच्या समोर पाटावर बसली होती. तीच घडण, तीच कांति, तेच डोळे. स्वर अजून त्याच्या कानांत पडायचा होता. तिच्याकडे पाहून विश्वनाथ मनांत म्हणाला, 'स्वभावहि तसाच असणार! नांदतं घर फोडणारा, दुःस्वास करणारा, केवळ आपस्वार्थ पहाणारा...... '

तो तिच्याकडे अधूनमधून पाहात होता; पण ती दृष्टि वल्लभाची नसून टीकाकाराची होती. तसें नसतें तर कुमुदच्या डोळयांत काजळाची रेघ चढल्यामुळें त्यांना एक आगळेंच सौम्य असें देखणेंपण आलें आहे, हें त्याला जाणवलें असतें. नव्या साडीशीं तिची कांति स्पर्धा करीत आहे, असें त्याला दिसलें असतें. प्रत्येक अलंकार तिच्या लवत्या तनूला सुवर्णलतेचें स्वरूप देऊन राहिला आहे हेंहि त्याला भावलें असतें.

वरात आल्यावर लक्ष्मीपूजनाच्या वेळीं आईच्या आदेशानुसार त्यानें 'गिरिजा' असें तिचें सासरचें नांव ठेवलें; पण त्याच्या मनांत आलें कीं, हिला 'कैकेयी' किंवा 'मंथरा' हेंच नांव योग्य होतें. लक्ष्मीपूजन चालू असतां कुमुद विश्वनाथाच्या शेजारीं मांडीला मांडी लावून बसली होती; पण विश्वनाथाच्या हृदयांत आपल्याविषयीं कोणत्या विचारविकारांचें तुंबळ चाललें आहे याची तिला कांहींच कल्पना नव्हती. ती नववधू म्हणून, त्याच्या शृंगार-सरोवरांतली मराळिका म्हणून त्याची गृहलक्ष्मी म्हणून, त्या घरांत आली होती. तिनें त्या सबंध दिवसांत अनेकदा त्याच्या दृष्टीला दृष्टि भिडवली होती; पण त्या प्रत्येक वेळीं त्यानें आपली मान वळवली होती. त्याच्या मुखांतून निघालेला एक कोवळा शब्द, त्याच्या दृष्टींतून सुटलेला एक उत्तेजक किरण, त्याच्या ओंठावर प्रगटलेली एकच बोलकी स्मितरेखा, यासाठीं ती अगदीं उतावीळ झाली होती. ती मनाशीं म्हणत होती, 'असं कां? हें लग्न यांना अंतरीं टोंचत असेल का? एकदा नाकारलं, पुन्हा स्वीकारलं, यांत जुलमाचा रामराम तर नाहीं ना? कांहीं असो. या कातळांतून झरा फोडायला आपल्याला तपश्चर्याच करावी लागणार.'

आणि त्याच वेळीं विश्वनाथ काय म्हणत होता ? ‘ मला तीन भावंडं आहेत. तीं माझ्यापेक्षां लहान आहेत. वडील नाहींत, म्हणजे मलाच वडीलकीच्या नात्यानें त्यांचं संगोपन करायला हवं. ही बायको म्हणून आलेली आहे ; पण हिची मला त्या बाबतींत काय मदत होणार तें कळतंच आहे. ही आपल्या वडीवर जाणार यांत शंकाच नको. हिचे ते घारे, उग्र डोळेच तसं सांगतात. ही कलहाचं, दुहीचं बीज मात्र पेरील. तें व्हायला नको असेल तर हिला आतांपासून धारेवर धरली पाहिजे. हिच्यावर जागरूकपणें लक्ष ठेवलं पाहिजे. तपश्चर्याच आहे ही एक ! ’

पण त्याच्या भावंडांचें मात्र मत कुमुदविषयीं अगदींच भिन्न होतें. कुमुदसारखी तरतरीत, हसरी, बोलकी वहिनी आपल्या घरीं आली याचा त्यांना खूप आनंद झाला होता. त्यांना आपली ती सर्वभावें आवडली होती. प्रथम आठ दिवस तर त्यांनीं तिला घेरूनच ठेवलें होतें. घरांतली आणि घराभोंवतालची प्रत्येक वस्तु तिला मोठ्या उत्साहानें दाखवली होती. नुकतीच लंगोटी लागलेला आत्माराम म्हणाला होता कीं, वहिनीचे डोळे कसे काजुल्यासारखे दिसतात. त्यावर पंचा नेसूं लागलेल्या बारा वर्षांच्या वामनानें म्हटलें कीं, ‘ बाकी सगळं ठीक आहे ; पण वहिनीचे वरचे दोन दांत किंचित् पुढें आले आहेत अन् कान पण थोडे पसरट आहेत. तेवढं नको होतं. ’ त्या दोघांचें ऐकून मग सर्वांत धाकटी सहा वर्षांची मनू ठसक्यांत बोलली होती, ‘ अहारे बावळट ! वैनी सुरेखच आहे मुळीं. ’

आपण आपल्या दिराननंदेला आवडलों, त्यांचीं कोवळीं लोभस हृदयें आपल्याकडे वळलीं, त्याबद्दल कुमुदला अपूर्वाई वाटली. पण अजून तिचा ‘ कंथ ’ सगळ्या वृत्ती आंखडून बसला होता. मेघ माथ्यावर डवरून यावा ; पण धार मात्र पडूं नये म्हणजे जसें अस्वस्थ वाटतें, दुर्दिन वाटतें, उकडल्यागत होतें, तशी कुमुदची अवस्था झाली होती. ती प्रयत्न करीत होती, उपाय शोधीत होती. क्षणभर तिला जें हवें तें गवसल्यासारखेंहि वाटत होतें ; पण सरतेशेवटीं मूठ उघडावी तों कांहीं नाहीं.

ती मनांत म्हणे, ‘ देतों असं दाखवायचं अन् हात पुढें केल्यावर चापट मारायची, हा न्याय कुठला ! हे मनमोकळे बोलत कां नाहींत माझ्याशीं ? माझ्यावर अशी पहारेकऱ्यासारखी दृष्टि कां ? मी आवडत नाहीं म्हणावं, तर मला

अगदीं गुदमरवून टाकतात. नुसता माझ्या पदराचा वारा पडला तरी एकदम निराळेच होतात. यांची भूक तेवढीच का? माझं या घरांतलं महत्त्व एवढ्या-पुरतंच का? माझ्या भावनांच्या कुपीवरचं झांकण एकदा तरी उघडावं असं यांना कां वाटूं नये? मला फक्त एक शरीरच काय तें आहे आणि मन वगैरे कांहीं नाहींच, असं का हे समजतात? मी म्हणजे एक सजीव केलेली रंगीत बाहुली एवढीच का यांची समजूत? का आंत कुठेंतरी अढी आहे? लग्नाच्या पूर्वीचं प्रकरण मी जाणतें; पण त्यांत माझा काय दोष? वडिलांवर राग असेल तर त्याचं प्रायश्चित्त मला कां? यांची जवळीक एका अंगानें मला सुखवते अन् दुसऱ्या अंगानें भाजून काढते. हें असंच का चालायचं? उन्हाळा आहे; पण वसंत नाहीं, हाच का अनुभव मी घेत रहायचं? काय करूं मी! कोण मला मार्ग दाखवील......'

कुमुद रोज सकाळीं शयनगृहांतून बाहेर येई ती अप्रसन्न मनानें. अंगण झाडण्यासाठीं केरसुणी उचलणाऱ्या तिच्या हातांत विशेषसा जीव नसे. समोरचा पाट खळाळे. पाळंदीकडचा सोनचांफा सुगंधाची पखरण करी. दाव्या-वरची गाय लुंचत्या वासराला चाटूं लागे. पोफळींच्या शेंड्यांत वायुलहरी लपंडाव खेळत. पाटापासल्या जांभावरच्या घोटुऱ्यांतून पाखरांचीं पिलें खालीं उतरत. पण या सगळ्या उत्साही वातावरणांत, निसर्गाच्या लाडक्या प्रदेशांत वावरत असूनहि कुमुदच्या डोळ्यांत प्रसन्नता उमटत नसे. बाहेर सगळें ठीक होतें, सुंदर होतें, प्रकाशमय होतें. पण तिच्या अंतःकरणांत........? तिथें संशय होता. आशंका होती. अंधार होता!

पण थोड्याच दिवसांत विश्वनाथाच्या अंतरांतल्या विकल्पांचें गांठोडें तिच्यापुढें उलगडलें. प्रकार झाला तो असा—

एका कुळवाडणीनें काजूगरांची एक पुरचुंडी मनूच्या हातांत आणून दिली. आत्मा तिच्याशी झोंबूं लागला. वामनहि त्यांत घुसला. पुरचुंडी जमिनीवर विखुरली. मुलांनीं भराभर काजू गोळा करून तोंडांत टाकल्या. मनूला मिळाल्या अवघ्या दोन. त्यांतली एक तिच्या तोंडांत गेली अन् दुसरी ओठाला लागणार तोंच आत्मानें खाली तिच्या हातावर थप्पड मारली. तिच्या हातांतून खालीं पडलेला गर आपल्या तोंडांत टाकून आत्मा पसार झाला. मनू भोकाड पसरून वहिनीकडे आली. कुमुदनें तिला जवळ केलें.

पदरानें दोनदा, तीनदा तिचे डोळे पुसले तरी ते कोरडे होईनात. मग ती तिला समजावण्यासाठीं तिच्या कानाशीं तोंड नेऊन म्हणाली.

'मनूवन्सं, रडं थांबवा. मीं उद्या खूप काजू चिरून देईन तुम्हाला एकटीला. कळलं? आत्माभावजी वाईट्ट आहेत अगदीं. आपण त्यांच्याशीं गट्टी फू करूं. तुम्ही अन् मी हंऽऽऽ!'

एवढ्यांत विश्वनाथ कुठून तरी तिथें आला. 'आत्माभावजी वाईट' हे कुमुदच्या तोंडचे शब्द त्यानें ऐकले. तो थबकला. त्यानें दोघींकडे एकदा रोखून पाहिलें. त्याच्या मुद्रेवर तिरसटपणाची लहर उमटली. तो मनूवर खेकसला.

"मने, चोंबडे कसलीं खलबतं चाललीं आहेत! होतें का नाहीं बाजूला तिथून! लावसट कुठली.........चांगलं चालवलं आहे तुम्हीं. नांदत्या घराचं 'कल्याण' कराल......"

शेवटचीं दोन वाक्यें तो कुमुदला उद्देशून बोलला होता. तिला त्यांचा अर्थच कळेना. 'इथें घराच्या कल्याणाचा प्रश्न कुठून आला? माझं काय चुकलं? मीं तर रडत्या मनूला हसती केली. खरं म्हणजे माझं त्यांनीं कौतुक करायचं; पण तें सोडून भलतंच काय बोलतात हे......'

पण त्याचाहि संदर्भ थोड्याच वेळांत लागला. विश्वनाथाची आई स्वयंपाकघरांत होती, तिच्यापुढें जाऊन तो तावातावानें बोलूं लागला.

"आई, मी म्हणत होतों तें खरं होण्याच्या मार्गाला लागलं. घरांत दुहीचं बीज पेरूं लागली तुझी सून. मनूला जवळ घ्यायचं अन् 'आत्मा वाईट आहे' म्हणून तिच्या मनांत भरवून द्यायचं. उद्या आत्माला जवळ करील अन् म्हणेल, 'वामन दुष्ट आहे.' शेवटीं आपल्या वंशावर गेलीच. हिच्या आईनें एका घरांत तीन चुली केल्या. एका मावशीनं आपल्या भोळसट दिराला देशोधडीला लावलं. दुसऱ्या मावशीनं नवऱ्याला भावाविरुद्ध दिवाणींत ढकलून दोघांना हाडवैरी बनविलं. हिची लटलटत्या मानेची थेरडी आजी तर तुला माहीतच आहे कशी छद्मीपणानं बोलते तें. त्या वंशवेलीची ही शेंग नको असतांना मला घरीं आणावी लागली. केवळ तुझं तोंड पाघळलं म्हणून. घरभेदी......दुस्वास करणारी......आपस्वार्थी......!"

कुमुदनें माजघरांतून हा अग्निकणांचा वर्षाव अंगावर घेतला. आपल्या नवऱ्याच्या अंतरांत काय खुपतें तें तिला आज कळलें. पण केवढा कांट्याचा नायटा केला होता त्यानें! खरें म्हणजे मुळांत कांटा तरी होता का? ती गेली समजूत घालायला आणि झालें उलटें. तिला त्या गोष्टीचें अत्यंत दुःख झालें. ती धुणें धुवायला पाटावर गेली आणि ओणव्यानें पाथरीवर लुगडें चोळतांना कोणाला न दिसेल असें पोटभर रडली. त्या पाटानें तिचे अश्रू झेलले आणि पाण्याबरोबर वाहून नेले.

तिला वाटलें कीं, 'आतां मात्र कठीण आहे. आपला नवरा पूर्वग्रहानें भिनलेला आहे. आपण सरळ बोललों तरी तो त्याचा वांकडाच अर्थ करणार. कसं त्याला आपलं अंतःकरण पटवायचं? काय साधन आहे आपल्या हातांत? भविष्यकाळच्या कुशंकेबद्दल मी त्याची कशी खात्री करूं? यापुढें एकच उपाय, तो म्हणजे तोंडांत गुळणी घ्यायची.'

आणि खरोखरच त्या दिवसापासून तिनें आपल्या तोंडाला चावी केली. सासूनें सांगितलेलें काम मुकाट्यानें करायचें, विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें शक्य तेवढीं मानेनें किंवा हुंकारानेंच द्यायचीं आणि बाजूला व्हायचें. पण ती बाजूला झाली तरी मुलें तिच्याजवळ येत. अनेक बालसुलभ कल्पना तिच्यापुढें मांडीत. तिच्याकडून स्पष्टीकरण मागत. तिलाहि त्यावर कांहीं तरी मजेदार सुचे. तिच्या चारी वाणी समुद्राच्या लाटांसारख्या ओठांच्या किनाऱ्यावर फुटायला धावत; पण लगेच विश्वनाथाचे ते विषलिप्त शब्द तिच्या कानांत घुमूं लागतः 'घरभेदी...दुःस्वास करणारी... आपस्वार्थी...' लगेच ती आपले ओठ घट्ट मिटून घेई. तिच्या घाऱ्या डोळ्यांत चमकणाऱ्या अर्थछटाहि त्याचबरोबर मावळत आणि ती कुठल्यातरी खऱ्याखोट्या कामाच्या निमित्तानें त्या मुलांच्या मधून चालती होई.

वहिनी घुमी झाली आहे हें त्या मुलांनीं थोड्याच दिवसांत ओळखलें. 'बोल, आधीं बोल. त्याशिवाय तुला जाऊं देणार नाहीं.' म्हणून आत्मा तिची वाट अडवूं लागला. मनू तिच्या मांड्यांना मिठी घालूं लागली. मग तिला वाटायचें कीं, आतां बोललेंच पाहिजे. पण काय बोलायचें? ज्याच्यांतून कांहीं वाईट अर्थ निघणार नाहीं, असा खात्रीचा निरुपद्रवी शब्द कुठून आणायचा! आणि बोललें नाहीं तर त्या न बोलण्यालाहि अर्थ आहेच कीं.

'पाहा, आतांपासून ही दिरानणंदेकडे तुसडेपणा करूं लागली. आलं, वंशाचं आलं...' म्हणून मग ती एवढेंच करें तरी म्हणे, 'आत्मा भावजी, तुम्ही शहाणे आहांत.' 'मनूवन्सं, असं करूं नये' आणि लगेच तोंडाला मिठी.

कुमुदनें अलीकडे हंसणें, बोलणें टाकलें आहे. गरज पडेल तिथें आणि तेवढाच शब्द ती उच्चारते हें विश्वनाथालाहि कळलें होतें. कुमुदच्या गोऱ्या तोंडावर नि घाऱ्या डोळयांत उल्हासाचें नांवसुद्धां नाहीं, हें त्याला दिसत होतें. त्याला वाटलें कीं, 'आपण त्या दिवशीं आईसमोर जी खरवड काढली, त्याचा राग बाईसाहेबांनीं अजून सोडलेला नाहीं. हें तर चक्क दीर्घद्वेषाचंच लक्षण.' पण याच्या उलटहि विचार त्याच्या मनांत डोकावल्यावांचून राहात नसत. 'आपण साप साप म्हणून भुई तर धोपटीत नाहीं ना ? आनुवंशिक गुणदोषांचा सिद्धांत मी गृहीत धरून चाललों आहें, तो शंभर टक्के खरा असेल का ? त्याला अपवाद कधींच अन् कुठेच होत नसेल का ? आपल्या बायकोची करणीच तशी आहे, तिचा स्वभावच तसा आहे, का माझी तिच्याविषयींची वृत्ति तशी आहे......'

या उलटसुलट विचारांच्या झोंबाझोंबींतून शेवटीं तो या निर्णयावर येई. 'कसेंहि असो; कांहींहि असो. आपल्याला सावधगिरीनें वागलं पाहिजे. तिच्या वृत्तींत कुठें तसला अंकुर दिसला कीं, तो तिथल्या तिथें चिरडून टाकला पाहिजे. तिला कळलं पाहिजे कीं, आपला नवरा म्हणजे आपल्या बापासारखा बाईलबुद्धया नव्हे. आपल्या मावशीच्या नवऱ्यासारखा ताटाखालचं मांजर नव्हे. इथें आपली एका कणखर पुरुषाशीं गांठ आहे...'

असे बरेच दिवस गेले. परिस्थिति मागील अंकावरून पुढें चालू राहिली. मुलांबाळांनीं भरलेल्या त्या घरांत कुमुद उदासपणें वावरत होती. वाणीचा संयम केल्यानें तिच्या मनावर खूप ताण आला होता. ती आतांशा स्वतःवरच रागावूं लागली होती. ती म्हणे, 'लोक आधीं अन्याय करतात अन् मग शिक्षा भोगतात ; पण माझ्या घरीं पुढच्या संभाव्य अपराधासाठीं मला आधीं शिक्षा भोगावी लागत आहे.' एक दिवस मागील दारच्या अंगणांत वाळत घातलेल्या खोबऱ्याच्या वाट्या राखण्यासाठीं ती ओटीवर बसली असतां याच विचारानें तिचा पिच्छा पुरविला होता. सासू शेजारघरीं पापड करायला गेली होती. विश्वनाथहि घरांत नव्हता. मुलें घराभोंवतीं कुठें तरी हिंडत होतीं. ती

बसली होती तिथें शेजारींच आत्माचें पाटी-दप्तर पडलें होतें. कुमुदनें सहज-गत्या त्या पाटीला हात घातला. शेजारीं पेन्सिलीचा तुकडा पडला होता तोहि उचलला. पाटी कोरीच दिसली तेव्हां हाताचा चाळा म्हणून तिनें तिच्यावर रेघ ओढली. मग तिला वाटलें कीं, कांहीं तरी अक्षरें लिहावीं. तिनें चटकन् स्वतःचें नांव लिहिलें. 'कुमुद ...' पण तिचा हात तेवढ्यावर थांबला नाहीं. ती पेन्सिल फिरवीतच राहिली अन् अभावितपणें तिच्या हातून पुढचीं अक्षरें उमटलीं —

'घरभेदी...दुःस्वास करणारी...आपस्वार्थी...'

तिच्या हृदयांत जें डांचत होतें तें तिच्या नखाग्रापर्यंत येऊन पोंचलें होतें, हाच त्याचा अर्थ. ती त्या अकल्पित अक्षरांकडे बघतच राहिली. तिचें तिलाच नवल वाटलें. एवढ्यांत कुठूनतरी आत्मा तिथें आला. त्यानें ते शब्द वाचले. पाठोपाठ वामन आणि मनू हीं दोघें आलीं. त्यांनाहि ते त्यानें दाखविले. 'वामन, वामन, हें बघ वहिनीनें काय लिहिलं आहे!'

"घरभेदी...दुःस्वास करणारी...आपस्वार्थी...म्हणजे काय ग वयनी?" आत्मानें विचारलें.

आणि कां कोण जाणे! इतके दिवस कोंडून राहिलेली तिची रसवंती एकदम मोकळी झाली. तिनें आत्माला म्हटलें.

"भावजी, त्या माझ्या पदव्या आहेत."

"चल. असल्या कुठें पदव्या असतात होय ग? पदव्या म्हणजे बी. ए., एम्. ए., असल्या असतात. आमच्या शेजारचा शंकर पुण्याला शिकतो आहे. तो म्हणे पुढल्या वर्षी बी. कॉम्. होणार आहे." वामन्यानें आपलें बहुश्रुतपण वहिनीला ऐकवलें.

"अहो, चांगल्या माणसाच्या पदव्या चांगल्या, वाईट माणसाच्या वाईट."

"हट्, पुसून टाक त्या. तुला कोणीं वाईट म्हटलं?" वामन चटकन् पुढें आला आणि त्यानें कुमुदच्या हातांतल्या पाटीवरचीं तीं दुष्ट अक्षरें चोळून चोळून पुसून टाकलीं. मग तो कुमुदच्या दृष्टीला दृष्टि भिडवून म्हणाला.' बाकी तूं वाईट आहेसच म्हणा. गेले आठ दिवस तूं आमच्याशीं बोललीस तरी का?'

"हो ना. मी वाईट आहेच मुळीं. अन् दिवसेंदिवस अधिक वाईट होणार आहें. अन् मग काय करणार ठाऊक आहे?"

" काय करणार आहेस ग ? " आत्मानें विचारलें.

" घर फोडणार आहें. "

" हट्! घर फोडायला तें काय चिवूड आहे का तवसं ? " वामन्यानें शंका दर्शविली.

" अहो, घर फोडायचं म्हणजे मधें एक भिंत उभारायची. देवघरापासून तों पडवीपर्यंत, अगदीं घराच्या मधोमध." कुमुद न हसतां गंभीरपणें म्हणाली.

" कशासाठीं पण ? " आत्मा जिज्ञासला.

" तुम्हांला वेगळं करण्यासाठीं. तुम्हां सगळयांना त्या बाजूला टाकायचं अन् मी या बाजूला राहायचं. "

" एकटीच ? "

" वेडाच आहेस तूं आत्म्या. अरे, ती एकटी कशी राहील ? दादा असेल कीं तिच्या सोबतीला. " वामन्या बोलला.

" आपण नाहीं बा त्या बाजूला राहाणार. वैनी असेल तिथें मीं." आत्मानें आपला मनोदय सांगितला.

" पण मी दारच बंद करून घेईन मुळीं. " कुमुद गंभीरपणा न सोडतां म्हणाली.

" हात्तेच्या. एवढंच ना ? मी भिंतीवर चढून तुझ्याकडे उडी घेईन. "

" मी म्हणेन, ऊं हुं ! आत्मा भावजी, चालते व्हा माझ्या घरांतून. इथें तुमचं काम नाहीं. "

" अन् मी नाहीं गेलों तर—"

" मग चुलींतलं कोलीत काढीन. "

" अरे बापरे ! नको रे बाबा. मग मी पळेन. मला आठवण आहे. आईनं एकदा माझ्या हाताला कोलीत लावलं होतं. असा चुरका बसला म्हणतेस ! हा एवढा फोड आला. सुपारीएवढा. बघ ना, डाग आहे हातावर... "

" होय ना ? मग मी दुसऱ्या हातावर देईन. "

" तें नको सांगूं. मी मुळीं गडू भरून पाणीच घेऊन येईन. तूं कोलीत काढलंस, कीं त्यावर ओतायचं, कीं फुस्स...कोलीत विझलं. मग काय करशील ? "

आतां मात्र कुमुदला गंभीरपणा टिकवणें जड झालें. ती एकदम हसली. त्या निरागस मुलाच्या कल्पकतेबद्दल तिला कौतुक वाटलें. काहीं झालें तरी

तो तिला सोडायला तयार नव्हता. ती उत्तर न देतां नुसतीच हसत राहिलेली पाहून आत्मा पुन्हा तिला म्हणाला.

"सांग ना. कोलीत विझवलं म्हणजे मग काय करशील ?"

"मग होय ! चुडकुल्यांतला लाडू काढून हातावर ठेवीन. म्हणेन आत्मा-भावजी, शिंकयाखालीं बसून खा अन् हात पुसून पळा."

"त्यालाच तेवढा लाडू देशील होय ग ! अन् मला..." मनूनें आपलें घोडें पुढें दामटलें.

"माझ्या छकुल्या मनूवन्संना कशी चुकवीन मी ! तुम्हांला पण देईन."

आणि कुमुदनें अंगावर रेलणाऱ्या मनूला चटकन् जवळ ओढली. ती कुमुदच्या भुजबंधांत सुखावली अन् तिचे तोंडावर भुरभुरणारे केस मागें सारूं लागली.

"तूं बोलशील ना आतां आमच्याशीं ? 'गट्टी फू' नाहीं ना करणार ?"

"नाहीं हो वन्संबाई, बोलेन मी तुमच्याशीं. मला तरी बोलल्यावांचून कुठें बरं वाटतं ?" आणि तिनें मनूला अधिकच हृदयाशीं आवळली.

एवढा वेळ कुमुद उपरोधानें बोलत होती. विश्वनाथानें केलेल्या मिथ्या दुष्ट आरोपांना आत्मनिंदेच्या द्वारें प्रत्युत्तरें देत होती. विश्वनाथ तिच्या समोर नव्हता. पण नसेना का ! तिला कुठून तरी मनावरचा ताण दूर करायचा होता. पण आत्मानें, मनूनें तिच्या उपरोधाला निराळेंच वळण दिलें. तीं तिचा घरभेदीपणा, दुष्टपणा, मानायलाच तयार होईनात. विश्वनाथानें तसा घाव घातला होता. मुलांनीं असा घातला. पण मुलांचा घाव गोड होता. त्यानें रक्त काढलें नाहीं, तर सहानुभूतीचा द्रव फोडला. त्यामुळें कुमुद एकदम निराळी झाली. 'शहाणीं माणसें कांहींहि म्हणोत ; पण या निरागस पोरांच्या मनांत आपल्याविषयीं किंतु नाहीं, यांच्या हृदयांतला देव मला ओळखतो,' या जाणिवेमुळें कुमुदचे नेत्र झरझरूं लागले.

"वैनी, तूं रडतेस ?" आत्मा उचंबळून म्हणाला.

"तुला भूक लागली ?" मनूनें जिवणीचा चंबू करून विचारलें.

भूक लागली, ती असह्य झाली, कीं रडायला येतें एवढेंच त्या सहा वर्षांच्या पोरीला ठाऊक होतें. एका दृष्टीनें खरें होतें तें. कुमुदलाहि भूकच लागली होती. गोड शब्दांची, मधुर स्मिताची, सानुनय प्रेमाची. विश्वनाथानें तिला

त्या बाबतींत उपाशी ठेवलें होतें. आज अन् कालच नव्हे, तर त्या घरीं आल्यापासून. हा लादलेला उपास आज तिला असह्य झाला होता. आतां त्या मुलांनीं तिला जे दोन अमृताचे थेंब पाजले, तेवढ्यानें तिला बरें वाटलें होतें, पण उपास फिटला नव्हता.

आत्माला वाटलें कीं, वैनी रडते हें शेजारीं जाऊन आईला सांगावें. तो मागीलदाराच्या पडवीवरून घरांत शिरतो, तों त्याला दाराआड विश्वनाथ दिसला. आत्माला पाहतांच आपण जणूं त्या गांवचेच नव्हे, अशा रीतीनें तो आंकडीची कोयती ओढून बाहेर चालूं लागला.

"दादा वैनी रडते आहे. तूं बघ. ये. तिला विचार कां रडतेस म्हणून. आम्हांला सांगत नाहीं ती." आत्मानें त्याला म्हटलें. नुसतें तसें म्हणूनच तो थांबला नाहीं, तर त्यानें विश्वनाथाला अडवण्याचाहि प्रयत्न केला. पण विश्वनाथानें त्याचा हात झिडकारून कुळागराची वाट धरली.

तास दीड तासानें तो परत आला. येतांना त्याच्या हातांत नुकतेंच तोडलेलें एक पिवळें धमक केवड्याचें कणीस होतें. त्याची प्रत्येक पाकळी अर्धवट उमललेली असल्यामुळें तें मोठें देखणें दिसत होतें आणि त्याचा घमघमाटहि सुटला होता. कुमुद एकटीच पाटावर अळकुड्या धुवीत होती. तिच्यापुढें उभें राहून त्यानें तें कणीस तिच्यापुढें धरलें.

"घे...घे ना!"

कुमुदनें हात पुढें करून तें घेतलें. एकदा विश्वनाथाकडे अन् एकदा त्या कणसाकडे पाहून ती म्हणाली,

"यांत कांहीं अभिप्राय आहे का! म्हणजे कांटेरी माणसाला कांटेरीच फूल......"

"अभिप्राय आहे; पण तूं म्हणतेस तसा नव्हे. बाहेरून कांटेरी दिसणाऱ्या या पातीच्या आंत एक मृदु परागमय अशी कांजीण असते. वरून दिसत नाहीं ती. पाकळ्या उलगडून ती आंत शोधायला हवी."

"कधीं शोध लागला हा?"

"आजच, थोड्या वेळापूर्वी. कांहीं तरी निमित्त घडतं अन् कसला तरी विलक्षण शोध लागून जातो म्हणतात ना? खरं आहे तें!"

# कसोटी : : ८ :

बापू बेळगांवला आले ते गृहकलहाला कंटाळून आणि संसाराचा सगळा भार आपल्या कर्त्या मुलावर सोंपवून. त्यांचें आणि मुलाचें अलीकडे व्यवहारांत पटेनासें झालें होतें. संसाराच्या बाबतींत त्यांच्या समजुती आणि आडाखे ठरलेले होते. त्याच धोरणानें ते वागत आले होते. पण मुलाला त्यांचे संकेत मान्य होईनात. तो 'नवें धोरण आणि नवें तोरण' बांधायला निघाला. आणि तिथेंच बाप-लेकांचें खटकूं लागलें. बापूंनीं विचार केला. 'हें बरें नव्हे, आपण दोघांनीं तोंडातोंडी करायची आणि लोकांनीं मजा बघायची ; त्यापेक्षां आपणच कड काढावी अन् मुलाला मोकळीक द्यावी. डोळयांआड मसण पाड !'

बेळगांवांत कुठें त्यांची ओळखदेख नव्हती. त्यांना एवढेंच ठाऊक होतें कीं, आपल्या एका भाच्याची म्हणजे दूरच्या एका बहिणीच्या मुलाची तिथें एक खानावळ आहे ; आणि ती चांगली चालली आहे. तेव्हां पहिल्या प्रथम पडशी टाकायला तिथें जावें आणि तिथून मग पुढचा विचार करावा, अशा विचारानें बापू त्या 'सुग्रास भोजनालयां'त दाखल झाले.

'या मामा' म्हणून गणपतीनें त्यांचें स्वागत केलें. त्यांच्या आगमना-बद्दल आनंदहि व्यक्तविला. बायकोला हाक मारून तो म्हणाला, 'हे माझे मामा. गोव्याहून आले आहेत.' मुक्ता नमस्कारासाठीं ओणवली.

कौतुकाच्या दृष्टीनें तिची विनम्र काया न्याहाळून बापू आशीर्वाद पुट-पुटले, 'पुत्रवती भव !'

गणपति बापूंना म्हणाला, 'मामा, घर तुमचं आहे. संकोच करूं नका. परत जाण्याची घाईहि नको. आरामांत रहा. तुमच्या आशीर्वादानं घरांत कांहीं उणं नाहीं.'

बापूंना तें थोड्याच वेळांत पटलें. खरोखरच त्या घरांत काहीं कमी नव्हतें. ते घराच्या सगळ्या भागांतून एकदां डोकावून आले. स्वयंपाक-घरांतल्या चुलाण्यावर तपेलीं-पातेलीं चढलेलीं होतीं. जेवणघरांत मोलकरणी भाजी चिरून परातींत ढीग रचीत होत्या. पुढच्या दारापासून परसदारापर्यंत सगळीकडे नोकर वावरत होते.

दहा वाजल्यापासून जेवणारी मंडळी जमूं लागली. वाढपी आणि खटपटे यांची धावपळ सुरू झाली. पाट खडखडूं लागले. ताटवाट्यांचे आवाज खण-खणूं लागले. पंक्तीमागून पंक्ती बसूं उठूं लागल्या. तें भोजनचक्र वेगानें फिरूं लागलें. पहिल्याच पंक्तीला कढत कढत जेवून बापू बाहेर आले आणि गल्ल्यावर बसलेल्या गणपतीच्या शेजारीं स्थानापन्न झाले. 'माझे मामा' म्हणून तो गिऱ्हाइकांना त्यांची ओळख करून देऊं लागला. बापूंनीं एक एक करून जेवणारांची गणति केली, ती सव्वाशेंच्या वर भरली. ते मनांत म्हणाले, 'गणपतीनें धंद्याचा जम चांगला बसविला आहे. आईनें कठीण प्रसंगीं सुरू केलेल्या व्यवसायाला लेकानं तिच्यामागून एवढं स्वरूप आणलं म्हणजे कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे.'

नाना वेषांचे आणि नाना पेशांचे लोक त्या खानावळींत जेवायला येत. अनेक भाषा बोलत. अनेक विषयांवर चर्चा करीत. बापूंना रोज नवे नवे संवाद ऐकायला मिळत. आजवर त्यांच्या कल्पनेंतहि नसलेल्या किती तरी गोष्टी त्यांच्या कानीं पडत. जसें दुपारीं तसेंच रात्रीं. त्यामुळें बापूंचा दिवस कसा चुटकीसरसा निघून जाई.

पण तिथें त्या एवढ्या रमण्यांत केवळ प्रेक्षकाची, केवळ श्रोत्याची भूमिका घेऊन स्वस्थ बसणें बापूंच्या स्वभावाला पटण्याजोगें नव्हतें. हातपाय न हालवतां आयतोबा बनून अन्न खाणें त्यांना मंजूर नव्हतें. भाच्याच्या घरीं आलों म्हणून काय झालें; मिठापुरता तरी उद्योग करायला हवाच.

आणि म्हणून गर्दीच्या वेळीं दुसऱ्या पंक्तीचा खोळंबा होतो आहे असें दिसलें कीं ते लगेच उष्ट्या ताट-वाट्या उचलण्यासाठीं ओणवत. सकाळीं भाजी चिरायच्या वेळीं एखादी विळी रिकामी पडलेली दिसली कीं स्वतः तिच्यावर बसत. धान्य निवडायला काढलेलें दिसलें कीं लगेच बाराबंदीच्या खिशांतला आपला चष्मा बाहेर काढीत.

गणपति कुठूनहि आंत आला अन् मामांचे हात कामांत गुंतलेले दिसले कीं त्याला तें बरें वाटत नसे. तो अंगावर आल्यासारखें करून त्यांना म्हणे.

" मामा, हें काय ! ठेवा पाहूं ती भाजी हातांतून. तुम्ही चार दिवस पाहुणे म्हणून आलां आहांत ते स्वस्थ बसून रहा. खाऊन पिऊन आराम करा. अहो, तुम्ही कामाला जुडायचं तर हे नोकर कशासाठीं ठेवायचे मग ? —उठा त्या विळीवरून. "

बापूंना उठणेंच भाग पडे. पण तसें करतांना ते आपली नापसंती त्याच्या कानांवर घातल्यावांचून रहात नसत.

" गणपति, तुझी अगदीं वेडगळ समजूत आहे. अरे, कामानें माणूस मरतो का झिजतो ? घरचं काम करायला रे लाज कसली ? हातापायांची जुडी करून नुसता बसलों म्हणून मला मास का चढणार आहे ? तुझ्या घरीं तूप-दूध खातों तें पचायला तरी हवं ना ? "

पण गणपतीला हा त्यांचा व्यवहारवाद मुळींच पटत नसे. खानावळ आपली असली तरी आपण तिच्यांत जातीनें राबणें हें कमीपणाचें आहे अशी त्याची समजूत होती. म्हणून तो बायकोलासुद्धा स्वयंपाकघरांत किंवा जेवण-घरांत फिरकूं देत नसे. तिचें ताट तिच्या खोलींत जायचें. बाईसाहेब जेवायला बसल्यावर नोकरांनीं त्या बाजूला धावपळ सुरू केलेली पाहून त्याच्या मुद्रेवर अभिमानाचें पाणी चढायचें. दिवसांतून तीन वेळां साडी-चोळी बदलणें आणि अधून मधून ठुमकत, मुरडत त्याच्या समोरून या खोलींतून त्या खोलींत प्रवेश करणें, एवढेंच सबंध दिवसाचें काम त्यानें तिच्यासाठीं ठरवून दिलें होतें.

बापूंना आठ दिवसांतच कळलें कीं, गणपतीचा सगळाच कारभार ' अलीशाही ' आहे. त्याला चाकराला पडचाकर हवेत. पैशांची फिकीर नाहीं. खिशांतून आणि गल्ल्यांतून नोटा काढून त्या मोडणें म्हणजे त्याच्या हातचा मळ. हा सगळा अधिक आणि अनाठाई खर्च तो केवळ आपल्या बडेजावा-साठीं करतो. आपल्याला लोकांनीं मोठा म्हणावें ही आकांक्षा त्याला दुर्दम्य आहे.

बापूंना एक दिवस थंडीपडश्याचा ताप आला, तर त्यानें त्याचा केवढा समारंभ केला! डॉक्टर काय घरीं बोलावला, इंजेक्शन काय द्यायला लावलें, पांचांची नोट काय त्याच्या खिशांत कोंबली—सगळेंच अजब! बापूंनीं विरोध केला, पण त्याला कोण जुमानणार! भाच्याकडे आले होते; त्यामुळें त्यांना तो करील ते सगळे सोपस्कार स्वीकारणेंच भाग होतें. त्यांना वाटलें कीं, एका दपू पैशांत आपल्याला आराम पडला असता. एक पैशाचा गवती चहा आणि एक पैशाची सुंठ! पण त्या जागीं या 'हुलसुंवार' पोरानें निष्कारण बारा रुपये पाण्यांत टाकले. अशानें हा दिवाळं काढायचा. छे! हें बरं नव्हे. हें बरं नव्हेच......

बापू मनांत म्हणत. 'खानावळीचा व्याप मोठा आहे खरा; पण त्या-साठीं एवढ्या नोकरांची मुळींच गरज नाहीं. माणसाला माणूस आदळतंय या घरांत. इतकी खोगीरभरती हवीच कशाला! जरा इकडे तिकडे डोकं हालवतात, आणि गिळायला बसतात. रांडेचे खातात त्याच्यापेक्षां नासतातच अधिक. भात उरला घाल म्हशीच्या आंबोणांत. भाजी उरली, दे फेकून. ताक उरलें, दे मोरींत ओतून. यांच्या बापाचं काय जातं! तो आचारी तर रिकाम्या हातानं कधींच बाहेर पडत नाहीं. लग्न नसलं तरी 'खटलं' आहेच त्याचं. अन् तें गणपतीच्या अन्नावर अविच्छिन्न पोसलं जात आहे. कोणाला ठाऊक आणखी कोणाकोणाचे संसार इथून पोसताहेत! आणि या वेड्याला त्याची दाद ना फिर्याद!

त्याला एक नाहीं लक्ष देणं होत; पण ही मुक्ता काय करते? काम तर करीत नाहीं; निदान देखरेख तरी! नुसती अचळागौर बसून रहाते अन् कंटाळा आला कीं पलंगावर लोळते. तेव अन् नखरे तेवढे पाहून घ्यावे. घरांतल्या गृहलक्ष्मीनें डोळे मिटून घेतले कीं 'अक्काबाई' आंत शिरायला नवस करायला नको. तिच्यापेक्षांहि गणपतीचाच दोष आहे हा. त्यानेंच जर अशी हिला पुजून ठेवली... '

बापू अनेकदा आपले हे विचार आडवळणानें गणपतीच्या कानावर घालीत. त्याचा अनागोंदी कारभार आपल्याला पसंत नसल्याचें दर्शवीत. पण गणपति त्याची हसून वासलात लावी.

" मामा, तुम्ही कशाला उगीच घोर लावून घेतां ? हें असंच चालत आलं आहे आणि असंच चालायचं. मोठ्या व्यवहाराला खर्चेहि मोठा असणारच. तुम्ही नका यांत लक्ष घालूं. "

गणपतीच्या स्वभावाचे एकेक पैलू बापूंना हळूहळू कळूं लागले. गणपति म्हणजे बेदरकार माणूस. बिथरला कीं तुकडा मोडून मोकळा. मग कुणाचाहि मुलाहिजा नाहीं. अन् भाळला तर शंभु महादेव ! फुकटखाऊ आणि सकटखाऊ असे किती तरी दोस्त त्यानें आपल्याभोंवतीं गोळा केले होते. त्यांनीं फक्त गणपतीला ' सावकार ' म्हणायचें अन् मग गणपतीनें त्या सर्वांचा सर्वभावें परामर्श करायचा. नाटकाला गेले कीं तिकिटासह चहापाण्याचा सगळा खर्च याचा. फिरायला गेले तरी तेंच आणि घरीं आले तरी तेंच.

चार-दोन दिवसांनीं रात्रीं माडीवर धिंगाणा असायचाच. दहा वाजतां एकेक टोळभैरव यायला सुरुवात व्हायची. चहाचें आचमन करूनच पत्त्यांचा अड्डा बसायचा. मध्यंतरांत उपीटाच्या बशा भरलेलीं ताटें कॉफीसह वर चढायचीं. पहांटे तीन वाजतां बैठक उठायच्या वेळीं, फिरून चहाची आपोष्णी हवीच. सिगारेटचीं पाकिटें किती भस्मसात् व्हायचीं त्याचा हिशेब नाहीं. आरड्या-ओरड्याला ताळतंत्र नसायचा. गणपतीला उद्देशून ' सावकार, सावकार ' हा शब्द सारखा घुमत रहायचा. गणपतीनें मग कुबेराला तुच्छ मानायचें. मुक्ता खालीं खोलींत तळमळायची. माजघरांत बापूंना आलोचन जागरण व्हायचें. ते त्रासून म्हणायचे, ' हीं लक्षणं ठीक नव्हेत. या पोराचं धड भलं दिसत नाहीं मला... '

बापूंना ही काळजी वाटत होती, ती आपलेपणाच्या पोटीं. त्यांनीं ती एक दिवस मुक्तेच्या कानांवर घातली— " मुक्ता, काय चाललं आहे तिकडे लक्ष आहे का तुझं ? आयापेक्षां व्यय अधिक. खर्चाला विवेकाचा लगाम नाहीं. अशानें कुबेरालासुद्धा भीक लागेल. तूं गाफील राहूं नकोस. त्याच्या डोळ्यांत अंजन घाल. त्याला आवर... " पण या हितोपदेशाची प्रतिक्रिया बापूंच्या कानांवर आली ती ही—

" मामांना माझा उत्कर्ष पहावत नाहीं. ' ज्यानें न पाहिला आवा त्यानें पाहिला दिवा ' अशी अवस्था आहे मामांची. त्यांचे डोळे पापी आहेत. "

बापूंना तें लागलें. ते काहीं त्याच्या दारीं कायमचे पडून राहायला आले नव्हते. आज ना उद्यां ते आपला मार्ग पहाणारच होते. पण गणपतीची ही वृत्ति पाहिल्यावर ते तांतडीनें त्या कामाला लागले. त्यांनीं काहीं गृहस्थांच्या घरच्या देवपूजा पत्करल्या. सकाळच्या वेळचा धंदा झाला. आतां दुपारच्या वेळेसाठीं ते आणखी काहीं तरी पहाणार होते. जानवीं तरी करणार होते, पत्रावळी तरी लावणार होते, किंवा अन्य कांहीं श्रमाच्या भांडवलांत शक्य होईल तें. ते स्वतंत्र खोली मिळविण्याच्या प्रयत्नांत होतेच. पण ती मिळायच्या पूर्वींच अचानक एक दिवस त्यांना आपलें बिऱ्हाड मारुतीच्या माडीवर हालवावें लागलें. गणपतीनेंच त्यांचें उच्चाटन केलें. ते गेले त्याच्या बऱ्यासाठीं बोलायला ; पण माकडाला घर बांधायला उपदेश करणाराची जी स्थिति झाली तीच बापूंचीहि झाली.

जेवणघरांत रात्रीच्या पंक्ति बसल्या होत्या. वाढपी वाढीत होते. जेवणारे जेवत होते. त्यांतल्या एका गृहस्थानें आमटीचा भुरका मारण्यासाठीं वाटींत बोटें बुडविलीं तर त्यांत विडीचें थोटुक निघालें. त्या गृहस्थाला विलक्षण संताप आला.

"तुम्ही आचारी, वाढपी, माणसं आहांत का हैवान? आहे काय हा धंदा! मालक काय नुसता गल्लाच जमवतो? त्याचं लक्ष नको घरांतल्या कारभारावर? रुबाबांत मिरवलं म्हणून धंदा होत नाहीं. आम्हांला काय जनावरं समजतां तुम्ही?..."

वस्तुतः या वेळीं गणपतीनें चूक कबूल करून त्या गृहस्थाची क्षमा मागायची. पुन्हा असें होणार नाहीं असें नम्रपणें सांगायचें. पण गणपति होता घोड्यावर स्वार. त्याला वाटलें, आपला रुबाब काढणारा हा कोण तिमाजी! आणि त्यानें धंदेवाल्याला कदापि न शोभणारें असें उत्तर दिलें.

"रुबाब काढायची गरज नाहीं. पटत नसेल त्यानं वाट धरावी."

त्या गृहस्थानें उठून खरोखरच वाट धरली. गणपतीला त्याचें काहींच वाटलें नाहीं. पण बापूंना तें जिव्हारीं लागलें. एक गृहस्थ भरल्या पानावरून उठून जातो, ही घटना त्यांच्या दृष्टीनें गंभीर होती, अशुभ होती.

बापूंनीं त्याला कळवळयानें सांगितलें, 'बाबा रे, अन्नदात्याशीं माजूं नकोस.' पण गणपति त्यांच्यावरहि उलटला.

"मामा! भलत्या गोष्टींत चोंबडेपणा करूं नका. बघवत नसेल, ऐकवत नसेल तर तुम्हांलाहि रस्ता मोकळा आहे."

बापूंना आणखी शोभा नको होती. त्यांनीं दुसऱ्याच दिवशीं मारुतीची माडी गांठली. आणि पुढें चार दिवसांत शहापुरांत खोली मिळवून आपलें चंबूगवाळें तिकडे नेलें. मुलाला सोडून आले ते भाच्याची काय पर्वा करतील? एकटा जीव सदाशिव! त्यांना कांहीं कमी पडलें नाहीं. सात-आठ महिने निघून गेले. आणि बापूंनीं 'विनादैन्येन जीवनम्' एवढा आपला जम उत्तम बसविला. ते त्या 'सुग्रास भोजनालया'कडे कधीं फिरकलेसुद्धा नाहींत.

पण ज्याकडे त्यांनीं पाठ फिरविली होती, तिकडेच तोंड वळवण्याचा प्रसंग त्यांच्यावर येणार होता. नियति तो दिवस जवळ जवळ आणीत होती. बापूंना त्याची कल्पना नव्हती. त्यामुळें एका सकाळीं मुक्ता त्यांच्या दारीं हजर झाल्याचें पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. कोमेजलेली मुद्रा आणि कातर डोळे घेऊन ती बापूंकडे आली होती. बापूंना तिला तशी पाहून आश्चर्याबरोबर धक्काहि बसला. दूरची का असेना; पण मुक्ता त्यांची सून होती. तिच्या घरीं दोन महिने त्यांनीं अन्नहि खाल्लें होतें.

"कां ग? कां आलीस?"

त्यांनीं तिला विचारलें. पण मुक्तेच्या तोंडून शब्दच फुटेना. पाहतां पाहतां तिचे डोळे भरले आणि ओठाची पाकळी स्फुरूं लागली.

"हें काय, रडतेस कां तूं? गणपति बरा आहे ना?"

"ते कालपासून घरीं नाहींत. लोक म्हणतात कीं, फरारी झाले." आणि तिनें बाहेर फुटूं पाहणारा हुंदका ओंजळींत झांकला.

"म्हणत्येस काय तूं? पोरी, मला हें स्वप्न पडलंच होतं. त्याचा व्यवहारच गाढवासारखा होता. कोणाशीं भांडणबिंडण झालं का?"

" भांडण नाहीं, पण पेठेंतले व्यापारी गेले दोन-तीन दिवस घरीं येऊन त्यांना तगादा करीत होते. कोर्टांत खेचीन, हिंडलग्याला पाठवीन, जप्ती आणून भांडींकुंडीं बाहेर काढीन, असलें कांहीं तरी बोलत होते. "

" हूंऽऽ! इथवर आली का पाळी! म्हणजे देणं बरंच दिसतंय्. फार वाईट गोष्ट झाली. आपण काळं केलन् अन् तुला दिलन् तोफेच्या तोंडीं— "

" होय हो! आतां मी काय करूं? मी उघडी पडलें होऽऽ! अतां तुम्ही घरीं या अन् मला वांचवा. "

" मी काय करणार येऊन? आकाशच फाटलं तिथं ठिगळ कितीसं पुरणार! "

" असं नका म्हणूं. मी तुम्हांला घेतल्याशिवाय जायची नाहीं. आतां तुमच्यावांचून कुणाचाहि आधार नाहीं मला— "

आणि मुक्ता ओक्साबोक्शीं रडूं लागली. बापूंचें काळीज द्रवलें. आपल्या खोलीला कुलूप लावून ते तिच्याबरोबर निघाले. घरीं येऊन पाहतात तों सगळाच आनंद!

नोकरवर्ग गोठून बसलेला. चूल पेटवायची तर कोपऱ्यांत लाकूड नाहीं. कोठीच्या खोलींत उंदीर शेपट्या बडवताहेत. तांदुळांचा वषट्कार. कणकेचें पिंप तळाशीं गेलेलें. गल्ल्यांत तांबडी शिवराईसुद्धा नाहीं. सकाळचे आठ वाजलेले. अकरा वाजतां जेवणारांची झुंड लागायची. कसें तोंड द्यायचें या प्रसंगाला? त्या लोकांना घालायचें तरी काय आणि सांगायचें तरी काय? बापूंना वाटलें कीं, दारावर पाटी लिहून ठेवावी—

' अपरिहार्य कारणामुळें आजपासून सुग्रास भोजनालय बंद केलें आहे. '

पण तसें करायला त्यांचा हात धजेना. गणपति एक उधळलाच; पण मुक्ता मार्गे आहे. तिच्यासाठीं धंदा टिकवायलाच हवा. नाहीं तर घरांतलें पोळपाट-लाटणें घेऊन तिला दुसऱ्याच्या चुली फुंकण्याची वेळ यायची. त्यांना वाटलें, आजची दुपार म्हणजे परीक्षेची वेळ आहे. ही हुकली कीं धंदा बसला. त्यांनीं मग मुक्तेला म्हटलें.

" तुझ्याकडे या वेळीं किती पैसे आहेत? काय असतील ते काढ लवकर. "

तिनें इकडचे तिकडचे करून साडेदहा रुपये त्यांच्या हातावर ठेवले. स्वतःच्या कडोसरीचे दोन-अडीच रुपये बापूंनीं त्यांत मिसळले. त्यांनीं विचार केला कीं, एवढ्यांत मणभर लांकडें येतील. दोन पायल्या तांदूळ येतील. चूल चालू होईल. पुढचें पुढें पाहूं. ते त्याप्रमाणें कामाला लागले. त्यांनीं ती दुपार अन्नानिशीं पार घातली. त्यांना हायसें वाटलें. जरा धीरहि आला. तिसऱ्या प्रहरीं उठून ते पेठेंत गेले. जिथें जिथें गणपतीची खातीं होतीं त्या सर्वांना जाऊन भेटले. व्यापाऱ्यांनीं प्रथम त्यांचाच सूड काढला. बापूंनीं तें सगळें सोसलें, आणि त्यांचें बोलून झाल्यावर एकच मुद्दा ठामपणें त्यांच्यापुढें मांडला.

"...गणपतीचे सगळे अपराध मला मान्य आहेत. त्याच्याशीं व्यवहार करून तुम्ही गोत्यांत आलां आहांत हेंहि मी जाणतों. पण यांतून आतां कांहीं तरी मार्ग काढला पाहिजे. गणपतीचा धंदा आजपासून मी शिरावर घेतों. पूर्वीच्या येण्या-देण्या सकट. पण त्या कामीं मला तुमचा पाठिंबा हवा आहे. आणखी एकदाच तुम्ही मला महिनाभर पुरेल इतका माल उधार द्या. वाटल्यास दानावर दक्षिणा असें समजा. मी तुमचं पैन् पै देणं चुकतं करीन. दर आठवड्याला मागच्या देण्याचा ठराविक हप्ता तुमच्याकडे येत जाईल. तुम्ही म्हणाल, 'तुमचा तरी काय विश्वास धरावा?' अगदीं खरं आहे. पण व्यापार हा बहुतांशीं विश्वासावरच चालतो, हें मी तुम्हांला सांगायला नकोच. धान्याच्या पोत्यांत खडे निघाले तरी किती, फारच थोडे. बाकीचे सगळे दाणेच असतात. यांत काय तें समजा. चालत्या धंद्याला एकवार हातभार लावाल तर तुम्हीहि तराल अन् मुख्यतः गणपतीची बायको छपराखालीं राहील. माझ्यासाठीं नव्हे; तर एका असहाय्य स्त्रीसाठीं ..."

एकदोघे वगळले तर बाकीच्या व्यापाऱ्यांनीं बापूंची ही गोष्ट मान्य केली. ते रिक्त हस्तांनीं पेठेंत गेले होते; पण उभ्या महिन्याची तरतूद करून घेऊन घरीं आले. एखादा गड जिंकून आल्याचें त्यांना समाधान झालें. त्यांनीं कांहीं धोरणें मनाशीं निश्चित केलीं. त्यासाठीं त्यांना कठोर व्हावें लागणार होतें. फाजील सौजन्याला फाटा द्यावा लागणार होता. पण परिणामाच्या दृष्टीनें तें इष्ट होतें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर त्यांनीं प्रथम मुक्तेला बजावलें.

"भांगटिकली करून सुखासीन राहण्याचे तुझे दिवस आतां संपले. आजपासून तुझी नेमणूक स्वयंपाकघरांत. मला चार डोळे नाहींत. मी फक्त बाहेरचं तेवढं पाहूं शकेन. आंतलं सगळं तूं पाहिलं पाहिजेस. तिळाएवढी नासधूस होतां कामा नये. स्वयंपाकावर तुझी नजर आहे एवढ्या एकाच गोष्टीनें आचारी नीटपणें रांधील. मागच्या त्या विडीच्या थोटकाची गोष्ट स्मरणांत आहे ना ?"

मुक्तेनें मान तुकविली. ती अंग घुऊन स्वयंपाकघरांत दाखल झाली. बापू पूर्वी घरांत होते ते पाहुणे म्हणून. आज त्यांची भूमिका सासऱ्याची होती, मालकाची होती. या दोन भूमिकेंतला फरक तिला पदोपदीं जाणवूं लागला. पण करते काय ? तिला आतां त्यांची आज्ञा शिरसावंद्य करूनच रहायला हवें होतें.

चार दिवसांत जेवणाची तऱ्हा बदलली. चवींत पालट झाला. खानावळ खरी ; पण तिला बराच घरगुतीपणा आला. त्या गोष्टीचें समाधान बापूंना जेवणाऱ्यांच्या चर्येवर दिसूं लागलें.

गणपति पळाला तरी गिऱ्हाईक पळतां कामा नये अशी त्यांची जिद्द होती. ग्राहक हे आपले अन्नदाते आहेत आणि आपण त्यांची सेवा कर्तव्यबुद्धीनें बजावली पाहिजे ही जाणीव त्यांनीं अंतरांत जागती ठेवली होती. आणि म्हणूनच पंक्ती बसल्या कीं बापू जातीनें हजर राहून जेवणाऱ्यांची विचारपूस करीत. सगळ्यांचीं जेवणें झालीं कीं मगच ते स्वतः जेवावयाला बसत. एवढा वेळपर्यंत त्यांचें अन्न गारढोण झालेलें असे. पण तेंच त्यांना अमृतासारखें रुचकर लागे. आपण यज्ञशिष्ट अन्न सेवीत आहोंत अशी त्यांची भावना होई. 'ग्राहकांचें समाधान तोच आमचा लाभ' अशी त्यांना पाटी लावावी लागली नाहीं. तें त्यांनीं कृतीनें सिद्ध केलें आणि ग्राहकांच्या अंतरांत बिंबवलें.

पडता धंदा सांवरणें एवढा एकच निदिध्यास त्यांनीं घेतला होता. त्यामुळें जिच्या कल्याणासाठीं ते एवढा जीव आटवीत होते, त्या मुक्तेकडे लक्ष द्यायला त्यांना फुरसतच झाली नाहीं. किंबहुना तिच्यावर लक्ष ठेवण्याइतकी तिच्या जीवनांत उलथापालथ झाली आहे एवढेंसुद्धा त्यांना भावलें नाहीं. मुक्ता त्यांची आज्ञा पाळी, दिवसभर कामाला जुंपे, मामंजींचीं बोलणीं

खावीं लागूं नयेत म्हणून धावाधाव करी आणि रात्रीं अकरा वाजतां अंथरुणावर पडली कीं मग अश्रु गाळायला, दुःखें उकलायला स्वतंत्र होई. दिवा मालवला कीं बाहेरच नव्हे; तर तिच्या अंतरांतहि काजळी भरे.

पहिल्याप्रथम तिला विचार येई तो स्वतःचा—'आपल्या या जगण्याला कांहीं अर्थ आहे का?—' पण दुसऱ्याच क्षणाला स्वार्थ बाजूला पडून तिला गणपतीची चिंता लागे. तो कुठें गेला असेल? कुठें राहिला असेल? काय करीत असेल? शहाणपणानें असो अथवा मूर्खपणानें असो ज्यानें या घरीं मोती वेचले त्याला आतां एखाद्याच्या घरीं गोवऱ्या तर वेचाव्या लागत नसतील ना? जेवढे जेवढे तिला ठाऊक होते तेवढ्या सगळ्यांचीं घरें तिनें मनश्चक्षूंपुढें आणलीं आणि त्या प्रत्येक स्थळीं गणपतीला शोधलें. पण इथें नाहीं, तिथें नाहीं, कुठेंच नाहीं, असें तिचें मन तिला सांगूं लागलें.

"मग यानें अंगाला राख तर फासली नसेल? एखाद्या गोसाव्यांच्या तांड्यांत तर मिसळला नसेल? 'अलख निरंजन' बनून भीक तर मागत नसेल? असेल; शक्य आहे. पण त्याला किती दिवस झेपणार हें! जिवाची खराबी करून घेईल......" आणि तिचे हे विकल्प इतक्या उंचीवर चढले कीं लगेच बाष्परूप बनत आणि डोळ्यांवाटे झिरपूं लागत. ती कृश झाली होती. पिकुटली होती. तिच्या डोळ्यांतलें तेजहि मंदावलें होतें. तिला अन्न मिळत होतें; पण तिची खरी भूक होती सहानुभूतीची. बापूंना मायेचे डोळे होते; पण त्यावर व्यावहारिकतेची झांपड आली होती.

पण त्यावर दीडच महिन्यानें असा एक दिवस उजाडला कीं, बापूंना तिची चौकशी करावी लागली. मुक्ता त्या दिवशीं ठरलेल्या वेळीं स्वयंपाकघरांत कां हजर झाली नाहीं म्हणून ते तिच्या खोलींत गेले; तर त्यांना दिसलें कीं, ती पडून राहिली आहे. त्यांनीं विचारलें.

"कां ग, बरं वाटत नाहीं का?"

बापू आल्याचें पाहून मुक्ता उठून बसली; पण तेवढ्यांत तिच्या पोटांत कळमळून आलें आणि तिला मोरीकडे पळावें लागलें. थोडया वेळानें चूळ भरून जेव्हां ती परतली तेव्हां बापू तिला नखशिखांत न्याहाळून म्हणाले,

"पित्त झालं आहे तुला. थांब, मी माझ्या बटव्यांतली सूतशेखरची मात्रा देतों, तिचे दोन वळसे उगाळून घे."

बापूंनीं मात्रा दिली. मुक्तेनं ती दूधसाखरेंतून घेतली. पण ती चालली मात्र नाहीं. मुक्तेच्या घेऱ्या आणि वांत्या दिवसानुदिवस वाढतच चालल्या. वस्तुस्थिति अशी होती कीं, गणपति एका रूपानें परागंदा झाला असला तरी दुसऱ्या रूपानें मुक्तेच्या उदरीं येऊन बसला होता.

बापूंना जेव्हां हें कळलें तेव्हां ते बेचैन झाले. त्या रात्रीं त्यांना झोंप येईना. आतां एकाऐवजीं दोन जीवांची काळजी त्यांना करावी लागणार होती. पडत्या प्रसंगीं शिरावर घेतलेलें ओझें हलकें होण्याऐवजीं तें दिवसानुदिवस अधिक जड होऊं लागलें होतें. पण एकदा माथें दिल्यानंतर त्यांना तें आतां काढून घेणेंहि शक्य नव्हतें. तशानें मुक्ता निराधार झाली असती. अन् आतां तर ती सर्वस्वीं पराधीन होणार होती. बापूंनीं बराच विचार केला अन् शेवटीं ते म्हणाले. 'ईश्वराची इच्छा !'

त्यांनीं दुसऱ्याच दिवशीं तिला स्वयंपाकघरांतून बाहेर काढलें. "मुक्ता, यापुढें तूं चुलीकडे जायचं नाहींस. पण एक लक्षांत ठेव. गर्भारपण म्हणजे आजारपण नव्हे. झोडाझोडीचीं कामं करूं नकोस; पण हातपाय हलवीत रहा." मुक्तेला वाटलें कीं, बापू व्यवहारी असले तरी त्यांच्याहि काळजांत मायेचा झरा आहे. त्या वात्सल्याच्या ओझरत्या स्पर्शानें तिला भडभडून आलें.

विचित्र परिस्थितींत तिला हें गर्भारपण आलें होतें. तिला अपत्याची आलुकी होती, उत्कंठाहि होती. पण तें तिच्या पतीला घालवून तिच्या कुसव्यात प्रविष्ट झालें होतें. वस्तुतः पहिलटकरणीच्या सर्व मंगल भावना गर्भावर केंद्रित व्हायच्या. ती भावधारा प्रथम त्याच्या मुखांत पडायची. पण वर्तमान परिस्थितीमुळें तिचें मन द्विधा झालें होतें. अर्धें नवऱ्यामागून देशविदेश वळंघत होतें आणि अर्धेंच गर्भाकडे वळत होतें.

नवव्या महिन्यांत बापूंनीं तिला विचारलें. "बाळंतपणासाठीं माहेरीं जाणार आहेस का ? मला वाटतं, जाऊं नयेस. तुझ्या हातापायांच्या काड्या झाल्या आहेत. गाल बसले आहेत. अशा स्थितींत इथेंच तें होणं चांगलं."

तिनें बापूंचा विचार मानला. बापूंनीं गेले आठ महिने तिला खरोखरच मायेनें वागविलें होतें. तिला थोडीसुद्धा तोशीस पडूं दिली नव्हती. 'ठीक

आहे ना तुझं ?' म्हणून कुशल विचारल्याशिवाय तो कर्तव्यतत्पर आत्मा कधींहि झोंपायला गेला नव्हता. तिला त्यांची एकच गोष्ट पसंत नव्हती. आणि ती म्हणजे नवऱ्याबद्दलचा त्यांचा तिरस्कार. 'गाढव' या पदवी-खेरीज ते एकदाहि त्याच्याबद्दल बोलले नव्हते. "कशाला त्याच्यासाठीं झुरतेस ? तो त्याच लायकीचा आहे. वळ भागली म्हणजे येईल आपोआप परत. अन् न आला म्हणून कांहीं तूं उपाशी मरत नाहींस. देवाच्या दयेनें मुलगा होऊं दे. जन्माचे पांग फिटतील तुझे !"

आणि खरोखरच मुक्तेला मुलगा झाला. ती सुखरूप प्रसूत झाली. बापूंना अपरिमित आनंद झाला. मुक्ताहि आपलें विरहदुःख कांहीं काळ विसरली. बापूंनीं त्याचें बारसें केलें. सगळया ग्राहकांना पेढे वाटले. बारशाच्या दिवशीं सुग्रास भोजनालयाची पाटी मळकी झाली होती ती नव्यानें रंगवून दारावर लावली. त्या खानावळीचा धनी परागंदा झाला होता तो परत आला, असेंच जणूं त्यांना जगाला सुचवायचें होतें. त्यांना आंतबाहेर वावरतांना एक नवाच उत्साह आला होता. दुसऱ्याचा एक बालजीव वाढवून मोठा करायचा म्हणजे सामान्य गोष्ट नव्हे! आतां खरें म्हणजे त्यांची जबाबदारी दुप्पट झाली होती. पण त्यांना मात्र वाटलें कीं, आतां आपण या हरिहरांतून मोकळे होण्याच्या मार्गाला लागलों.

मुलाला पाळण्यांत घालून आणि बाळंतिणीच्या ओटया भरून शेजारच्या सवाष्णी जेव्हां निघून गेल्या तेव्हां मुक्ता एकटीच त्या खोलींत राहिली. तिचा बाळ मुठी वळून झोंपला होता. लोकांनीं दिलेल्या झबलीं, टोपरीं, बोंडलीं, खुळखुळे, खण इत्यादि वस्तू तिच्याभोंवतीं विखुरल्या होत्या. समईचा शांत, सौम्य प्रकाश त्या 'बाळसंतोषा'वर पसरला होता. मुक्तेनें एकवार त्या सर्व पसाऱ्याकडे अन् नंतर बाळाच्या चिमण्या मुखाकडे पाहिलें आणि नकळत तिच्या डोळयांचीं तळीं झालीं.

"आज हे असते तर बाळाच्या गळयांत सोन्याची सांखळी रुळली असती. सगळया ग्राहकांना जिलबीची मेजवानी झाली असती. माझ्यासाठीं जरीच्या लुगड्याची घडी घरांत आली असती. खानावळींतल्या नोकरांना बक्षिसं देण्यासाठीं त्यांनीं शंभरांची नोट सहज मोडली असती......"

बापूंनीं यांपैकीं कांहीं केलें नाहीं याचें तिला परम वाईट वाटलें. त्यांना हें सुचलें नाहीं का त्यांचें व्यवहारी शहाणपण आड आलें, तें तिला कसें कळावें!

मुक्तेला पुत्रजन्माचा आनंद झाला होता आणि तो तिच्या अष्टांगीं मावत नव्हता. पण तो व्यक्त करायला, वाढवून घ्यायला तिला प्रेमाची जागा मात्र नव्हती. तिला बाळाचें कौतुक होतें हें काय सांगायला हवें? पण या एकेरी कौतुकावर तिचें समाधान नव्हतें. दुसऱ्या कुणीं तरी आपल्याइतक्याच उत्कटपणें तें करावें आणि आपण तें पहावें यासाठीं तिचा जीव तहानला होता. पण तें ' कोणी तरी ' मात्र तिला कुठेंच दिसत नव्हतें.

तिला वाटे, आपला नवरा येऊन बाजेजवळ उभा रहावा. बाळाला पहाण्यासाठीं त्याचे डोळे अधीर व्हावे. बाळाचें मुख आपल्या पदराखालीं असावें. आपण त्याला थोडा दम धरायला सांगावें. ' चुक्' करून बाळानें शेवटचा घोट घेतल्यावर आपण त्याच्या जावळावरचा पदर दूर करावा. नवऱ्यानें झडप घातल्यासारखें करून त्याला उचलावें. आणि दुधाच्या ओघळांनीं चिकट, पांढुरक्या झालेल्या त्याच्या गालावर आपले ओठ टेकावे...

असे कल्पनेचे मनोज्ञ खेळ खेळतांना तिला असेंहि कित्येकदा वाटे कीं खुंटावरच्या कावळयानें, अंगणांतल्या चिमणीनें—कुणी तरी उडून त्याच्या कानांत ही वार्ता घालावी. ' अहो, अहो! तुमच्या घरीं बाळ झाला आहे. चला लवकर. असाल तसे निघा. बाळाची आई डोळयांत प्राण गोळा करून बसली आहे......' मग ते येतील. बाप-लेक भेटतील. मी बाळाला त्यांच्या स्वाधीन करून म्हणेन, ' तुमचा वंशाचा दिवा तुम्ही सांभाळा. माझ्या एकटीवर जबाबदारी नको. '

पण बाळ पालथा वळला तरी गणपतीचा पत्ता लागला नाहीं. तो रांगूं लागला तरी तो आला नाहीं. त्यानें पहिलें पाऊल टाकलें, तरी त्याचा पाय घरांत पडला नाहीं. त्याचा ' दाद्दाऽ ' हा लाडिक शब्द तिला एकटीलाच ऐकावा लागला. ती आग्रहानें म्हणे, " आतां तरी हे आलेच पाहिजेत. उद्यां बाळ मोठा झाला शाळेंत जाऊं लागला, तुला बाप नाहीं म्हणून मुलं म्हणूं लागलीं, ' बापाचं तोंड तरी पाहिलं आहेस का, ' म्हणून हिणवूं लागलीं कीं

त्याचं तोंड किती गोरंमोरं होईल! तो माझ्या गळ्याला विळखा घालून नाना प्रकारचे प्रश्न विचारूं लागला तर मी त्याला कसं संबोखूं... ”

बापू बाळाचें कौतुक करीत नव्हते असें नाहीं. पण तें सगळें दुरून दुरून चाले. त्यांना माया होती; पण आंतला जिव्हाळा नव्हता. असें असलें तरी त्याला ते अणुमात्र उणें पडूं देत नव्हते. त्यांनीं त्याचा पहिला वाढदिवस गोडधोड करून साजरा केला आणि त्या दिवशीं मधल्या वेळीं मुक्तेला सांगितलें—

“ आज बाळाच्या नांवें पांचशें रुपये बँकेंत टाकून आलों. जगलों वांचलों तर दर वर्षीं हाच क्रम चालू ठेवीन. हें धन त्याच्या शिक्षणासाठीं. तो गणपतीसारखा गाढव राहातां कामा नये.”

मुक्तेला बापूंच्या या कृतींतलें हृदय कळलें. तिला बरें वाटलें. मात्र आजच्या वाढदिवसाला गणपति असता तर त्यानें बँकेंत पैसे ठेवण्याऐवजीं बाळाच्या हातांत सोन्याचीं कडीं करून घातलीं असतीं, असा विचार त्याच वेळीं तिच्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. अशा रीतीनें पदोपदीं ती गणपतीची आठवण काढीत होती.

त्यानंतर आणखी सहा महिने लोटले आणि दैवानें तिला आपला नवा पवित्रा दाखविला. गणपति एका रात्रीं रस्त्यांतली रहदारी बंद झाल्यावर घरीं आला. बापू रोजकीर्द करण्याच्या बेतांत होते. एवढ्यांत बाहेर दार वाजलें. ‘ कोण आहे ? ’ म्हणून ते त्रासिक मुद्रेनें उठले, आणि त्यांनीं कडी काढून दार किलकिलें केलें. तेवढ्यांत गणपति आंत घुसला.

“ कोण गणपति का रे ? ” बापूंनीं त्याला ओळखून विचारलें.

“ होय. मी गणपतिच.”

बापू त्याला आपादमस्तक न्याहाळूं लागले. पूर्वींचा गणपति आणि आतांचा गणपति यांच्यांत चांगलीच तफावत होती. तलम धोतराच्या जागीं आतां पायजमा चढला होता. गरम कोटाच्या ऐवजीं जाड्याभरड्या सदऱ्यावर काम भागलें होतें. डोक्यावर टोपी होती, पण तीहि मळकट. बोटांतल्या आंगठ्या बेपत्ता झाल्या होत्या. भोगलेले कष्ट अन् सोसलेल्या विपदा त्याच्या चेहऱ्यावर मुद्रित झाल्या होत्या. तो जातांना होता त्यापेक्षांहि सर्वार्थीं कफल्लक होऊन आला आहे हें बापूंना कळायला वेळ लागला नाहीं. पण कांहीं

असलें तरी तो आला हेंच त्यांना अधिक होतें. मुक्तेचा जीव आतां खालीं पडेल असें त्यांना वाटलें आणि ते त्याचें स्वागत करून म्हणाले.

" बैस. "

गणपति बसला. खालच्या मानेनें आणि मिटल्या तोंडानें. " कुठून आलास ? " या बापूंच्या प्रश्नाची त्यानें मौनानेंच संभावना केली. बापूंनीं दाराशीं तोंड नेऊन हांक मारली.

" मुक्ता, बाहेर ये. गणपति आला आहे. "

मुक्ता बाळाला मांडीवर घालून थोपटीत होती. बापूंची हाक येतांच अर्धवट झोंपल्या अवस्थेंतच तिनें मुलाला उचलून खांद्यावर टाकलें आणि ती लटलटत्या पायांनीं बाहेर आली. उंबरा ओलांडून तिनें बांकावर बसलेल्या गणपतीच्या मुद्रेकडे टक लावली. त्याचीहि नजर तिच्यावरच खिळली. बापू त्या दोघांकडे आळीपाळीनें डोळे वळवूं लागले. तिघांच्याहि अंतरांत नाना-विध भावनांच्या लाटा उठत होत्या. पण त्या ओठांच्या किनाऱ्यावर मात्र येईनात. कांहीं क्षण एक असह्य अशी स्तब्धता तिथें दाटली. शेवटीं गणपतीनेंच तिचा भंग केला. त्यानें मुक्तेला विचारलें, ' हें मूल कोणाचं ? '

बाळ पेंगुळलेल्या अवस्थेंत होता. त्याचें डोकें मुक्तेच्या खांद्यावर विसावलें होतें आणि पाय लुगड्यावर लोंबत होते. एक हात त्याच्या चड्डीखालीं आणि दुसरा त्याच्या पाठीवर, अशा स्थितींत तिनें तें जिवाआगळें ओझें सांवरून धरलें होतें. याउप्पर गणपतीच्या प्रश्नाला तिनें तोंडानेंच उत्तर द्यावयाला हवें होतें का ? पण ती बोलत नाहीं हें पाहून गणपति डोळे मोठे करीत तिच्यावर खेंकसला.

" बोल कीं ! अशी दांतखीळ कां बसली ? "

" अरे, कुणाचं म्हणून काय विचारतोस ? तुझंच आहे तें. मुलगा आहे पहा सोन्यासारखा. " मुक्तेऐवजीं बापूंनींच त्याला वस्तुस्थिति ऐकवली.

" माझा मुलगा ? " गणपतीनें बापूंकडे रोख वळविला.

" होय, तुझाच ? या घरांत दुसऱ्या कुणाचा मुलगा असणार ! " बापू स्मित करीत म्हणाले.

गणपति दोन पावलें बापूंकडे अधिक सरकला. तिरका होता तो सन्मुख झाला.

" मामा, मला काय बोळयानं दूध पिणारं कुकुलं बाळ समजतोस तूं? खानावळ लाटलीस ती लाटलीसच ; वर आणखी माझी बायकोहि लाटून बसलास? लाज वाटली नाहीं थेरड्या तुला? अन् या वयेलासुद्धा— "

" गणपति, गणपति! काय बोलतोस तूं हें? अरे, जनाची नाहीं तर निदान... "

बापूंच्या शब्दांत कळवळा भरला होता. गणपतीनें त्यांच्या कल्पनेच्या बाहेरचा हा घाव त्यांच्यावर घातला होता. त्या आरोपानें त्यांचें अंतःकरण आंतून पिळवटत आहे हें त्यांच्या मुद्रेवरून कळून येत होतें. त्यांनीं दृष्टि खालीं करून मान हालवली आणि हातांनीं हतबुद्ध झाल्यासारखें दाखविलें.

पण गणपति काय तेवढ्यावरच स्वस्थ बसेल! त्याचा तवा चांगलाच तापला होता.

" खरं बोलायला मला कुणाच्या बापाची भीति नाहीं. माझ्या नांवावर आपलं पाप पचवूं पहातोस काय? "

" तोंड संभाळून बोल. गणपति, तोंड संभाळ. असलं अभद्र बोलूं नको. तें बऱ्याला पडायचं नाहीं. "

" कां म्हणून तोंड संभाळूं? मी ओरडून गांव गोळा करीन. जगाला तुमच्या तोंडावर थुंकायला लावीन. समजतां काय तुम्ही? "

एवढा वेळ थिजून शिशासारखी जड झालेली मुक्ता एकदम भानावर आली.

" पायां पडतें तुमच्या, पण असलं काहीं घाणेरडं बोलूं नका! मामंजी-बद्दल असं बोलेल त्याची जीभ झडेल, समजलं? झालं गेलं गंगेला मिळालं. आतां तरी शहाणे व्हा. घरीं पाय ठेवलांत तों एकदम रान उठवलंत. कसलं तुमचं मन हें! मामंजी त्या प्रसंगाला धावले, त्यांनीं या पडत्या गाड्याला मान दिली, म्हणून तुमची बायको घराच्या आढ्याखालीं अब्रूनिशीं जगली. म्हणूनच तुम्हांला हें हक्काचं दार उघडं राहिलं. कातड्याचे जोडे करून त्यांच्या पायांत घातलेत तरी त्यांचे उपकार फिटणार नाहींत. चुकलों म्हणा आणि पाय धरा त्यांचे— "

" या हलकटाचे मी पाय धरूं? तूं धरतेस, चाटतेस तेवढे पुरे नाहींत का? उपकार तुझ्यावर केले त्यानें. बरोबर आहे. मुलगा दिला ना तुला! "

" तुम्हांला काय वेड लागलं आहे का ? कुठून हें विष चढलं तुमच्या डोक्यांत ? बघा ना एकदा बाळाकडे ! बघा. मन शांत करून, दृष्टि शाबूत ठेवून बघा. "

मुक्तेनें दोन पावलें पुढें होऊन बाळाचें डोकें वर उचललें आणि त्याला सामोरें केलें. " बघतों, बघतों. चांगलंच बघतों त्याला. " म्हणून गणपति एखाद्या देवचारासारखा दोन्ही हातांचे पंजे जवळ आणीत मुक्तेच्या अंगावर झेपावला. त्याचे ते अर्धचंद्राकृति हात बाळाच्या गळयाजवळ येत आहेत, हें पाहून मुक्ता एकदम किंचाळली. तांतडीनें उंबऱ्याच्या आंत जीव घालून तिनें माजघराचें दार धाडकन् बंद केलें.

तिच्या ओरडण्यानें शेजारचे लोक धावून आले. मुक्ता आंत गेल्यावर गणपति बापूंवर उलटला. लोकांनीं पुढें होऊन त्यांना सोडवून घेतलें. प्रथम थोडा वेळ थपडांचे आवाज उठले. मध्येंच गलका...मध्येंच बापूंचा आवाज... मध्येंच गणपतीचा अविवेकी आक्रोश. नंतर तो गलका दाराशीं गेला. पुढें रस्त्यावर पोहोंचला. नंतर क्षीण झाला आणि थोड्या वेळानें पूर्ण थांबला. शेवटीं घराचें पुढचें दार लागलें. मुक्तेनें हें सगळें भयाकुल होऊन ऐकलें. आजच्याइतका भयकंप तिनें गणपति परागंदा झाला त्या वेळींहि अनुभवला नव्हता. वाट पाहून डोळे थकल्यावर तो आला होता. पण आल्या आल्या बाळाच्या जिवावर अन् तिच्या शीलावर उठला होता. कसें सहन करावें हें तिनें ?

बाहेर सर्व शांत झाल्यावर बापू जेव्हां तिच्यापुढें जाऊन उभे राहिले, तेव्हां तिनें क्षीण आवजांत त्यांना विचारलें, " ते गेले ?— बरं झालं ! फार चांगलं झालं ! – मामंजी, पोर दुर्भागी हो ! बापाचं सुख नाहीं त्याच्या नशिबांत – "

आणि एवढा वेळ दाबून ठेवलेला तिचा उमाळा एकाएकीं बाहेर फुटला. बापूंचीहि दशा दीन, करुण झाली. त्यांचेंहि अंतर द्रवलें, कालवलें अन् पाझरूं लागलें. मुक्तेची ती घायाळ अवस्था त्यांना पाहवेना. त्यांना वाटलें, जवळ बसावें अन् पोरीच्या पाठीवरून मायेचा हात फिरवावा. पण गणपति नुकताच जें गरळ ओकला होता तें अजून त्यांना पचलें नव्हतें. त्यामुळें मनांत येऊनहि त्यांचा हात तसें करायला धजला नाहीं. बाहेर येऊन आंथरुणाला पाठ लावण्यापूर्वीं देवाला हात जोडून ते उद्गारले —

" देवा, भलेपणालासुद्धा तुझ्या राज्यांत हींच फळं का ? का तूं माझी कसोटी पहातोस ? "

---

## पर्जन्यकुंड : :१:

चंद्रेश्वराच्या देवळांत आज सगळ्या ग्रामस्थांची सभा भरली होती. खोतांच्या घरच्या गड्यानें सकाळींच गांवांत हिंडून घरटी आमंत्रण दिलें होतें. देऊळ गांवाच्या मध्यभागीं होतें. त्याचा सभामंडप विस्तृत होता. गांवांतलीं कथा-कीर्तनें, मेळे, पंचायती, वगैरे सार्वजनिक कार्यक्रम देवळांतच होत असत. चंद्रेश्वर त्या गांवचा मुख्य देव होता. आसपासच्या पंचक्रोशींतहि एक जागृत देवस्थान अशी त्याची ख्याति होती. त्याच्या साक्षात्काराच्या अनेक गोष्टी लोकांच्या मनींमुखीं घोळत होत्या. त्यामुळें ग्रामस्थांच्या मनांत त्याच्याविषयीं अलोट भक्तिभाव वसत होता—केवळ भक्तीच नव्हे तर भयहि. चंद्रेश्वराच्या पुढें उभें राहून खोटें बोलायला कोणाचीहि जीभ धजत नसे.

संध्याकाळचे पांच वाजले. सूर्याचीं उन्हें मऊ मऊ होत पश्चिमेकडच्या माडांच्या शेंड्यांवर चढलीं. लांब लांब सावल्या जमिनीवर लोळूं लागल्या. ग्रामस्थ मंडळी चोहों बाजूंनीं देवळाकडे जाण्यासाठीं निघाली. त्यांतले जे वयोवृद्ध होते, जबाबदार होते आणि सभेंतले बोलके होते ते थेट देवळांत जाऊन बैठकीवर बसले. बाकीचे बाहेरच दरवाज्यांत घोटाळत राहिले. कांहीं जण पायऱ्यांवर बसले. कांहींनीं दीपमाळेचा चौथरा धरला. कांहींनीं तुळशी–वृंदावनाभोंवतीं कडें केलें. कांहीं आंगणाच्या मेरेवर तर कांहीं समोरच्या तळ्याच्या रुंद पाळीवर चढून बसले. सभेला सुरुवात होण्यापूर्वी हवें तिथें बसायला अन् हवें तें बोलायला त्यांना परवानगी होती. पण आज सर्वांच्या तोंडीं एकच विषय होता अन् तो म्हणजे अवर्षण!

गेल्या पन्नास–पाऊणशें वर्षांत इतकें उग्र, भीषण अवर्षण त्या गांवावर पडलें नव्हतें. दरवर्षी कृत्तिका नक्षत्रांत वळवाच्या पावसाची एखादी सर झडझडून यायची आणि त्यामुळें विहिरींतले आटते झरे जिवंत व्हायचे. यंदा

ती सर पडली नाहीं. लोकांना जरा अस्वस्थ वाटलें. पण तें त्यांनीं विशेषसें मनावर घेतलें नाहीं. कारण रोहिणी पुढें होत्या. अन् त्यांनींहि जरी धरणी ओली केली नाहीं तरी मृगाची खात्रीच.

पण तिथेंहि भरंवशाच्या म्हशीला टोणगा झाला. मृगाच्या पुढचीं नक्षत्रेंहि एकामागून एक कोरडीं जाऊं लागलीं. वातावरणांत आग उठत चालली. धरतीची तहान अनावर झाली. तिच्या लेंकरांचीहि टाळू सुकण्याची वेळ आली. सगळे लोक एकमेकांना विचारूं लागले कीं, 'पाऊस कुठल्या देशांतराला गेला?'

चंद्रेश्वराच्या समोरचें तळें म्हणजे गांवकऱ्यांची अमृताची सांठवण. पण त्यांत आतां फक्त ओला चिखल तेवढा उरला होता. त्याच्या शेजारच्या वृन्दावनांतली तुळस कोमेजून तिचीं पानें पिवळीं झालीं होतीं. सभोंवतींचीं केळी–पोफळींचीं आगरें पाण्यासाठीं मुका आक्रोश करीत होतीं. त्यांना शिंपणें घालायचें तर विहिरी केव्हांच कोरड्या पडल्या होत्या. त्यांतले बेडूक तिन्हीसांजा 'डरांव डरांव' ओरडत होते तें ऐकवत नव्हतें. चुळका चुळका पाण्यासाठीं माणसें या बावीवरून त्या बावीवर अशीं गांवभर भटकत होतीं. मृगाच्या तोंडावर घरोघरीं लोकांनीं दोडके, काकडी, पडवळ यांच्या बिया परसांत पुरल्या होत्या. विरीच्या द्रोणांतून मुलांबाळांनीं पाणी घातल्यामुळें त्यांचे हात हात वेलहि वाढले होते. पण पुढें उन्हाच्या धगींत ते पार करपून गेले होते. कोका पक्षी प्रथम प्रथम रोज रात्रीं 'कोक्–कोक्' आवाज करीत समुद्राकडे उडत होता आणि पाऊसकाळाची सूचना देत होता. पण अलीकडे तोहि निराश होऊन आपल्या घरट्यांतच बसून राहिला होता.

छे! ही परिस्थिति असह्य होती. हा दैवी कोप अति दारुण होता. लोकांना पुढचें भविष्य भयानक दिसत होतें. लोक बाहेरून उन्हानें अन् आंतून चिंतेनें तापत होते. आणि आज याच गोष्टीचा विचार करण्यासाठीं चंद्रेश्वराच्या देवळांत सभा भरणार होती.

हा आला, तो आला, असें करतां करतां चंद्रेश्वराचें अंगण गजबजलें. एवढ्यांत दिगंबरहि आला. अंगांत फाटका सदरा, डोक्याला तेलकट, काळी टोपी आणि तुटलेल्या कडांना गांठी दिलेला जेमतेम गुडघ्याखालीं पोहोंचेल

असा चवाळी पंचा अशा वेषांत ती स्वारी आलेली पाहतांच बहुतेकांचें लक्ष त्याच्याकडे वेधलें.

" या उपाध्ये ! " कोणीं तरी त्याचें उपहासगर्भ स्वागत केलें.

दिगंबर नुसता हसला. त्या हसण्यांत त्या स्वागताचा स्वीकार नसून कारुण्याची छटा होती. 'मी कसला उपाध्या ! कशाला मला उगीच डिवचतां ?' असें त्याला म्हणायचें होतें. पण ते शब्द त्याच्या तोंडून निघाले नाहींत. आपल्या आईशीं जो माणूस धीटपणें आणि मनमोकळेपणें चार शब्द बोलूं शकत नव्हता तो भरल्या मेळाव्यांत कसचें तोंड उघडतो !

लोकांनीं त्याला 'उपाध्ये' म्हटलें तें कांहीं खोटें नव्हतें. कांहीं दिवसांपूर्वीं तो खरोखरच गांवचा उपाध्या अन् चंद्रेश्वराचा पुजारी होता. वंशपरंपरेनें ती वृत्ति त्याच्या घराण्यांत चालत आली होती. पण आतां त्याचें काय ! ती गोष्ट केव्हांच इतिहासजमा झाली होती. त्याचे वडील हरिशास्त्री निवर्तले आणि त्यांच्या पाठोपाठ ती वृत्तीहि दुसऱ्या घरीं गेली—अन्य कोणत्या कारणानें नव्हे तर केवळ दिगंबराच्या ठोंबेपणामुळें ! चंद्रेश्वराची पूजा करायची तर रुद्र आणि षोडशोपचारांचे मंत्र मुखोद्‌गत हवे होते. गांवचें उपाध्येपण सांभाळायचें आणि सगळें हव्यकव्य संपादायचें तर प्रयोगाचे मंत्रतंत्र माहीत असायला हवे होते. पण दिगंबर त्या बाबतींत जड–मूढ निघाला. गेल्या सात पिढ्यांत त्या वंशांत दिगंबर हा असा एकच मुलगा जन्मला कीं, ज्याच्या जिभेवर वेदाक्षर म्हणतात तें कधीं चढलेंच नाहीं.

त्याच्या बापानें त्यासाठीं जंग जंग पछाडलें. किती तरी छड्या त्याच्या पायावर नि पाठीवर ओढल्या. शेंडी धरून त्याचें डोकें खालींवर केलें. परोपरींनीं त्याचा उपहासहि केला. 'दगड झाला असतास तर एखाद्यानें शौचकूपाला तरी बसवलं असतं' असे जिव्हारीं झोंबणरे शब्दहि बोलायला कमी केलें नाहीं. दिगंबराची जिव्हाच जड होती. त्याला वेदाक्षर शुद्ध उच्चारतांच येत नसे. संथा घोक घोक घोकली तरी पाठच होत नसे. अन् पाठ झालें तरी तें दुसऱ्या दिवसाला टिकत नसे.

हें असलें अवचिन्ह पाहिलें कीं हरिशास्त्र्यांच्या अंगाचा भडका होई. ते मग पोराला तर अद्वातद्वा बोलतच अन् शिवाय बायकोलाहि पुष्पांजलि वाहात.

" पोरगा तुझ्या माहेरच्या माणसांच्या वळणावर गेला. तुझ्या वंशांत सगळेच एकाहून एक ' बृहस्पति '. कोणी गाडीवान् तर कोणी नांगऱ्या. तेंच वळण या पोराला आलं. चांगलं तें कधीं यायचं नाहीं. जें अवगुणाचं असेल तें दत्त म्हणून हजर..."

नवऱ्यानें असें माहेर उद्धारलें कीं दिगंबराच्या आईला फणकरा येई. ती मग घरांत आदळआपट करी. पोराला हवी तशी बदडी. त्याला उपाशीं ठेवी. अन् शेवटीं आपण मागच्या दारीं बसून पदरानें डोळे पुशी. आपल्या पोटीं असला पाषाण निपजावा, त्याबद्दल आपल्याला नवऱ्यानें हिणवावें आणि शेजाऱ्यांनीं टोंचावें या गोष्टी तिच्या अंतराला व्यथित करीत. एका परी तिला दिगंबराचा राग येई आणि दुसऱ्या परी त्याचा गांवांत सगळीकडे उपहास होत असलेला पाहून त्याची करुणाहि येई. तिला मंगळागौरीची ती कहाणी आठवे. त्या कहाणींतल्या वांझ बाईला गणपतीनें विचारलें होतें. ' मुलगा शतायुषी हवा असेल तर मूर्ख मिळेल. अल्पायुषी पत्करशील तर विद्वान्, पंडित देईन. ' त्या बाईनें अल्पायुषी पण विद्वान् मुलगा पतकरला होता. दिगंबराच्या आईला ती बाई मोठी शहाणी वाटत होती.

अशी चहूंकडून त्रासली कीं मग दिगंबराची आई चार-चार दिवस त्याच्याशीं अबोला धरी. पोराच्या पानावर भाताचा ठाव वाढून आपण दूर जाऊन बसे. दिगंबर त्या अन्नानें पोटाची खळगी भरी. कारण त्याला भूकच तशी सण-सणून लागे. पण ते अन्नाचे ग्रास गिळतांना त्याला वाटे कीं, या अन्नांत आईच्या मायेचें अमृत नाहीं. कधीं कधीं त्याच्या मनांत येई कीं, आपण घर सोडून कुठें तरी दूर निघून जावें. आपलें हें निरक्षर निर्बुद्ध तोंड कायमचें आईबापांच्या डोळ्यांआड करावें. पण...

दिगंबर त्या गांवांत नि त्या घरांत कसा वाढला तें गांवांतल्या बहुतेकांना माहीत होतें. बापच जिथें त्याचा वेळीं-अवेळीं चारचौघांसमक्ष पाणउतारा करी तिथें इतरांनीं काय म्हणून त्याची भूज राखावी ! आतांसुद्धा देवळांत आल्यावर त्याला पाहून लोकांच्या चर्या उजळल्या, दंतपंक्ति प्रगटल्या, त्या दिगंबराच्या रूपानें करमणुकीला छान विषय मिळाला म्हणूनच.

तो तळ्याच्या पाळीवर जमलेल्या मंडळीपासून थोडा दूर, गुडघ्यांना दोन्ही हातांचा विळखा घालून बसला, तशी चार-पांच टारगट तरुणांचें

टोळकें त्याच्याभोंवतीं जमलें. दिगंबर उगाच भेदरल्यासारखा झाला. त्याला वाटलें, 'कशाला हे लोक माझ्यामागें लागतात! मी त्यांच्या अध्यांत ना मध्यांत.' पण जग दुर्बळाला डिवचून त्यांतच आनंद मानणारें आहे हें त्याला काय ठाऊक!

"काय शास्त्रीबुवा! ठीक आहे ना सगळं?" एकानें त्याला विचारलें.

"अरे, कशाला त्याला शास्त्रीबुवा म्हणून हिणवतोस?" दुसरा साळसूदपणें बोलला.

"वाः! शास्त्रीबुवांचा मुलगा तो शास्त्री असायलाच हवा. तो काय ठोंब्या असूं शकेल?" आणखी एकानें तोंड उघडलें.

"हरिशास्त्री म्हणजे आमच्या गांवांतलं रत्न होतं. बिचारे या दिग्यासाठीं हाय खाऊन मेले." आणखी कोणीतरी सुस्कारा टाकला. कोणी त्याला 'बिडी ओढतोस का?' म्हणून बिडी-काडी पुढें केली. कोणी त्याला 'आज चंदुलाल मारवाड्याचीं किती पोतीं मचव्यावर नेऊन टाकलींस?' म्हणून पुसलें. दिगंबराची अवस्था चक्रव्यूहांतल्या अभिमन्यूसारखी झाली. दिगंबर तीं वेगवेगळ्या मुखांतून बाहेर पडलेलीं वाक्यें ऐकूं लागला. त्या प्रत्येकाचा गर्भितार्थ त्याला कळे. त्याबद्दल अंतरांत प्रतिक्रियाहि होई. त्याच्या काळसर चेहऱ्यावरच्या त्याहून काळ्या डोळ्यांत वेगवेगळे भावहि चमकत. झुपकेदार मिशांखालचा त्याचा ओंठही अधूनमधून लवलव हाले. कांहीं तरी त्याला बोलायचं असे. भोंवतींच्या माणसांना कसलें तरी झणझणीत उत्तर द्यायचें असे. तो आंतल्या आंत शब्दांची जुळणी करी. त्या शब्दांचा अर्थ त्याच्या चेहऱ्यावर उमटल्यासारखा दिसे. पण सरते शेवटीं शब्द मात्र बाहेर पडत नसे. पातळ तवा चुलीवरून उतरतांच ताबडतोब निवावा तशी दिगंबराची अवस्था व्हायची. चमकायच्या आधींच त्याच्या हृदयांतली वीज गुप्त व्हायची. मग त्याच्या डोळ्यांत दिसायचें तें फक्त कारुण्य. चेहऱ्यावर उमटायचा तो फक्त भेणेंभाव!

तसा दिगंबर मुळींच भित्रा नव्हता. तो रात्रीं-बेरात्रीं गांवच्या पाठीमागचा डोंगर एकटा चढून-उतरून येत असे. त्या डोंगरमाथ्यावरच्या वडावर बसणाऱ्या देवचाराला त्यानें कधींच भीक घातली नव्हती. केतकीच्या

बनांतला ओढा अंधारांत उतरून येतांना त्याला सापाचें भय कधींच शिवलें नव्हतें. भाद्रपदांत हिरवें गवत मनसोक्त चरून सर्वांगीं गोटबंद झालेल्या आणि वारुळं उकरीत नि डरकाळ्या फोडीत हुंदडणाऱ्या खोंडाचीं शिंगें चपकन् पकडून तो त्याला एका क्षणांत शरण आणी. त्याच्या निधडेपणाचा अंदाज गांवांत अनेकांनीं घेतला होता. पडत्या प्रसंगीं अनेकांनीं त्याच्या जिवावर उदार होऊन त्यालाच पुढें लोटलें होतें !

पण वाघालाहि न भिणारा दिगंबर माणसांना भीत होता. प्रथम तो बापाच्या डोळ्यांना, त्याच्या छडीला भ्याला. घरीं येणारीं नातेवाईक माणसें त्याच्यावर कावलीं, गुरगुरलीं, त्यांनाहि भ्याला. घरांतून बाहेर पडतांच शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं विद्वत्ता काढली, मुद्दाम होऊन त्याला 'हें म्हण', 'तें म्हण', असें कांहीं तरी म्हणायला सांगितलें, त्यांना तो भ्याला. एखाद्या घरीं जेवायला गेल्यावेळीं यजमानानें त्याला उदक सोडायचा मंत्र उच्चारायला सांगितलें, त्याला तो भ्याला. बाळपणापासूनच त्यानें मानवजातीची दहशत घेतली. चार माणसं समोरून येतांना दिसलीं कीं त्याचें काळीज उगीच गलबलूं लागे. त्यामुळें तो सदैव शक्य तितका एकटा, शक्य तितका बाजूला राही. आजसुद्धां तो चंद्रेश्वराच्या देवळांतल्या सभेला यायला तयार नव्हता ; पण आई त्याला कडाडून बोलली होती.

"मेल्याला चार माणसांत जायलाच नको. भागूबाईसारखा कोपऱ्यांत बसून राहील. जा, ऊठ. सभेला चालता हो. ग्रामस्थांची सभा आहे. सगळ्यांनीं जायला हवं."

दिगंबरला अनेकदां वाटे कीं 'माणसांना असं भिऊन चालणार नाहीं. आपल्यासभोंवतीं माणसंच माणसं आहेत अन् तीं आपल्या जन्माला पुरलीं आहेत. यांना भिऊन आपला निभाव लागायचा नाहीं. 'अरे, तर कां रे' म्हटलंच पाहिजे. कोणी 'रांडेच्या' म्हटलं तर त्याला 'शिंच्या' म्हणून ठणकावलंच पाहिजे ! काय म्हणून मी माणसांना भ्यायचं ?'

कांहीं वर्षांपूर्वीं त्या गांवांत एक दाढीकफनीवाला रामदासी बुवा आला होता. त्यानें आपल्या प्रवचनांत मुलांना उपदेश केला होता. 'मुलांनो, असे काडीपैलवान राहूं नका. मारुतीचा आदर्श पुढें ठेवा. रोज गाईचं दूध

घ्या. सूर्यनमस्कार घाला. म्हणजे तुम्ही बलवान् व्हाल, स्वतंत्र व्हाल, निर्भय व्हाल ! ... '

दिगंबराला तो उपदेश एकदम मानवला. त्याला निर्भय होण्याचें रहस्यच जणूं सांपडलें. गाईचें दूध पिणें त्याच्या हातीं नव्हतें. पण नमस्कार घालायला कांहींच अडचण नव्हती. दुसऱ्या दिवसापासून त्यानें तें व्रत घेतलें. सकाळीं उठून चंद्रेश्वराच्या तळयांत बुडी मारायची आणि सभामंडपांत एका बाजूला कांचा मारून घाम गळेपर्यंत, खालची जमीन भिजेपर्यंत नमस्कार घालायचे. त्याचा हा क्रम आजतागायत अखंड चालू होता. त्या नमस्कारांनीं त्याच्या देहाला सुंदर घाट आणला होता. दंड अन् मांड्या पिळदार बनवल्या होत्या. त्याची ताकद किती तरी वाढवली होती. चंदूलाल मारवाड्याचें पांच मणांचें सुपारीचें पोतें कचकन् उचलून तो पाठीवर घेई आणि अर्धा फर्लांग रस्ता तुडवीत मचव्यावर नेऊन टाकी !

त्याच्या देहांत, शक्तींत एवढा फरक पडला, पण मन मात्र जसेंच्या तसेंच राहिलें. त्याला वाटणारें माणसांचें भय अणुमात्र कमी झालें नाहीं. 'मोठा ताकदवान, पण तितकाच निरुपद्रवी' असें गांवांतले सभ्य लोक त्याच्याबद्दल बोलत. पण हा निरुपद्रवीपणा त्याच्या विचारांतून, तत्त्वज्ञानांतून आला नव्हता ; तर तो भयांतून आला होता, याची त्यांना काय कल्पना !

त्या लोकांनीं दिगंबराला मधें घेऊन घटकाभर विनोद केला, एवढ्यांत खोताची स्वारी देवळाकडे आली. त्यानें डोक्याला रुमाल बांधला होता. उपरण्याचा एक शेव उजव्या खांद्याखालून घेऊन डाव्या खांद्यावर टाकला होता. त्याच्या काळया, लांब कोटांतून घड्याळाचा सोनेरी छडा बाहेर डोकावत होता. चांदीच्या मुठीची काठी टेकीत खालच्या नजरेनें तो चालत होता. ती काठी केवळ शोभेसाठीं नसून आधारासाठींहि होती. कारण तो आतां पिकल्या केसांच्या म्हाताऱ्यांत जमा झाला होता. त्याचें शरीर खंगत चाललें होतें ; पण नाकावरचा राग मात्र जसाच्या तसा होता.

खोताच्या मागोमाग शंकरभट्ट त्याच्या पावलावर पाऊल टाकून येत होता. खोताकडून गांवचें उपाध्येपण आणि चंद्रेश्वराची पूजा मिळाल्यापासून खोत त्याच्या वाट्याला परमेश्वर झाला होता. सडसडीत देहयष्टि, तांबूस गोरा वर्ण,

पातळ—नितळ त्वचा, लांबट चेहरा, डोळयांखालचीं हाडें टोंकदार होऊन वर आलेलीं, असा त्याचा पिंड होता. पातळ मलमलीचा शुभ्र स्वच्छ सदरा घालून त्यानें आपल्या डाव्या खांद्यावर उपरण्याची नुसती घडी टाकलेली होती. सकाळीं लावलेलें कपाळावरचें दुबोटी आडवें गंध अजून जसेंच्या तसें होतें. त्याच्या चालण्यांतली तुरतूर अन् चालतांना हातांची होणारी हालचाल असें सुचवीत होतीं कीं, शंकरभट्ट म्हणजे हरकामांत चलाख माणूस ; त्याला क्षणाची उसंत नाहीं. 'या गांवांतला वसिष्ठ-वामदेव काय तो मीच ' हीं गर्वाक्षरें त्याच्या चेहऱ्यावर स्वच्छ वाचतां येत होतीं.'

खोत आणि शंकरभट्ट या दोघांना एकत्र पाहून दिगंबराच्या पूर्वस्मृती चाळवल्या. शंकरभट्ट हा दिगंबराचा चुलता ; पण त्यानेंच त्याच्या पोटावर पाय दिला होता. दिगंबराचा बाप निवर्तल्यानंतर दोन महिन्यांनीं ती गोष्ट घडली होती. खोताच्या घरीं श्राद्ध होतें ; म्हणून दिगंबर ब्राह्मण गेला होता. खोत सोंवळें नेसून पुढें येऊन बसला होता अन् त्यानें दिगंबराला संकल्प सुरू करायला सांगितलें होतें. 'आपल्याला येत नाहीं ' म्हणून दिगंबर ओशाळत मूकस्तंभ बसला होता. खोताला आश्चर्य वाटलें होतें. 'पूजा तरी येते का ?' म्हणून त्यानें दिगंबराला दुसरा प्रश्न केला होता. दिगंबरानें नकारार्थीं मान हालवली होती. खोत एकाएकीं संतापला होता. त्यानें दिगंबराची ' पाद्यपूजा ' केली होती. आयत्या वेळीं शंकरभट्टाला बोलावून श्राद्ध चालवून घेतलें होतें. आणि जेवण झाल्यावर शंकरभट्टाला तो म्हणाला होता.

" आजपासून गांवचें उपाध्येपण तुमच्याकडे. चंद्रेश्वराची पूजाहि तुम्हांलाच दिली आहे. हरिशास्त्र्यांचा हा दिग्या इतका ठोंब्या असेल याची मला कल्पना नव्हती. यापुढें तुम्ही ही वृत्ति चालवा. "

शंकरभट्टाच्या हर्षाला एकाएकीं उकळया फुटल्या होत्या. त्याचें भाग्य अकल्पितपणें फळफळलें होतें. दिगंबराच्या मठ्ठपणाचा, गांवांत तोच अधिक डांगोरा पिटीत होता, त्याच्याविषयीं लोकमत अधिक विरुद्ध बनवीत होता, त्याचें आज एकाएकीं सार्थक झालें होतें. तो मान ताठ करून घरीं गेला होता आणि दिगंबरानें हिंपुटी होऊन जड पावलांनीं घर गांठलें होतें. ' कां रे, असं तोंडावर काळं कां ओतलं ?' म्हणून आईनें त्याला विचारलें होतें. त्यानें

घडला वृत्तान्त तिला सांगितला होता. त्यावर ती माऊली रामशास्त्री प्रभुण्यांच्या ऐटींत बोलली होती.

"तुला गाढवाला कुणीं सांगितली आहे पूजा अन् वृत्ति! तूं हमालीच करायचीस. लोकांचीं ओझींच उचलायचींस. झालं तें ठीकच झालं..."

आणि खरोखरच त्याला पुढें ओझीं उचलावीं लागलीं होतीं. घरची लहानशी वाडी होती. पण पांच मण सुपारीवर वर्ष कसें निभायचें? त्याच्या अंगीं दुसरी कोणतीहि कला नव्हती. होती ती देहामध्यें न मावणारी ताकद. मग तिचाच त्यानें आसरा घेतला होता. गांवांतलें कोणाचेंहि केवढेंहि ओझें तो घरून समुद्रावर नेत होता अन् समुद्रावरून उतरलेलें घरीं आणीत होता. त्याच्या चरितार्थाचा मुख्य भर आतां हमालीवरच होता.

दिगंबरच्या डोळ्यांपुढून हा स्मृतिपट सरकून जातो एवढ्यांत खोत आणि शंकरभट्ट सभामंडपांत जाऊन स्थानापन्न झाले. बाहेरचे सगळे लोक त्यांच्यामागून भराभर आंत घुसले. चंद्रेश्वराचें आंगण रिकामें झालें अन् देऊळ भरलें. 'या, बसा' असें परस्परांचें स्वागत होऊन सभा स्थिरस्थावर झाल्यावर खोत सभेचा उपक्रम करण्यासाठीं उठून उभे झाले. त्यांनीं एकवार उपरणें सांवरलें, जमलेल्या जनांवर एक धावता दृष्टिक्षेप टाकला, एकदा खाकरून घेतलें आणि हळू पण किंचित् अडखळणाऱ्या आवाजांत भाषण सुरू केलें—

"ग्रामस्थ मंडळी हो, आज ही सभा कशाकरतां बोलावली आहे याची अटकळ तुम्हांला असेलच. माझ्या साठ वर्षांच्या आयुष्यांत मीं कधीं पाहिलं नाहीं, ऐकलं नाहीं असं अवर्षणाचं संकट आज आपल्या गांवावर आणि भोंवतालच्या पंचक्रोशीवर येऊन आदळलं आहे. ज्येष्ठ गेला, आषाढहि संपत आला. पण अजून पावसाचा टिपूससुद्धा नाहीं. आभाळ समुद्रासारखं स्वच्छ, निळं आहे. क्वचित् कुठें ढग दिसला तर वारा त्याला पिटाळून लावतो आणि मग आभाळाकडे लावलेल्या नजरेला दिसतात ते तांबूस–पिवळसर फराटे. रक्तानं रंगलेल्या दुधारी पट्ट्यासारखे ते भयासुर वाटतात. सूर्य बाराहि महिने डोळे उघडून तळपतो अन् आमच्या अंगांत जीवनाचा कांहीं अंश असेल तर तो घामावाटे बाहेर काढतो. रात्रीं स्वच्छ पिठोरी चांदणं

पडतं. आषाढांत शुभ्र चांदणं हें किती अशुभ वाटत असेल तें रात्रीं जागून पहाणाऱ्या माणसालाच कळेल. केळी-पोफळींचीं आगरं वाळलीं. चाऱ्याच्या अभावीं ढोरं उठवणीस आलीं. कित्येकांनीं दाव्यावरच हापका प्राण सोडला. शेतांत अजून नांगर घुसला नाहीं. विहिरी आटल्या. चंद्रेश्वरापुढचं तळंहि खडखडीत झालं. मला भविष्यकाळ मोठा भयानक वाटतो आहे. आतां चार-आठ दिवसांत पाऊस पडलाच पाहिजे. या वर्षीचं पीक गेलंच ; निदान प्यायला पाणी तरी हवं ! आतां आपण सर्व मिळून चंद्रेश्वराला शरण जाऊंया. त्याला निर्वाणीची हाक फोडूं या. आजवर या चंद्रेश्वरानंच आपलं गांव नांदतं-वसतं ठेवलं आहे. गांवावर आलेले अनेक वाखे त्यानेंच चतुःसीमेच्या बाहेर हाकलले आहेत. याहि संकटांतून तोच आपल्याला पार घालील..."

खोताच्या या भाषणानें सभेवर गांभीर्याची गडद छाया पसरली. सुस्काऱ्याशिवाय दुसरें कांहींहि ऐकूं येईनासें झालें. दिगंबर दाराच्या फळी-आड बसून एकतानतेनें तें ऐकत होता. खोताचें एकेक वाक्य जणूं त्याच्या काळजांत घुसत होतें. ऐकतां ऐकतां त्याचे डोळे पाण्यानें भरले अन् त्याला न जुमानतां पाझरले. 'ढोरं उठवणीस आलीं, कित्येकांनीं दाव्यावरच हापका प्राण सोडला' या खोताच्या वाक्यांनीं तर त्याच्या काळजाचा ठावच घेतला. दिगंबरच्या गोठ्यांतला एकुलता एक बैल तणकाडी न मिळाल्यानें जागच्या जागीं हातपाय झाडून मेला होता. आतां रहाटाला कोणाला जुंपायचें, टीचभरच आगर, पण त्याचें शिंपणें कसें करायचें या विवंचनेंत तो होता. त्या ठेंगण्या आणि अंगावर पांढरे ठिपके असलेल्या काळ्या बैलाचें मरण त्यानें जिवाला लावून घेतलें होतें. आणि आतां खोत सांगत होता कीं, आणखी चार-आठ दिवस पाऊस पडला नाहीं तर गांवांतल्या माणसांवरहि तीच पाळी येईल !!

सगळे जलाशय आटले आहेत. सगळा गांव शुष्क झाला आहे. झाडेंमाडें करपून काळीं पडलीं आहेत. माणसें 'पाणी पाणी' म्हणून आकांत करीत आहेत, टाळूला शोष पडल्यामुळें पटापट प्राण सोडीत आहेत. आपलीहि तीच दशा, आपल्या आईचीहि तीच दशा. आपल्या आळींत, पलीकडच्या पाखाडींत, कोळीवाड्यांत, महारवाड्यांत, सगळीकडे मृत्युच थैमान घालतो

आहे! गांव उजाड झाला आहे! नांदतीं नंदाचीं गोकुळें ओस पडलीं आहेत! कावळे, घारी, गिधाडें वरून घिरट्या घालीत आहेत!... असें कांहीं तरी स्मशानदृश्य त्याच्या डोळ्यांपुढें तरळून गेलें आणि बसल्याजागीं त्याचें हृदय कंपित झालें. तो माणसांना घाबरत होता. शक्यतों त्यांचा संसर्ग टाळीत होता. पण पाऊस पडला नाहीं तर भविष्यकाळांत त्यांचा संहार मांडला जाणार आहे, ही कल्पनासुद्धा त्याच्या मृदु-मवाळ अंतःकरणाला सहन होईना.

एवढ्यांत शंकरभट्ट उठून बोलूं लागला.

"उद्यांपासून पांच दिवस अहोरात्र चंद्रेश्वरावर संततधार धरायची. साध्या पाण्याची नव्हे; तर शहाळ्यांतल्या पाण्याची. अखंड रुद्राध्याय गाजवायचा. सगळ्यांवरच हें संकट आहे. तेव्हां सर्व ग्रामस्थांनीं या कामीं मनोभावें सहकार्य केलं पाहिजे. कोणाचे कांहीं द्वेष-मत्सर असतील, कोणाचीं कोणाविषयीं कांहीं किल्मिषं असतील तर तीं विसरून या आपत्प्रसंगीं सर्वांनीं एक झालं पाहिजे. ज्यांना रुद्र येत असेल त्यांनीं अभिषेकासाठीं यावं; नसेल त्यांनीं इतर सगळं साह्य करावं."

दिगंबरानं मान तुकवली. त्याला चुलत्याचं बोलणं एकदम पटलं. मग सर्व योजना ठरली आणि सभा उठली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं देवळांत शंकरभट्टाची सत्ता सुरू झाली. कारण तोच त्या अभिषेककृत्याचा अध्वर्यु होता. सर्वांच्या समक्ष चंद्रेश्वराची पंचामृतपूजा झाली. शिवलिंगावर अभिषेकपात्र लोंबकळलें आणि खोताच्या आगरांतल्या शहाळ्यांच्या पाण्याची पहिली मधुर धार चंद्रेश्वरावर पडली. शंकरभट्टानें रुद्राध्याय सुरू केला—'**नमस्ते रुद्र मन्यव उतोत इषवे नमः**' दिगंबरानें सकाळींच आपल्या आगरांतल्या माडावर चढून पांच शहाळीं काढलीं होतीं आणि त्यांचें तांब्याभर पाणी देवळांत आणलें होतें. तें उपायन घेऊन तो गाभाऱ्याच्या दरवाज्यांत उभा राहिला. शंकरभट्टानें पाणी आपल्यादेखत अभिषेकपात्रांत ओतावें अशी त्याची अपेक्षा होती. पण शंकरभट्टानें त्याच्याकडे तुच्छतेनें पाहिलें आणि म्हटलें.

"ठेव तो तांब्या तिथें!"

आणि मग दिगंबराला लोकांनीं कामासाठीं बाहेर ओढलें. कामाच्या वेळेला सगळ्यांना त्याचीच प्रथम आठवण होई. तो अनेकांच्या बरोबर अनेक आगरांतून

हिंडला. अनेक माडांवर चढून त्यानें नारळांच्या पेंडी तोडून खालीं टाकल्या. त्या आपल्या डोक्यावर वाहून देवळापुढें आणल्या. ते नारळ कोयत्यानें फोडून त्यांचें पाणी घंगाळांत जमा केलें. संध्याकाळ होईपर्यंत तो अगदीं थकून गेला. त्याच्या दोन्ही हातांतून रक्त फुटायची वेळ आली. माडांच्या अंगाला घासून पोट खरचटलें. पायांचे तळवे लाल झाले. तो हे छाती फोडणारे श्रम मोठ्या श्रद्धेनें करीत होता. गांवाचें भलें व्हावें, आपलेंहि भलें व्हावें म्हणून करीत होता. शंकरभट्टानें एखाद्याला कांहीं काम सांगितलें कीं, जो तो ' दिग्या दिग्या, पळ, तेवढं जरा करून ये ', म्हणून त्यालाच पुढें ढकलीत होता. पण एवढं असूनहि त्याच्याविषयीं कौतुकाचा, कृतज्ञतेचा शब्द कोणाच्या तोंडून निघेल तर शपथ ! लोकांना वाटे, दिग्या रेड्यासारखा माजला आहे; त्याच्या मांसाच्या गोळ्यांचा दुसरा काय उपयोग ! '

घरांतसुद्धा जिथें त्याचें कौतुक नव्हतें, त्याच्या श्रमांची कदर नव्हती, तिथें बाहेर कोण कदर करणार ! एखाद्या दिवशीं तो चंदूलाल मारवाड्याचीं पोतीं वाहून, चार पांढरीं नाणीं कडोसरीला लावून घरीं येई अन् ' हुश्श ' करून झोपाळ्यावर अंग टाकी. त्याला तशा स्थितींत पाहून आईला त्याची कीव येई. पण त्याच वेळीं घृणाहि वाटे. ती म्हणे.

" कोणाला दाखवतोस ' हाश्श हुश्श ' करून ? चार अक्षरं शिकला असतास तर देवळांत सावलीला बसून उपजीविका नसती का चालली ! अन् तीं पुन्हा मानानं, प्रतिष्ठेनं. पण... ' ते ' तुझी हाय खाऊन गेलेच. आतां मला जन्मभर दुःखं गाळायला लाव... "

चंद्रेश्वरावर संततधार सुरू झाल्यावर पहिल्या–दुसऱ्या दिवशीं पाऊस पडता, तर दिगंबरचे केलेले श्रम सार्थकीं लागले असते आणि पुढचे वाचले असते. लोक आकाशाकडे डोळे लावून होते. एखादा चोरटा. धूसर ढग आभाळांत दिसला कीं लोकांना वाटे, ' चंद्रेश्वर पावणार. आतां हाच ढग वाढेल, मोठा होईल, आकाश कोंडून टाकील, अधिक अधिक काळा अन् जड होत जाईल अन्... ' पण पाहतां पाहतां तो अनंतांत विरून जाई. लोक आपले डोळे खालीं करीत. ' अरे ढग ! ' असें कोणी तरी म्हटलें कीं पुन्हा मान वर करीत. त्या गांवाचें सत्त्व पणाला लागलें होतें. सगळे ग्रामस्थ आशा–निराशेच्या झोल्यावर झुलत होते.

चार दिवस गेले. पांचव्या दिवशींचा सूर्य प्रखरपणें तळपूं लागला. तेव्हां गांवांतली अस्वस्थता शिगेला पोंचली. जो तो देवळांत येऊन डळमळणाऱ्या श्रद्धेनें विचारूं लागला, 'शंकरभट्ट! कुठें आहे पाऊस? कसलं तुमचं अनुष्ठान!' शंकरभट्ट गेले चार दिवस सांगत राहिला होता. 'पडेल, पाऊस नक्की पडेल. आमचं अनुष्ठान फुकट जायचं नाहीं. तुम्ही पहाच प्रचीति.' पण आज त्याच शंकरभट्टाच्या तोंडून शब्द उमटत नव्हता. कोणीं विचारलं कीं तो सुस्कारा सोडी अन् तोंड वळवी. अनुष्ठानाच्या मुदतींत वृष्टि झाली असती तर शंकरभट्टाचं महत्त्व त्या गांवांत भलतंच वाढणार होतं. गांवावरच्या पावसाबरोबरच त्याच्यावरहि अभिनंदनाची वृष्टि होणार होती. तींच सुखस्वप्नें तो जागेपणीं पहात होता. पण ...

त्या दिवशीं संध्याकाळीं पुन्हा दुसरी सभा भरली. तिचें वातावरण कमालीचें गंभीर होतें. लोकांना निराशेनें ग्रासून टाकलें होतें. प्रत्येकाच्या मुद्रेवर भवितव्याची चिंता ठसा उमटल्यागत दिसत होती. खोत जेव्हां बोलायला उभा राहिला, तेव्हां तो आतां काय सांगतो याकडे सर्वांनीं जिवाचे कान केले होते. खोताचेंहि मन खिन्न झालें होतें. त्याच्या वाणींतलें बळ लोपलें होतें. त्यानें कसें बसें बोलणें सुरू केलें.

"ग्रामस्थ मंडळी, आज पांच दिवस आपण देवावर संततधार धरली. पण अजून तो प्रसन्न होत नाहीं. अजून त्याला आमची करुणा येत नाहीं. श्रियाळाचं सत्त्व पाहिलं, महानंदेचं सत्त्व पाहिलं, तसं त्यानं आमचंहि सत्त्व पहायचं ठरवलेलं दिसतं ..."

आणि खोताचा कंठ गहिंवरला. त्याच्या तोंडून शब्दच निघेना. त्याच वेळीं सभामंडपाच्या एका कोपऱ्यांतून कोणाचा तरी दुःखावेग बाहेर फुटला. लोक चमकून पहातात तों दिगंबर रडतो आहे! दुसरा हुंदका निघूं नये म्हणून तोंडांत पंचाचा बोळा कोंबतो आहे! कोणी तरी लगेच म्हणालें, 'हा रांडेच्या! या मूर्खाला काय झालं गळा काढायला!' आणखीहि कोणी कांहीं तरी बोललें असतें. पण एवढ्यांत खोतानें आपलें रुद्ध झालेलें भाषण डोळे टिपून पुन्हां सुरू केलें—

"आज पाऊस पडला तर ठीक; न पेक्षां उद्या सकाळीं निर्वाणीचा उपाय योजायचा. याच सभामंडपांत उत्तरेच्या अंगाला तो जो चौथरा दिसतो

त्याच्या खालीं एक कुंड आहे. त्याचं नांव पर्जन्यकुंड. गांवांतल्या आबाल-वृद्धांना तें ठाऊक आहे. उद्यां सकाळीं तें पर्जन्यकुंड उघडायचं आणि त्यांत इंद्रदेवतेला उद्देशून स्वाहाकार सुरू करायचा. गेल्या दोनशें वर्षांत हें कुंड तीनदां उघडलं गेलं आणि त्यामुळें सपाटून पाऊस पडून आबादी-आबाद झाली असा कागदोपत्रीं पुरावा सांपडतो. हा उपाय शेवटचा आहे. तो सफल होईल अशी तुम्हीं खात्री बाळगा. इतिहासाची पुनरावृत्ति होते म्हणतात. या प्रसंगीं कुंड उघडणं अन् पाऊस पडणं अशा दोन्ही अंगांनीं ती होऊं दे, अशी आपण चंद्रेश्वराला अनन्यभावें प्रार्थना करूं या!"

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सगळें गांव देवळाकडे लोटलें. शंकरभट्टानें प्रथम चंद्रेश्वराची षोडशोपचारें पूजा केली. मग खोताकडून पुण्याहवाचन करविलें. नंतर त्या कुंडाचीहि पूजा करण्यांत आली. त्याच्या शेजारीं ठेवलेल्या कुदळी-लाहि हळदकुंकू इत्यादि उपचार मिळाले. तें कुंड आतां सगळया गांवाच्या दृष्टीचा आणि भावनेचा एकमेव विषय झालें होतें. एवढें झाल्यावर खोतानें देवापुढें नारळ ठेवला. सर्वांनीं उभें राहून चंद्रेश्वराची प्रार्थना केली.

"देवा चंद्रेश्वरा! गांवाचं सगळं कल्याण–मंगल तुझ्या हातीं आहे. तुझ्या आज्ञेनेंच आम्ही आज पर्जन्यकुंड उघडीत आहों. तूं करुणाघन आहेस. आमच्यावर तुझ्या कृपेचा पाऊस पडूं दे!"

मग सर्व मंडळी चंद्रेश्वराचा जयजयकार करून परत आपापल्या स्थानावर बसली. खोतहि खांबाला टेकून बसला. आतां पर्जन्यकुंडावर पहिली कुदळ कोणाची पडते म्हणून लोक टकामकां पाहूं लागले. एवढ्यांत खोतानें 'शंकरभट्ट!' म्हणून हांक मारली. तो गाभाऱ्यांतून बाहेर आला. त्यानें त्याला सांगितलें.

"ती कुदळ घ्या अन् कुंड उघडा. तुमची पहिली कुदळ बसली कीं मग बाकीचे लोक भराभर माती उपसतील."

"मी कुदळ मारूं?...... मी?" शंकरभट्टानें चमकून विचारलें.

"होय तुम्ही! गांवचा उपाध्या आणि देवाचा पुजारी याचं तें काम आहे. कागदोपत्रीं तसा दाखला मिळतो." खोत म्हणाला.

शंकरभट्टाची पांचांवर धारण बसली. तो एकाएकीं थिजल्यासारखा झाला. त्याला वाटलें होतें कीं, खोत गांवांतला मुख्य असल्यामुळें तोच कुंड उघडील. पण ही बलामत तर त्याच्याच अंगावर फुटली होती. तो कांहीं हालचाल न करतां नुसताच उभा आहे हें पाहून खोत जरा चढ्या स्वरांत बोलला—

" अहो, उभे काय राहिलांत ? आटपा लवकर. पुढच्या कामाला उशीर होतोय. "

सगळ्या सभेचे डोळे शंकरभट्टावर लागले. तो भरल्या सभेंतून वाट काढीत कुंडाजवळ जाऊं लागला. जसा कांहीं कोणी बळी द्यायलाच काढला आहे. कुंडाकडे जाऊन त्यानें त्या पूजा केलेल्या कुदळीला हात घातला. पण ती त्याला उचलेचना. तिचा नुसता दांडा हातीं धरून तो उभा राहिला. त्याच्या हातापायांना कंप सुटला. सर्वांग घामानें निथळलें. चेहरा पांढरा फटफटीत पडला. पाहतां पाहतां त्याचे ओठ विवर्ण झाले. डोळ्यांतलें तेज जणूं कोणीं तरी काढून नेलें.

त्याच्यावर अशी प्रेतकळा कां आली हें त्या सभेला समजलें, खोताला समजलें आणि दूर बसलेल्या दिगंबरालाहि समजलें ! कुंड उपसण्यासाठीं जो पहिला कुदळीचा घाव घालील तो तीन महिन्यांत मरतो अशी पर्जन्यकुंडाविषयींची आख्यायिका सगळ्या गांवाला ठाऊक होती. तें मरण आतां शंकरभट्टावर ओढवलें हें प्रत्येकानें मनोमन जाणलें होतें. शंकरभट्ट मृतवत् झाला होता तो त्याचसाठीं.

" अहो, बघत काय राहिलांत ? उचला ती कुदळ ! " खोत एकाएकीं ओरडला. त्या चित्रासारख्या स्तब्ध झालेल्या सभेच्या हृदयावर ते शब्द कुदळीच्या प्रहारासारखेच आदळले. प्रत्येकाच्या आत्म्यावर त्या प्रसंगाचें असह्य असें दडपण पडलें. प्रत्येकाचे कान, डोळे उघडे होते ; पण श्वास मात्र रुद्ध झाला होता. शंकरभट्टाचे ओंठ हालत होते. जीभ आंतल्या आंत चळवळत होती. तो कांहीं तरी बोलूं इच्छीत होता. आणि तो काय बोलतो तें ऐकण्यासाठीं सर्वांनीं कान टवकारले होते.

" नाहीं ! ...माझ्याच्यानं हें होणार नाहीं ! " शंकरभट्टानें निर्जीव शब्द उच्चारून हात जोडले.

" होणार नाहीं कसं ? झालंच पाहिजे." खोत गरजला. पाठोपाठ 'झालंच पाहिजे, झालंच पाहिजे ' असा चारी कोपऱ्यांतून प्रतिध्वनि उठला.

" देवाची जमीन उपभोगायला बरं वाटतं. एकादष्णीची दाक्षिणा उपटायला हात पुढें होतो. अन् आतां कुंड उघडायच्या वेळीं मात्र हात मागें, नाहीं का ? " एका निर्भीड, स्पष्टवक्त्या माणसानें त्याला रोखठोक सवाल टाकला.

" मला देवाची पूजा नको. गांवचं उपाध्येपणहि नको. मी तें या क्षणीं सोडून देतों. पण मला माफ करा. " शंकरभट्टानें पुन्हा हात जोडून गयावया केलें.

" या आणीबाणीच्या प्रसंगीं तें तुम्हांला सोडतां येणार नाहीं. गांव लागलं आहे मृत्युपंथाला अन् तुम्ही भलत्यासलत्या आशंका मनांत आणून कच खातां ? शंकरभट्ट, हेंच का तुमचं पांडित्य ! हाच का वेदान्त... " खोतानें त्याला खोचून विचारलें.

शंकरभट्टाला वाटलें कीं, इथून बाहेर उडी घ्यावी अन् जगाच्या अंतापर्यंत पळत सुटावें. पण त्यानें पाहिलें कीं, आपल्याभोंवतीं लोकांचें कडें आहे. आपल्याला पळतां येणार नाहीं. मग त्यानें आपल्या हाताकडे पाहिलें. पण तो शिळेसारखा जड झाला होता. चैतन्य म्हणून म्हणतात त्याचा अंशसुद्धा त्याच्या शरीरांत राहिला नव्हता. त्याच्या रूपानें तिथें जणूं एक शुष्क काष्ठ उभें होतें.

हा प्रकार दिगंबर 'आ' वासून पहात होता. त्याला मग रहावलें नाहीं. 'आंतुलिया ऊर्मीच्या बळें' तो उठला अन् लोकांच्या खांद्यांवर हात ठेवीत, वाट काढीत, कुंडाच्या रोखानें निघाला. 'ए, येडपटा, तूं कुठें निघालास ?' कोणीं तरी त्याला विचारलें. पण ते शब्द त्याला ऐकूंच आले नाहींत. आतां सभेचे नेत्र त्याच्यावर जडले. सरळ कुंडाकडे जाऊन त्यानें शंकरभट्टाला म्हटलें—

" काका ! द्या ती कुदळ इकडे. "

काकाला हात कुठें होते ती घ्यायला? त्यानेंच ती त्याच्या हातून काढून घेतली. विद्वान् चुलत्याच्या शेजारीं निरक्षर मूर्ख पुतण्या उभा राहिला. सभेकडे तोंड करून; निश्चल अन् निष्कंप! त्याला कुदळ उचलायचा धीर होता; पण बोलायचा नव्हता. पण तरीहि त्याला कांहीं तरी बोलायचें होतें. त्यानें तोंड उघडलें; पण जीभ अडखळूं लागली.

"म...म...म...माझा काय उपयोग आहे या जगांत! मी नुसता दगड आहें...म...म मी मेलों तरी चालेल...पण गांव जगूं दे!"

हा एकाएकीं काय चमत्कार होतो आहे, याचा क्षणभर त्या सभेला बोधच झाला नाहीं. दिगंबराचे अडखळते शब्द सर्वांना ऐकूं गेले; पण त्यांचा पुरेसा अर्थ समजायच्या आंतच त्याच्या हातांतली कुदळ वर जातांना दिसली. आतां कुंडावर घाव बसणार, एवढ्यांत दिगंबराचा हात एकाएकीं थांबला. त्याच्या डोळ्यांत सरसरून अश्रू येत आहेत हें लोकांनीं पाहिलें. पण ते खालीं ओघळायच्या आंत त्यानें टिपले आणि खोताच्या दृष्टीला दृष्टि भिडवून म्हटलें.

"खोत...माझ्या आईला सांभाळाऽऽ!"

दिगंबराचें तें वाक्य सभेच्या काळजांत घुसलें! सर्वदिशीं सर्वांच्या अंगावर रोमांच उभे झाले. काळ्या पाषाणाला पाझर फोडण्याची ताकद त्या शब्दांत होती. त्यामुळें अनेकांचीं अंतःकरणें द्रवलीं आणि डोळ्यांवाटें झिरपलीं. सामुदायिक करुणरसाचा जणूं एक धबधबाच त्या सभामंडपांत कोसळला. दिगंबराच्या रूपानें सभेला तिथें चंद्रेश्वरच दिसूं लागला. आणि त्याच क्षणीं त्याच्या कुदळीचा घाव त्या कुंडावर पडला.

"शाबास दिगंबर!" चहूं बाजूंनीं आरोळी उठली. त्याच्याबरोबरचे जवान उठून कुंडाकडे धावले. त्यांनीं दिगंबराच्या हातांतली कुदळ काढून घेतली. यानें चार घाव, त्यानें चार घाव असें करून तें कुंड तळापर्यंत खोदलें. माती उपसणाऱ्याच्या हाताला तळाशीं भस्म लागलें. तें पांची बोटांनीं उचलून त्यानें दिगंबराच्या कपाळीं फासलें. दुसऱ्या कोणी तरी चंद्रेश्वराच्या प्रसादाची माळ आणून त्याच्या गळ्यांत घातली. दिगंबर देवासारखा दर्शनीय दिसूं लागला.

त्याचें काम झालें होतें. त्याला आतां त्या जनसंमर्दांतून बाहेर पडायचें होतें. कुठें तरी मोकळ्यावर नेऊन जीव घालायचा होता. कोंडलेला श्वास मोकळा करायचा होता. पण त्याला तिथून कोण जाऊं देणार! आतां तो असामान्य पुरुष झाला होता ना! तरुणांनीं त्याला खांद्यावर घेऊन नाचवलें. कोणीं त्याच्यावर फुलें उधळलीं. कोणी देवावरचा हार आणून त्याच्या गळ्यांत घातला. कोणीं आपल्या डोक्याचा रुमाल त्याला बांधला. कोणीं आपल्या खांद्यावरची शाल त्याच्या पाठीवर घातली. पुरुषांतून कसाबसा सुटला तर बायकांनीं त्याच्याभोंवतीं कडें केलें. कोणीं त्याला फुलें वाहिलीं, तर कोणी त्याच्या पायांवर मस्तक ठेवलें. त्या ग्रामस्थांची त्याच्याविषयींची भावनाच बदलली. त्याचें मूढपण हें वरवरचें आहे, केवळ दाखवण्यासाठीं आहे अन् आंतून तो जडभरतासारखा कोणी तरी योगभ्रष्ट पुण्यात्मा आहे अशी पोथ्यापुराणें ऐकणाऱ्या लोकांनीं कल्पना करून घेतली. जिकडेतिकडे एकच शब्द वातावरणांत निनादूं लागला.

" दिगंबर...दिगंबर...दिगंबर... ! "

दिगंबरला हें सगळें असह्य झालें. त्याचा जीव गुदमरला. लोक आपल्या नांवाचा उद्घोष कां करतात, आपल्याभोंवतीं गर्दी कां करतात, तें त्याला समजेना. त्याला आजवर एकच गोष्ट ऐकून ठाऊक होती आणि ती म्हणजे उपहास! त्यामुळें त्या प्रशंसेनें आणि त्या जयघोषानें तो गडबडून गेला. पारध्यांनीं कोंडी केलेल्या हरणासारखी त्याची अवस्था झाली. तो रडवेला झाला आणि सुटकेचा मार्ग शोधूं लागला.

आपल्या पोरानें पर्जन्यकुंड उघडलें ही बातमी त्याच्या आईला कळली. ती धावतच देवळाकडे जायला निघाली. ती घाईघाईनें निघालेली पाहून तिच्यामागून आणखी कांहीं बायका निघाल्या. दिगंबराप्रमाणेंच ती म्हातारीहि आतां ग्रामस्थांच्या कौतुकाचा विषय झाली होती. ती रस्त्यावरून देवळाच्या प्राकारांत शिरलेली दिसली मात्र; दिगंबर सगळ्या लोकांचें कडें फोडून बाणासारखा तिच्याकडे धावला.

" आईऽऽ! हे बघ लोक कसे माझ्या पाठीस लागले आहेत. "

तो जवळ आलेला पाहतांच 'येरे माझ्या राजाऽऽ' म्हणून त्या माउलीनें त्याला मिठी मारली. तिला काय झालें होतें ! सुख का दुःख ! हर्ष का शोक ? नक्की कोण सांगणार ! पण तिच्या भावना एकांगी नसून मिश्र आहेत असें तिच्या मुद्रेवरून दिसत होतें. लोक आपल्या पोराचा जयजयकार करीत आहेत हें ती ऐकत होती. 'माझा मुलगा' असें अभिमानानें सांगावें असें काहीं तरी भव्य, दिव्य त्यानें आज केलें होतें. तिनें केवळ दिगंबराच्या रूपानें एक दगडच जन्माला घातला नव्हता. तो मनुष्य होता. सामान्य नव्हे; तर गांवासाठीं जिवावर उदार होणारा...पण आतां त्याचें पुढें काय होणार ! पुन्हा तिला ती मंगळागौरीची कहाणी आठवली. अल्पायुषी पण कीर्तिमान् मुलगा...तिच्या डोळ्यांतून अश्रूंचा खळाळ सुरू झाला. आई रडते हें पाहून दिगंबराचेहि नेत्र पाझरूं लागले. माय-लेकरांचे अश्रू एकमेकांत मिसळून जमिनीवर टपटपूं लागले. ती दृढ मिठी आणि तो अश्रुवर्षाव !

लोकांनीं तें दृश्य अष्टौभावें उचंबळून पाहिलें. त्यांना वाटलें कीं, हा पाऊस वरच्या पावसाला नक्की खेंचून आणील. या मंगलाश्रूंनीं आतां अवर्षण संपलें ! गांवावरची अलाबला गेली ! !

BVBK-0404563
संग्रहालय
अनु. २९६५९
क्रमांक २०२९
नों. दि. ३।७।६९
दा. क. ७५६३